मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४५६/०२

श्री.हेमंत विसनजी ट्रस्ट अपिलकर्ता
लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट
९ वॉलेस स्ट्रीट रोड,
फोर्ट,मुंबई ०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त उत्तरवादी
झोन-९ वांद्रे (पश्चिम)मुंबई ५०

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलिस
आयुक्त, पश्चिम प्रादेशिक नियंत्रण कक्ष,
कार्टर रोड, बांद्रा पश्चिम, मुंबई- ५०

-विवेचन-

श्री.हेमंत विसनजी ट्रस्टी, लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट यांना त्यांच्या दि.२ ऑगस्ट २००८ रोजीच्या अर्जानुसार त्यांची "सामना" व "लोकमत" या दैनिकपत्रात दि.१ ऑगस्ट २००८ रोजीच्या त्यांच्या अटकेसंबंधी जी बातमी आली होती. त्या संदर्भात A to H या ८ मुद्दयांवर माहिती पाहिजे होती. ही माहिती अर्जदारास दि.३.९.२००८ रोजी पोस्टाने पाठविण्यांत आली. मात्र माहितीने समाधान न झाल्यामुळे त्यांना दि.१० डिसेंबर २००८ केलेल्या प्रथम अपिलावर निर्णय देताना दिलेली माहिती समाधानकारक आहे असा निष्कर्ष काढून दि.७.१.२००९ रोजीच्या आदेशाने अपिल फेटाळून लावण्यांत आल्याने अर्जदाराने आयोगाकडे दि.२७.१.२००९ अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.८ जुलै २००९ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर पोलिस स्टेशनला असलेली सर्व माहिती अर्जदारास देण्यांत आलेली आहे असे स्पष्ट झाले. वर्तमानपत्रात प्रकाशित करण्यांत आलेल्या बातमीच्या सत्यतेबाबत पोलिस स्टेशनच्या अभिलेख्यावर कागदपत्र उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबत माहिती दिलेली नाही.

दि. ११ जुलै २००८ रोजीच्या एफ.आय.आर.बाबत माहिती देताना जन माहिती अधिका-यानी सुनावणीच्यावेळी हे स्पष्ट केले की, "अंधेरी पोलिस ठाण्याने दि.११.२.२००८ रोजी चिनॉय कॉलेज व एमव्हीएलयु कॉलेजच्या प्रिन्सिपॉल यांचे विरोधात सरकारी कामात अडथळा निर्माण केला म्हणून गुन्हा क्र.३०७/०८ कलम ३५३ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यांत आलेला असून सदरबाबतची एफ.आय.आर.ची कॉपी अर्जदार यांना देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणात पोलिसांनी तपास पूर्ण करुन आरोपीविरुध्द सबळपुराव्यानिशी न्यायालयात सर्व कागदपत्रांसह दोषारोपपत्र सादर केलेले असल्यामुळे सदरचा गुन्हा सध्या न्यायप्रविष्ठ आहे. "

त्यामुळे अर्जदारास रेकॉर्डवर उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे असे दिसून आले. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ८ जुलै २००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मुंबई - ३२

आदेश क्र. मुमाआ-२००९/ /अपील क्र.४४४४ /०२

श्रीमती जयश्री शेखर नार्वेकर, ------- अपिलार्थी
१४१युगधर्म को.हौ.सोसायटी
इन ऑर्बिट मॉल समोर,
गोरेगांव (प)मुंबई ४०० १०४

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ------- उत्तरवादी
पोलस उपआयुक्त परिमंडळ-९
हिल रोड बांद्रा पश्चिम
मुंबई ४०० ०५०

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलिस आयुक्त,
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,
बांद्रा (प)मुंबई ४०० ०५०

-- विवेचन --

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: दि.२२.१२.२००८ चा माहितीचा अर्ज
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	:दि.४.२.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	:दि.२७.१.२००९
प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	:दि.६.२.२००९
द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	:दि.४.५.२००९

सुनावणीचा दिनांक : ८ जुलै २००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :श्री.संतोष महिपत घाग, पो.उप निरिक्षक यांच्या विरुध्द त्यांच्या पत्नीने नोंदविलेल्या तक्रारी, श्रीमती सुरभी चटर्जी यांच्या विरुध्द हिमगौरी को.हौ.सो.च्या

पदाधिक-यांनी नोंदविलेल्या तक्रारी व काही जावक क्रमांक देउुन त्यावरील अहवाल इ.ची विचारणा केली.

जन माहिती अधिकारी यांचे उत्तर : सदर बाबतची माती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (ज)अन्वये यातील तरतूदीस अनुसरुन अर्जदारांना देय असलेली माहिती देता येत नाही.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

अपिलार्थी यांना समाधानकारक माहिती दिलेली नाही. सदर प्रकरणी विहित वेळेत माहिती दिलेली नसल्याने संबंधितांविरुध्द माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील कलम २० (२)नुसार शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

सुनावणी दिनांक ९.२.२००९ रोजी ११.३० वाजता

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

सुनावणीच्यावेळी निदर्शनास आले की, अर्जदार यांना उपलब्ध असलेली माहिती म्हणजे ठाणे दैनंदिनीची प्रत याप्रमाणे दिलेली आहे. परंतू उर्वरित माहिती नमूद जावक क्रमांकाच्या पत्राची प्रत ठाण्याच्या अभिलेख्यावर नसल्याने ती देण्यांत आलेली नाही. रेकॉर्डलाच माहिती नसल्यामुळे ती देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. या संदर्भात प्रथम अपिलीय आदेशात संबंधिताविरुध्द शिस्तभंगाची कारवाई कां करण्यांत येऊ नये, असे आदेश अपिलीय अधिकारी यांनी या अगोदरच दिलेले आहेत. त्यानुसार ३ महिन्याच्या आत कार्यवाही करुन अनुपालन अहवाल आयोगाकडे पाठवावा

आदेश : अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

आयोगाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी या आदेशाची प्रत पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांनाही पाठविण्यांत यावी.

मुंबई
दिनांक: ८.७.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मुंबई - ३२

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.४४४५ व ४४४६/०२

श्री.राजेंद्रकुमार राजाराम गावडे **-------** **अपिलार्थी**
डी-६३ सरिता, विश्वकर्मा नगर,
मुलूंड पश्चिम मुंबई ४०० ०८०

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक **-------** **उत्तरवादी**
सहकारी संस्था मुंबई(१)शहर,
मल्होत्रा हाऊस ६ वा मजला,
जीपीओ समोर फोर्ट, मुंबई ४०० ००१

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था मुंबई(१)शहर,
मल्होत्रा हाऊस ६ वा मजला,
जीपीओ समोर फोर्ट, मुंबई ४०० ००१

-- विवेचन --

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: दि.९.१.२००९
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: आदेश/माहिती दिलेली नाही
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	:दि.६.३.२००९
प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	:दि.२५.३.२००९
द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	:दि.२९.४.२००९

सुनावणीचा दिनांक : ८ जुलै २००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :दारुवालावाडी को.ऑप हौसिंग सोसयटी या संस्थेच्या व्यवस्थापक समितीची निवडणूक, व्यवस्थापक समितीने ठेवलेल्या बंधपत्राची इ. च्या माहितीची विचारणा अपिल क्र.४४४५ अन्वये व ४४४६अन्वये व्यवस्थापक समितीच्या सभेचे इतिवृत्त वगैरे माहिती मागितलेली आहे.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर :जन माहिती अधिकारी यांनी कुठलेही आदेश/माहिती दिली नसल्याचे अपिलार्थी यांनी नमूद केले आहे.
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :अपिलार्थी श्री.गावडे यांनी दाखल केलेले प्रथम अपील मान्य करण्यांत आले. खर्चाबाबत आदेश नाहीत.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : माहिती जन माहिती अधिकारी कार्यालयातील नव्हती. तर गृह निर्माण सोसायटीकडे होती अर्जदारास दि.२८.४.२००९ रोजीच्या पत्रांनी उपनिबंधक तथा जन माहिती अधिकारी यांनी कळविले की,हवी असलेली माहिती दारुवाला वाडी सोसायटीकडून प्राप्त झाली आहे व अर्जदारांने ती शुल्क भरुन घेऊन जावी. पण अर्जदाराने अजुनहि माहिती नेलेली नाही. अर्जदार अपिल सुनावणीचेवेळी गैरहजर असल्याने त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही.

आदेश : अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

अर्जदाराने हवे तर जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

मुंबई
दिनांक: ८.७.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/६७०/०२

श्री.तुळशीराम लक्ष्मण नाईक, अपिलकर्ता
मु.नळवे खु.पो.करजकुपे ता.
जि.नंदुरबार.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अपर पोलिस अधिक्षक उत्तरवादी
झोन-९ वांद्रे (पश्चिम)मुंबई ५०

जन माहिती अधिकारी तथा पोलिस अधिक्षक
नंदुरबार तालुका पोलीस स्टेशन

-विवेचन-

अपिलकार श्री.तुळशीराम लक्ष्मण नाईक, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोग, यांच्याकडे दि.२१.३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२६.५.२००९ रोजी धुळे येथे आयोजित करण्यांत आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

श्री.तुळशीराम लक्ष्मण नाईक, यांनी कलम २०२ (२) व १५६ (३)प्रमाणे न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, नंदूरबार यांचे आदेशान्वये दि.२४.५.२००८ व दि.२७.७.२००८ अन्वये १५६ (३) च्या जाबजबाबाच्या नोंदी व दैनंदिन नोंदवहीची प्रत मिळण्याबाबत दि.१.१.२००९ रोजी अर्ज केला होता. त्यावर विभागीय आयुक्त, नाशिक कार्यालयाने सदर अर्ज त्यांच्याशी संबंधित नसल्याचे अर्जदाराला दि.१२.१.२००९च्या पत्रान्वये कळविले. त्यावर अपिलार्थीने विभागीय आयुक्त, नासिक यांच्याकडे व्दितीय अपील केले. अपिलीय प्राधिकारी, विभागीय आयुक्त, कार्यालय, नासिक यांनी सदर अर्ज त्यांच्याशी संबंधित नसल्याचे नमूद करुन दि.२.३.२००९ च्या आदेशान्वये सदर अपील फेटाळले.

त्यानंतर श्री.नाईक यांनी पोलिस अधिक्षक, नंदूरबार कार्यालय, या ठिकाणी दि.५.११.२००८ रोजी अर्ज करुन माहितीची मागणी केली. सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी मागविलेली माहिती कोर्टाकडून उपलब्ध करुन घेण्याबाबत अर्जदारास कळविले. त्यावर अर्जदार यांनी अप्पर पोलिस अधिक्षक व अपीलीय प्राधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलीय प्राधिकारी यांनी सदर माहिती न्यायालयाकडून घेण्याबाबत कळविली. त्यामुळे व्यथित होऊन अर्जदाराने दि.२१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांच्याकडे व्दितीय अपील केले.

अपिलीकाराने मागविलेल्या माहितीच्या प्रती पोलिस विभागास न्यायालयाकडून आता प्राप्त झाल्या असल्याचे सुनावणीच्या वेळी सांगण्यांत आले. हे पाहता अपिलकाराच्या मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती अपीलकारास दिवसांच्या आत पुरविण्यांत यावी.

त्यामुळे अर्जदारास रेकॉर्डवर उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे असे दिसून आले. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल मान्य करण्यांत येत आहे. उपनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक ८ जुलै २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/७३०/०२

श्री.शोभाचंद माधवलाल नौलखा अपिलकर्ता
मु.पो.देवधर ता.मालेगांव,जि.नासिक

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा तहसिलदार उत्तरवादी
मालेगांव जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
मालेगांव उप विभाग, मालेगांव

-विवेचन-

अपिलाचा दिनांक ३१.१२.२००८
सुनावणीचा दिनांक २४.६.२००९
अपिलार्थी - उपस्थित
जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित.
अपिलार्थीनी दि.१३.६.२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

सन १९७६ नंतर, मौजे देवघर, तालुका मालेगांव येथील सरला सोनु सांळुके, दिलीप सोनु साळुंके, सुभाष सोनु साळुंके यांनी आदिवासी असल्याचे प्रमाणपत्र मिळाले या विषयी सर्व कागदपत्रे तसेच जातीच्या दाखल्याच्या नकला.

यावर अपिलार्थीना जन माहिती अधिकारी यांनी दि.१६.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, उपरोक्त व्यक्तींना ज्या क्रमाने दाखले देण्यांत आलेले आहेत ते क्रमांक व तारखा कळविण्यांत याव्या म्हणजे माहिती पुरविता येईल.या पत्राच्या उत्तरात अपिलार्थीनी माहिती पुरविली तथापि त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलार्थीनी दि.२०.११.२००८ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिल विहित मुदतीत न केल्याचे कारण देऊन प्रथम अपिल दि.२५.११.२००८ रोजी निकाली काढण्यांत आले.

अपिलार्थीनी दि.३१.१२.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. यावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी रेकॉर्ड जुना असल्याने तो शोधण्याचा प्रयत्न करुनहि तो सापडत नसल्याचे सांगितले. तृतीय पक्ष सरला साळुंखे वगैरे यांचे म्हणणे असे की, दिलेले जमातीचे प्रमाणपत्र योग्य असल्याचा निर्वाळा हायकोर्टाने रिट पिटीशन क्र.४७५२/२००८ च्या दि.१६ जानेवारी २००९ च्या आदेशाने दिला आहे व अर्जदार विनाकारण त्रास देण्याचे उद्देशाने ' माहितीचा अधिकारा ' खाली अर्ज करीत आहेत व या मुद्यांची नोंद आयोगाने घेतली आहे तरीहि जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती व कागदपत्रे बघुन असे निर्देश देण्यांत येतात की, १९७६ सालचे रेकॉर्ड सापडत नाही हे एकवेळ जरी मान्य केले तरी २००६ सालचे रेकॉर्डसाठी ही सबब माहिती न देण्यासाठी वाजवी ठरत नसल्याने रेकॉर्डचा शोध घेऊन सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीना माहिती पुरवावी. मात्र रेकॉर्ड सापडत नाही असे निष्पन्न होत असेल तर निवासी जिल्हाधिकारी यांचे सहीचे तसेच प्रमाणपत्र रेकॉर्डला ठेवावे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ८ जुलै २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/१४३/०२

श्री.इंद्रा बहादूर शर्मा **तक्रारकर्ता**
अंधेरी कुर्ला रोड, कुष्ण नगर,
मरोळ नाका,अंधेरी पूर्व,मुंबई.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, **उत्तरवादी**
श्री.राजस्थान सेवा संघ संचालित,
आर्टस व सायन्स विद्यालय, जे.बी.नगर
अंधेरी पूर्व मुंबई ५९

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
श्री.राजस्थान सेवा संघ संचालित,
आर्टस व सायन्स विद्यालय, जे.बी.नगर
अंधेरी पूर्व मुंबई ५९

-विवेचन-

श्री.इंद्रा बहादूर शर्मा, मुंबई यांनी दि.२४.७.२००८ रोजी आयोगाकडे श्री राजस्थान सेवा संघ संचालित आर्टस, सायन्स व कॉमर्स विद्यालय, अंधेरी पूर्व या संस्थेकडे विहित प्रपत्रातील माहितीचा अर्ज दि.२१.६.२००८ रोजी सादर केला असता सदर अर्ज प्रत्यक्ष स्विकारण्यास नकार दिला त्यामुळे पोस्टाने पाठवावा लागला अशी तक्रार केली होती. त्याची सुनावणी दि.९.७.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळी तक्रारकर्ते व कॉलेजचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अर्जदाराने असे सांगितले की, या संबंधी त्यांनी विद्यापीठाकडे तक्रार केल्यानंतर विद्यापीठाने कॉलेजला माहिती देण्यास सांगितले हाते व त्याप्रमाणे काही माहिती अर्जदारास मिळालेली आहे.

कॉलेजच्या प्रतिनिधीनी सांगितले की, 'माहितीचा अधिकार' हा कायदा लागू आहे किंवा नाही याबाबत संभ्रम असल्यामुळे सुरुवातीला या कायदयाची अंमलबजावणी करण्यांत आली नाही. परंतू विद्यापीठाने कॉलेजला 'माहितीचा अधिकार कायदा' लागू असल्याबाबत स्पष्ट केल्यानंतर ' माहिती अर्ज ' स्विकारण्यांत येत आहेत. परंतू अद्याप अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे फलक लावण्यांत आलेले नाहीत, अशी तक्रार तक्रारकर्त्यानी केल्यानंतर ते फलक लावण्याबाबत संबंधित अधिकारी यांना निर्देश देण्यांत आले. तक्रारकर्त्यास त्यांनी दिलेल्या अर्जावर त्यांना काही मुद्यावर अजूनहि माहिती मिळावयची आहे ती माहिती ७ दिवसाचे आत अर्जदारास देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक १० जुलै २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मुंबई - ३२

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.४४७२/०२

श्री.दिपक दत्ताराम कदम, ------- **अपिलार्थी**
१४७/८६ दिग्विजय मिल्स चाळ,
दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी,
मुंबई ४०० ०३३

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
पोलीस उपआयुक्त परिमंडळ-१२
शैलेंद्र नगर, दहिसर पूर्व,
मुबई ४०००६८

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहाय्यक पोलिस आयुक्त,
उत्तर नियंत्रण कक्ष,
ठाकूर व्हिलेज कांदिवली पूर्व
मुंबई ४०० १०१

-- विवेचन --

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: दि.६.१२.२००९
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: दि.१७.१२.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	:दि.१४.१.२००९
प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	:दि.२२.२.२००९
द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	:दि.२१.०४.२००९

सुनावणीचा दिनांक : १७ जुलै २००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल- समता नगर पोलिस ठाण्यामध्ये अपिलार्थी श्री. कदम व त्यांची पत्नी सौ.ज्योती यांनी दिलेल्या जबानीची सत्यप्रत मिळण्याबाबत

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर :सन २००७ पूर्वीचा अभिलेख्र पो.प.क्र.११/भाग-३ दि.१.८.२००७ अन्वये स्थायी आदेश क्र.६५ प्रमाणे मुदतबाहय झाल्याने नष्ट करण्यांत आला आहे. तरी नमूद जबानीची प्रत सध्या ठाणे अभिलेख्रावर उपलब्ध नाही.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश : पूरविण्यांत आलेली माहिती बरोबर आहे.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : अर्जदारास हवी असलेली जबानीची प्रत ही मुदतबाहय झाली असल्याने ती नष्ट करण्यांत आलेली आहे. त्यामुळे त्याची प्रत देता येऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे, ती मान्य करावी लागेल.

आदेश : अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक: १७.७.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मुंबई - ३२

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.४४७३/०२

श्री.विजय प्रकाश मिश्रा ------- **अपिलार्थी**
रमाकांत पान शॉप,
राम मनोहर यादव चाळ,
गोळीबाबर ३ रा रोड,
सांताक्रुझ, मुंबई ५५

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
पोलिस उप आयुक्त (मुख्यालय-१)
पोलिस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट समोर, मुंबई ४०० ००१

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
पोलिस उप आयुक्त (मुख्यालय-१)
पोलिस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट समोर, मुंबई ४०० ००१

-- विवेचन --

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: दि.९.२.२००९
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: ३.३.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	:दि.१२.३.२००९
प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	:दि.२६.३.२००९
द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	:दि.२१.४.२००९

सुनावणीचा दिनांक : १७ जुलै २००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : यांचे प्रतिनिधी उपस्थित
अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :अपिलाथी श्री.मिश्रा यांनी त्यांच्या स्वत:च्या व श्री. सिताराम मिश्रा यांच्या शस्त्र परवान्याबाबतचे अर्ज व त्यांनी संबंधित पोलिस ठाण्यास दिलेल्या जबाबांच्या

छायांकित प्रती तसेच श्री. शिवशंकर पाठक यांच्या तक्रार अर्जाची प्रत इत्यादिची माहितीची मागणी केली आहे.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर :श्री. विजय प्रकाश व श्री.सिताराम मिश्रा यांचे शस्त्र परवान्याबाबतचे अर्ज व त्यांनी दिलेले जबाब कार्यालयीन अभिलेख्र तपासला असता आढळून आला नाही.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :जन माहिती अधिकारी यांनी संबंधित कक्षाला परस्पर कारवाई करुन अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या त्यांच्या स्वत:च्या व श्री. सिताराम मिश्रा यांच्या जबाबाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात.तसेच श्री. शिवशंकर पाठक यांच्याशी संबंधित माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने व ती उघड करण्यामध्ये व्यापक जनहित नसल्याने अपिलार्थीची विनंत अमान्य करण्यांत येत आहे.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : अर्जदाराने असे सांगितले की, श्री.शिवशंकर पाठक यांनी केलेल्या तक्रारीची प्रत त्यांना देण्यांत आलेली नाही बाकी सर्व माहिती मिळालेली आहे. अपिलीय अधिकारी यांनी श्री.शिवशंकर पाठक यांनी केलेल्या तक्रार अर्जाची प्रत ही त्रयस्थ पक्षाने दिलेल्या तक्रार अर्जाची प्रत असल्यामुळे व ती उघड करण्यात व्यापक जन हित दिसून येत नसल्याने तक्रार अर्जाची प्रत देण्याची विनंती मान्य करता येत नाही, असे आदेश दिले होते. तसेच अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलात दिलेला निर्णय हा अर्जदाराच्या शस्त्र परवान्याबाबतचा होता. याबाबतचा अंतिम निर्णय शासन स्तरावर झालेला आहे, त्यामुळे तक्रारीची प्रत दिल्याने कुठलेही जन हि साध्य होईल असे वाटत नसल्याने अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यांत येत आहे.

आदेश : अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक: १७.७.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४७६/०२

श्री.लेस्ली अलमेडा **अपिलकर्ता**
कासा अलमेडिया प्लॅट नं.१०३
सेंट जोसेफ रोड, एस.टी.पॉल रोड.
वांद्रे पश्चिम मुंबई ५०

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक **उत्तरवादी**
सहकारी संस्था एच/वेस्ट वॉर्ड सहकार बाजार,
वांद्रे पश्चिम मुंबई ५०

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था गृहनिर्माण भवन म्हाडा
वांद्रे पश्चिम मुंबई ५१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक ४.३.२००९
सुनावणीचा दिनांक १७.५.२००९
अपिलार्थी - अनुपस्थित
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

अपिलीय अधिकारी यांनी दि.३०.१.२००९ रोजीच्या आदेशाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ७८ (१)अन्वये संस्थेवर काढलेल्या नोटीशीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती अर्जदार यांना दिलेली नाही ती देण्यांत यावी असे निर्देश दिले होते. या सहकारी कायदयानुसार कार्यवाही पूर्ण करुन याबाबतचे आदेशही पारित करण्यांत आलेले आहे, त्याची प्रतही अर्जदारास दिलेली आहे. तसेच नस्तीतील रोजनाम्याची प्रत अर्जदारास दिलेली आहे. त्या व्यतिरिक्त इतर कुठलीही नोटींग्ज नाहीत असे सुनावणीच्यावेळी सांगितले. त्यामुळे अर्जदारास आवश्यक असलेली माहिती देण्यांत आल्याचे दिसून येते. सबब पुढीलप्रमाणे माहिती देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २० जुलै २००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४७९/०२

श्री.रविंद्र रामचंद्र काळविट **अपिलकर्ता**
१०४ सी, साईभूषण सोसायटी,
खारेगांव शिवसृष्टी सोसायटी जवळ,
ठाणे-४०० ६०५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक **उत्तरवादी**
सहकारी संस्था एच/वेस्ट वॉर्ड सहकार बाजार,
वांद्रे पश्चिम मुंबई ५०

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था गृहनिर्माण भवन म्हाडा
वांद्रे पश्चिम मुंबई ५१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक ३०.९.२००९
सुनावणीचा दिनांक १७.७.२००९
अपिलार्थी - उपस्थित
जन माहिती अधिकारी - उपस्थित

दि.१६.८.२००८ प्रथम अपिलीय आदेशात त्यांनी सक्षम अधिकारी, ठाणे यांच्याकडून पुर्णिमा बिल्डर्स, मनीषा नगर ठाणे यांनी ना.ज.क.धा. कायद्यातंर्गत सदनिका दिली नाही त्याविरुध्द गुन्हा दाखल केला होता किंवा कसे याबाबतची माहिती अपिलकार यांना द्यावी असे निर्देश दिले होते. त्याचे पालन न झाल्यामुळे सदरील अपिल केलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जदारास हवी असलेली माहिती संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलकारास दि.१०.११.२००८ रोजीच्या पत्राने माहिती पुरविण्यांत आलेली आहे. सदरील माहिती मिळाली असल्याचे अपिलकाराने मान्य केलेले व आता कोणतीही तक्रार नसल्याचे अपिलार्थीनी सांगितले. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २० जुलै २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/७३१/०२

श्री.अरविंद गणपत गुजरार्थी **अपिलकर्ता**
ता.सिन्नर जि.नाशिक

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी **उत्तरवादी**
नगर परिषद सिन्नर
ता.सिन्नर जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी
ता.सिन्नर जि.नाशिक

-विवेचन-

अपिलाचा दिनांक १८.१२.२००८
सुनावणीची दिनांक २४.६.२००९
अपिलार्थी - उपस्थित
जन माहिती अधिकारी- उपस्थित. प्रथम अपिलीय अधिकारी- उपस्थित

अपिलार्थीनी दि.५.१२.२००७ च्या अर्जान्वये असिन्नर न.प.हद्दीतील सि.स.नं.४४४६ मध्ये प्रभाकर रामदार बाकडे गिरीश राजाराम शाकुंतल यांनी केलेल्या बांधकामाबद्दल माहिती मागितली. परंतू त्यांना माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी दि.२८.१.२००८ रोजी प्रथम अपिल दाखल केले. हीच माहिती अपिलार्थीनी त्यांच्या दि.२६.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती. प्रथम अपिलाच्या आदेशात माहिती देण्याचे निर्देश होते. पण पूर्ण माहिती न मिळाल्याने अपिलार्थीनी दि.२८.१२.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे असे सांगण्यांत आले की, अपिलार्थीना त्यांनी मागितलेली माहिती देण्यांत आली आहे. आयोगासमोर सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून आले की, अपिलार्थीना संपूर्ण माहिती पुरविण्यांत आलेली नाही. तरी असे निर्देश देण्यांत येतात की, अपिलार्थीनी मागितलेल्या माहितीचा शोध घेऊन ती अपिलार्थीना सदर आदेशाच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत देण्यांत यावी. तसेच अर्जदारास संपूर्ण नस्ती हि तपासण्यासाठी देऊन त्याचे समाधान करण्याचा प्रयत्न करावा.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २० जुलै २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/४५०७/०२

श्री.प्रशांत दत्तात्रय भट तक्रारकर्ता
भूखंड क्र.१७४, २ रा मजला,
एफ लेन सेक्टर-८,वाशी,
नवी मंबई ४०००७३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा नायब तहसिलदार उत्तरवादी
(भूसंपादन)कोकणभवन, विभागीय आयुक्त,
कोकण विभाग, नवी मुंबई.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार
(भूसंपादन)कोकणभवन, विभागीय आयुक्त,
कोकण विभाग, नवी मुंबई.

-विवेचन-

श्री.प्रशांत भट यांनी दि.८.१.२००८ रोजी अर्ज करुन अधिनियमाच्या कलम १८ अन्वये अशी तक्रार केली आहे की, त्यांना माहितीसाठी रुपये १८०/- एवढे शुल्क भरण्यास कळविण्यांत आले होते व हे शुल्क अवाजवी आहे. वरील तक्रारीची चौकशी दि.२१.७.२००९ रोजी करण्यांत आली करण्यांत आली त्यावेळी तक्रारकर्ते अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

तक्रारीच्या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यात्या तक्रारीच्या संदर्भात पुढीलप्रमाणे खुलासा दिलेला आहे :-

" उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार श्री.प्रशांत भट, नवी मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांनी दि.४.१.२००८ रोजी केलेल्या अर्जाप्रमाणे त्यांना सदर माहितीसाठी रक्कम रु.१८०/- भरुन माहिती घेऊन जाणेबाबत कळविल्यामुळे त्यांनी सदर रक्कम अवास्तव व बेकायदेशीर असल्याबाबत आपणांस कळवून माहिती अधिका-यांवर कायदेशिर कारवाई करण्याबाबत तक्रार दाखल केलेली आहे.

अर्जदार श्री.प्रशांत भट यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मौजे दारावे ता.जि.ठाणे येथील गट क्र.२६६ संबंधी निवाडा झालेला आहे. त्यामध्ये सदर जमिन सरकारी असल्याने व त्यामध्ये कुळ म्हणून श्री.दिनानाथ तांडेल यांचे नांव होते, परंतू जमिन सरकारी असल्याने निवाडा निरंक करण्यांत आला. त्यामुळे विशेष भूसंपादन अधिकारी यांनी चुकीचा निवडा जाहिर केला तसेच नुकसान भरपाईची रक्कम मिळाली नाही. म्हणून विशेष भूसंपादन अधिकारी मेटो सेंटर ४ हे कार्यालयच अस्तित्वात नाही. अशी त्याची धारणा आहे. वास्तविक श्री.प्रशांत भट यांचा या जमिनीशी काहीही संबंध नाही. ते श्री.तांडेल यांच्या वतीने ते कार्यालयात अर्ज करतात. सदर जमिन आता सिडकोच्या ताब्यात आहे.

श्री. भट यांनी शासन विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी येथील माहिती अधिकारी यांजकडे विविध प्रकारे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केले आहेत. त्यांनी या कार्यालयास सन २००६ ते

२००८ पर्यत एकूण २८ इतके अर्ज केले असून त्यांना त्याप्रमाणे माहिती शासनाचे नियमाप्रमाणे शासकीय फी वसूल करुन त्यांना त्याप्रमाणे माहिती दिलेली आहे. काही प्रकरणी आढळ होत नाही तसेच कलम ३ च प्रमाणे प्रश्नांकित स्वरुपाची माहिती देता येत नाही. अशा स्वरुपाची उत्तरे देण्यांत आलेली आहे व तसेच अर्जदारास उत्तर देण्यांत आलेल्या प्रकरणात त्यांचे म्हणण्याप्रमाणे उत्तर न दिल्यास धमकी देणे, पोलिस स्टेशनात तक्रार दाखल करणे, किंवा तुम्ही माझ्याकडे ४० लाख मागणी करता म्हणून अर्ज दाखवून धकावणे असे प्रकार त्यांनी केलेले आहेत, अशा प्रकारे मला मानसिक त्रास दिलेला आहे.

सोबत वरिष्ठ पोलिस निरिक्षक, सी.बी.डी.बेलापूर यांना दिलेले पत्र तसेच मा.विभागीय आयुक्त यांनी पोलिस आयुक्त सी.बी.डी.बेलापूर यांना दिलेले पत्र अवलोकनार्थ जोडलेले आहे.

सदर कार्यालय अस्तित्वात होते याबाबत शासनास दिलेले पत्र सोबत जोडले आहे.

अर्जदार श्री.प्रशांत भट यांना माहिती अधिकाराखाली मागणी केल्याप्रमाणे त्यांना वेळोवेळी माहीत उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

अर्जदार श्री.प्रशांत भट यांनी विशेष भूसंपादन अधिकारी मेटो सेंटर-४ ठाणे हे पद कधी निर्माण झाले याबाबत आदेश यापूर्वी आढळ होत नव्हते. त्यामुळे सदर आदेशाची प्रत जिल्हाधिकारी ठाणे येथून प्राप्त करुन घेऊन त्याच्या प्रती देऊन व त्यांचे मनात कोणती शंका राहू नये म्हणून पद निर्मितीचे आदेश व त्या आधारे आयुक्तांचे आदेश तद्नंतर गांव वाटपाचे आदेश व मुदतवाढ इ.कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांना पत्र दिले. त्यामध्ये अवास्तव व बेकायदेशीर रक्कमेची मागणी केलेली नाही. अर्जदार यांना इतर कागदपत्राची गरज नसल्याने त्यांना आवश्यक असलेल्या आदेशाची प्रमाणित प्रती उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या आहेत.

अर्जदार यांना सदर रकमेबाबत आवास्तव/बेकायदेशीर मागणी केली म्हणून त्यांनी प्रथम अपिल या कार्यालयातील वरिष्ठ अधिका-याकडे केलेले नाही. त्यामुळ त्याचे तक्रार अर्जाची दाखल घेण्यांत येऊ नये हि विनंती."

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अर्जदारास माहिती पाहिजे होती त्याची पृष्ठे १२ होती व त्या प्रमाणित प्रती करुन द्यावयाची असल्यामुळे १५x १२ अशा रितीने १८० रुपये शुल्काची आकारणी योग्यच होती. अर्जदाराने फक्त त्यातील दोन प्रती प्रमाणित करुन घेण्यासाठी रुपये ३०/-इतके शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे ते शुल्क नियमाप्रमाणे आहे असे दिसून येते. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

तक्रार फेटाळण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २१ जुलै २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/७०९/०२

श्री.अन्सारी अफरोज अहमद महमद उम्मान **अपिलकर्ता**
घर नं.१८१, चुनाभट्टी,मालेगांव, जि.नासिक ४२३२०३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याध्यापिका **उत्तरवादी**
मौलाना आझाद गर्ल्स प्राय.स्कुल
२३२ हजार खोली,मालेगांव, जि.नासिक

जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष
मौलाना आझाद गर्ल्स प्राय.हायस्कूल,
२३२, हजार खोली, मालेगांव जि.नसिक

-विवेचन-

अपिलाचा दिनांक ३.९.२००९
सुनावणीचा दिनांक २४.६.२००९
अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी - उपस्थित

अपिलार्थीनी दि.१८.६.२००७ च्या अर्जान्वये सन २००१ ते २००७ पर्यतच्या शैक्षणिक वर्षातील खालील माहिती मागितली.

१. **शाळा समितीच्या ठराव क्र.३ दि.७.९.२००१ अन्वये श्रीमती साजदा अब्दुल गफार यांची पदवीधर शिक्षिका म्हणून मान्यतेसाठी पाठविलेल्या प्रस्तावाची नक्कल.**
२. **प्रस्तावाच्या मान्यतेची नक्कल.**
३. **या अनुषंगाने घेतलेली ना-हरकत प्रमाणपत्राची नक्कल.**
४. **ठराव क्र.२ दि.१२.४.२००२ अन्वये श्रीमती तुखसाना मोहंमद अमीन यांच्या प्रस्तावाची नक्कल.**
५. **प्रस्ताव मंजूरीची नक्कल.**
६. **या अनुषंगाने प्राप्त ना-हरकत प्रमाणत्राची नक्कल.**
७. **आसिफ इकबाल मो.अय्यूब यांची प्रस्तावाच्या कागदपत्रांची नक्कल**

माहिती न मिळाल्यामुळै त्यांनी दि.२०.७.२०००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. तरीही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीनी दि.३.९.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलाचे सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे तसेच उपलब्ध कागदपत्रे तपासणीसाठी अपिलार्थीना देण्याचे मान्य केले याचाविचार करता असे निदेश देण्यांत येतात की, जन माहिती अधिकारीयांनी अपिलार्थीनी मागितलेल्या माहितीशी संबंधित सर्व कागदपत्रे अपिलार्थीना पडताळणी करण्यासाठी सदर आदेशाच्या दिनांकापासून ८ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. मुख्याध्यापिका यांनी यापुढे मुदतीत माहिती न दिल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २१ जुलै २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/६८४/०२

श्री.राजेंद्र काळु नानकर अपिलकर्ता
रा.नविन नाशिक-८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी उत्तरवादी
नासिक
जन माहिती अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी
नासिक

-विवेचन-

अपिलकार श्री.राजेंद्र काळू नानकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

मात्र अपिलार्थीचे म्हणणे असे की, त्यांनी अपील हे औरंगाबाद माहिती आयोगाच्या कार्यालयात केले आहे तेव्हा हे अपील त्याच आयुक्तांनी चालवावे. सध्या नाशिक विभागाचा कार्यभार औरंगाबाद राज्य माहिती आयुक्तंकडे आहे. औरंगाबाद विभागाचा कार्यभार फार अवजड असल्याने नाशिक विभागाच्या काही अपीलाची सुनावणी स्वत: मुख्य माहिती आयुक्त व सर्वाची सोय व्हावी, अपिलार्थी व सरकारी अधिकारी यांचा प्रवास खर्च व वेळ वाचावा म्हणून नाशिकला येऊन सुनावणी घेत असतात. या विशेष सुनवणीत अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी देण्यांत येते. निकाल आपल्यास बाजुने लागावा अशी मात्र अपेक्षा ठेवणे रास्त नाही. त्यामुळे अपिलार्थीची विनंती अमान्य करण्यांत आली.

अपिलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि.७.४.२००८ रोजी अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, यांचेकडे अर्ज करुन,श्री.रमेश मिसाळ हे तहसिलदार,नासिक धान्य वितरण अधिकारी (FDO)इगतपूरी तहसिलदार म्हणून कार्यरत असताना त्यांचेविरुध्द तक्रारदारांचे व्यतिरिक्त इतर तक्रारीची माहिती जिल्हाधिकारी, नाशिक, पुरवठा अधिकारी, नाशिक महसूल आयुक्त पुरवठा विभाग, नाशिक यांचेकडे केलेल्या पत्रव्यवहारासंबधी सर्व कागदपत्राच्या प्रमाणित प्रतीची मागणी केली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती ही, जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाशी

निगडीत आहे म्हणून अपिलकाराचा अर्ज त्या कार्यालयाकडे पाठविला यासंबंधी पुढील पत्रव्यवहार जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नासिक यांचेकडे पत्रव्यवहार करणेबाबत अपिलकारास दि.१५.४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. त्रयस्थ व्यक्तिसंबंधी माहिती आहे असे व खाजगी बाबतीत आंगतुक हस्तक्षेप करणारी आहे असे कर्इंरणदाखवून माहिती नाकारण्यांत आली. अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.११.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपील चालवले नाही. माहिती दिली नाही त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. जर एखाद्या अधिका-याविरुध्द तक्रार असतील तर त्याची शहानिशा करुन घेणे हे प्रशासनपध्दतीत आवश्यकच असते. तक्रारीत तथ्य नसेल तर तक्रारी दप्तरदाखल करणे व तक्रारीत तथ्य असेल तर पुढील कार्यवाही हे अनुषंगाने क्रमप्राप्तच असते. तेव्हा अर्जदाराच्या तक्रारी सोडून इतर तक्रारी आल्या असल्यास व त्याची शहानिशा करुन घेतली असल्यास तशी माहिती वा तक्रारी सद्यःस्थितीची माहिती अर्जदारास देणे हे नाकारु शकत नाही. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदरकृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यानी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

आदेश

अपिल मान्य करण्यांत येत आहे. वर निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

मुंबई
दिनांक: २२.७.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/७६१/०२

श्री.राजेंद्र काळु नानकर अपिलकर्ता
रा.नविन नाशिक-८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) उत्तरवादी
जिल्हा परिषद,नासिक

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद,नासिक

-विवेचन-

अपिलकार श्री.राजेंद्र काळू नानकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

मात्र अपिलार्थीचे म्हणणे असे की, त्यांनी अपील हे औरंगाबाद माहिती आयोगाच्या कार्यालयात केले आहे तेव्हा हे अपील त्याच आयुक्तांनी चालवावे. सध्या नाशिक विभागाचा कार्यभार औरंगाबाद राज्य माहिती आयुक्तंकडे आहे. औरंगाबाद विभागाचा कार्यभार फार अवजड असल्याने नाशिक विभागाच्या काही अपीलाची सुनावणी स्वतः मुख्य माहिती आयुक्त व सर्वाची सोय व्हावी, अपिलार्थी व सरकारी अधिकारी यांचा प्रवास खर्च व वेळ वाचावा म्हणून नाशिकला येऊन सुनावणी घेत असतात. या विशेष सुनवणीत अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी देण्यांत येते. त्यामुळे अपिलार्थीची विनंती अमान्य करण्यांत आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२५.१०.२००७ रोजी अर्ज करुन नाशिक जिल्हापरिषदेंतर्गत जिल्हा बदली कर्मचारी यांची नांवे, किती कर्मचारी बदलून आले त्यांची नांवे इत्यादि माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित वेळेत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१८.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर अर्जदार यांनी दि.१८.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.१२.२००७ च्या पत्रान्वये (एकूण १ ते ५१ पृष्ठे) माहिती उपलब्ध करुन दिली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश

पारित केले नाहीत. अर्जदारास हवी असलेली माहिती विभाग प्रमुख या नात्याने पाठविली होती असेनिवेदन अपिलीय अधिकारी यांनी केले.म्हणून प्रथम अपिलाचा वेगळाआदेश नाही. तसेच अर्जदाराची मागणी १७ वर्षे एवढया प्रदिर्घ कालावधीची होती.त्यामुळे माहितीदेण्यास विलंब लागला आहे. शिक्षणधिका-यानी सांगितले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यानी विहित कालावधीत दिली नाही. माहिती विलंबाने दिली. प्रथम अपिलीय अधिका-यानी आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकारपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित वेळेत आवश्यकती कारवाई करण्याची दक्षता घ्यावी अशी उभयतांना ताकिद देण्यांतयेत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक २१ जुलै २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/२५४/०२

श्री.नवल आदी टाटा **तक्रारकर्ता**
एम ३६९ तारापोर टॉवर्स
न्यू लिंक रोड,ओशिवरा
अंधेरी (प)मुंबई ४०००५३

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था **उत्तरवादी**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबई ५१

-विवेचन-

श्री. नवल अदी टाटा यांनी १५ फेब्रुवारी २००७ रोजी तक्रार केलेली होती. त्या तक्रारीबाबतची सुनावणी दि.२२.७.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळेला तक्रारकर्ते व्याधीग्रस्त असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाही. जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते.

अर्जदारास त्यांच्या दि.१.९.२००६ रोजीच्या अर्जानुसार त्यांच्या सोसायटीच्या मॅनेजिंग कमिटीच्या सदस्यांनी दिलेल्या बॉन्डच्या संदर्भात माहिती पाहिजे होती. याबाबत जन माहिती अधिकारी यांची अर्जदाराच्या सोबत दि.१५ नोव्हेंबर २००६ रोजी चर्चा झाली व विभाग बुक व रजिस्टरर्स निरिक्षण आदेश देत आहे असे त्यांना सांगण्यांत आले. त्यानंतर १४ डिसेंबर २००६ रोजी अर्जदाराने कार्यालयास भेट दिली असता हे पत्र त्यांना देण्यांत आले व ते त्यांनी सोसायटीस सुपूर्द केले. त्यानंतरची कार्यवाही झ ालेली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. तसेच याबाबतची सद्य:स्थितीतील माहिती १० दिवसांचे अर्जदारास देण्यांत यावी असेही निर्देश देण्यांत येत आहेत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २१ जुलै २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.७०५/०२

श्री.अन्सारी अफरोज अहमद मोहम्मद उस्मान ------- **अपिलार्थी**
घर नं.१८१ चुनाभटटी
मालेगांव, जिल्हा नाशिक ४२३ २०३

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
अध्यक्ष,
मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,
२३२ हजारखोली मालेगांव,
जिल्हा नासिक

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,
२३२ हजारखोली मालेगांव,
जिल्हा नासिक

■ **विवेचन -**
■

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : दि.२७.६.२००७
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : --
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. :दि.८.८.२००७
प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. :
द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक :दि.१७.९.२००७ रोजीचे अपील

सुनावणीचा दिनांक **:** दि.२१.९.२००७
अपिलार्थी **:** उपस्थित
जन माहिती अधिकारी **: उपस्थित**
अपिलीय अधिकारी **:** उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : २७.६.२००७ चा माहिती अर्ज दि.२८.६.२००७ रोजी प्राप्त झाला असल्यामुळे दि.२७.७.२००७ रोजी पर्यत जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविणे आवश्यक होते. अर्जदारास माहिती वरील सुनावणीच्या दिवशी म्हणजे सुमारे दोन वर्षानी

देण्यांत आली. १०० दिवसापेक्षा जास्त विलंब झाला असल्यामुळे रुपये २५,०००/-(रुपये पंचवीस हजार फक्त)एवढया कमाल मर्यादेची शास्ती लादता येऊ शकली असती, माहिती द्यावयास एवढा वेळ कां लागला असे विचारले असता समाधानकारक उत्तर जन माहिती अधिकारी देऊ शकले नाही. मात्र कायदयाचे परिपूर्ण ज्ञान नाही, कायद्याचे प्रशिक्षण नाही ही बाब लक्षात घेता पूर्ण शास्ती न लादता जन माहिती अधिकारी यांचेवर फक्त रुपये ५०००/- रुपयाची शास्ती लावण्यांत येत आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखील उक्त अधिनियमाच्या कलम १९ (६) मधील तरतूदीचा भंग केला आहे. याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यांत येत आहे.
आदेश : अपिल मान्य करण्यांत येत आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या माहे ऑगस्ट २००९ च्या माहे सप्टेंबर २००९ च्या मासिक वेतनातून दोन समान हप्त्यामध्ये एकूण रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) एवढी शास्ती वसूल करुन राज्य शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास आदेशाच्या क्रमांकाचा संदर्भ देऊन पाठवावा. या पत्राची प्रत उपसंचालक (शिक्षण)प्रथमअपिलीय प्राधिकारी यांनी भविष्यात उक्त अधिनियमाच्या कलम १९ (६)मधील तरतूदीचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांक: २२.७.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४८८/०२

श्री.शैलेश रघुनाथ कडव **अपिलकर्ता**
२/३ सहयाद्री नगर चारकोप
कांदिवली, पश्चिम मंबई ६७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त **उत्तरवादी**
बृहन्मुंबई मनपा कार्यालय, पी/उत्तर विभाग,
मालाड पश्चिम मुंबई ६४

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता
बृहन्मुंबई मनपा कार्यालय, पी/उत्तर विभाग,
मालाड पश्चिम मुंबई ६४

-विवेचन-

अपिलाचा दिनांक ३१.३.२००९
सुनावणीची तारीख २२.७.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी - उपस्थित.

अर्जदार यंनी त्यांच्या दि.१०.१०.२००८ रोजीच्या अर्जानुसार सर्व्हे नं.२५० हिस्सा क्र.२६८६ खडकपाडा ज.अरुणकुमार वैद्य मार्ग,मालाड पूर्व मुंबई या जागेवरील झोपडपट्टी झोपडपटटीचे वास्तव्य अधिकृत/अनधिकृत आहे याबाबतची माहिती पाहिजे होती. तसेच अनधिकृत असेल तर कायदेशीर कारवाई कां केली नाही अशी विचारणा केलेली आहे.

याबाबत अर्जदारास सदरील जागेवरील शेड्स व झोपडपट्टी अनधिकृत आहे व या संदर्भातील विस्तृत माहितीसाठी अर्जदाराने जन माहिती अधिका-यास भेटावे अशा बाबतचे पत्र लिहिण्यात आले. याविरुध्द केलेल्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे आदेश दिले की, सदरील जागा ही कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात आहे किंवा कसे याबाबत शहानिशा करण्यांत यावा व त्यानंतर सहाय्यक अभियंता यांनी सीएसटी क्र.८६८ डिमार्केट करुन दाखवावी व त्याप्रमाणे सहाय्यक अभियंता यांनी योग्यती कार्यवाही करावी. त्यावर अर्जदाराने असे सांगितले की,अशी कार्यवाही झालेली नाही. याबाबत कार्यवाही होणे हा मुख्यत्वेकरुन अर्जदाराचा उद्देश आहे.

१५ ऑगस्ट २००९ पर्यत जागेची पाहणी करुन याबाबतीत सहायक अभियंता याचे निर्देशानुसार कार्यवाही करण्यांत येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: २२.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४५०२/०२

श्री.अे.गोपाल राय, अपिलकर्ता
चेंबूर इलेव्हन हेवन को.हॉ.सोसायटी
११/३३७ सहकार नगर-३
चेंबूर मुंबई ४०० ०७१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त उत्तरवादी
परिमंडह-६ ४ था मजला, प्रशासकिय इमारत,
आर.सी.मार्ग,चेंबूर मुंबई ४०० ०७१

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त
पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष, चेंबूर,मुंबई.

-विवेचन-

अपिलाचा दिनांक १६.३.२००९
सुनावणीची तारीख २३.७.२००९
अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी - उपस्थित.
सदरील अपिलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

उपरोक्त विषय व संदर्भान्वये पत्र व पत्रासोबत अपिलकार श्री.अे गोपाल राय यांचे व्दितीय अपील या कार्यालयात प्राप्त झालेले आहे. अपिलकार यांनी व्दितीय अपिलामध्ये अपिलीय अधिकारी यांनी प्रती देण्याचे आदेश दिले होते परंतू प्रति न देता त्यांच्याशी विसंगीत असा अहवाल दिला तसेच व्दितीय अपिल अर्जामध्ये अ.क्र.८ मध्ये पाहिजे असलेल्या माहितीमध्ये इमारतीमधील काही गैर सभासद व सभासद यांनी अपिलकार यांच्या कमिटीच्या विरोधात नेहरुनगर पोलिस ठाणे नोव्हेंबर २००७ ते ऑगस्ट २००८ या कालावधीत केलेल्या धमकीच्या तक्रार मिळणेबाबत नमूद केलेले आहे.

अपिलकार यांनी शासकीय माहिती अधिकारी व सहाय्यक पोलिस आयुक्त, चेंबूर, मुंबई यांचे नांवे दि.१.१२.२००७ रोजी अर्ज करुन माहितीची मागणी केली असता वपोनि नेहरुनगर पोलिस ठाणे यांचेकडून जा.क्र.१३१६१/०८ दि.२५.१२.२००८ अन्वये अहवाल या कार्यालयास प्राप्त झाल्याने प्रस्तुत अहवालाचे अनुषंगाने अपिलकार यांना या कार्यालयाचे जा.क्र.४०१९/माहिती/सपोआ/पुनिक/०८ दिनांक २९.१२.२००८ अन्वये माहिती नाकारण्यांत आली बाबत पत्र देण्यांत आले प्रस्तुतचे पत्र अपिलकार यांनी दि.३०.१२.२००८ रोजी स्विकारलेले आहे.

तद्नंतर अपिलकार यांनी मा.प्रथम अपिलीय अधिकारी व पोलिस उप आयुक्त परि-६ मुंबई यांचेकडे अपिल अर्ज सादर केल्याने अपिल अर्जाचे अनुषंगाने मा.प्रथम

अपिलीय अधिकारी व पोलिस उप आयुक्त परि-६ मुंबई यांचे कार्यालयीन जा.क्र.६५९/पोऊआ/परि-६/०९ दि.५.२.२००९ अन्वये आदेश या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत प्रस्तुत आदेशामध्ये अपिलाचे सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी ते कमीटीचे सचिव असल्याचे सांगून मागील ६ महिन्यात तक्रारी संदर्भात कोणताही तपास झाला नाही असे सांगून माहितीची मागणी केली प्रस्तुत मागणी अपिलामध्ये मान्य करण्यांत येऊन अपिलार्थी यांना संबंधितांकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलार्थी यांना देण्याबाबत आदेश या कार्यालयात प्राप्त झालेले आहेत.

सदर आदेशाचे अनुषंगाने शासकिय माहिती अधिकारी व सहाय्यक पोलिस आयुक्त,चेंबूर, मुंबई यांचे कार्यालयीन जा.क्र.५६०/०९ दि.७.२.२००९ अन्वये पत्र व अपिल आदेशाची प्रत वपोनि नेहरुनगर पोलिस ठाणे यांना पाठवून अहवालाची मागणी करण्यांत आली असता वपोनि नेहरुनगर पोलिस ठाणे यांचेकडून जा.क्र.१८६२/०९ दि.२८.२.२००९ अन्वये अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला परंतू सदरचा अहवाल वपोनि नेहरुनगर पो.ठाणे यांचेकडून परिपूर्ण प्राप्त न झाल्याने पुन्हा शासकीय माहिती अधिकारी व सहाय्यक पोलिस आयुक्त, चेंबूर, मुंबई यांचे कार्यालयीन जा.क्र. ९५०/०९ दि.३.३.१००९ अन्वये पत्र वपोनि नेहरुनगर पोलिस ठाणे यांना पाठवून अहवालाची मागणी करण्यांत आली असता वपोनि नेहरुनगर पो.ठाणे यांचे जा.क्र.२०७५/०९ दि.६.३.२००९ अन्वये अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला परंतू प्रस्तुत अहवालामध्ये अपिलकार यांनी तक्रार अर्जाच्या प्रतीची मागणी केलेली आहे परंतू अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये इमारतीतील प्लॉट नंबर ३०३ साईकृपा संस्था कार्यालय व सोसयटीतील इतर रहिवाश्यांनी चेंबूर इलेव्हन हेवन को ऑ. सोसयअीच्या काय्रकारणीवर करण्यांत आलेले चौकशीमध्ये वाद असल्याचे दिसून आल्याने दोन्ही पक्षकारांना नेहरुनगर पोलिस ठाण्यामार्फत शांतता राखण्याची समज देण्यांत आली आहे तरी तक्रार अर्जाच्या प्रती अर्जदार व गैरअर्जदार यांना दिल्यास पुन्रच वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे नमूद केल्याने शासकीय माहिती अधिकारी व सहाय्यक पोलिस आयुक्त, चेंबूर मुंबई यांचे कार्यालयीन जा.क्र.१०७४/०९ दि.१०.३.२००९ अन्वये फक्त अहवाल तयार करुन अपिलकार यांना देण्यांत आलेला आहे प्रस्तुतचा अहवाल अपिलकार यांनी दि.१०.३.२००९ रोजी स्विकारलेला आहे.

वपोनि नेहरुनगर पो.ठाणे यांनी त्यांचे अहवालात तक्रार अर्जाच्या प्रती अपिलकार यांना दिल्यास वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे नमूद केल्याने पुन्हा शासकीय माहिती अधिकारी व सहाय्यक पोलिस आयुक्त, चेंबूर मुंबई यांचे कार्यालयीन जा.क्र.१२१०/०९ दि.१८.३.२००९ अन्वये पत्र व वपोनि नेहरुनगर पो.ठाणे यांचेकडून प्राप्त तक्रार अर्जाच्या प्रती पाठवून तक्रार अर्जाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय१ तक्रार अर्जाची सद्यःस्थितीबाबत विचारणा करण्यांत आली तद्नंतर दिलेल्या वेळेत अहवाल प्राप्त न झाल्याने स्मरणपत्र जा.क्र.१७०४/०९ दि.२८.४.२००९ अन्वये पाठविण्यांत आले तदनंतर वपोनि नेहरुनगर पोलिस ठाणे यांचेकडून जा.क्र. ३७१६/०९ दि.४.५.२००९ अन्वये अहवाल

या कार्यालयास प्राप्त झाल्याने अपिलकार यांना शासकिय माहिती अधिकारी व सहाय्यक पोलिस आयुक्त चेंबूर मुंबई यांचे कार्यालयीन जा.क्र. १८१८/०९ दि.७.५.२००९ अन्वये अपिलकार यांनी मागणी केलेली माहिती (तक्रार अर्जाची प्रती)देण्यांत आलेल्या आहेत. प्रस्तुतची माहिती अपिलकार यांनी स्विकारलेली आहे.

यावरुन अपिलार्थी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत आले आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांक: २२.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.७९४/०२

श्री.हिरामण किसन आहेर ------- अपिलार्थी
नाशिक पूणा रोड,
नाशिक

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस अधिक्षक ------- उत्तरवादी
(ग्रामीण)पोलिस अधिक्षक कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार नाशिक-२

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पोलिस अधिक्षक
जिल्हा अधिक्षक कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार नाशिक-२

-विवेचन -

अपिलाचा दिनांक दिनांक २०.३.२००८
सुनावणीचा दिनांक २५.६.२००९
अपिलाथी, जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी- उपस्थित.

अपिलार्थीनी दि.११.९.२०७ च्या अर्जान्वये सन २००७ मध्ये झालेल्या पोलिस शिपायांच्या भरतीच्या अनुषंगाने खालील माहिती मागितली.

i) प्रमिला खंडू आहिरे उर्फ राजश्री हिरामण आहेर या उमेदवाराच्या मुळ अर्जाची प्रत, शैक्षणिक प्रमाणपत्राची प्रत तसेच अर्जदाराने अर्जासोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्राच्या प्रती.

ii) लेखी व तोंडी परीक्षेत मिळालेले गुण.

उपरोक्त माहिती संकलित करुन पुरविण्यांत येईल असे जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीना कळविले. यानंतर दि.१५.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविण्यांत आले की, अपिलार्थीनी मागितलेली माहिती नवप्रविष्ठ माहिती पोलिस शिपाई प्रमिला खंडू आहिरे यांच्या खाजगीबाबतीत हस्तक्षेप करणारी असल्याने पुरविता येणार नाही. तत्पूर्वी दि.११.१०.२००७ रोजी अपिलार्थीने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावरील निर्णय न लागल्यामुळे त्यांनी दि.२०.३.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

iii) **अपिलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे सादर केले की, अपिलार्थीनी मागितलेली माहिती त्रयस्थ व्यक्तीच्या खाजगी बाबींशी संबंधित असल्याने अधिनियमाच्या कलम ८ (१) च्या आधारे देण्यांत आलेली नाही. वास्तविक पाहता अधिनियमाच्या कलम ११ नुसार कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावयास हवे होते. पण त्यानुसार प्रकरण हाताळले गेले नाही. आता असे निर्देश देण्यांत येतात की, जन माहिती अधिकारी यांनी कलम ११ अन्वये प्रक्रिया पूर्ण करुन माहिती देण्याबाबत समर्पक निर्णय घ्यावा. जन माहिती अधिकारी यांचा निर्णय जर अपिलार्थीना अमान्य असेल तर त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल करावे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरील कार्यवाही सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांत पूर्ण करावी.**

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांक: २३.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.७८९/०२

श्री.अन्सारी अफरोज अहमद ------- अपिलार्थी
मो.उस्मान ता.मालेगांव,नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी ------- उत्तरवादी
(प्राथमिक)जिल्हा परिषद, नाशिक

जन माहिती अधिकारी तथा तहजीब प्रायमरी स्कूल
तहजीब नगर, मालेगांव जि.नाशिक

-विवेचन -

अपिलाचा दिनांक दिनांक ३०.४.२००८
सुनावणीचा दिनांक २५.६.२००९
अपिलाथी-अनुपस्थित
जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी- उपस्थित.

अपिलार्थीनी दि.४.२.२००८ रोजीच्या अर्जान्वये तहजीब प्रायमरी व प्री प्रायमरी शाळेबद्दल खालील माहिती मागितली. सारांशरुपाने माहितीचे स्वरुप असे आहे.

१. **शाळेतील तुकडया व पट संख्या**
२. **अनुदानित व विना अनुदानित तुकडयांची संख्या**
३. **शिक्षकांची संख्या**
४. **विद्यार्थ्याकडून घेतलेल्या फीची वर्षनिहाय आकडेवारी**
५. **जमा केलेली फी बॅकेत भरण्यांत येते कां असल्यास बॅकेचा खातेनिहाय तपशिल**
६. **के.जी. ची वर्ग संख्या व पट संख्या**
७. **के.जी. च्या फीची वर्षनिहाय आकडेवारी**
८. **के.जी.ची फी बॅकेत भरण्यांत येत असल्यास बॅक खात्याचा तपशिल.**
९. **प्राप्त झालेल्या रक्कमाच्या खर्चाचे ऑडिट झाले असल्यास ऑडिट रिपोर्टची प्रत.**

अपिलार्थीना अर्जानुसार माहिती न प्राप्त झाल्याने त्यांनी दि.११.३.२००८ रोजी प्रथम अपिल दाखल केले. अपिलावरील निणर्य दि.१५.४.२००८च्या पत्रान्वये अपिलार्थीना कळविण्यांत आला. या निर्णयानुसार आठ दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीना माहिती उपलब्ध करुन द्यायची होती. तथापि माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.३०.४.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी असे निर्दशनास आले की, अपिलार्थीना माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, अर्जदाराचा अर्ज कायम विना अनुदानित शाळेबाबत आहे. प्रथम अपिलीय अधिका-याला याबाबतीत अपील ऐकण्याचा अधिकार नाही. मागितलेली माहिती अधिनियमाच्या कलम ८ (क)(दोन)अन्वये देता येत नाही तेव्हा व्दितीय अपील फेटाळण्यांत यावे. सुनावणीच्या वेळी उपलब्ध कागदपत्रावरुन असे अनुमान निघते की, संस्था चालवित असलेल्या शाळेबाबतची माहिती अर्जदाराने विचारलेली आहे. (अनुदानित व विना अनुदानित धरुन) व शाळा सुरु करण्यास शिक्षण खात्याच्या मंजूरीची आवश्यकता आहे. तेव्हा प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)जि.प.नासिक यांना अपील ऐकण्याचा अधिकार आहे. यास्तव जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरता येणार नाही. तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना त्यांना मागितलेली माहिती सदर आदेशाच्या दिनांकापासून ८ दिवसांच्या आंत पुरवावी.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक: २३.७.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.८१५/०२

श्री.हामीद हुसेन ------- अपिलार्थी
मोहमंद उमर
ता.मालेगंव जि.नासिक

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव ------- उत्तरवादी
मालेगांव हायस्कूल,
स.न.२६८/१,रौनकाबाद, नया पुरावॉर्ड
मालेगांव जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
मालेगांव हायस्कूल १६८/१
रौनकाबाद नयापूरा वॉर्ड,मालेगांव जि.नाशिक

-विवेचन -

अपिलाचा दिनांक दिनांक २०.१२.२००८
सुनावणीचा दिनांक २५.६.२००९
अपिलाथी-अनुपस्थित
जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी- उपस्थित.

अपिलार्थी श्री.हामीद हुसेन मोहम्मद उमर यांनी दि.१७.९.२००७ च्या अजा्रन्वये अंजुमन मोईनुत तुलबा, मालेगांव या संस्थेच्या शाळेविषयी माहिती मागितली. माहितीचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे आहे.

i) **दि.४.१०.२००७ ते ४.१०.२००३ या कालावधीची कार्यकारीणी सदस्यांची यादी.**

ii) **सन १९९८ नंतर कार्यकारिणीची निवड केव्हा करण्यांत आली, निवडून आलेल्या सदस्यांची यादी व ठरावाची छायांकित प्रत.**

iii) **सदर संस्थेच्या दि.४.१२.१९९९ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेची माहिती, चर्चेला आलेल्या विषयासह.**

iv) **दि.२५.१.२००० रोजीची विशेष सर्वसाधारण सभा कोणाच्या अध्यक्षतेखाली झाली. तसेच या सभेची माहिती, चर्चेला आलेल्या विषयांसह**

v) **श्री.अरशद हुसेन मोहंमद याकुब केव्हापासून संस्थेचे सदस्य कोणत्या तारखेपासून आहेत.**

माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.२०.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. दि.२०.१०.२००७ चा अर्ज रास्त व योग्य पध्दतीचा नाही. या कारणास्तव अर्ज विचारात घेतला नाही व त्यांना योग्य पध्दतीने अर्ज करावा असे दि.२६.११.२००७ रोजी कळविण्यांत आले. यानंतर अपिलार्थीनी दि.२०.१२.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलावरील सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर होते. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अशी तयारी दर्शविली की, अपिलार्थीनी योग्य रितीने माहिती मागितल्यास ती पुरविण्याची त्यांची तयारी आहे. उपलब्ध कागदपत्राची पाहणी करता असे निर्दशनास आले की, अपिलार्थीनी योगय रितीने अर्ज सादर केला आहे. माहितीचा अर्ज रास्त व योग्य नाही या कारणास्तव परत करण्याची अधिनियमात तरतूद नाही. वास्तविक पाहता प्रथम अपिलीय अधिकारी अपिलार्थीकडे विचारणा करु शकले असते व त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे हे जाणून घेऊ शकले असते. प्रथम अपिलीय अधिकारी यांची अर्ज परत करण्याची कृती योग्य नाही. त्यांनी भविष्यात असे कारण दर्शवून अपील अर्ज फेटाळून लावू नये, असे त्यांना निर्देश देण्यांत येतात. अपिलार्थीनी विचारलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत पुरवावी, असे आदेशित करण्यात येते.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक: २३.७.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.४४८५/०२

श्री.हरिश्चंद्र ज्योमा म्हात्रे ------- अपिलार्थी
अ-५, लेन क्र.८ सेक्टर-९
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उद्यान उपायुक्त ------- उत्तरवादी
वीर जिजामाता भोसले उद्यान,
भायखळा, पूर्व मुंबई २८

जन माहिती अधिकारी तथा मुख्य सुरक्षा अधिकारी,
बृहन्मुंबई महानगर पालिका, सुरक्षा बल, डॉ.इ. मोजेस रोड,
सी.ए.इमारत जवळ, वरळी,मुंबई.

-विवेचन -

अपिलाचा दिनांक दिनांक १२.३.२००९
सुनावणीचा दिनांक २१.७.२००९
अपिलाथी-अनुपस्थित जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारीउपस्थित.

अर्जदाराच्या अपिलात श्रीमती चारुशिला झिंजोर्डे यांच्या बाबतीतील माहिती मिळाली नाही असे मुख्यत्वेकरुन तक्रार आहे. अर्जदारास दि.१.७.२००९ रोजीच्या पत्राव्दारे असे कळविण्यांत आले आहे की, या अगोदर त्यांना दि.१९.९.२००८ रोजी माहिती देण्यांत आली होती व सदर माहिती देताना श्री.झिंजोर्डे चंद्रकात बी. विभागीय सुरक्षा अधिकारी यांच्याविरुध्द प्राथमिक चौकशी चालू असून चौकशी पूर्ण होताच आपणांस कळविण्यांत येईल असे स्पष्ट केले होते. त्यानुसा श्री.झिंजोर्डे यांच्याविरुध्द चालू असलेली चौकशी पूर्ण झाली असून सदर तक्रारीमध्ये श्री. व सौ. झिंजोर्डे यांच्याविरुध्द कोणताही पुरावा आढळून येत नसल्यामुळे सदर प्रकरण बंद करण्यांत आले आहे, असे कळविण्यांत आले आहे. अर्जदाराचे अपिल हे विशेषकरुन श्रीमती चारुशिला झिंजोर्डे यांच्या विरुध्द आहे.

श्री.झिंजोर्डे यांनी चंद्रप्रकाश को.ऑप.हौ.सोसयटीच्या आवारात अथवा इमारतीच्या कोणत्याही भागामध्ये कसलेही अनधिकृत बांधकाम केलेले नाही. तसेच अनधिकृत बांधकाम वाचविण्यासाठी त्यांनी आपल्या पदाचा गैर वापर केलेला नाही असे दिसून आल्याने व श्रीमती चारुशिला झिंजोर्डे यांच्या विरुध्दच्या तक्रारीमध्ये कोणताही पुरावा

आढळून येत नसल्याने सदर प्रकरण बंद करण्यात येत असल्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच श्रीमती चारुशीला झिंजोर्डे यांनी गुप्ता टेरेस, केळुस्कर मार्ग, कुर्ला या ठिकाणी गुप्ता टेरेस, केळुस्कर मार्ग, कुर्ला या ठिकाणी भविष्य निर्वाह निधीतून कर्ज घेऊन फ्लॅट खरेदी केलेला आहे, असेहि अर्जदारास कळविण्यांत आले आहे असे सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कळविल्याचे सांगितले व अर्जदारासही कळविण्यांत आलेले आहे. तसेच अपिलार्थीस सदर चौकशीचे कागदपत्र सुरक्षा दलाच्या मुख्यालयामध्ये कामाच्या दिवशी अवलोकित करता येतील, असेही कळविण्यांत आलेले आहे. परंतू अपिलार्थी अनुपस्थित असल्याने त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. मात्र दि.१२ सप्टेंबर २००८ रोजी आयोगाकडे जी तक्रार केली त्या तक्रार क्र.३४/२००९ प्रमाणे सदरील संपूर्ण माहिती मिळालेली आहे. अर्जदारास हवे तर सुरक्षा विभागास कामाच्या दिवशी जाऊन श्री व श्रीमती झिंजोर्डे यांच्या विरुध्द केलेल्या चौकशीबाबत नस्ती पाहता येईल. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांक: २८.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.३९३४/०२

श्री.मेवालाल हिरालाल शाह ------- अपिलार्थी
ओशो स्वीट सेंटर शॉप नं.२४३/८
डॉ.दामजी चाळ, आर.एम.डी. इस्टेट,
सर्व्हे नं.२२७ बी स्टेशन रोड
घाटकोपर पूर्व मुंबई

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहमुख्य अधिकारी ------- उत्तरवादी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भू-व्यवस्थापक (कुर्ला)
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व, मुंबई ५१

-विवेचन ः

श्री.मेवालाल हिरालाल शहा यांनी आयोगाकडे दि.२१.११.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपील सादर केले. त्या अपिलाची सुनावणी मुंबई येथे आयोगाच्या कार्यालयात दि.६.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी व तत्कालीन तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी होते.

अपिलार्थीनी दि.८.४.२००८ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून बी.एच.ॲन्ड ॲ.डी. बोर्ड, आर.एम.डी. इस्टेट पंतनगर, इन्क्वॅायरी नं.एएस/१०५/२००२च्या अनुषंगाने माहिती मागविली होती. परंतू मागणी केलेली माहिती न मिळाल्याने अपिलार्थीनी प्रथम अपिल केले. त्यावर सुनावणी होऊन जन माहिती अधिकारी यानी १५ दिवसांत अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती पुरविण्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.११.८.२००८ रोजी आदेश पारित केले. परंतू अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीनी दि.२१.११.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले.

व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला दोन्ही पक्षकारांची बाजू ऐकून घेण्यात आली तसेच सदर प्रकरणात आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्राची तपासणी करण्यांत आली. सुनावणीच्या वेळेला अपिलार्थीस उपस्थित जन माहिती अधिका-याकडे

उपलब्ध असलेल्या संबंधित कागदपत्राची तपासणी करण्यास परवानगी देण्यांत आली. तसेच नस्तीतील अपिलार्थीनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती देण्याचे निर्देश देण्यांत आले. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती ७ दिवसांत पुरविण्याचे मान्य केले. तेव्हा सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी मान्य केल्याप्रमाणे अपिलार्थीना माहिती पुरविली असणार असे गृहीत धरुन अपील निकालात काढण्यांत येत आहे.

असे असले तरी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भू-व्यवस्थापक श्री.एस.एस.सिंग यांनी अपिलार्थीस माहिती देण्यांत कुचराई केल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आल्याने त्यांचेवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई कां करण्यांत येऊ नये याबाबत दि.७.३.२००९ च्या आदेशान्वये खुलासा मागविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दि.२५.३.२००९ च्या पत्राने खुलासा प्राप्त झाला आहे.

अर्जदाराचा दि.८.४.२००८ रोजीचा अर्ज अर्जदाराच्या व्दितीय अपीलात निवेदन केल्याप्रमाणे दि.१५.४.२००८ रोजी देण्यांत आला. तत्कालीन सहाय्यक भूव्यवस्थापक तथा माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दि.७.७.२००८ रोजी अर्जदारास संपर्क करण्यांस सांगितले कारण नस्ती कार्यालयात मिळून येत नव्हती, असा खुलासा त्यांनी केला आहे. नस्ती मिळत नव्हती तर तेवढे तरी अर्जदारास त्वरीत व उशिरात उशिर एक महिन्यांत कळविणे आवश्यक होते. तद्नंतरही झालेल्या कार्यवाहीबाबत पुढीलप्रमाणे निवेदन त्यांनी दिलेले आहे.

अर्जदारास दि.१५ मे २००८ पर्यत माहती देणे किंवा कमीत कमी अंतरीम उत्तर देणे आवश्यक होते. अर्जदारास जन माहिती अधिका-याकडून प्रथम पत्र ७ जुलै रोजी पाठविण्यांत आले. त्यामुळे विलंब ५१ दिवस झालेला आहे. या विलंबाबद्दल ५१x२५० = १२७५० ची शास्ती जन माहिती अधिका-यावर लावण्यांत येत आहे. ही रक्कम २ हप्त्यात जन माहिती अधिकारी यांच्या सप्टेंबर २००९ व ऑक्टोबर महिन्याच्या पगारातून वसूल करुन ती शासनाने विहित केलेल्या बजेट हेडखाली जमा करण्याचे निर्देश मुख्य अधिकारी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना देण्यांत येत आहेत. त्यांनी शास्ती वसुल करुन संबंधित बजेट हेड खाली जमा केल्याचा अहवाल आयोगास दि.१५ ऑक्टोबर पूर्वी पाठवावा.

-आदेश-

मुख्य अधिकारी यांनी शास्ती वसुल करण्याच्या वरील आदेशाची अंमलबजावणी मुदतीत करावी व अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. या आदेशाची प्रत मुख्य अधिकारी यांना पाठविण्यांत यावी.

मुंबई
दिनांक: २८.८.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.२४९०/०२/बृहन्मुंबई

श्री.कमल नारायण शेडेकर ------- **अपिलार्थी**
कमल कम्युनिकेशन सेंटर,
मंत्रालयासमोर, देना बॅंक कॉर्नर,
मुंबई ४०० ०२१

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहमुख्य अधिकारी ------- **उत्तरवादी**
(द.ई.पू)मिळकत व्यवस्थापक
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व, मुंबई ५१

-विवेचन -

अपिलाचा दिनांक दि १७.३.२००९
सुनावणी दिनांक दि.२९.७.२००९
अपिलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित

दि.१० फेब्रुवारी २००९ रोजी सहमुख्य अधिकारी तथा अपिली अधिकारी यांचे आदेशानुसार क्षेत्र नोंदवही अधिका-यासमोर ठेवून त्याची छायाप्रत अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावयाची होती. त्याप्रमाणे क्षेत्र नोंदवहीची प्रत जी जन माहिती अधिकारी यांनी आणली होती ती अपिलार्थी यांना देण्यांचे त्यांना निर्देश देण्यांत आले. या उपर आणखी कोणती माहिती पाहिजे असे अपिलार्थीस विचारले असता. गोरेगांव संक्रमण शिबिर येथील इमारत दंगलग्रस्तासाठी राखीव ठेवलेल्या होत्या त्यापैकी इमारत क्र.४ सुध्दा होती काय, या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही असे सांगितले. ही माहिती दुस-या दिवशी दि.३०.७.२००९ रोजी अर्जदारास देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांक: २९र.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.२९६१/०२/बृहन्मुंबई

श्री. अविनाश मधुकर प्रभु ------- अपिलार्थी
४६/डी,६ ओल्ड चिखलवाडी.
टी.जे.रोड, मुंबई ४०० ०७

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा डेप्युटी चिफ इंजिनिअर ------- उत्तरवादी
(पुर्नबांधणी) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व, मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर (आरयु-ा)
मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व, मुंबई ५१

-विवेचन -

अपिलाचा दिनांक दि.३१.३.२००९
सुनावणी दिनांक दि.२९.७.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी उपस्थित

सी.टी.सर्व्हे नं. ३०९ नांदेड डिव्हिजन ताडदेव डिव्हिजन येथील जुनी चिखल वाडी या पुर्नविकसित होणा-या प्रकल्पाच्या संदर्भात २००२-२००८ या कालावधीत टेनामेंट खाली करण्याबाबत काही आदेश पारित केले होते का१ दिले असल्यास त्याची प्रत, नसल्यास याबाबत प्रस्तावित कार्यवाही व रिकामी झालेल्या टेनामेंट भाडयाने देण्यासंदर्भात माहिती पाहिजे होती.

अर्जदारास माहिती न मिळाल्यामुळे अंतिमतः त्यांनी आयोगाकडे अपिल सादर केले. अर्जदाराचा अर्ज व अपिलाचे संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन आयोगास सादर केले.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने श्री.अविनाश मधुकर प्रभु, यांचेकडून माहितीचा अधिकारी अधिनियम - २००५ अंतर्गत दि.१८.१२.२००८ रोजी अर्ज आलेले आहे. या अनुषंगने दि.१०.२.२००९ रोजी प्रथम अपिलाचे पत्र प्राप्त झालेले आहे. श्री. अविनाश प्रभू व श्री.भिष्मा नारकर यांचेकडून जनी चिखलवाडी या पुर्नविकसित होणा-या प्रकल्पाबाबत या कार्यालयास ७ ते ८ वेळा वेगवेगळी माहिती मागितलेली आहे. सदर अर्जदारांना मिळालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी काही प्रकरणी आपल्याकडे दुसरे अपिल केले होते त्याचाही निर्णय झालेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने अर्जदारास वेळोवेळी माहिती देण्यांत आलेली आहे. तसेच जुनी चिखलवाडी या पुर्नविकास योजनेचे पूर्ण फाईल इंस्पेक्शन सुध्दा दि.५.६.२००९ रोजी दाखविण्यांत आलेले असून त्यांना हवी असलेली माहिती देण्यांत आलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीस सदर योजनेबाबतची माहिती दडविण्याचा या विभागातर्फे प्रयत्न झालेचा प्रश्न उद्भवत नाही. एकाच

प्रकणात दोन अर्जदाराकडून वारंवार माहिती मागविण्यांत येत असल्यामुळे दि.१८.१२.२००८ अर्जाची माहिती अनावधानाने देण्यांत आलेली नाही व अर्जदाराकडून वेळोवेळी झालेल्या समक्ष भेटी दरम्यान सुध्दा याबाबत विचारणा झालेली नाही. दि.१८.१२.२००८ रोजी केलेल्या अर्जाबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

मंडळातर्फे जुनी चिखलवाडी येथील २२८ बैठया गाळयापैकी कोणालाही गाळे खाली करणे बाबतची कार्यवाही केलेली नाही. तथापि विकासक मे.श्रीपती स्काईज यांचे पत्र दि.२९.४.२००९ नुसार असेसमजले की, सुमारे १२१ गाळेधारकांनी, विकासकाने केलेल्या पर्यायी व्यवस्थेचा लाभ घेऊन त्यांचे मुळ गाळे खाली केलेले आहेत खाली झालेले गाळे दुस-या कोणालाही भाडयाने देण्याचा प्रस्ताव नाही.

सुनावणीच्या वेळेला अपिलार्थीचे प्रतिनिधी यांनी अशी पृच्छा केली की, या संदर्भात म्हाडाची पुढील कार्यवाही काय राहणार, या संदर्भात जर काही कागदपत्रे उपलब्ध असतील तर ती देण्यांत यावीत. जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार या संदर्भात कुठलेही कागदपत्र नाहीत. अर्जदार याबाबतची नस्ती पाहून त्याची खात्री करुन घेऊ शकतात. जन माहिती अधिकारी याचा खुलासा बघता पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

दिनांक: २९.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.२९६४/०२/बृहन्मुंबई

श्री. युसूफ तांबोळी, ------- अपिलार्थी
२०३,सफायर अपार्टमेंट,
एस.व्ही.रोड, जोगेश्वरी पश्चिम मुंबई १०२

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त ------- उत्तरवादी
मुंबई महानगरपालिका, के पश्चिम कार्यालय,
पालीराम पथ, अंधेरी पश्चिम,मुंबई ४०० ०५८

जन माहिती अधिकारी तथा
मुंबई महानगरपालिका,के पश्चिम कार्यालय,
पालीराम पथ, अंधेरी पश्चिम मुंबई ४०० ०५८

-विवेचन -

अपिलाचा दिनांक दि.२९.४.२००९
सुनावणी दिनांक दि.२९.७.२००९
अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराने रुम नं.७६,आरामनगर, पार्ट-१, सात बंगला,वर्सोवा येथील अनधिकृत बांधकामाची दि.२३ सप्टेंबर २००८ रोजी आयुक्त महानगर पालिका यांच्याकडे तक्रार केली होती व त्या तक्रारीबाबत झालेल्या कार्यवाहीबाबत दि.७.१.२००९ माहितीचा अधिकाराचा अर्ज दिला होता. अर्जदारास दि.६.२.२००९रोजीच्या पत्राने सद्यःस्थितीत तक्रारीत नमूद केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत उपलब्ध अभिलेखानुसार कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तसेच सदर बांधकामास कोणतीही परवानगी देण्यांत आलेली नाही व सद्यःस्थितीत कोणतेही निर्देश देण्यांत आलेले नसल्याची माहिती रेकॉर्डप्रमाणे दिलेली आहे.

वरील माहितीने समाधान न झाल्यामुळे प्रथम अपिल व नंतर व्दितीय अपिल केलेले आहे. सुनावणीच्यावेळी अर्जदार अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार रेकॉर्डप्रमाणे सदर बाबतीत अजुनही कार्यवाही व्हावयाची आहे. त्यामुळे अर्जदाराला सद्यःस्थितीतील माहिती रेकॉर्डप्रमाणे दिलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियमान्वये रेकॉर्डला जशी माहिती असेल तशी माहिती देण्यांत येते, हे जरी खरे असले तरी अर्जदाराचे समाधान हे त्यांच्या तक्रारीची महापालिकेनी दखल घेतल्याने होणार आहे. त्यामुळे ही बाब योग्यत्या कार्यवाहीसाठी महापालिका आयुक्तांच्या निदर्शनास आणण्यासाठी या आदेशाची प्रत त्यांना देण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे. आदेशाची प्रत महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई यांनाहि देण्यांत यावी.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: २९.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.८०१

श्री. शशांक प्रभाकर मदान ------- अपिलार्थी
शाकुंतल कमीद कॉलनी,
मुंबई आग्रा रोड,नासिक ४२२००१

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक------- उत्तरवादी
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,नासिक
मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,आयुक्त कार्यालय,
नासिक रोड,नासिक

जन माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी
शिक्षण खाते, नाशिक जिल्हा नाशिक

-विवेचन -

अपिलार्थीस श्री. शशांक प्रभाकर मदाने यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२.५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१५.९.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

१. लेखा शिक्षण विभाग कार्यालयातील माध्यमिक शिक्षकांच्या सेवा पुस्तकाबाबत.
२. लेखा शिक्षण विभागातील कार्यालयीन कर्मचारी/असिकारी यांचे अधिकार, कार्यकक्षा, नावे भेटण्याच्या वेळे संबंधी व इतर ११ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अर्जातील मुद्दा क्र.१ ते ६,८,९ व ११ बाबत प्रश्नोत्तर स्वरुपात माहिती मागितली आहे. प्रश्नोत्तर स्वरुपाची माहिती पुरविण्याची माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये तरतूद नाही. अर्जातील मुद्दा क्र.७ व १० याबाबत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयात येऊन अभिलेख व दस्तऐवजाची पहाणी आवश्यक ते शुल्क भरुन करु शकतात.मुद्दा क्र.९ बाबतची कार्यालयात दर्शनी ठिकाणी सविस्तर माहिती लावण्यांत आली आहे, असे जन माहिती अधिका-यांनी

अपीलकारास दि.१०.४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१५.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास आठ दिवसात विनाशुल्क माहिती देण्याची व्यवस्था करावी असे आदेश दि.१८.६.२००८ रोजी पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणी प्रमाणे माहिती पुरविली नसल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती अतिशय व्यापक स्वरुपाची आहे. तत्कालीन जन माहिती अधिका-याची बदली झाली असल्याने माहिती देण्यास विलंब झाला असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीवेळी प्रतिपादन केले. माहिती व्यापक स्वरुपाची आहे. त्यासाठी अदांजे रु.१७०००/- इतका खर्च येईल. माहिती अवलोकनार्थ उपलब्ध असल्याचेही प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. विवेक बाळगून अपिलार्थीनी कागदपत्रांची निवड करावी. त्यानंतर निवडलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास उपलब्ध करुन द्याव्यत.

-आदेश-

अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांक: २९.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.८०४/०२

श्री. शामराव शंकरराव जाधव ------- अपिलार्थी
रा.गट नं.१०८२,श्रमिक नगर समोर
ओझर दिक्षी रोड, ओझर (मिग)
ता.निफाड,जि.नासिक - ४२२२०७

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ------- उत्तरवादी
नाशिक उप विभाग,नासिक

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
नाशिक

-विवेचन -

अर्जदार श्री. शामराव शंकरराव जाधव यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीकरिता जन माती अधिकारी प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

अपीलकाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिका-याकडे दि.३१.५.२००८ रोजी अर्ज करुन, दि.२५.११.२००२ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.४.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३०.८.२००८ रोजी आदेश पारित केले. अपीलकाराच्या अर्जाबाबत एक महिन्याच्या कालावधीत निर्णय घ्यावा, असे आदेश पारित केले आहेत. त्यानंतरही जन माहिती अधिका-यानी माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन श्रीमती शांताबाई पांडुरंग डांगळे (मयत)रा.श्रीरामनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मोटवाणी रोड, नाशिक रोड,नाशिक यांना मुलंबाळ नसताना त्यांचे संदर्भात तहसिल,नाशिक यांच्या कार्यालयाकडून त्यांना पती व्यतिरिक्त दोन मुले व दोन मुली वारस असलेबाबत एप्रिल ९७ मध्ये वार दाखला दिला आहे. सदरचा वारस दाखला हा चुकीचा असून तो रद्द करणेबाबत अपीलकार जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,नाशिक यांचेकडे दि.२५.११.२००२ रोजी अर्ज केला होता. सदर अर्जाची सद्यःस्थिती काय आहे व त्यावर काय कार्यवाही करणेत आली याबाबत चौकशी करण्यांत येऊन तहसिलदार यांना आदेश देणेबाबत अपीलकार यांनी विनंती केली होती. अर्जावर एक महिन्यांत आत आवश्यकती प्रशासकिय कार्यवाही करण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश दिले होते.

ती कार्यवाही होऊन अर्जदारास दि.२.३.२००९ रोजी त्यांच्या दि.२५.११.२००२ च्या तक्रार अर्जाबाबत समर्पक उत्तर देण्यांत आले आहे.

अर्जदाराने सुनावणीच्या वेळी असे सांगितले की, त्यांच्या अपिलाचा उद्देश अर्ज दिल्यानंतर शासन नियमानुसार वेळेत माहिती मिळावी. कागदपत्र (महत्वाचे)कार्यालयात गहाळ होऊ नये व अर्जदारास अनावश्यक खर्च होऊ नये हा आहे.

अर्जदाराची अपेक्षा ही सर्वाची रास्त आहे. पण १९९७ सालचे चौकशी कागदपत्र कार्यालयात उपलब्धच नव्हते. म्हणून देता आले नव्हते. व अर्जदारास आता संपूर्ण स्पष्टीकरणे देण्यांत आले आहे.

-आदेश-

अपिल मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

दिनांक: ३०.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.८१२/०२

कु.भाबड योगिता प्रभाकर ------- अपिलार्थी
गणपती प्रसाद, येवला रोड, कॅम्प नं.२
मनमाड. ता.नांदगांव,जि.नासिक
मनमाड ४२३१०४

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ------- उत्तरवादी
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
पुणे

जन माहिती अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
पुणे.

-विवेचन -

कु.भाबळ योगिता प्रभाकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेण्यांत आली. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात दि.३.४.२००८ रोजी अर्ज करुन अपीलकाराची शिष्यवृत्ती मंजूर केली का? कोणत्या तारखेला शिष्यवृत्ती कॉलेजला केव्हा पाठविली. याबाबत तपशिलवार माहिती मिळण्याबाबत अपीलकाराने मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यानी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन शैक्षणिक वर्ष २००६-२००७ या वर्षात शिष्यवृत्ती मिळाली नसल्याने अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपीलकार मॉर्डन कॉलेज ऑफ एज्युकेशन बी.एड.(महिला)शिवाजी नगर, पुणे या कॉलेजमध्ये सन २००६-२००७ या शैक्षणिक वर्षात बी.एड्. या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला होता. सदर कॉलेजने अपीलकाराच्या शिष्यवृत्तीचा प्रस्ताव पाठविला नाही. महाविद्यालयाकडून शिष्यवृत्ती मंजूरी संबंधीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शिष्यवृत्ती मंजूरीची कार्यवाही करण्यांत येईल, असे जन माहिती अधिका-यानी सुनावणीचेवेळी प्रतिपादन

केले. प्राचार्य मॉर्डन कॉलेज ऑफ एज्युकेशन, शिवाजी नगर, पुणे-५ यांनी विशेष समाजकल्याण अधिकारी, पुणे यांचेकडे मागासवर्गीय विद्यार्थ्याचा भारत सरकार शिष्यवृत्ती (G.O.I)मंजूरीचा एकत्रित प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते. प्राचार्यानी शिष्यवृत्ती मंजूरीचा प्रस्ताव पाठविला आहे काय? त्यामध्ये अपीलकाराच्या नावाचा समावेश आहे काय ? याबाबतच्या परिस्थितीची माहिती अर्जदारास व विशेष समाजकल्याण अधिकारी, पुणे यांना जन माहिती अधिकारी/प्राचार्य मॉडर्न कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे यांनी द्यावी. अर्जदाराचा अंतर्भाव प्राचार्य मॉर्डन कॉलेज ऑफ एज्युकेशन यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही १० दिवसांत करावी. या आदेशाची प्रत त्यांनाहि पाठविण्यांत यावी. याबाबत प्रस्ताव करणे आवश्यक होते पण तो झाला नाही अशी परिस्थिती असेल तर दुरुस्त प्रस्ताव त्वरीत विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे पाठवावा लागेल हे सुज्ञास सांगणे नलगे.

-आदेश-

अपिल मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

दिनांक: ३०.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/१३/०२

श्री.महाबीर अर्स तक्रारकर्ता
५०२, स्वप्रसारिता सह.गृहनिर्माण संस्था (म)
स्वप्ननगरी, मुलूंड (प)
मुंबई ४०० ०८०

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, टी वॉर्ड यांचे कार्यालय,
लालादेवीदयाल रोड पांच रस्त्याजवळ, मुलूंड पश्चिम
मुंबई ४०० ०८०

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
बृहन्मुंबई महानगरपालिका, टी वॉर्ड यांचे कार्यालय,
लालादेवीदयाल रोड पांच रस्त्याजवळ, मुलूंड पश्चिम
मुंबई ४०० ०८०

-विवेचन-

श्री.महाबीर अर्स यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता इमारत व कारखाने, टी वॉर्ड यांना दि.२० ऑगस्ट २००८ रोजी अर्ज दिला होता. त्या संदर्भात माहिती देताना संदर्भाधीन 'awnings' हे त्यांच्या कार्यालयाने दि.२८.८.२००८ रोजी काढून टाकले अशी माहिती दिली. अर्जदाराने अशी तक्रार केली आहे की, सदरील माहिती जाणुनबुजून खोटी व दिशाभूल करणारी दिली आहे म्हणून जन माहिती अधिका-यास अधिनियमाच्या कलम २० नुसार दंड व्हावा. सदर तक्रारीची सुनावणी दि.४.८.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी तक्रारकर्ते व विद्यमान सब इंजिनिअर व कार्यकारी अभियंता हे उपस्थित होते.

अर्जदाराचे म्हणणे असे की, त्यांनी दि.९.९.२००८ रोजी सदरील 'awnings'ची ज्यावेळी छायाचित्र काढली आहेत ती आयोगाला सादर केली याचाच अथ दि.९.९.३००८ रोजी ही 'awnings' काढलेली नव्हती. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार ती सहजासहजी काढता येण्यासारखी नाहीत. जेणेकरुन २८ तारखेला काढण्यांत आली व नंतर ती लावण्यांत आली असे म्हणणे हे चुकीचे ठरु शकेल. अर्जदाराने हे कबुल केले की, सदरील 'awnings' हे दि.११.९.२००८ रोजी काढून टाकण्यांत आली. कार्यकारी अभियंता यांनी असे सांगितले की, ज्या वेळेला एखादे अनधिकृत बांधकाम काढून टाकावयाचे असेल तर त्यावेळेला वॉर्ड ऑफिसर परवानगी देता असतो. आयोगाने त्यांना विचारले त्या वेळेला

२८ तारखेला सदरहूं'awnings' काढून टाकले असे जे विधान केले ते कशाचे आधारे केले व त्याचा कागदोपत्री पुरावा असेल तर तो आज दि.४.८.२००९ रोजी आयोगास सादर करावा. सबब पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

-आदेश-

तक्रार मान्य करण्यांत येत आहे. वर उपरनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही करावी

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

दिनांक: ३०.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.२६६३/०२

संचालक, ------- **अपिलार्थी**
रिध्दी सिध्दी एस.डी.व्ही.प्रा.लि.
रुबी चेंबर्स, ४०/४३ धनजी स्ट्रीट,
मुंबई ४०० ०३

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक ------- **उत्तरवादी**
भूमापन व भुमी अभिलेख यांचे कार्यालय,
मुंबई शहर, जुने जकात घर, मुंबई -१

जन माहिती अधिकारी तथा
भूमापन व भुमी अभिलेख यांचे कार्यालय,
मुबंई शहर, जुने जकात घर, मुंबई -१

-विवेचन ₹

संचालक, रिध्दी सिध्दी एस.डी.व्ही.प्रा.लि.यांनी आयोगाकडे दि.१२ जुलै ३००७ रोजी अर्ज दाखल केला होता. त्यांची सुनावणी दि.२०.८.२००८ रोजी घेण्यांत आली त्यावेळी संचालक, रिध्दी सिध्दी प्रा.लि.चे प्रतिनिधी उपस्थित होते तसेच अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती :- (अपीलामध्ये नमुद केल्याप्रमाणे)

" TRUE EXTRACT COPY OF THE BLOCK PLAN WITH EXISTING LEGAL OR ILLEGAL (i.e.MARKED IN RED ALSO)STRUCTUES AS ON YEAR 1960 OR 1962 FOR CADESTRAL SURVEY 157 SHEET NO 195-196 (EDN 1962)OF MALABAR HILL DIVISION ."

अर्जदारास माहिती न देण्याचे कारण अर्जदारास हवे असलेले नकाशे आहे त्या स्थितीत देणे हे जन हितार्थ नाही, हे होते.

माहितीच्या अधिकाराचा वापर हा नागरिकांनी करावयाचा आहे. सदरील अपिलाचे अपिलार्थी हे कंपनीचे संचालक आहे व त्यांचे प्रतिनिधीचे नांव त्यांच्या अर्जात दिलेले नाही असे जरी असले तरी अर्जदारास माहिती न देण्याच्या बाबतीत अधिक्षक, मुंबई शहर, भूमापन व भुमी अभिलेख यांचे कार्यालय,प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

" मे.रिध्दि सिध्दि एस.डी.सी.प्रा.लि.यांनी मलबार कंबाला विभागामधील भूकर क्र.१५७ या सन १९५६ किंवा १९६० पूर्वीचा नकाशा कायदेशीर किंवा बेकायदेशीर बाब रेशेने दर्शविलेला नकाशा न मिळण्याबाबत आपल्याकडे अपील अर्ज केलेला आहे.

वरील प्रमाणे अर्जदार यांनी मागणी केलेल्या माहिती अनुसरुन असे सादर करण्यांत येते की, अर्जदार यांनी सन १९५६ साली तयार करण्यांत आलेल्यो आवृति मधील लाल रेषेने

दर्शविलेल्या बांधकामासह नकाशा देण्याबाबत विनंती केलेली आहे. याबाबतच्या आलेखाची तपासणी केली असता नकाशामध्ये केलेल्या लाल शाईच्या दुरुस्तीबाबत आलेखावर अधिका-याने रोस ठेवल्याचे दिसून येत नाही व लाल शाईच्या दुरुस्त्यांना कोणताही कागदोपत्री आधार दिसून येत नाही. याबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी दि.१.७.१९८३ च्या पत्राने शासनास अहवाल सादर करुन To stop issuing extract showing defail of additions made in red ink unless they are backed by proper survey record अशा सुचना दिलेल्या आहेत. त्यावरुन या कार्यालयाकडून अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती नाकारण्यांत आलेली आहे. सबब अर्जदार यांनी मागणी केलेली त्यांना पुरविता येणार नाही असे या कार्यालयाचे मत आहे. "

जिल्हाधिकारी यांनी दि.१.७.१९८३ रोजीचे ज्या स्वरुपात नकाशे आहेत त्या स्वरुपातील नकाशात दाखविण्यांत आलेल्या लाल शाईच्या दुरुस्त्यांना आधार नाही. त्यामुळे वरील नकाशे देण्यांत येऊ नयेत, असे नमूद करुन शासनास तसा अहवालही सादर केलेला आहे. एखाद्या नकाशाचा दुरुपयोग होण्याची शक्यता जरी असली तर त्या नकाशाच्या प्रती देऊ नयेत, हे केव्हाही जन हितार्थ सुसंगतच राहिल. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यानी नकाशे माहिती नाकारण्याचा जो निर्णय घेतलेला आहे तो आयोगास योग्य वाटतो. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

दिनांक: ३०.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.७९३/०२

श्री.छगन गोविंदराव ढोणे अपिलार्थी
लोकमान्य नगर, चौथी स्किम,
सिडको, नाशिक-८

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कोषगार अधिकारी -------उत्तरवादी
जिल्हा कोषगार कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार
नाशिक

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कोषागर कार्यालय
१ ला मजला, लेखा कोष भवन,
जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक

-विवेचन -

अपिलाचा दिनांक २५.३.२००८
सुनावणीचा दिनांक २५.६.२००९
अपिलार्थी - गैरहजर
जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी - हजर

अपिलार्थीनी दि.२० फेब्रुवारी २००७ च्या अर्जान्वये तालुक्यातील उपकोषगार कार्यालयातून मिळणा-या व दस्ताच्या नोंदणीसाठी लागणा-या गैरन्यायिक मुद्रांकबाबतची १२ वर्षाची माहिती विचारली. माहितीचे स्वरुप थोडक्यात खालीलप्रमाणे.

१. दस्तऐवजाची नोंदणी करणारी व्यक्ती प्रत्यक्ष उपस्थित नसताना मुद्रांकाचा भरणा करु शकतात का ?
२. अशा प्रकारे मिळणारे मुद्रांक हस्ते म्हणून स्विकारु शकतात का ?
३. अशा प्रकारे मुद्राकासाठी भरलेल्या रकमेच्या चलनाच्या प्रती किती वर्षापर्यत व कोठे मिळू शकतात.

अर्जदाराला या अनुषंगाने दि.२०.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर देण्यांत आले व कळविण्यांत आले की, आपणांस अभिप्रेत असलेल्या माहितीचा सविस्तर उल्लेख केल्यास त्यानुसार दस्तऐवजाच्या नकला पुरविण्यांत येतील. या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीना दि.२६.२.२००७ रोजीच्या प्रथम अपील दाखल केले. यानंतर अपिलार्थीस दि.२७.१२.२००७ रोजी माहिती देण्यात आली. तथापि प्राप्त झालेली माहिती अयोग्य व चुकीची असल्याचे कारण नमूद करुन अपिलार्थीनी दि.२४.३.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी खुलासा सादर केला. त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, अपिलार्थीना माहिती पुरविण्यांत आली आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नसल्याने माहिती अपूर्ण व अयोग्य आहे असे त्यांना का वाटते हे जाणुन घेता आले नाही. अपिलार्थीना त्यांच्या अर्जाच्या संबंधात नियमावलीच्या प्रतीच्या रुपात मुद्रांक विक्रेत्यांना कोषागारासंबंधी येणा-या अडचणीबाबत संचालनालयाने दिलेल्या स्पष्टीकरणाचे विवरणाच्या स्वरुपात माहिती दिली असल्याने पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

दिनांक: २९.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.८०५/०२

श्री.देविदास दगडू कांबळे — अपिलार्थी
न्यू महाराष्ट्र कॉलनी, गणेशवाडी,
मालेगांव कॅम्प, ता.मालेगाव.
जि.नाशिक

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार — -------उत्तरवादी
तहसिल कार्यालय, मालेगांव,जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
मालेगांव जि.नाशिक

-विवेचन -

अपिलार्थी श्री.देविदास दगडू कांबळे,मालेगांव यांनी दि.२०.९.२००८ च्या अर्जाव्दारे मालेगांव कॅम्प येथील सर्व्हे नं.४१ व स.नं.४६ मधील जमिनीबाबत माहिती विचारली होती. सदर अर्जान्वये त्यांनी असेही विचारले होते की, या जमिनीवर झालेली बांधकामे कोणाच्या परवानगीने झालेली आहेत. अर्जातील माहिती महात्मा गांधी विद्या मंदिर, मालेगांव यांच्या संबंधित असल्याने अपिलार्थीचा अर्ज दि.१०.१०.२००८ रोजी संस्थेकडे वर्ग करण्यांत आला. संस्थेने दि.३.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीना उत्तर दिले की, सदर जमिन दि.७.७.१९५३ च्या आदेशान्वये शैक्षणिक कार्यासाठी संस्थेला देण्यांत आली आहे व याचा वापर शैक्षणिक कामासाठी केला जात आहे. जागेच्या मोजमापासंबंधाने असे कळविण्यांत आले की, जागेचे ७ x १२ चे उतारे विनामूल्य पुरविण्यांत येत आहेत.

यावर समाधान न झाल्याने अपिलार्थीनी दि.३.११.२००८ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपील अर्ज दि.२८.११.२००८ रोजी निकाली काढण्यांत आला. यानंतर अपिलार्थीनी दि.४.२.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केले की, महात्मा गांधी विद्या मंदिर या संस्ाील जागा शैक्षणिक कामाच्या वापरासाठी देण्यांत आली होती व संस्था शैक्षणिक प्रयोजनासाठीच जागेचा वापर करत आहे. जन माहिती अधिकारीयांनी संस्थेकडे दि.१०.१०.२००८रोजी अर्ज वर्ग केला व संस्थेने अपिलार्थीना दि.३.११.२००८ रोजी माहिती पुरविली यावरुन असे दिसते की, माहिती पुरविण्यास विलंब झालेला नाही. त्यामुळे सुनावणीच्या वेळी विलंबासाठी अपिलार्थीने दंड आकारण्याची मागणी मान्य करता येत नाही.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई — (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः २९.७.२००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/३८९०/०२

श्री.अेस. आनंदनटराज, अपिलकर्ता
बी-७०६, राजश्री अपार्टमेंटस
महावीर नगर, कांदिवली पश्चिम,मुंबई ४०० ०६७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(इमारत प्रस्ताव) उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका पी व आर विभाग कार्यालय,
१ ला मजला, आंबेडकर मार्केट इमारत,नारायण जोशी मार्ग,
कांदिवली पश्चिम मुंबई ४०० ०६७

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव)
बृहन्मुंबई महानगरपालिका पी व आर विभाग कार्यालय,
१ ला मजला, आंबेडकर मार्केट इमारत,नारायण जोशी मार्ग,
कांदिवली पश्चिम मुंबई ४०० ०६७

-विवेचन-

श्री.एस.आनंदनटराजन यांनी आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी दिनांक ३.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराने जन माहिती अधिकारी आर-वॉर्ड तथा कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव, मनपा यांचेकडे दि.२६.९.२००८ रोजी केलेल्या अर्जानुसार दि.१.४.२००८ ते ३०.६.२००८ या कालावधीत अर्जाची माहिती पुरविल्याने किती खर्च आला वा त्या शुल्कापासून किती उत्पन्न मिळाले याची माहिती पाहिजे होती. यापैकी त्यांना किती उत्पन्न झाले याची माहिती देण्यात आली मात्र महापालिकेला झालेल्या खर्चाची माहिती देण्यांत आलेली नाही.

सुनावणीच्या वेळी अपिलकर्ते अनुपस्थित होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, महपालिका करीत असलेल्या खर्च हा वेगवेगळया प्रकारे असतो. उदा.मनुष्य बळावरील खर्च, फोटोकॉपीवरील खर्च, फोटोकॉपीचा मेंटनंन्स खर्च, तसेच या सर्व फोटोकॉपी या वेगवेगळया कामासाठी वापरल्या जात असतात. त्यामुळे माहितीच्या अधिकारासाठी नेमका किती खर्च आला ही माहिती देता येणे शक्य नाही व तसा हिशेबाचा रेकॉर्ड ठेवलाही जात नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे सयुक्तिक वाटते. मात्र अर्जदारास प्रत्येक अर्जापोटी किती शुल्क प्राप्त झाले याबाबतचे जे रजिस्टर्स असतील ते रजिस्टर्स दाखवून त्यांना शुल्क प्राप्ती संबंधी काही विवक्षित माहिती पाहिजे असेल तर रजिस्टर्सच्या प्रती अर्जदारास देण्यांत याव्यात. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: २९.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/३८२९/०२

श्री.अेस. आनंदनटराज, अपिलकर्ता
बी-७०६, राजश्री अपार्टमेंटस
महावीर नगर, कांदिवली पश्चिम,मुंबई ४०० ०६७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सचिव उत्तरवादी
राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय भवन,
मंत्रालय,मुंबई.३२

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कार्यासन -२
राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय भवन,
मंत्रालय,मुंबई.३२

-विवेचन-

श्री. आनंद नटराजन यांनी आयोगाकडे केलेल्या दि.२१.११.२००८ च्या व्दितीय अपिलाची सुनावणी दि.१७.२.२००९रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास जी माहिती पाहिजे होती त्यानुसार विविध कलमांच्या नियमाचा अन्वयार्थ विचारलेला आहे व काही मुद्यांवर स्पष्टीकरणे मागविलेली होती. अर्जदाराने मागणी केलेली "माहिती अधिकार अधिनिमय २००५ " च्या कलम २ (च) व (झ)मध्ये केलेल्यो अनुक्रमे माहिती व अभिलेखाच्या व्याखेत बसत नसल्याने ती देता येऊ शकत नाही असे अर्जदारास दि.६.८.२००८च्या अर्जास अनुसरुन दि.२२.८.२००८ रोजी कळविण्यांत आलेले आहे.

प्रथमअपिलातील माहितीने समाधान न झाल्यामुळे अर्जदाराने आयोगाकडे व्दितीय अपील सादर केलेले आहे. प्रथम अपिलावर तत्कालीन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देणे आवश्यक होते मात्र ते आता सेवानिवृत्त झालेले आहेत व अर्जदारास जी माहिती पाहिजे आहे ती रेकॉर्ड या स्वरुपात त्या कार्यालयात उपलब्ध असायला पाहिजे. एखादया व्यक्तीस मत पाहिजे असते ते मत कुठल्यातरी नस्तीमध्ये उपलब्ध असले ते द्यावयाचे असते एरवी ते मत उपलब्ध करुन देणे आवश्यक नाही. या गोष्टी सुनावणीच्या वेळी अर्जदारास समजावून सांगितलेल्या आहेत. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: २९.७.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/१३/०२

श्री.महाबीर अर्स तक्रारकर्ता
५०२, स्वप्रसारिता सह.गृहनिर्माण संस्था (म)
स्वप्ननगरी, मुलूंड (प)
मुंबई ४०० ०८०

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, टी वॉर्ड यांचे कार्यालय,
लालादेवीदयाल रोड पांच रस्त्याजवळ, मुलूंड पश्चिम
मुंबई ४०० ०८०

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
बृहन्मुंबई महानगरपालिका, टी वॉर्ड यांचे कार्यालय,
लालादेवीदयाल रोड पांच रस्त्याजवळ, मुलूंड पश्चिम
मुंबई ४०० ०८०

-विवेचन-

श्री.महाबीर अर्स यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) टी वॉर्ड यांना दि.२० ऑगस्ट २००८ रोजी अर्ज दिला होता. त्या संदर्भात माहिती देताना संदर्भाधीन 'awnings' हे त्यांच्या कार्यालयाने दि.२८.८.२००८ रोजी काढून टाकले अशी माहिती दिली. अर्जदाराने अशी तक्रार केली आहे की, सदरील माहिती जाणुनबुजून खोटी व दिशाभूल करणारी दिली आहे म्हणून जन माहिती अधिकाऱ्यास अधिनियमाच्या कलम २० नुसार दंड व्हावा.

सदर तक्रारीची सुनावणी दि.४.८.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी तक्रारकर्ते व विद्यमान सब इंजिनिअर व कार्यकारी अभियंता हे उपस्थित होते.

अर्जदाराचे म्हणणे असे की, त्यांनी दि.९.९.२००८ रोजी सदरील 'awnings'ची ज्यावेळी छायाचित्र काढली आहेत ती आयोगाला सादर केली याचाच अर्थ दि.९.९.२००८ रोजी ही 'awnings' काढलेली नव्हती. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार ती सहजासहजी काढता येण्यासारखी नाहीत. जेणेकरुन २८ तारखेला काढण्यांत आली व नंतर ती लावण्यांत आली असे म्हणणे हे चुकीचे ठरु शकेल. अर्जदाराने हे कबुल केले की, सदरील 'awnings' हे दि.११.९.२००८ रोजी काढून टाकण्यांत आली. आयोगाने जन माहिती अधिकारी यांना विचारले त्या वेळेला २८ तारखेला सदरहूं'awnings' काढून टाकले असे जे

विधान केले ते कशाचे आधारे केले व त्याचा कागदोपत्री पुरावा असेल तर तो आजच सायंकाळी ५.०० वाजेपर्यत दि.४.८.२००९ रोजी आयोगास सादर करावा.

सहाय्यक अभियंता, इ व का. टी. विभाग जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केलाः-

मुलूंड टी विभागातील वृंदावन इमारती मधील पुजा हया हॉटेलचे ओनिंग हे तात्पुरत्या स्वरुपाचे असल्यामुळे श्री.महाबीर अर्स हयांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर हया कार्यालयातील कनिष्ठ अभियंता श्री.खाडे यांनी कुठल्याही स्वरुपाची निष्कासन करण्यासाठीच्या आदेशाची कागदपत्रे तयार न करता दि.२८.८.२००८ रोजी सदर ओनिंग काढून टाकले. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे हॉटेलचे ओनिंग हे तात्पुरत्या स्वरुपाचे असल्यामुळे कनिष्ठ अभियंता खाडे यांनी निष्कासनाच्या कारवाईचा अहवाल तसेच निष्कासन नोंदवहीत नमुद केल्याचे कार्यालयातील कागदपत्रांची पडताळणी केली असता निदर्शनास येत नाही.

यावरुन स्पष्ट होते की, दि.२८.८.२००८ रोजी ओनिंग काढून टाकण्यांत आले याची रेकॉर्डला कुठेहि नोंद नाही. माहितीचा अधिकार अधिनियमानुसार जी माहिती दिली जाते ती एकतर कागदपत्रांची फोटो कॉपी या स्वरुपात आणावयास पाहिजे किंवा नोंदल्या गेलेल्या रेकॉर्डच्या आधारावर द्यायला पाहिजे. नुसत्या स्मरणशक्तीच्या आधारावर नाही.

कनिष्ठ अभियंता श्री.खाडे यांनी यांची नोंद घ्यावी माहितीचा अधिकार अधिनियमाखाली जन माहिती अधिकारी यांचेवर असलेली अचूक व फुलफ्रूफ असलेली माहिती देण्याची जबाबदारी पार पाडलेली नाही. याबद्दल त्यांचेवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये २०००/- रुपयाची शास्ती लादण्यांत येत आहे.

वॉर्ड ऑफिसर टी वॉर्ड यांनी किंवा श्री. खाडे आता जेथे काम करीत असतील त्या विभागाच्या प्रमुखांनी (श्री.खाडे बदलून गेले असल्यामुळे वॉर्ड ऑफिसर टी वॉर्ड यांनी या आदेशाची प्रत संबंधित विभाग प्रमुखास पाठवावी) ही शास्ती सप्टेंबर महिन्याच्या १ ऑक्टोबर २००१ रोजी होणा-या पगारातून वसुल करावी. शासनाने विहित केलेल्या बजेट हेडमध्ये जमा करुन आयोगास तसा अनुपालन अहवाल पाठवावा

-आदेश-

तक्रार मान्य करण्यांत येत आहे. संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

मुंबई

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः ४.८.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/३८१/०२

श्री.किर्ती बी. सोनी. तक्रारकर्ता
किर्ती आर्टस,
२० निलकंठ परब चाळ, पोदार वाडी,
शहाजी राजे मार्ग, काळ डोंगरी,
विलेपार्ले, मुंबई ५७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी उत्तरवादी
(अतिक्रमण/निष्कासन),गृहनिर्माण भवन,
रुम नं.६८ तळमजला, वांद्रे पूर्व मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,
(अतिक्रमण/निष्कासन),गृहनिर्माण भवन,
रुम नं.६८ तळमजला, वांद्रे पूर्व मुंबई ५१

-विवेचन-

श्री. किर्ती सोनी, यांनी आयोगाकडे दि.३१.३.२००८ रोजी अशी तक्रार सादर केली की, आयोगाने दि.२०.२.२००८ रोजी जे आदेश पारित केले त्याची अंमलबजावणी झालेली नाही. या तक्रारीची चौकशी दि.४.८.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी तक्रारकर्ते व विद्यमान माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराच्या तक्रारीबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा आयोगास सादर केलेला आहे.

"आपलेकडील अपिल क्र.२००७/१८५३/०२ मध्ये श्री. किर्ती सोनी यांचे अपिल अंशत: मान्य करण्यांत आले असूनश्री. किर्ती सोनी यांनी मागितलेली माहिती व कागदपत्रे त्यांना देण्यांत यावी असे निर्देशित केले आहे.

तक्रारदार श्री.किर्ती सोनी हे या कार्यालयात दि.२.४.२००८ रोजी उपस्थित राहिले. सदर दिवशी त्यांना आवश्यक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती देण्यांत आल्या व त्यांनी त्यांच्या शंकेचे निरसन झाल्याचे व कोणतीही तक्रार राहिली नसल्याबाबत लेखी जबाब दिला आहे.

अपिलकर्ता यांनी ज्यांच्या बाबत आक्षेप घेतला आहे त्या परि-२ मधील अ.क्र.१७९वरील झोपडीधारकाचे नांव ३८ विलेपार्ले विधानसभा मतदार संघाच्या १९९५ च्या मतदार यादीत समाविष्ट आहे व त्यामुळे त्यांना पात्र करण्यांत आले आहे. तसेच मतदार यादीत नांव असल्यावर इतर पुराव्याची आवश्यकता नाही.

श्री. किर्ती सोनी यांनी त्यांच्या दि.४.४.२००८ अर्जात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणाने (एस.एस.ए.)पुर्नपडताळणीसाठी (Reverification)पत्र पाठविल्याचे नमूद करुन त्याबाबतही कार्यवाही न झाल्याचे म्हटले आहे. परंतु सदरचे प्रकण मा.अपर जिल्हाधिकारी यांचेकडून

पुर्नपडताळणी/फेरचौकशीसाठी या कार्यालयास प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे श्री.सोनी यांनी त्यांच्या दि.४.४.२००८ च्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे या कार्यालयास सदरचे पत्र मिळाले नसल्याचे सांगण्यांत आले ही बाब खरी आहे.

अपिलकर्ता यांचा उद्देश कार्यालयात जी माहिती उपलब्ध नाही ती झोपडीधारकांकडे पाठपुरावा करुन अपिलकर्ता यांना मिळवून द्यावी अशी आहे.

आपल्या आदेशाचे पालन करण्यांत आले असून अवमानता करण्याचा कोणताही हेतु नव्हता. कृपया ही बाब विचारात घ्यावी व दंडात्मक कार्यवाही करु नये हि विनंती. "

सदर खुलासा मान्य करण्यांत येत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ४.८.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/७२/०२

श्री.डी.टी.चाफे **तक्रारकर्ता**
५०-सी, भूपेन चेंबर्स,४ थामजला, दलाल मार्ग,
फोर्ट,मुंबई ४०० ०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता **उत्तरवादी**
(इमारत प्रस्ताव) मुंबई महानगर पालिका, शहर विभाग
इ वॉर्ड महानगर पालिका बिल्डिंग १०शेख हाफिझुद्दीनमार्ग,
भायखळा, मुंबई ४०० ०८

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
(इमारत प्रस्ताव) मुंबई महानगर पालिका, शहर विभाग
इ वॉर्ड महानगर पालिका बिल्डिंग १०शेख हाफिझुद्दीनमार्ग,
भायखळा, मुंबई ४०० ०८

-विवेचन-

श्री.डी.टी.चाफे, यांनी दि.२७.३.२००९ रोजी आयोगाकडे अशी तक्रार केली की, आयोगाने अपिल क्र.३१२१ नुसार जे आदेश दिले होते त्या आदेशाची अंमलबजावणी जन माहिती अधिकारी यांनी योग्यरितीने केलेली नाही. सदर तक्रारीची सुनावणी दि.२.८.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी (तत्कालीन व विद्यमान)उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी तक्रारीच्या संदर्भात पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला.

वर संदर्भिलेल्या अपीलावर मा.माहिती आयुक्तासमोर दि.१६.१०.२००८ रोजी सुनावणी झाली व त्यावर आदेश पारित करण्यांत आले. सदर आयोगाचे आदेश या कार्यालयास दि.२१.११.२००८ रोजी प्राप्त झाले. त्यानंतर सदर आदेशानुसार विहीत वेळेमध्ये श्री.डी.टी.चाफे यांना पत्र लिहून तयांना या कार्यालयात उपस्थित राहण्यास कळविण्यांत आले. पत्र सोबत जोडले आहे. त्यानंतर त्यांना कार्यालयात त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांविषयी माहिती देण्यांत आली तसेच उपलब्ध दस्तऐवजा विषयीच्या पाहणीविषयी विनंती करण्यांत आली. तसेच या कार्यालयाच्या मॅन्युअलची प्रत दाखविण्यांत आली. त्यानंतर सदर मॅन्युअलची प्रत त्यांना निशुल्क पाठविण्यांत आली या कार्यालयाच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. श्री. चाफे यांच्या तक्रारीत तथ्य नाही. त्यांना या कार्यालयात उपलब्ध असलेल्या कोणत्याही दस्तऐवजाची पाहणी करु शकतात व त्यांच्या प्रती शुल्क भरुन घेऊ शकतात.

जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास उपलब्ध असलेली माहिती देण्याचा प्रयत्न जरी केलेला दिसला तरी जे मॅन्युअल तयार केलेले आहे ते अद्ययावत केलेले दिसत नाही हे मॅन्युअल अद्यायावत

करण्याची कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करावी व अर्जदारास हवे असल्यास त्यांना शुल्क भरुन अद्ययावत केलेले मॅन्युअल प्राप्त करुन घ्यावे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ४.८.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/२७८/०२

श्री.सी.एन.ठक्कर — तक्रारकर्ता
प्रो.निलेश इलेक्ट्रीक स्टोअर्स
१७०/३/बी पंचशील हाईटस,
कांदिवली पश्चिम मुंबई ४०००६७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा — उत्तरवादी
महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ,वांद्रे पूर्व
मुंबई ४०००५१

जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ,वांद्रे पूर्व
मुंबई ४०००५१

-विवेचन-

श्री.सी.एन.ठक्कर यांनी दि.२२.१२.२००७ म्हाडाकडे जो अर्ज केलेला आहे त्यात त्यांना १९८४-८५ साली जे इलेक्ट्रिकल इन्स्टॉलेशनचे जे काम केले आहे त्याच्या अंतिम बिलाची माहिती अर्जदारास दि.२४.२.२००७ रोजीच्या अर्जाने पाहिजे होती. दि.२६.३.२००७ रोजी कळविण्यांत आले की, सदरील नस्ती २० वर्षापूर्वीची असून संबंधित कागदपत्र सापडत नाही. तेव्हा अर्जदाराकडे जे कागदपत्र असतील ते त्यांना देण्याची विनंती करण्यांत आली होती जेणेकरुन अंतिम देयकाबाबत कार्यवाही करता येऊ शकेल,असे त्यांना कळविण्यांत आलेले आहे. अर्जदाराने त्यांचे अर्जात असे नमूद केले आहे की, त्यांच्या अंतिम बिलाचे सेंटलमेंट हवे आहे या संबंधीची तक्रार आहे.

सदर तक्रारीची सुनावणी दिनांक ४.८.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी तक्रारकर्त्याचे प्रतिनिधी व कार्यकारी अभियंता तथा जन माहिती अधिकारी उपस्थित होते त्यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले आहे :-

१. वरील विषयासंदर्भात लिहिल्याप्रमाणे ३४३ गाळे अल्प उत्पन्न गाळे, चिकणघर, कल्याण (प)येथील विद्युत कामे करण्याबाबतचे करारपत्र या कार्यालयात झालेले नसून ते करारपत्र कार्यकारी अभियंता विद्युत/मु.गृ.व क्षे.वि.मंडळ या कार्यालयात झालेले हेते. करारपत्र व मोजमाप पुस्तिका ही त्या कार्यालयाशी संबंधित आहे. परंतू १९९८ साली या कार्यालयाचे नवीन पद निर्माण झाल्यानंतर कोकण विभागाचा कार्यभार या कार्यालयाकडे आलेला आहे.

२. संबंधित कामाचे करारपत्र २९८४/८५ मध्ये झालेले असून १५.४.१९८६ रोजी त्यानुसार ५ वे अंतिम देयक नसुन फक्त ५ वे चालू देयक सही केल्याचे उपविभाग कार्यालयातील नस्तमधील तपशिलानुसार आढळते.

३. कार्यालयाने दिलेल्या उत्तराप्रमाणे करारपत्र/मोजमाप पुस्तिका वा ४थ्या चालू देयकाची प्रमाणित प्रत पुढील ५ वे व अंतिम देयक देण्यासाठी आवश्यक आहे. परंतू वरील गोष्टी न मिळाल्यास काय करावे ? याबाबत कार्यालयाने वरिष्ठ कार्यालयांना कार्यालयीन टिप्पणी पाठवली असून त्यांच्या मतानुसार वरीलपैकी एक तर बाब मिळणे आवश्यक आहे.

४. त्यानुसार कार्यालयाने मुख्य लेखाधिकारी/कोकण मंडळ यांना १९८५ मधील ledger/Cash Book हयातील नोंदीनुसार वा बिलाची प्रमाणित प्रत मिळण्याविषयी लिहिले आहे.

५. तसेच संबंधित मोजमापपुस्तिका नं. ६२९६ कार्यकारी अभियंता विद्युत/मुंबई मंडळ कार्यालयातून गहाळ झाल्याचे व ती मोजमाप पुस्तिका ऑक्टोबर १९९९ मध्ये देयकाचे मोजमाप पुस्तिकेत नोंद घेऊन ती मुख्य लेखाधिकारी / मुंबई मंडळ यांना सादर झाल्याचे आढळते. त्यामुळे मुख्य अभियंता १/प्राधिकरण यांना संबधित कागदपत्रे पुन्हा Record Section मध्ये शोधण्याच्या निर्देशनाबाबत लिहिलेले आहे.

वरील कोणतीही कागदपत्रे वा मोजमाप पुस्तिकेचा शोध झाल्यानंतर त्वरीत त्याबाबतीत सक्षम अधिका-याकडून परवानगी घेऊन संबंधित कार्यालयाला ५ वे अंतिम देयक तसेच सुरक्षा रक्कम देण्याबाबत कळविण्यांत येईल."

त्यामुळे अर्जदारास त्यांच्या बिलासंबंधी सद्य:स्थितीची माहिती दिलेली आहे. मात्र अर्जदाराचे समाधान हे त्यांच्या बिलाचे सेटलमेंट होण्यातच आहे. याची जाणीव कार्यकारी अभियंता यांनी ठेवावी.

-आदेश-

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ४.८.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४५१४/०२

श्री.मोहम्मद फारुख शहादू **अपिलकर्ता**
बागर अहमद इमारत फ्लॅट नं.२०१
१६ मेघराज, सिटी रोड, आग्रीपाडा, मुंबई ४०००८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता **उत्तरवादी**
कस्टमर केअर (एन/डब्ल्यू),कर्मशियल नॉर्थ डिव्हिजन,
बेस्ट २ रा मजला ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरिंग इमारत,
खोर्दाद सर्कल, दादर (टी.टी.)मुंबई.

जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता,
कस्टमर केअर(इ वॉर्ड) ४ था मजला, बेस्ट कार्यालय,
नविन इमारत वडाळा, मुंबई ३१

-विवेचन-

श्री.मोहम्मद फारुख शहादू यांनी आयोगाकडे दि.२४ एप्रिल २००९ रोजी सादर केलेल्या अपिलाची सुनावणी दिनांक १३.८.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अर्जदार व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराला जी माहिती पाहिजे होती ती त्यांना पैसे भरल्यानंतर देण्यांत आलेली आहे असे दिसून आले. अर्जदार यांना खालीलप्रमाणे छायांकित प्रती देण्यांत आलेल्या आहेत.

१. **अर्ज क्र.५०४९२३८७ दि.१२.११.२००८**
२. **अनामत रक्कम रु.१५००/- व जोडणी शुल्क क्र.५०/- भरणा केल्याची पावती.**
३. **कार्यपूर्ती आणि चाचणी प्रतिव्रत्ती**
४. **संगणीकृत अभिलेख**
५. **मोहम्मद फारुख शाहदत चौधरी यांचे शपथपत्र**
६. **मोहम्मद फारुख शाहदत चौधरी यांची भाडेपावती**
७. **मोहम्मद ईलियास शाहदत चौधरी यांचे हमीपत्र**
८. **ग्राहक क्र.५४२-२९७-००३ यांचे भरणा केलेले चीज देयक**
९. **दक्षता विभागाकडुन प्राप्त झालेले ना-हरकत प्रमाणपत्र (clearance)**

अर्जदार व त्यांचे बंधु यांच्या जागेच्याबाबत काही वाद आहेत त्या वादाचे निराकरण सिव्हिल कोर्टाकडून करुन घ्यावयाचे आहे. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जदार यांच्या नावावर असलेले मीटर हे पैसे न भरल्यामुळे खंडीत करण्यांत आले

होते. सदर मीटर अर्जदाराच्या नावावर परत **Restore** करुन देण्यांत आलेले आहे. माहिती देण्याच्याबाबत कसुर झालेला दिसत नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

दिनांक: १४.८.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४५४९/०२

श्री.युसूफ सेलेमान बागवाला — अपिलकर्ता
दस्तगीर हाऊस, फ्लॅट नं.८
३ रा मजला, मराठा मंदीर मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त — उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका इ विभाग कार्यालय
१० शेख हफिझुद्दिन मार्ग, भायखळा (पश्चिम)
मुंबई. ४०० ०८

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का)
बृहन्मुंबई महानगरपालिका इ विभाग कार्यालय
१० शेख हफिझुद्दिन मार्ग, भायखळा (पश्चिम)
मुंबई. ४०० ०८

-विवेचन-

श्री.युसूफ सुलेमान बागवाला यांनी सुनावणीच्या वेळला असे पत्र दिले की, सदर अपिल चालविण्यास त्यांना स्वारस्य नाही. सबब पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई — (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: १४.८.२००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपील क्र.४४५०/०२

श्री.संजय आनंदा पवार ------- अपिलार्थी
४०२, कांदिवली पद्मजा को.हौ.सोसायटी
प्लॉट नं.६ आर.एस.सी.-१ म्हाडा ले आऊट
गणेशनगर, कांदिवली पश्चिम मुंबई ४०० ०६७

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक ------- उत्तरवादी
पोलिस उपआयुक्त परिमंडळ ज्ञ१२
शैलेंद्र नगर दहिसर पूर्व,मुंबई ४०००६८

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहाय्यक पोलस आयुक्त उत्तर नियंत्रण कक्ष
कांदिवली पूर्व मुंबई ४०० १०१

-- विवेचन --

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: दि.७.१०.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: दि.१५.११.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	:दि.६.१२.२००८
प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	:दि.२.१.२००९
द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	:दि.६.५.२००९

सुनावणीचा दिनांक : ८ जुलै २००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :चारकोप पोलिस यांचेमार्फत श्री.संजय पवार यांचेशी संबंधित विविध प्रकरणांमध्ये करण्यांत आलेली कार्यवाही, पंचनामे, अहवाल अशा एकूण ०५ मुद्यांची माहिती मिळण्याबाबत..

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर : सविस्तर माहिती दि.१५.११.२००८ देण्यांत आलेली आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :श्री.पवार अपिलार्थी यांना एक ते तीन मुद्यांची पुरविण्यांत आलेली माहिती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी एक ते पाच या सर्व मुद्यांची सविस्तर माहिती अपिलार्थी यांना पुरविण्यांत यावी.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : जन माहिती अधिकारी यांनी व्दितीय अपील संदर्भात पुढील निवेदन दिले.

अर्जदार श्री.संजय आनंदा पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याकरिता दि.७.१०.२००८ रोजी अर्ज सादर केला होता. सदर अर्जात त्यांनी १. चारकोप पो.ठाणेने महानगरपालिकेला पाठविलेले पत्र जा.क्र.५०८३/०७,ख दि.१७.७.२००७ हे कोणत्या आधारावर पाठविले याची माहिती २. दि.३१.१०.२००७ रोजी चारकोप पो.ठाणेस दिलेल्या पत्रावर केलेले कारवाई व त्यांच्या प्रती ३. अर्जदाराचे ॲड.शशिकांत दुबे यांचे दि.६.११.२००७रोजीचे पत्रावरील कारवाईची माहिती व प्रती ४) व ५) संस्थेने दि २५.८.२००८ रोजी दिलेल्या तसेच तसेच वारंवार दिलेल्या पत्रावरील कारवाईची माहिती व प्रती यांची मागणी केली होती. मागितलेली माहिती ही चारकोपपोलीस ठाणेशी संबंधित असल्याने ती वरिष्ठ पोलिस निरीक्षक, चारकोप पोलिस ठाणे यांचेकडून मागविण्यांत आली ती दि.६.११.२००८ जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाली प्राप्त माहिती अर्जदारानी दि.१५.११.२००८ रोजी व्यक्तिश: स्विकारली.

अर्जदारांचे दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी व पोलिस उपआयुक्त, परिमंडळ-१२ मुंबई यांचेकडे दि.६.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी होऊन त्यात अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारांना नव्याने माहिती पुरविण्यांत यावी असे आदेश पारीत केले. अपिल आदेशाचे अनुषंगाने अनुषंगाने वरिष्ठ पोलिस निरीक्षक, चारकोप पोलिस ठाणे, मुंबई यांचेकडून फेरमाहिती मागविण्यांत आली. फेर अहवालात अर्जदारास पूर्वी देण्यांत आलेली माहितीप्रमाणेच उत्तर प्राप्त झाले तसेच प्रस्तुत प्रकरणातील चोकशी अधिकारी पोलिस उप निरिक्षक पवार हे नाशिक येथे प्रशिक्षणासाठी गेले असल्याने तात्पुरत्या स्वरुपात नमूद कागदपत्रे पोलिस उप-निरीक्षक जाधव यांच्याकडे असल्याने श्री. पवार प्रशिक्षणावरुन येताच अधिक माहिती देण्याची तजवीज ठेवण्यांत येत आहे असा अहवाल प्राप्त झाला. सदरची माहिती अर्जदार यांना पुरविण्यांत आली.

पोलिस उपनिरिक्षक पवार हे नाशिक येथून प्रशिक्षण संपवून कर्तव्यास हजर झाले नंतर त्यांची काही दिवसांत डी.एन.नगर पोलिस ठाणे मुंबई येथे बदली दर्शविण्यांत आली याच दरम्यान नमूद अपिल प्राप्त झाले करिता त्यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधून सदर प्रकरणात अधिक कागदपत्रे उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत विचारणा केली असता त्यांनी पूर्वी देण्यांत आलेल्या व्यतिरिक्त त्यांच्याकडे इतर कोणतीही कागदपत्रे नसल्याचे त्यांनी लेखी स्वरुपात दिलेले आहे.

ख्रात्यांतर्गत पदोन्नती प्राप्त पोलिस उप निरिक्षक यांना नाशिक पोलिस अकादमी येथे दोन/तीन महिन्याकरिता प्रशिक्षणाकरिता पाठविण्यांत येते. चौकशी अधिकारी पोलिस उप निरिक्षक पवार हे याच दरम्यान प्रशिक्षणास गेल्याने तसेच प्रशिक्षणाहून आल्यानंतर त्याची उत्तर प्रादेशिक विभागाच्या बाहेरील दुस-या प्रादेशिक विभागात महणजेच डी.एन.नगर पोलिस ठाणे येथे बदली झाल्याने अर्जदारास अभिलेख्यावर सदर प्रकरणाशी संबंधित अधिक कागदपत्रे आहेत किंवा कसे याबाबतची माहिती घेऊनच उत्तर देणे योग्य वाटल्याने तसा लेखी अहवाल घेण्यांत आलेला आहे.

सदर प्रकरणात माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ चे तरतूदीनुसार काटेकारपणे पालन करीत कारवाई करण्यांत आलेली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे म्हणणे असे की, त्यांचे वकिलांनी दि.६.११.२००७ रोजी पोलिस स्टेशनला दिलेल्या पत्राची नोंद नाही असे उत्तरात म्हटले आहे. पण त्यांचेकडे पत्र मिळाल्याची पोंच आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे की, पुन्हा तपासणी केली असता पोलिस स्टेशनला त्याची नोंद नाही असेच दिसून आहे. पण अर्जदाराकडील या पत्राचे अवलोकन केले असता अर्जदाराचे तक्रारीतील व वकिलाचे तक्रारीतील मुद्देएकच आहेत असे दिसून आले.

वरील विवेचनावरुन उपलब्ध सर्व माहिती दिल्याचे दिसून येते.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक: १४.८.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४५५६/०२

श्री.नारायण कृष्णाजी लवाटे **अपिलकर्ता**
२/बी झाओबा वाडी,
ठाकूरव्दार, मुंबई ४०० ०२

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्य स्थापत्य अभियंता **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई ४०० ०८

जन माहिती अधिकारी तथा स्थावर व्यवस्थापक
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई ४०० ०८

-विवेचन-

अपिलाचा दिनांक दि.६.५.२००९
सुनावणीची तारीख दि.१३.८.२००९
अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराने श्रीमती मोनिका वानखेडे यांना दिलेल्या सदनिका वाटप संदर्भात तसेच इस्टेट डिपार्टमेंट च्या मॅन्युअल बाबतीत माहिती मागितली होती. श्रीमती वानखेडे यांना निवासस्थान वाटप करण्यांत आलेल्या सर्व कागदपत्राची पाहणी अर्जदाराने केलेली आहे व त्यांना त्याबाबतचे कागदपत्र देण्यांत आलेले आहेत.

इस्टेट डिपाटमेंटचे वेगळे असे मॅन्युअल नाही त्यामुळे ते देता येत नाही. फक्त अर्जदाराने १९५० सालापासून ते आजतागायत कालावधी लिहिला असल्यामुळे त्यांना उपलब्ध कागदपत्राच्या प्रती दिलेल्या आहेत त्यासाठी त्यांच्याकडून रुपये ८०/- एवढे शुल्क आकारण्यांत आलेले होते. त्यातील रु.५८/-ची माहिती ही त्यांनी मागितलेली नव्हती असे त्यांचे म्हणणे आहे तेव्हा त्यांना रुपये ५८/-परत करण्यांत यावेत असे निर्देश देण्यांत येत आहेत.

उपरोक्त सर्व माहिती दिलेली असल्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास रु.५८/- परत करावेत.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांक: १४.८.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४५५७/०२

श्री.नरेंद्र भिकाजी सावंत **अपिलकर्ता**
११/३४५ सहकार नगर-३
चेंबूर, मुंबई ४००००१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा **उत्तरवादी**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग,ॲनी बेझंट रोड,वरळी,
मुंबई ४०००१८

जन माहिती अधिकारी तथा स्थावर व्यवस्थापक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग,ॲनी बेझंट रोड,वरळी,
मुंबई ४०००१८

-विवेचन-

अपिलाचा दिनांक दि.११.५.२००९
सुनावणीची तारीख दि.१३.८.२००९
अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराच्या अपिलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर कलेले आहे.

अपिलकर्ता श्री.नरेंद्र भिकाजी सावंत यांनी माहिती अधिकारी २००५ अन्वये या कार्यालयात अर्ज दाखल केला होता व सदर अर्जामध्ये त्यांनी "साईकृपा संस्था न्यास" नोंदणी क्रमांक एफ-२३१०१ (मु) व "संघमित्रा सामाजिक संस्था न्यास" नोंदणी क्र.एफ-२९२२९ (मुंबई)या संस्थांच्या एप्रिल २००६ ते मार्च २००८ या कालावधीतील हिशोबपत्रकांची मागणी केलेली होती. सदर मागणी पूर्ण न झाल्यामुळे त्यांनी दि.३१.३.२००९ रोजी या कार्यालयात प्रथम अपिल दाखल केले होते. सदर अपिलावर दि.२७.४.२००९ रोजी आदेश पारित होऊन, माहिती देणेबाबत आदेशित केलेले होते.

सदर अपिलाची प्रत अपिलकर्त्यास देताना त्यास तोंडी स्वरुपात दोन्ही न्यासांची हिशोबपत्रके या कार्यालयास अद्यापपावेतो प्राप्त न झाल्याबाबत सांगितलेले होते. मात्र लेखा स्वरुपात कळविण्यांत अनवधानाने राहू गेले. परंतू नुकतीच "साईकृपा संस्था "नोंदणी क्रमांक एफ-२३१०१ (मु)या न्यासाची सन २००६ व २००७ या दोन्ही वर्षाची हिशोब पत्रके या कार्यालयात प्राप्त झालेली असून, ती लवकरात लवकर अपिलकर्त्यास पोस्टाने अथवा समक्ष भेटीत देण्याची कार्यवाही करण्यांत येईल तसेच संघमित्रा सामाजिक संस्था नोंदणी क्र.एफ-२९२२९ (मुंबई)या न्यासाची हिशोब पत्रके आजतागायत या कार्यालयास प्राप्त झालेली नाहीत. त्यामुळे अपिलकर्त्यास ती देण्यांत आलेली नाहीत, असे सांगण्यांत आले

तेव्हा उपलब्ध झालेली माहिती अर्जदारास विनामुल्य पोस्टाने पाठविण्यांत यावी असे निर्देश देण्यांत येत आहेत. तसेच "संघमित्रा सामाजिक संस्था" यांनाही न्यासाची हिशोब पत्रके सादर करण्यांबाबत ताकिद देण्यांत यावी.

-आदेश-

अपिल मान्य करण्यांत येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांक: १४.८.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४५५८/०२

श्री.वासुदेव राजाराम वझे **अपिलकर्ता**
२०४, जीवनछाया, आर्य चाणाक्य नगर
आकुर्ली क्रॉस रोड नं.३,कांदिवली पूर्व
मुंबई ४०००१०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव (३४-अ) **उत्तरवादी**
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई

जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (३४-अ)
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई

-विवेचन-

अपिलाचा दिनांक दि.७.५.२००९
सुनावणीची तारीख दि.१३.८.२००९
अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराचा लोकसेवा आयोगाकडून अतिरिक्त संचालक पदासाठी निवड होऊन सुध्दा त्यांची अंतिमत:नियुक्ती न झाल्याबाबत त्यांनी माहिती अधिकार कायदयातंर्गत जो अर्ज दि.२.२.२००९ रोजी केला होता त्या संदर्भात अर्जदाराला त्यांनी उपस्थित केलेल्या वेगवेगळया मुद्यावर विभागाचे अभिप्राय पाहिजे होते व अभिप्राय माहिती अधिकार अधिनियमाप्रमाणे देता येत नाही असे अर्जदारास कळविण्यांत आले होते. मात्र अपिलीय अधिकारी यांनी जर अपिल खारीज केले होते तर श्री.वझे यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांवर माहिती उपलब्ध करुन देणे शक्य असलेल्या मुद्दयावर फेरविचार करणे आवश्यक
नसले तरी संबंधितांकडून माहिती उपलब्ध करुन देण्याच्या सूचना जन माहिती अधिकारी यांना दिल्या होत्या त्यानुसार अर्जदाराला त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या संदर्भात अभिप्राय व इतर माहिती ही पाठविण्यांत आली होती. अर्जदाराला अर्जदाराच्या नियुक्तीच्या संदर्भात सुनावणीच्या वेळेला पुढील परिस्थिती जन माहिती अधिकारी यांनी कथन केली

"श्री वझे उपअभियंता सामुहिक दूरचित्रवाणी सेवा संचालनालय यांची अतिरिक्त संचालक पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.२९.४.२००० च्या पत्राव्दारे शिफारस केली होती. त्यानुसार श्री.वझे यांची अतिरिक्त संचालक पदावर नियुक्तीसाठीचा प्रस्ताव सादर केला होता. अतिरिक्त संचालक हे पद जून १९९७ पासून रिक्त असल्याने ते व्यपगत होते. जरी ते पद स्थायी असले अथवा विनावेतन अतिरिक्त कार्यभार दिला असेल तरी ते पद व्यपगत होते असे अभिप्राय वित्त विभागाने दिले. त्यामुळे श्री.वझे यांची सदर पदासाठी आयोगाकडून शिफारस होऊनही त्यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित झाले नाहीत. तसेच सामुहिक दूरचित्रवाणी सेवा बंद करण्याचे आदेश दि.२०.८.२००१ रोजी निर्गमित करण्यांत आले. त्यामुळे सामुहिक दूरचित्रवाणी सेवा संचालनालय कार्यालयातील अतिरिक्त संचालक हे पद भरण्याची आवश्यकता उरली नसल्याने श्री वझे यांना सदर पदावर नियुक्ती देता येणे शक्य नाही असे दि.१३.९.२००१ च्या पत्रान्वये आयोगास कळविण्यांत आले. त्याप्रमाणे आयोगाने श्री.वझे यांना दि.७.१.२००५ च्या पत्रान्वये कळविण्यांत आले आहे. "

श्री.वझे यांचे यापूर्वी एक अपिल आयोगाने ऐकलेले आहे. सामान्य प्रशासन विभागाने नोटशिट्स,अभिप्राय यापूर्वी अर्जदारास दिलेल्या आहेत, सर्व माहिती दिली आहे. आयोगाचे मत झालेले आहे.सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांकः १४.८.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/७७९/०२

श्री.अॅड सुधाकर आर.जाधव/नरेंद्र मधुकर लचके **अपिलकर्ता**
एन-४१ जेए३-१२-१,सावतानगर
४ थी स्किम,नविन सिडको. नाशिक-८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा आयुक्त **उत्तरवादी**
महानगरपालिका मालेगांव जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ, मालेगांव महानगरपालिका,
मालेगांव,जि.नाशिक

-विवेचन-

अपिलार्थी श्री.अॅड.सुधाकर आर.जाधव यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.१.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमुद केलेली माहिती मागितली होती.

मालेगांव महानगरपालिका शिक्षण मंडळाव्दारे शहरात सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळा खोल्या बांधल्या जात आहेत. पूर्ण झालेल्या खोल्यांची संख्या प्रत्येक शाळा खोली बांधकामासाठी झालेला खर्च इत्यादि अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अर्जात मुद्दा क्र.२ मोस पुलशाळा इमारतीच्या नियोजित गाळयाबाबत दि.१३.२.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान इज्ञाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१०.३.२००८ प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मुदतीत प्रथम अपील दाखल केले नाही म्हणून अपीलकाराचे प्रथम अपील अवैद्य ठरविले

असल्याची बाब दि.२१.६.२००८ च्या पत्रान्वये अपीलार्थी यांना कळविले. अपिलकारास माहिी देणेबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना सांगितले. जन माहिती अधिका-यानी माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सर्व शिक्षा अभियांनांतर्गत नविन प्राथमिक शाळा सन २००७-२००८ मध्ये १११ वर्ग खोल्या बांधल्या. त्यासाठी रु.२०,७,४०,०००/- इतर खर्च आला. मोसमपूल शाळा इमारतीच्या तळ मजल्यावरील प्रस्तावित गाळयांचे सर्व कागदपत्र संकिर्ण वार कार्यालयात कार्यालयीन वेळेत दाखविण्यांत येतील. गाळेधारक हे स्वखर्चाने गाळयाचे किरकोळ दुरुस्ती व रंगरंगोटी करणार आहे म्हणून महानगरपालिकेचा खर्च होणार नाही. तसेच रे.मु.न२९६ अन्वये दावा न्यायप्रविष्ठ झाला आहे. या प्रकरणी आयुक्तांनी स्थगिती दिली आहे असे अर्जातील मुद्दा क्र.२ बाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याचा मुद्दा अपीलकाराने व्दितीय अपीलात उपस्थित केला आहे. वर नमुद केल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी काही माहिती अपीलकारास पुरविली आहे जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार दोन विभागाची माहिती पुरविण्यांत आली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती पैकी उर्वरित माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांकः १४.८.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/७८२/०२

श्री.ॲड सुधाकर आर.जाधव/नरेंद्र मधुकर लचके **अपिलकर्ता**
एन-४१ जेए३-१२-१,सावतानगर
४ थी स्किम,नविन सिडको. नाशिक-८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता **उत्तरवादी**
जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ,
जळगांव आकाशवाणी चौक,
जळगांव.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
वाधुर धरण विभाग, जळगांव.

-विवेचन-

अपिलार्थी श्री. ॲड सुधाकर आर.जाधव यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.१.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

कार्यकारी अभियंता यांचे पूर्ण नांव, कार्यालयात रुजू होण्याची तारीख, यापूर्वी कोणत्या कार्यालयात कार्यरत होते ते ठिकाण नांव व पत्ता नोकरीत सुरुवातीस रुजू होण्याची तारीख सुरुवातीचे

३ महिन्यातील मासिक वेतन सध्याचे मासिक वेतन, कार्यकारी अभियंत्याच्या हाताखाली काम करणा-या उप अभियंत्याची नांवे पत्ते, सन २००६-२००७ मध्ये शासनाकडून मंजूर होऊन प्राप्त झालेला निधी. सदर निधी खर्चाचा सविस्तर तपशिल इत्यादि अनुषंगीक माहिती मागितली होती. व्यक्तिशः कार्यालयात येऊन संबंधित कागदपत्राचे निरिक्षण करावे. त्यानंतर मागणी प्रमाणे कागदपत्राच्या छायाप्रती देण्यांत येतील असे जन माहिती अधिका-यांनी दि.१७.१.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित न राहता प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२६.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकार दि.२६.५.२००८ रोजी कार्यालयात १२.३० वाजता हजर झाले. उप विभागातील सध्या वापरात असलेली आपन पुस्तके वगळून इतर सर्व माहिती तयार ठेवली होती. वापरात असलेली मापन पुस्तके उप विभागाकडून मागवावी लागणार होती. त्यासाठी अवधि लागणार होता. सर्व माहिती त्याच दिवशी म्हणजे दि.२६.५.२००८ रोजी ताब्यात घेऊन असे अपिलकारानी सांगितले व कार्यालयातून निघून गेले. परंतू अपीलकार पुन्हा कार्यालयात फिरकले नाहीत. वेळोवेळी पत्र देऊनही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कळविले. परंतू अपीलकारांनी माहिती कार्यालयात येऊन घेण्यास टाळाटाळ केल्याचे दिसून येते असा जन माहिती अधिकारी यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविली आहे. परंतू अपीलकार माहिती घेण्याकरिता कार्यालयात हजर होत नाहीत. तर अर्जदाराचे म्हणणे त्यांना माहिती देण्याचे बुध्दीपुरस्सर टाळला जात आहे. तेव्हा असे आदेश देण्यांत येतात की, अर्जदारांनी जन माहिती अधिकारी कार्यालयात दि.२९ ऑगस्ट रोजी दुपारी २.०० वाजता हजर रहावे. जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहिती तयार ठेवावी व अर्जदारांना द्यावी. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांकः १४.८.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४५७४/०२

श्री.मनहरलाल इश्वरलाल शहा **------- अपिलार्थी**
भट बंगलो, रुम.न.३ पेरु बाग
उत्तरे रोड, गोरेगांव पूर्व मुंबई ४०००६३

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनियंत्रक शिधावाटप **-------** **उत्तरवादी**
"ग"परिमंडळ कांदिवली हितवर्धक मंडळ,
कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४००० ६७

जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी,
"ग"परिमंडळ कांदिवली हितवर्धक मंडळ,
कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४००० ६७

-- विवेचन --

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: दि. ५.९.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक :	दि.०६.१२.२००८दि.२६.९.२००८दि.२१.१०.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	:दि.१३.१०.२००८
प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	:दि.२०.१०.२००८
द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	:दि.६.५.२००९

सुनावणीचा दिनांक : २५ ऑगस्ट २००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल : श्रीमती जसवंतीबेन इश्वरलाल शहा यांच्या नावे शिधापत्रिका होती का तसेच तयांना नवी शिधापत्रिका कां देण्यांत आली नाही इत्यादि बाबतच्या माहितीची विचारणा केली आहे.
जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर : दि.२६.९.२००८ च्या पत्रान्वये अभिलेख उपलब्ध नसलयाचे व कार्यवाही सुरु असल्याचे कळविण्यांत आले. तद्नंतर अअपिलीय अधिका-यांच्या आदेशावरुन अभिलेखाची पडताळणी करुन सुधारित उत्तर देण्यांत आले आहे.
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट उत्तरे दिली असल्याने, त्यांनी अर्जदाराने विचारणा केलेल्या सर्व मुद्यांची तपशिलवार व सुस्पष्ट माहिती देण्याचे आदेश दिले.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अर्जदारास माहिती पेक्षा त्यांच्या प्रश्नाची सोडवणूक होण्यातच जास्त रस आहे. त्यांनी दि.२०.५.२००८ रोजी गोरेगांव शिधावाटप कार्यालयात अर्ज करुन दोन मागण्या केलेल्या आहेत. शिधावाटप पत्रिकेत त्यांच्या भावाच्या नावाच्या ऐवजी त्यांच्या आईला कुटूंबप्रमुख म्हणून दाखविण्यांत यावे व त्यांची जुनी शिधापत्रिका ही कार्यालयाच्या सुपूर्द केलेली आहे. तेव्हा त्यांच्या व त्यांच्या कुटूंबियाची नावेनव्या पत्त्यावर शिधापत्रिकेत जोडण्यांत यावी. या अर्जावर अजूनही कार्यवाही झालेली नाही. सुनावणीच्या वेळेला अर्जदारास शिधावाटप कार्यालयाच्या रेकॉर्डप्रमाणे असलेली सर्व परिस्थिती ही त्यांच्या दि.६.१२.२००८ रोजीच्या पत्रानुसार कळविलेले आहे. मात्र अपिलात नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराचे समाधान हे त्यांच्या दि.२०.५.२००८ रोजीच्या अर्जावर निर्णय होण्यानेच होणार आहे. यासंबंधी विभागाच्या नियमाप्रमाणे १ महिन्यात कार्यवाही करण्यांत येईल, असे शिधावाटप अधिकारी यांनी सांगितले.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांकः २६.८.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/३१३०/०२

श्री.माळगांवकर भूषण पांडूरंग — अपिलकर्ता
प्लॉट नं.१२२, रुम नं. ३०२
मुकेश अपार्टमेंट, नाडकर्णी मार्ग,
वडाला इस्ट मुंबई-३७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा व्हाईस चेअरमन — उत्तरवादी
बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र ऑफ गोवा
(बीसीएमजी)२रा मजला हायकोर्ट,विस्तार इमारत
फोर्ट, मुंबई ३२

जन माहिती अधिकारी तथा सचिव
बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र ऑफ गोवा
(बीसीएमजी)२रा मजला हायकोर्ट,विस्तार इमारत
फोर्ट, मुंबई ३२

-विवेचन-

अपिलाचा दिनांक १८ जून २००९ . सुनावणीचा दिनांक २७ ऑगस्ट २००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

वरील अपिलाची सुनावणी राज्य माहिती आयुक्त बृहन्मुंबई यांचेकडे दि.२७.८.२००९ रोजी ठेवण्यांत आली होती. मात्र अर्जदाराच्या अयोग्य भाषेने उद्विग्न झाल्याने राज्य माहिती आयुक्त (बृहन्मुंबई) यांनी माझ्याकडे (मुख्य माहिती आयुक्त) सुनावणी घेण्यासाठी पाठविलेले आहे.

अर्जदाराने त्यांच्या दि.१९.३.२००९ रोजीच्या अर्जाने बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र, गोवा यांच्या कार्यपध्दतीबाबत माहिती पाहिजे होती. दि.१६ एप्रिल २००९ च्या पत्रानुसार असे कळविण्यांत आले की, ' बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र गोवा हे जन प्राधिकरण नाही'. माहिती अधिकार अधिनियमाच्या

तरतूदी त्यांना लागू नाही हाच निर्णय प्रथम अपिलीय अधिकारी, बार कॉन्सिल यांनी दि.२६ मे २००९ रोजीच्या आदेशाने कायम केला. त्या विरुध्दचे हे अपिल आहे.

गेल्या एक महिन्यापूर्वीच बार कॉन्सिल जन प्राधिकरण आहे किंवा नाही याबाबत मी निर्णय दिलेला असून, ' बार कॉन्सिल हे जन प्राधिकरण आहे ' असा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीच्या आधिन राहून अर्जदारास त्यांच्या दि.२०.३.२००९ रोजीच्या अर्जाबाबत माहिती १५दिवसाचे आंत द्यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: २६.८.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक अपिल/नाशिक/२००९/९९२/०२

श्री. अमृतलाल शांतीलाल शहा अपिलकर्ता
केकू रोड, देशमुख नगर, घरसंसार
अमळनेर ४५०४०१, जिल्हा जळगांव.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा रजिस्ट्रार उत्तरवादी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव

जन माहिती अधिकारी तथा सचिव
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव

-विवेचन-

अपिलाचा दिनांक १८ जून २००९ . सुनावणीचा दिनांक २७ ऑगस्ट २००९

अपिलार्थी श्री. अमृतलाल शांतीलाल शहा यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि.३१.७.२००९ रोजी सुनाणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२८.७.२००८ रोजी अर्ज करुन खाली नमुद केलेली माहिती मागितली होती.

श्री.पारधी पी.जी.या विद्यार्थ्याने शैक्षणिक वर्ष १९९१-९२ ला एम.एस्सी मात्र १ (एम.एस्सी पार्ट-१) उत्तर १) महाराष्ट्र विद्यापीठाला भौतिक शास्त्र विषयात प्रवेश घेतलेला होता व काही महिन्यानंतर प्रवेश रद्द केला त्यावेळी त्यांने विद्यापीठात जमा केलेले व त्याला परत करण्यांत आलेले शुल्क यांची नोंद असल्याची झेरॉक्स पत्र मिळावी.

२) शैक्षणिक वर्ष १९९१-९२ ला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात भौतिक शास्त्र या विषयात एम.एस्सी पार्ट-१ ला प्रवेश घेतलेले विद्यार्थ्याची यादीची झेरॉक्स प्रत मिळावी. (copy indept of physics N..M.U. Jalgaon)

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१०.९.१००८ रोजी अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१०.९.२००८ रोजी अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.६.११.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयागाकडे व्दितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी प्रथ्झम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार अपीलकारास श्री.पारखे पी.जी.या विद्याथ्यानी संबंधित अर्जातील मुद्दा क्र.१ नुसार विद्यापीठात जमा केलेल्या शुल्काच्या नोंदीची छायांकित प्रत व मुददा क्र.२ नुसार प्रवेश रद्द केल्यामुळे शुल्क परत मिळणेबाबतचा विनंती अर्ज व शुल्क परत करण्यांत आलेल्या नोंदीची छायाप्रत इत्यादि दस्त ऐवजाच्या ३ साक्षांकित प्रती जन माहिती अधिका-यांनी दि.२५.११.२००८ च्या पत्रानुसार अपिलकारास पुरविल्या असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक: २६.८.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक अपिल/नाशिक/२००९/९७९/०२

श्री. ज्ञानेश्वर नारायण चौधरी **अपिलकर्ता**
मु.पो.मादली बु. ता.जि.जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहसंचालक **उत्तरवादी**
सेवा योजन कार्यालय,जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,
जळगांव

-विवेचन-

अपिलार्थी श्री.ज्ञानेश्वर नारायण चौकधरी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि.३१.७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१९.६.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२०.८.२००८ च्या पत्रानुसार अपीलकारास सन १९९१ चे कार्यमुक्त जन गणना कर्मचा-यांची संपूर्ण यादी व अपंगाची स्वतंत्र सुधारित यादी पुरविण्यांत आली. अपीलकाराने दि.१७.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यानी दि.२४.९.२००८ रोजी अपीलकारास माहिती दिली. अपूर्ण माहिती मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. परंतू जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे दि.२०.८.२००८ व २४.९.२००८ च्या पत्रान्वये पुरविलेली माहिती अपूर्ण कशी आहे याबाबत काहीही कारणे दिलेली नाहीत. अपीलातील कागदपत्राची तपासणी केली. तसेच प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन अपीलकारास माहिती पुरविल्याचे प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिका-यांनी मागणीप्रमाणे माहिती ुरविली असल्याचे दिसून येते.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

दिनांक: २६.८.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक अपिल/नाशिक/२००९/९६५/०२

श्री. लक्ष्मण शिवाजी शिरसाट — अपिलकर्ता
पवार वाडी, विठ्ठल मंदिराजवळ
चाळीसगांव जि.जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपअभियंता — उत्तरवादी
बांधकाम विभाग, जि.प.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
जळगांव

-विवेचन-

अपिलाचा दिनांक १२.१.२००९
सुनावणीचा दिनांक ३१.७.२००९
अपिलार्थी - गैरहजर
जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित

अपिलार्थीनी दि.१.९.२००८ च्या अर्जान्वये शाखा अभियंता यांनी मार्च २००५ ते अर्जाच्या दिनांकापर्यत चाळीसगांव, उपविभागांतर्गत केलेल्या कामाच्या अनुषंगाने खालील माहिती मागितली.

१. खासदार निधी, पंतप्रधान निधी, दलित वस्तीसुधार निधी, रोजगार हमी योजना इत्यादि मधुन केलेल्या कामाची यादी.
२. पूर्ण झालेल्या व अपूर्ण राहिलेल्या कामांची नांवे.
३. शाखा अभियंता यांचा निवासाचा पत्ता.

उपरोक्त बाबींवरील कागदपत्राच्या छायाप्रती पुरवाव्या अशी अपिलार्थीची मागणी होती. तथापि माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.१.२०.२००८ रोजी प्रथम अपिल दाखल केले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही यास्तव त्यांनी दि.१२.१.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिाकरी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीनी मागितलेली माहिती विविध अभिलेख्यावरुन संकलित करावयाची असल्याने ती विस्तृत स्वरुपाची असल्याने पुरविण्यास विलंब झाला. तथापि त्यांना दि.२६.१२.२००८ रोजी माहिती पुरविली आहे. अपिलार्थी सुनावणीचे वेळी गैरहजर असल्याने त्यांना पुरविण्यास आलेली माहिती त्यांनी मागणी केल्याप्रमाणे आहे किंवा कसे याची शहानिशा करता आली नाही. आयोगासमोर सुनावणीच्यावेळी सादर करण्यांत आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीना माहिती पुरविण्यांत आली आहे. याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश देण्यांत येतात.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई — (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: २६.८.२००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक अपिल/नाशिक/२००९/४५८४/०२

श्री. प्रदिप एम.सबनिस अपिलकर्ता
ए/२३,जागृती हो.ऑ.हौ.सो.
१०१, एल.जे.रोड माहिम,
मुंबई ४०००१६

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक उत्तरवादी
सहकारी संस्था, मुंबई(१)शहर
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जीपीओ समोर फोर्ट, मुंबई ४०० ००१

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,
जी एन विभाग, मुंबई, सहकारी संस्था, मुंबई(१)शहर
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जीपीओ समोर फोर्ट, मुंबई ४०० ००१

-विवेचन-

श्री.प्रदिप सबनीस यांनी आयोगाकडे दि.११.५.२००९ रोजी जे व्दितीय अपिल सादर केलेले आहे. त्या अपिलाची सुनावणी दि.७.९.२००९ रोजी घेण्यांत आली होती. अपिलार्थी उपस्थित होते. अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व कागदपत्राचे वाचन केल्यानंतर असे दिसून आले की, अर्जदाराने ज्या आदेशाविरुध्द अपिल केलेले आहे ते आदेश माहितीच्या अधिकार अधिनियमाखाली दिलेले नसून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९ (२)अन्वये दिलेला आहेत.

अर्जदारास ते ज्या ठिकाणी राहतात त्या अधिकृत को.ऑ.हौ.सोसायटीच्या दुरुस्तीच्या कामकाजाबाबत जे कॉन्ट्रॅक्ट दिलेले होते त्या कॉन्ट्रॅक्टच्या ॲग्रीमेंटच्या प्रती पाहिजे होत्या व ही माहिती देण्यासाठी उपनिबंधक ानी प्रमाणित लेखा परिक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. तसेच सोसायटीनी माहिती द्यावी असे जे आदेश उपनिबधंक यांनी दिलेले आहेत त्याची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास व्यवस्थापन समिती विरुध्द सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम ६१ अन्वये कार्यवाही करण्यांत येईल असेही त्या आदेशात नमूद केलेले आहे. अर्जदारास माहिती मिळालेली दिसत नाही तेव्हा याबाबत उपनिबंधकानी सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये पुढील कार्यवाही करणे जास्त योग्य राहिल. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ८.९.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक अपिल/नाशिक/२००९/४६०९/०२

श्री. राजेंद्र दत्तात्रय दोडके अपिलकर्ता
रुम नं.४९८५ इमारत क्र.४११
शुभारंभ को.ऑ.हौ.सो.टागोरनगर,
विक्रोळी, मुंबई ८३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक उत्तरवादी
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
वांद्रे पूर्व मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा
सहकार अधिकारी श्रेणी-१ म्हाडा मुंबई ५१

सचिव मे.शुभारंभ को.ऑ.हौ.सो.लि.
४११/४९१३ अे विंग टोगोर नगर विक्रोळी पूर्व मुंबई ८३

-विवेचन-

अपिलाचा दिनांक २२.६.२००९
सुनावणीचा दिनांक ८.९.२००९
अपिलार्थी - उपस्थित.
अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
सचिव,शुभारंभ हौ.सोसायटी, विक्रोळी - उपस्थित.

अर्जदारास ते रहात असलेल्या शुभमंगल को.ऑ.हौ.सो. या संस्थेच्या बाबतीतील काही ६ मुद्दयांवरील माहिती पाहिजे होती. माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिलेली असून सदर कागदपत्राच्या प्रती प्राप्त करुन घेण्यासाठी अर्जदाराने आवश्यकते शुल्क जमा करुन उपनिबंधकांकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे अर्जदारास कळविलेले आहे. नुकताच हायकोर्ट,नागपूर खंडपीठाने सहकारी गृहनिर्माण सोसायटी हे ' जन प्राधिकरण नाही ' असा निर्णय दिलेले आहे. त्यामुळे सदर माहिती ही सहकारी कायदयांतर्गत सभासदाला प्राप्त करुन घेता येऊ शकते. त्याप्रमाणे ती प्राप्त करुन घ्यावी.

सुनावणीच्या वेळी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते व याबाबत दि.१३ सप्टेंबर २००९ रोजी अर्जदारास संपूर्ण रेकॉर्डप्रमाणे माहिती दाखविण्यांत येईल असेही संस्थेच्या सचिवांनी सांगितले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ८.९.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक अपिल/नाशिक/२००९/९८०/०२

श्री. कैलाश शांताराम तायडे अपिलकर्ता
मु.पो.सावदा ता.रावेर,
जि.जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी उत्तरवादी
नगर परिषद, सावदा, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
नगरपालिका सावदा जि.जळगांव

-विवेचन-

अपिलार्थीनी दि.१९.९.२००८ च्या अर्जान्वये एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितली. यातील ठळक बाबी खालीलप्रमाणे :-

१. दि.२४.५.२००८ च्या जाहिरातीमध्ये झालेल्या सेवा भरतीची प्रक्रिया
२. सेवा भरतीबाबत केलेली कार्यवाही
३. उपरोक्त बाबींवर नगर पालिकेने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती.
४. शाळा समन्वय समितीने दि.८.६.२००८ रोजी केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती.
५. या प्रकरणी जिल्हाधिका-यानी दिलेल्या निर्णयाच्या प्रती.

वरील माहिती ४८ तासांच्या आंत मिळावी अशी अपिलार्थीची मागणी होती.

मुदतीत माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून तसेच पुरविलेल्या माहिती त्रुटी असल्याचे नमूद करुन अपिलार्थीनी दि.७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावरील आदेश दि.२०.११.२००८ रोजी पारित करण्यांत आले व अपिलार्थीनी मागणी केल्याप्रमाणे कागदपत्रे त्यांना पुरविण्यांत यावी असे नमूद करुन अपील निकाली काढण्यांत आले.

यानंतर अपिलार्थीनी दि.२४.१२.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. यावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर होते. अपिलार्थीनी अशी मागणी केली की, माहिी ४८ तासात न पुरविल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यांत यावी. माहिती पुरविली असल्याने व ती ४८ तासांच्या आत पुरविण्याचे काही प्रयोजन अपिलार्थी देऊ न शकल्याने अपिलार्थीनी केलेली दंडात्मक कारवाईची मागणी विचारात घेण्यांत येत नाही. दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान होत नसल्यास ते संपूर्ण नस्तीची पाहणी करुन खात्री करुन घेऊ शकतात.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ८.९.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक अपिल/२००९/४६१९/०२

श्री. सुरेश नाऊ वरक, अपिलकर्ता
गणेश नगर रुम नं.१२/३/१०,
आर.सी.मार्ग, चेंबूर कॉलनी,
चेंबूर, मुंबई ४०००७४

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी परि-५ उत्तरवादी
उपशिक्षणाधिकारी, परिमंडळ-५,प्रशासकिय अधिकारी(शाळा)
बृहन्मुंबई मनपा एम पश्चिम विभाग चेंबूर मुंबई ७१

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी (शाळा)
उपशिक्षणाधिकारी, परिमंडळ-५,प्रशासकिय अधिकारी(शाळा)
बृहन्मुंबई मनपा एम विभाग चेंबूर मुंबई ७१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक २२.६.२००९
सुनावणीचा दिनांक ९.९.२००९
अपिलार्थी,अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास टी.एन.हिंदुजा नॅशनल सर्वोदय हायस्कूल, प्राथमिक शाळा ही मान्यता प्राप्त अनुदानित व विना अनुदानित या शाळेच्या मान्यतेबाबत व मागासवर्गीय मुलामुलींना मिळणारी शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क याबाबतीत माहिती पाहिजे होती. दिलेल्या माहिने समाधान झाल्याने त्यांनी प्रथम अपिल सादर केले. त्या अपिलाची सुनावणी दि.४.५.२००९ रोजी सुनावणी नंतर पुन्हा माहिती देण्यांत आली परंतू त्याने अर्जदाराचे समाधान न झाल्याने आयोगाकडे व्दितीय अपील सादर केलेले आहे. अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, पुन्हा एकदा पत्र लिहून सर्व मुद्यांचा खुलासा करण्यांत आलेला आहे. तसेच अर्जदाराचे म्हणण्यानुसार सक्युलर व इतर सर्व माहिती सुनावणीच्या वेळेला सुध्दा आणलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार मागितलेली काही माहिती अर्जदाराकडे आहे कारण ती त्यांनीच जन माहिती अधिकारी यांना दाखविली होती तेव्हा सुनावणीनंतर लगेच सर्व कागदपत्राची पाहणी करुन अर्जदारास जी अतिरिक्त कागदपत्रे पाहिजे असतील ती त्यांना देण्यांत यावेत असे निर्देश देण्यांत आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.दि.२०.९.२००९ पर्यत पाहणी झाल्यानंतर शाळेकडून ही काही कागदपत्र बोलावून अर्जदारास देण्यांत येतील असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ९.९.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक अपिल/२००९/४६२०/०२

श्री. सुभाष एन पुत्रन अपिलकर्ता
रुम नं.३१, बीएमसी स्टाफ कॉलनी,
दुसरा मजला, यारी रोड, कल्याण
कॉम्प्लेक्स समोर, वर्सोवा, अंधरी पश्चिम
मुंबई ४०००६१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त उत्तरवादी
सहायक मनपा आयुक्त(इमारत व कारखाने)
एच/पश्चिम विभाग पालीराम मार्ग, बांद्रा पश्चिम मुंबई ४०००५०

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता
सहायक मनपा आयुक्त(इमारत व कारखाने)
एच/पश्चिम विभाग पालीराम मार्ग, बांद्रा पश्चिम मुंबई ४०००५०

-विवेचन-

अपिलाचा दिनांक ११.६.२००८
सुनावणीचा दिनांक ९.९.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास पुढील विषयासंदर्भात माहिती पाहिजे होती.

न्यु ब्युटी सेंटर ३ १३८ एस.व्ही. रोड खार मस्जिद समोर बी.एम.सी.हॉस्टीच्या पुढे खार पश्चिम मुंबई ४०००५२ येथे झालेल्या ग्राऊंड १ बांधकामासंदर्भात.

अर्जदारास जन माहिती अधिकारी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलीय अधिकारी अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी तपासणी करुन आवश्यक असलेली माहिती द्यावी असे निर्देश दिले. त्यानुसारही माहिती देण्यांत आलेली आहे. त्या माहितीने अर्जदाराचे समाधान झालेले नसल्याने आयोगाकडे व्दितीय अपिल सादर केलेले आहे.

विभागाकडे यासंबंधी जी नस्ती उपलब्ध असेल ती अर्जदारास दाखवावी त्यात अर्जदारास हवी असलेली माहिती त्यांना द्यावी. अर्जदाराने मागितलेली माहिती इतर जन माहिती अधिकारी यांचेकडे संबंधित असल्यास जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज स्वत:हून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवावयाचा असतो याची नोंद घ्यावी. सदरील कार्यवाही १० दिवसाच्या आत करावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ९.९.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक अपिल/२००९/४/०२

श्री. जे.जी.टंडन **अपिलकर्ता**
जानी इस्टेट घाटला रोड,
जयभारत वूड वर्क्स पुढे
चेंबूर मुंबई ७१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपायुक्त **उत्तरवादी**
परिमंडळ-६ पोलिस आयुक्त, परिमंडळ-६
पूर्व प्रादेशिक विभाग,
चेंबूर, मुंबई -७१

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलिस आयुक्त
परिमंडळ-६ पोलिस आयुक्त, परिमंडळ-६
पूर्व प्रादेशिक विभाग,
चेंबूर, मुंबई -७१

-विवेचन-

श्री. जे.जी.टंडन यांनी आयोगाकडे दि.१८.१.२००८ रोजी अपिलाची सुनावणी १०.९.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराला अपिलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण आक्षेपाविरुध्द पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.

अपिलकार यांनी शासकीय माहिती अधिकारी व सहाय्यक पोलिस आयुक्त, पूर्व नियंत्रण कक्ष, चेंबूर, मुंबइ र्यांचे नावे दि.२९.१२.२००६ रोजी अर्ज करुन माहितीची मागणी केली असता दि.८.१.२००७ अन्वये माहिती देण्यांत आली सदरची माहिती अपिलकार यांनी दि.२७.१.२००७ रोजी स्विकारलेली आहे. प्रस्तुतची माहिती स्विकारल्यानंतर अपिलकार यांनी शासकीय माहिती अधिकारी व सहाय्यक पोलिस आयुक्त, पूर्व नियंत्रण कक्ष,चेंबूर मुंबई यांचे नांवे माहिती अपूरी व चुकीची असल्याबाबत पत्र सादर केल्यानंतर प्रस्तुत पत्राचे अनुषंगान शासकिय माहिती अधिकारी व सहाय्यक पोलिस आयुक्त पूर्व नियंत्रण कक्ष, चेंबूर,मुंबई यांचे जा.क्र. २७७/माहिती/सपोआ/पुनिक/०७ दि.१२.२.२००७ अन्वये पत्र वरिष्ठ पोलिस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून जा.क्र.१०३२/०७ दि.१४.२.२००७ अन्वये माहिती या कार्यालयास प्राप्त झाल्याने या कार्यालयाचे जा.क्र.३०२/माहिती/सपोआ/पुनिक/०७ दि.१५.२.२००७ अन्वये अपिलकार यांचे नावे माहिती तयार करुन अपिलकार याचे निवासस्थानी पोष्टाने पाठविण्यांत आलेली आहे. अपिलकार यांनी पथम अपिल अर्ज हा विहीत वेळेपेक्षा अधिक कालावधी नंतर सादर केल्याने तसेच अपिल अर्जासोबत अधिनियमातील तरतूदीप्रमाणे विहीत शुल्क अदा केलेले नसल्याने अपिलकार यांचा प्रथम अपिल अर्ज फेटाळण्यांत आला.

अपिलकार यांनी सादर केलेल्या व्दितीय अपिलाचे अनुषंगाने पुन्हा वरिष्ठ पोलिस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलीस ठाणे,मुंबई यांचेकडून अहवाल मागविण्यांत आला असता त्यांनी त्यांचे अहवालात श्री.के.एफ.पॉल यांनी ए/११ निर्मला निवास, हो.सोसायटी देवनार डेपा जवळ, गोवंडी, मुंबई ८८ हा प्लॅट खाली करीत नाही व प्लॅट महेंद्र गणपत पाटील नावाच्या इसमास ३ वर्षाकरिता भाडयाने दिला व त्यांना महेंद्र पाटील हे प्लॅट खाली

करीत नाही व प्लॅट नावावर करुन देण्याकरिता सोसायटीचे सेक्रेटरी कमलकात शाह यांनी पॉल यांचेकडे एक लाख रुपयाची मागणी केली म्हणून श्री.पॉल यांनी ट्रॉम्बे पोलिस ठाणेयेथे मलकांत शहा व महेंद्र गणपत पाटील यांचेविरुध्द दिलेल्या फिर्यादीवरुन गुरक २९७/०६ कलम ३६३,३६८,४७१,४२०,४५४,४५७,३८०,३४ भादवि नोंद करण्यांत आला तसेच यातील फिर्यादी व गुन्हयातील संशयीत आरोपी यांनी सादर केलेले कागदोपत्री पुरावे व त्यांच्या हस्ताक्षराचे तसेच सहयांचे नमुने हस्तांक्षर तज्ञांकडे तपासून अहवालाकरिता पाठविण्यांत आले होते त्यांचा अहवाल दि.१४.५.२००९ रोजी प्राप्त झालेला असून सदर अहवालामध्ये स्पष्ट असा काही निष्कर्ष दिलेले नसल्याने तो अहवाल व गुन्हयाच्या तपासाचे कागदपत्र मा.विशेष सरकारी अभियोक्ता,पोलिस आयुक्तांचे कार्यालय,मुंबई यांचेकडे जा.क्र.१७१३/०९ दि.१२.८.२००९ रोजी अभिप्राय मिळण्याकरिता पाठविण्यांत आलेले आहेत त्यांना अहवाल प्राप्त होताच त्याप्रमाणे पुढील कारवाई करण्यांत येत आहे.

तसेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांनी त्यांचे अहवालात गुन्हयातील संशयात आरोपीताविरुध्द कारवाई करण्याइतपत ठोस पुरावा मिळालेला नाही. अर्जदार यांनी यापूर्वी मागविलेली माहिती गुन्हयाचा तपास चालू असल्याने संपूर्ण माहिती पुरविणे शक्य नव्हते. गुन्हयाच्या तपासामध्ये अर्जदार अथवा गुन्हयातील फिर्यादी यांना तपासी अधिकारी यांचेकडून कसल्याही प्रकारे मानसिक त्रास दिलेला नाही. तपासी अधिकारी यांनी सदर गुन्हयाचा तपास कायदयाच्या कक्षेत केलेलो आहे. फिर्यादी/अर्जदार यांनी वेळोवेळी मागितलेली माहिती कायदयाच्या कक्षेत राहून पुरविण्यांत आलेली आहे. कायदयाचे योग्य प्रकारे पालन करण्यात आलेले आहे. तसेच सध्या गुन्हयाचा तपास संपलेला असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक,ट्रॉम्बे पोलिस ठाणे यांनी त्यांचे जा.क्र.८२६५/०९ दि.८.९.२००९ अन्वये सादर केलेली आहेत.

अपिलकर्ते उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. मात्र या संपूर्ण केसशी त्यांचा काय संबंध आहे हे स्पष्ट होत नाही. तसेच संबधित केस ही तृतीय पक्षाची व खाजगी व्यवहाराबाबतची दिसते. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

दिनांक: ९.९.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक अपिल/२००९/४७०९/०२

श्री. विजय गणपती इंगवले — अपिलकर्ता
नेपच्यून कलरस्केप ६०४ लव्हेंडर
दिनदयाल उपाध्याय मार्ग,
मुलूंड पश्चिम, मुंबई ८०

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव (रस्ते) — उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग रस्ते-७
मंत्रालय,मुंबई ३२

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
सार्वजनिक बांधकाम विभाग रस्ते-७
मंत्रालय,मुंबई ३२

-विवेचन-

अपिलाचा दिनांक १५.६.२००९
सुनावणीचा दिनांक १६.९.२००९
अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

शासन निर्णय क्र.आरपीडी/१०८१/८७१/रस्ते-७ दि.९ मार्च २००९ मध्ये उल्लेख असलेल्या नियमामधील नियत्रंण रेषा विषयी निकषामध्ये संदिग्धता आहे असे अर्जदारास वाटते. त्यामुळे त्यांना त्यांच्या दि.२४.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी अर्जात उपस्थित केलेल्या मुद्दयांवर विभागाने केलेली खुलासा पुढीलप्रमाण आहे.

अ. क्र.	मुद्दा	खुलासा
१.	अ) साधारण २५ ते ३० आसनक्षमतेचे उपहारगृह ब) चहा शीतपेय/फळांचा रस वगैरेची सेवा देणारे केंद्र क) महामार्गाच्या सुखसोयी अंतर्गत १. टायर सर्व्हिस केंद्र. २. वाहनांचे सुटटे भाग पुरविणारे देखभाल,दुरुस्ती कंद्र ३. लॉजिंग बोर्डिग ४. परमिट कम बिअर बार ही ठिकाणे गर्दी होणारी ठिकणे आहेत का ?	सदरहू मुद्दयामध्ये नमूद केलेली सर्व ठिकाणे ही गर्दी होणारी ठिकाणे आहेत.
२.	गर्दी होणारी वाणिज्यिक ठिकाणे व न होणारी ठिकणे अशी स्पष्ट सूची शासनाने प्रसिध्द केली आहे का१	गर्दी होणारी वाणिज्यिक ठिकाणे व न होणारी ठिकाणे अशी स्पष्ट सुची शासनाने प्रसिध्द केलेली नाही.

३.	ड) वर उल्लेख केलेल्या वाणिज्यिक ठिकाणांना सरसकट नियंत्रण रेषेचे निकष लावणे योग्य आहे का१	शासन निणर्य क्रमांक आरबीडी १०८१/८७१/रस्ते-७ दि.९ मार्च २००१ निर्गमित केला असलयाने यावर वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नाही.
४.	उपरोक्त निकषांमध्ये शिथिलता हवी असल्यास अर्ज कोणाकडे करावयाचा व त्याची पध्दत काय१ शिथिलता देण्याचे अधिकार कोणत्या विभागास आहेत.	शासन परिपत्रक क्र.आरबीडी-१०९५/(१६९२)रस्ते-७ दि.१३.११.१९९५ अन्वये पथ किनारवर्ती नियमात शिथिलता देण्याबाबत अंमलात आणावयाची पध्दत विहीत केलेली आहे. सदर परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या पध्दतीनुसार संबंधितांकडे अर्ज सादर करावा.

प्रथम अपिलाच्या निर्णयात जन माहिती अधिका-याचे म्हणणे हे मान्य करण्यांत आलेले आहे. त्या विरुध्द सदरचे अपिल आयोगाकडे सादर केलेले आहे.

अपिल सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अर्जदाराला या विषयासंबंधीची विस्तृत माहिती आहे. त्यांना या स्विकृत धोरणामध्ये असलेले काही निकष त्यांना मान्य नाहीत असे दिसते व त्यामुळे त्यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज केलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियमान्वये जशी कागदपत्र असतील तशी ती देण्यांत येत असतात. शासन निर्णयात एखादे धोरण ठरल्यानंतर त्या निर्णयात बदल करण्याचे आदेश माहितीच्या अधिकार नियमामध्ये आयोग देऊ शकत नाही. सदरील नकाशामध्ये शिथिलता करण्याची पध्दत व त्या संबंधीत माहिती सुध्दा अर्जदारास देण्यांत आलेली आहे. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांकः १६.९.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/५०४/०२

श्री. एस.के.नानंगिया **तक्रारकर्ता**
७०४ गोल्डन चॅरिएट सह.गृ.संस्था,
१३३, सेक्टर-६ चारकोप,
कांदिवली पश्चिम, मुंबई ४०० ०६७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक तथा **उत्तरवादी**
व्दारा निबंधक, मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ इमारत,
फोर्ट, कॅम्पस, एम.जी.रोड,मुंबई ४०००३२

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
व्दारा निबंधक, मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ इमारत,
फोर्ट, कॅम्पस, एम.जी.रोड,मुंबई ४०००३२

-विवेचन-

श्री.एस.के.नानंगिया यांनी दि.१८ एप्रिल २००९ रोजी दिलेल्या तक्रारीची सुनावणी दि.१५.९.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी तक्रारकर्ते श्री.नानंगिया व जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी तथा निबंधक मुंबई विद्यापीठ उपस्थित होते.

अर्जदाराची पहिली तक्रार ही आयोगाने दि.७.११.२००८ रोजी आदेश देऊनही कंट्रोलर ऑफ एक्झामिनेशन तथा जन माहिती अधिकारी यांचेवर रुपये १७,५००/- रुपयाची शास्ती लावलेली होती. त्यासंबंधी मुंबई विद्यापीठाने कार्यवाही केली किंवा नाही हे समजत नाही. कारण या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ६ अन्वये दि.२६.५.२००९ रोजी अर्ज दिला असता त्याला प्रतिसाद मिळालेला नाही.

सुनावणीच्या वेळेला अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक यांनी असे सांगितले की, संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून शास्तीची वसुली झालेली नाही हे चुकीचे आहे कारण आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून एक किंवा दोन महिन्याच्या आत संबंधित जन माहिती अधिकारी यांचे वेतनातून रक्कम वसुली करुन शासनाने विहित केलल्या बजेट हेड खाली भरावयाची आहे हे नमूद केलेले असते. यासंबंधी ज्या काय प्रशासकिय बाबी आहे त्या कार्यालयाने त्वरीत पार पाडावयाच्या असतात. त्यासाठी १५-२० दिवस पुरेत. अजूनही सदर शास्ती वसुल करुन शासनाकडे ती रक्कम भरुन कार्यवाही झालेली नाही. या गोष्टीची गंभीर दखल आयोग घेत आहे.शास्तीची रक्कम माहे १ नोव्हेंबर २००९ रोजी देय असणा-या मासिक वेतनातून वजाती करुन शासनाने विहित केलेल्या बजेट हेडमध्ये जमा करावी, असे निर्देश विद्यापीठाच्या उपनिबंधकांना देण्यांत आले.

जरी दंड वसुलीची कार्यवाही झालेली नव्हती तरी जी परिस्थिती असेल ती अर्जदारास त्यांच्या कलम ६ नुसार केलेल्या अर्जानुसार त्यांना माहिती देणे आवश्यक होते ती न दिल्याबद्दल संबंधीत जन

माहिती अधिकारी यांना समज देण्यांत येत आहे व त्याची नोंद जन माहिती अधिका-याच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यांत यावी असेही निर्देश देण्यांत येत आहेत.

अर्जदाराची दुसरी तक्रार ही की, त्यांचा जो दुसरा अर्ज होता तो अपिलीय अधिकारी यांनी निर्गत केलेल्या अपिलांच्या संख्येबाबतची आहे. त्याबाबतची माहिती ही अर्जदारास वेळेत मिळालेली नाही. माहितीचा अधिकार अधिनिमयानुसार जशी कागदपत्रात परिस्थिती असेल तशी ती त्वरीत देण्यांत यावी हीच अपेक्षा आहे असे करीत असताना कार्यवाही करुन अद्यायावत माहिती देणे स्वागतार्ह आहे. पण तसे होत नसेल तर सद्य:स्थितीतील माहिती मुदतीत देणे हे आवश्यक असते. या अर्जाच्या बाबतीत असे झालेले दिसत नाही. अर्जदारास उशिरा माहिती देण्यांत आली. या माहितीवरुन असे दिसून येते की, बराच मोठया प्रमाणावर अपिलीय अधिकारी म्हणून प्रथम अपिलावर निर्णय घेण्यास वेळ घेतलेला आहे.

सद्य:स्थितीतील माहिती देताना अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी मोठया प्रमाणामध्ये अपिले ऐकण्याचा कार्यक्रम हाती घेतला होता व सर्व अपिलांची सुनावणी झालेली आहे व त्याचे आदेश हे एक आठवडयाच्या आत पारित होतील.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे. संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

मुंबई
दिनांक: १६.९.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक अपिल/२००९/९०१/०२

श्री. पुरुषोत्तम भास्कररराव पाटील — अपिलकर्ता
मु.पो.ता.भडगांव जि.जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अभियंता — उत्तरवादी
पाटबंधारे उपविभाग, जळगांव

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
पाटबंधारे उपविभाग, जळगांव

-विवेचन-

अपिलाची तारीख दि.३.५.२००८
सुनावणीची तारीख दि.३०.७.२००९
अपिलाथी, प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित

अपिलार्थीनी दि.३०.८.२००७ च्या अर्जान्वये चारी क्र.४१च्या नकाशाबाबतच्या मागणी अर्जाच्या छायांकित प्रतीची मागणी केली होती या अर्जाला प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.१६.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपीलावर सुनावणी न झाल्याने त्यांनी प्रस्तुतचे व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे निर्दशनास आणले की, अपिलार्थीनी मागणी केल्याप्रमाणे चारी क्र.४१ ची नकाशाची प्रत रुपये २५/- शुल्क आकारुन पुरविण्यांत आली आहे. अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यांना पुर्वीच्या नकाशाची प्रत हवी आहे. तेव्हा असे निर्देश देण्यांत येतात की, अपिलार्थीना त्यांना मागणीनुसार शुल्क आकारुन नकाशाची प्रत सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत पुरविण्यांत यावी.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई — (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: १६.९.२००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक अपिल/२००९/८९४/०२

श्री. सूर्यकांत बाबुराव पोळ — अपिलकर्ता
संजय गांधी नगर, स्टेशन रोड
चाळीसगांव, जि.जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधिकारी — उत्तरवादी
जळगांव

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी
जळगांव

-विवेचन-

अपिलाची तारीख दि.७.१.२००८
सुनावणीची तारीख दि.३०.७.२००९

अपिलाथी गैरहजर तसेच प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित

अपिलार्थीनी दि.१८.१०.२००८ च्या अर्जान्वये त्यांच्या दि.१०.९.२००७ रोजीच्या अर्जानुसाएर फ्रीसेल केरोसीन अनुज्ञाप्ती मिळण्याबाबत अर्ज केला. परंतू त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि.६.१२.२००७ रोजी प्रथम अपिल अर्ज केला. तथापि यावर सुनावणी झाली नाही. यास्तव त्यांनी दि.७.१.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीच्या दि.१८.१०.२००८ च्या अर्जाला दि.७.११.२००८ रोजी उत्तर देण्यांत आले आहे. अपिलार्थी गैरहजर असल्याने त्यांची बाजू समजून घेता येऊ शकली नाही. सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून आले की, अपिलार्थीना जन माहिती अधिका-याकडून उत्तर देण्यांत आले आहे. सबब व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यांत येत आहे.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई — (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: १६.९.२००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/१४८/०२

श्री. विक्रम शामा शेट्टी — तक्रारकर्ता
होटेल श्री.लक्ष्मीशा बार ॲन्ड रेस्टॉरंट
शॉप नं.१० ओ.पो.नं.८५,
२२, अभयचंद गांधी मार्ग, मस्जीद बंदर
मुंबई४०० ६०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा — उत्तरवादी
सहाय्यक अभियंता जी / उत्तर विभाग,
मुंबई महागरपालिका,मुंबई

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता जी / उत्तर विभाग,
मुंबई महागरपालिका,मुंबई

-विवेचन-

श्री.विक्रम शामा शेट्टी, मुंबई यांनी आयोगाकडे दि.३१.१२.२००७ रोजी दि.५ जुलै २००७ रोजीच्या अर्जानुसार असे उत्तर मिळाले की, माहिती फार मोठया प्रमाणात असल्यामुळे अर्जदाराने त्याची तपासणी करुन माहिती घ्यावी. या तक्रार अर्जाच्या कारणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी 'फाईल बंद करण्यांत येत आहे ' असे लिहिले आहे म्हणून आक्षेप घेतलेला आहे.

सुनावणीच्या वेळेला स्पष्ट झाले की, अर्जदाराने आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले होते व व्दितीय अपिलातील आदेशानुसार अर्जदारास माहिती मिळालेली आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई — (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: १६.९.२००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/१४३/०२

श्री. प्रविण सिताराम शितप **तक्रारकर्ता**
१/अ/१० श्री.सहयाद्री सोसायटी,
मुंबई पुणे रोड,कळवा ठाणे ४२०६०५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा **उत्तरवादी**
सचिव, धामणी विविध कार्यकारी
सेवा सहकारी सोसायटी (म)
मु.पो.धामणी, तालुका संगमेश्वर जि.रत्नागिरी

जन माहिती अधिकारी तथा
सचिव, धामणी विविध कार्यकारी
सेवा सहकारी सोसायटी (म)
मु.पो.धामणी, तालुका संगमेश्वर जि.रत्नागिरी

-विवेचन-

तक्रारीची तारीख दि.२१.१२.२००७
सुनावणीची तारीख १८.१२.२००९
तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित.

आयोगाच्या दि.१७.९.२००७ रोजीच्या आदेशात जन माहिती अधिकारी तथा सचिव धामणी वि.का.सेवा सह.संस्था ता.संगमेश्वर यांनी त्यांच्या संस्थेचे सन २००४-२००५ व २००५-२००६ चे लेखा परिक्षण होताच ते तक्रारदारास उपलब्ध करुन घावे असे निर्देश दिले होते.

ते मिळाली नाही अशी तक्रार आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अर्जदारानी शुल्क न भरल्यामुळे त्यांना अहवालाच्या प्रती देता आल्या नाहीत. आता २००७-२००८ पर्यतचे हि लेखा परिक्षण उपलब्ध आहे. यापैकी जे अर्जदारास पाहिजे ते शुल्क भरल्याबरोबरच लगेच उपलब्ध करुन दिल्या जाईल हे योग्य वाटते.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
दिनांकः १६.९.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/१५३/०२

श्री. सखाराम रा.यादवाडे
(निवृत्त स.पो.उपनिरिक्षक) तक्रारकर्ता
रा.रक्ष्मी बिल्डिंग अम्मू अपार्टमेंट समोर,
म्हसोबा मैदान, कल्याण पश्चिम
जि.ठाणे

प्रथम अपीलीय प्राधिकारी उपसचिव उत्तरवादी
गृह विभाग, मंत्रालय,मुंबई ३२

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
गृह विभाग, मंत्रालय,मुंबई ३२

-विवेचन-

श्री.सखाराम यादवडे, (निवृत्त स.पो.उपनिरिक्षक) मुंबई यांच्या दि.१८.११.२००७ रोजीच्या तक्रारीची सुनावणी दि.१८.९.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला श्री.यादवडे व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराचे म्हणणे असे की, त्यांच्या अपिल बडतर्फीबाबत मुंबई उच्च न्यायालयामध्ये निर्णय झाला होता.

सुनावणीच्यावेळेला हे स्पष्ट झाले की, अर्जदाराच्या मुद्दयाबाबत पोलिस महासंचालक कार्यालयाने श्री.यादवडे यांना दि.९.२.२००७ रोजी माहिती दिलेली आहे. तसेच अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.१२.२००७ रोजी माहिती दिलेली आहे. अर्जदाराच्या बडतर्फी प्रकरणी हायकोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीची अर्जदारास माहिती दिलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमात कागदपत्र असे असतील असेल तसे देण्यांत येत असतात. मग यातील प्रशासकिय निर्णय अर्जदारास मान्य असो किंवा नसो. अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, हायकोर्टाच्या आदेशाचे पालन करीत असताना त्यांच्या बाबत एक निष्कर्ष व दुस-याबाबत दुसरा निष्कर्ष असे दिलेले आहेत. याबाबत पडताळणी करण्यांत येईल असे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग यांनी असे सांगितले. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: १८.९.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/४८१/०२

श्री. तिर्थ आर.सोनपार
१०/अे/लोहसे सह.गृह.संस्था
रुईया पार्क, जुहू, मुंबई ४०००४९ तक्रारकर्ता

जन माहिती अधिकारी सहाय्यक पालिका आयुक्त
के/पश्चिम वॉर्ड, मुंबई महानगरपालिका
मुंबई ५८ उत्तरवादी

-विवेचन-

तक्रारीचा दिनांक ८ सप्टेबर २००८
सुनावणीचा दिनांक १९.९.२००९
तक्रारकर्ते अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित

अर्जदारास त्यांच्या दि.२६.६.२००६ च्या अर्जान्वये लोहत्से को.ऑप हौ.सोसयटी रुईया पार्क, जुहू, मुंबई ४९ येथील अनधिकृत जागेच्या वापरासबंधी माहिती विचारली. याबाबत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे तक्रार केली होती. तक्रारीच्या बाबतीत महापालिकेकडून मागविलेला अहवाल न आल्यामुळे या तक्रारीची चौकशी करण्यांत आली. त्यावेळेला जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे :-

"श्री.तिर्थ आर.सोनपार यांनी त्यांच्या दि.२८.८.२००६ च्या अर्जान्वये लोत्से को.ऑप. हौ.सो.रुईया पार्क मिलिट्री रोड, जुहू येथील स्टील्ट पार्किगमध्ये अनधिकृतपणे केलेल्या बांधकामबाबत माहिती मागितली होती. सन माहिती अधिकारी यांनी क्र.केप/२४५०१/तनिअ/इवका अन्वये दि.११.१०.२००६ रोजी माहिती दिलेली होती. त्यानंतर दि.३१.१०.२००६ रोजी अपिलकर्त्यानी प्रथम अपिल दाखल केले होते. या अपिलाची सुनावणी दि.२९.११.२००६ रोजी घेण्यांत आली. प्रथम सुनावणी दरम्यान अपिलकर्त्याने अनधिकृत बांधकामावर अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासंबंधी विनंती केली होती. त्यांच्या गा-हाण्यांचे वेळेवर निराकरण न झाल्याने ते वारंवार विभाग कार्यालयात येत होते. तद्नंतर योग्य ते कागदोपत्री पुरावे (मंजूर आराखडा इ.) गोळा करुन अनधिकृत बांधकामबाबत मनपा अधिनियम ३५१ अन्वये क्र.केप/इवका/३५१/४४३४/एसईबी-१/२००८ दि.८.५.२००९ रोजी नोटीस बजाविण्यांत आली होती. नोटीशीचा पाठपुरवा करुन सदरहू अनधिकृत नोटीस बांधकामावर दि.२४.१२.२००८ रोजी पोलिसांच्या मदतीने निष्कासन कारवाई केलेली आहे. केलेल्या कारवाईची माहिती अपिलकर्त्यास या कार्यालयाने प्रत्यक्ष भेटीत तोंडी दिली होती. तेव्हा त्यांनी केलेल्या कारवाईबद्दल

समाधान व्यक्त केले होते. परंतू केलेल्या कारवाईनंतर अपिलकर्त्यास लेखी स्वरुपात कळविण्याचे नजरचुकीने राहून केलेले आहे. "

याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दिलगीरी व्यक्त केलेली आहे.

अर्जदारांना माहिती पेक्षा कारवाईत जास्त रस असल्याने ते सुनावणी कदातिच उपस्थित राहिले नसावेत. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

दिनांक: १९.९.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/१५/०२

श्री. मल्लिकार्जून शंकर धोत्रे
प्लॉट नं. १० स.न.२४३/१ ब/२ब
गाडवे पेट्रोल पंपाजवळ बेलवाड रोड
मिरज ४१६४१०

तक्रारकर्ता

जन माहिती अधिकारी संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,
३ महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र.१९६७,
मुंबई ४०००१

उत्तरवादी

-विवेचन-

तक्रारीचा दिनांक ३० एप्रिल २००८
सुनावणीचा दिनांक १९.९.२००९
तक्रारकर्ते अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराने दि.११ डिसेंबर २००६ रोजी जन माहिती अधिका-या अर्ज लिहून त्यांनी दि.२१ जून २००५ व दि.१८ जुलै २००५ रोजी जी पत्रे लिहिली होती त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती व त्यास प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे धाव घेतलेली आहे.

तक्रारीच्या सुनावणी दि.१८.९.२००९ रोजी घेतली त्यावेळी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

"अपिलकर्ता श्री.धोत्रे यांनी या कार्यालयास माहिती अधिकारांतर्गत जुलै २००५ पासून आज अखेर याच विषयावर २० माहितीचे अर्ज व १ अपिल अर्ज सादर केलेला आहे. तसेच एकाच माहिती करिता ते या कार्यालयास या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय संस्थांना व वरिष्ठ कार्यालयास अर्ज सादर करतात. त्यामुळे शासनाचा अमुल्य असा प्रशासकीय वेळ वाया जातो. तरी विनंती की, अर्जदाराला आपले स्तरावरुन समज देण्यांत यावी व सदर अपिल निकाली काढण्यांत यावे. "

दिलेल्या निवेदनावरुन असे दिसते की, अर्जदारास हवी असलेली माहिती दिलेली आहे अर्जदाराने या अगोदर दि.२४.८.२००६ रोजी असे पत्र लिहून दिले आहे की त्यांना सर्व माहिती मिळाली आहे व त्यांच्या ज्या तक्रारी होत्या त्या गैरसमजुतीतून होत्या आता त्यांचेसमाधान झाले आहे.

अर्जदार प्रत्यक्ष उपस्थित असते तर याची शहानिशा करता आली असती. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक: १९.९.२००९

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/४७७/०२

श्री. सुब्रोतो गोशाल
निरह जय भवानी माता रोड **तक्रारकर्ता**
मातारवाडा, अंबोली
मिरज ४१६४१०

जन माहिती अधिकारी तथा **उत्तरवादी**
सहाय्यक पोलिस आयुक्त
ओशिवरा पोलिस स्टेशन,
न्यू लिंक रोड,ओशीवरा जोगेश्वरी पश्चिम
मुंबई ४०० ०१०२

-विवेचन-

तक्रारीचा दिनांक २१ जानेवारी २००८
सुनावणीची तारीख दि.१९.९.२००९
तक्रारकर्ते व जनमाहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.१२.२००६ रोजीच्या माहिती अर्ज व प्रथम अपिल विहित नमुन्यात व शुल्कासह न केल्यामुळे त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यानंतर त्यांनी आयोगाकडे दि.२१ जानेवारी २००८ रोजी तक्रार केलेली आहे. त्यानुसार सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिलेली आहे :-

सदर बाबत सविनय सादर करण्यांत येत`की, यातील तक्रारदार यांचा सदर प्रकरणी जबाब नोंद करण्यांत आलेला असून त्यांनी त्यांचे जबाबात असे नमुद केले आहे की, त्याचे रहाते बंगल्याच्या समोर मोकळी जागा असून त्यास वॉल कंपाऊड केलेले असुन त्यास गेट बसविलेले नाही व गेट समोर साधारणत: ५० फुट मोकळी जागा आहे सदर मोकळया जागेत एक वडापाव वाल्याचे किचन आहे व ते अनधिकृत आहे त्या ठिकाणी त्या इसमाचा दररोज टैम्पो माल घेण्यासाठी येत असतो. त्यावेळी तो टेम्पो तेथे पार्क केला जातो त्याचप्रमाणे इतर दुचाकी वाहने देखील पार्क केली जातात त्याबाबत त्यांना मनपाकडे व ओशिवरा पोलिस ठाण्यास तक्रारी अर्ज दिलेले होते. परंतू त्याबाब मनपाकडून काय कारवाई झाली तसेच स्थानि पोलिसांकडून काय कारवाई झाले याबाबत विचारणा करणारा अर्ज केला होता. परंतू तो अर्ज सर्वसाधारण नमुन्यात केला होता तो माहितीचा अधिकार अधिनियम ३ २००५ मधील विहीत नमुन्यातील नव्हता. तरी त्या अर्जाबाबत अर्जदार यांनी दि.३०.४.२००७ रोजी मा.माहिती आयोगाकडे अपीलाकरिता अर्ज केलेला आहे व त्याची सुनावणी दि.१९.९.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यांत आलेली आहे.

तरी अर्जदार श्री.सुब्रोतो कर्नलसुरेन गोशाल रा.ठी. विर जय भवानी माता मार्ग. अंबोली अंधरी पश्चिम मुंबई यांचे तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी/बिट अधिकारी स.पो.नि. शिवाजी पाटील यांनी प्रत्यक्ष अर्जदाराची भेट घेऊन त्याची तक्रार ऐकून घेऊन तक्रारीतील मुद्दा दूर केलेला आहे व त्यांना पूर्ण सहकार्य केलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांची आता कोणतीही तक्रार नसल्याचे लेखी दिलेले आहे त्याबाबत त्यांचा जबाब नोंद केला आहे त्याचप्रमाणे त्यांनी प्रत्यक्ष मा.राज्य माहिती आयोगास देखील त्यांच्या दि.२६.३.२००९ रोजीच्या पत्रान्वये ते त्याचा अपील वजा तक्रार अर्ज मार्ग घेतल्याबाबत कळविलेले आहे.

तरी यातील अर्जदार सुब्रोतो कर्नल सुरेन गोशाल रा.ठी.विर जय भवानी माता मार्ग, अंबोली अंधरी पश्चिम मुंबई यांच्या तक्रारीची दखल घेऊन पोलिस ठाण्याचे मार्फतीने बिट अधिकारी स.पो.नि.शिवाजी पाटील यांनी योग्यती कारवाई करुन तक्रारदारांच्या तक्रारीचे निवारण केलेले आहे. त्याबाबत त्यांना प्रत्यक्ष भेटून माहिती दिलेली आहे व महत्वाचे म्हणजे प्रत्यक्ष अर्जदार सुब्रोतो कर्नलसुरेन गोशाल, रा.ठी.विर जय भवानी माता मार्ग, अंबोली अंधेरी पश्चिम,

मुंबई यांनी देखील मा.राज्य माहिती आयोगास ते त्यांचा अर्ज वजा अपिल मागे घेत असल्याबाबतचे पत्राने कळविले आहे. तसेच त्यांचा जबाबात देखील नमुद केलेले असल्याने सदरचा अर्ज वजा अपिल निकाली काढण्याची विनंती केलेली आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

दिनांक: १९.९.२००९ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ रामाआ/अपील/नाशिक/२००९/सीआर-६०९

श्री.श्रावण यशवंत खैरनार, **----- अपीलकर्ता**
३,अभिरुची अपार्टमेंट, गोंदूर विमानतळ रोड,
बोरसे नगरजवळ, देवपूर,जि. धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
जि.प.बांधकाम उपविभाग,पंचायत समिती नवापूर,
ता.नवापूर, जि.धुळे

जन माहिती अधिकारी तथा
जि.प.बांधकाम उपविभाग, पंचायत समिती नवापूर,
ता.नवापूर,जि.धुळे

- वि वे च न -

रामाआ/अपील-६०९ यातील आदेश प्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीयुत सोळंकी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्या बद्दल श्रीयुत सोळंकी यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याचा खुलासा दिनांक २८.०७.२००९ रोजी आयोगाच्या कार्यालयात येऊन करण्याचे निर्देश दिलेले होते. त्यांनी दिनांक २९.०७.२००९ रोजी पुढील प्रमाणे लेखी खुलासा केलेला आहे.

आपले कडील विवेचन व आदेश दि. ३०.०६.२००९ च्या पत्रान्वये आपले कडील दि. ३०.०६.२००९ पत्र मला दि. २७.०७.२००९ रोजी मिळाल्यानुसार मी विनंतीपुर्वक खुलासा सादर करतो की, श्री. श्रावण यशवंत खैरनार रा. धुळे यांनी मागविलेल्या माहितीनुसार संबंधीत सहाय्यक अभियंता श्री. एस.सी.राठोड जि.प. बांधकाम उपविभाग नवापूर यांना मी दि.५.०५.२००८ व २६.०६.२००८ रोजी लेखी पत्र दिले होते. तसेच तोंडी वारंवार सुचना दिल्या होत्या. परंतु त्यांनी वेळेवर माहिती उपलब्ध करुन दिली नाही. दरम्यानच्या काळात येथील उपअभियंता जि.प. उपविभाग नवापूर (प्रथम अपिलीय अधिकारी) सुध्दा या संदर्भात तोंडी वारंवार सुचना दिल्या त्यानंतर त्यांना देखील दि.१२.०५.२००८ रोजी लेखी कळवून या संदर्भात अवगत केले आहे. प्रस्तुत माहिती ३१ मार्च या कालावधीत कामाच्या व्यापामुळे देता आली नाही व संबंधितांकडून वेळेवर मिळाली नाही. त्यानंतर कोणीही माहिती दत नाही म्हणुन कंटाळून काम सोडले होते.

तसेच त्यानंतर आर.डी.वडिले शा.अ.यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून कार्यभार देण्यात आला त्यांनीच त्यांना दि.१५.०७.२००९ रोजी पैसे भरणेबाबत कळविले आहे.(माहिती मिळणेबाबत पैसे भरणे) महोदय,वरील खुलासा मी विनंतीपुर्वक व नम्रपणे सादर करीत असुन भविष्यात माझेकडून अशी चुक होणार नाही याची काळजी घेईल तरी मी सादर केलेला खुलासा ग्राहय धरुन मला माफ करावे ही नम्र विनंती व संबंधितास आता माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच आमच्या उपविभागाकडून झालेल्या चुकीबाबत माफी मागतो.

वरील विवेचनावरुन असे दिसते की, जन माहिती अधिकारी श्रीयुत साळुंके यांच्या बरोबरच श्रीयुत राठोड सहाय्यक अभियंता हे देखील सकृतदर्शनी जबाबदार होऊ शकतात मात्र अर्जदाराला माहिती मिळण्यास १००दिवसापेक्षा जास्त कालावधी लागलेला आहे. मात्र वरील विवेचन लक्षात घेता संपुर्ण कालावधीसाठी दंड न लावता माहिती न दिल्या बद्दल एकूण रुपये १०,०००/- रकमेची शास्ती लादण्यात येत आहे. माहिती देण्यास कोणते अधिकारी जबाबदार होते ही बाब उपविभागीय अभियंता जिल्हापरिषद बांधकाम नवापूर जिल्हा नंदुबार यांनी ठरवावे व दंडाची रक्कम त्यांच्याकडून समप्रमाणात वसुल करावी. दंडाची रक्कम त्यांच्याकडून ऑगष्ट महिन्याच्या पगारातून जो एक सप्टेबरला देण्यात येतो त्या पगारातून वसुल करावी व शासनाने विहित केलेल्या बजेट हेड मध्ये जमा करावी तसेच त्याचा अनुपालन अहवाल आयोगास तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद नंदुरबार व सचिव ग्रामविकास विभाग मंत्रालय यांनाही पाठवावा. आयोगाच्या या आदेशाची प्रत उपविभागीय अभियंता जिल्हापरिषद बांधकाम उपविभाग नवापूर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद नंदुरबार व सचिव ग्रामविकास विभाग मंत्रालय यांनाही पाठवावा.

आदेश

नस्ती संबंधी उपरिनिर्दीष्ट आदेशाच्या विहित मुदतीत पालन करावे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २९.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ तक्रार २९६०/२००९

श्री. हितेश आर. चड्डा ----- **अपीलकर्ता**
एल.जी.कार्डस, ग्राउंड फ्लोअर, मधुसूदन निवास,
१०,अक्कलकोट लाईन नं.१, खाडीलकर रोड, गिरगांव मुंबई ४०० ००४

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव शहर ई वार्ड

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २७.०४.२००९
सुनावणीचा दिनांक: २९.०७.००९

अपिलार्थी हे सुनावणीच्यावेळी अनुपस्थित होते त्यांची सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती अमान्य करण्यात आली मात्र त्यांचे सर्व कागदपत्र विचारात घेण्यात आले. जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास म्हाडाच्या रिपोट प्रमाणे ४३ टेनंन्टस ४४ टेनंन्टस कोणत्या रिपोटखाली ग्राहय धरण्यात आली याची माहिती पाहिजे होती.

याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराच्या संबंधीत नस्तीची तपासणी करुन जी कागदपत्र पाहिजे असतील ते कागद घेण्याची विनंती केली होती. अपिलात अर्जदाराचे म्हणणे त्यांच्या इनस्पेक्शन नको अर्जदाराने त्यांना माहितीच पाहिजे आहे. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, उपरिनिर्दीष्ट कॅलक्यूलेशन प्रमाणे ४३ टेनंन्ट धरण्यात आले होते पण नंतर टेनंन्टची आवश्यकता ही ४३ करण्यात आली. यासंदर्भात किंवा या मुद्यांवर प्रकाश पडणाऱ्या नस्ती मध्ये जे कागदपत्र असतील त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती ५ असतात अर्जदाराला विनामुल्य पोष्टाने पाठविण्यात याव्यात असे निर्देश देण्यात आले.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २९.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ तक्रार क्रं. २९६२/२००९

श्रीमती फरिदा कुरेशी, **----- अपीलकर्ता**
१८०/१८२प्रकाश भवन, ३ रा मजला, सॅमुअल स्ट्रीट,
मुंबई ४०० ००९

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
कार्यकारी अभियंता, बिल्डींग प्रपोजल विभाग (शहर)
ई वार्ड महानगरपालिका भायखळा मुंबई

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २४.०४.२००९
सुनावणीचा दिनांक: २९.०७.००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी: उपस्थित

अर्जदारास ज्या इमारतीच्या संदर्भात माहिती पाहिजे होती त्या इमारतीच्या भूकर क्रमांकाशी निगडीत असलेल्या नस्ती फाटलेल्या अवस्थेत असल्यामुळे सदर इमारतीचा प्रकरण क्रमांक सापडून येत नव्हता. अर्जदारास त्यांच्या कार्यालयाची धारणे शोधण्याच्या पध्दतीची प्रत्यक्ष माहिती देण्यात आली होती. तद्नंतर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्याशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, येत्या पाच दिवसात अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन नस्तीची पुन्हा तपासणी करतील तेव्हा त्या वेळेला विभागाच्या अधिकाऱ्यांनी नस्ती शोधून काढण्याच्या बाबतीत मदत करावी व अर्जदार ज्या कागदपत्रांची निवड करतील ते कागदपत्र त्यांना शक्य तो वर त्याच दिवशी किंवा फार झालेतर त्याच्या दुसऱ्या दिवशी देण्यात यावे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २९.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ अपील क्रं. २४८९/२००९

श्री. इब्राहीम हाजी जुनास, **----- अपीलकर्ता**
८८/१२, कोलेस रोड, बंगलोर ५६० ००५

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका,बी,वॉर्ड,
१२१, रामचंद्र भट्ट मार्ग, मुंबई ९

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १०.०२.२००९
सुनावणीचा दिनांक: २९.०७.००९
अपिलार्थी :अनुपस्थित
जन माहिती अधिकारी: उपस्थित

अर्जदाराने स्वत:च्या अपीलाच्या दोन वेगवेगळया प्रती आयोगाला सादर केलेल्या दिसतात. हेच मुद्दे असलेल्या अपिलावरील निर्णय अपील क्रमांक ४१५४ दि.६.०४.२००९ ने दिलेला आहे. ते अपील अमान्य करण्यात आलेले होते.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २९.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ अपील क्रं. २८७२/२००९

श्री.अब्दुल अजीज जुसाब पटेल **------ अपीलकर्ता**
रुम नं.३, २ रा मजला, ७३, अली उमर स्ट्रीट, मुंबई ३

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक पोलीस आयुक्त दक्षिण नियंत्रण कक्ष, मुंबई

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २०.०५.२००९
सुनावणीचा दिनांक: २९.०७.००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी: उपस्थित

अर्जदार यांनी आपल्या अर्जात सर जे.ज. मार्ग पोलीस ठाणेस श्री. मोतीन मोईल खान यांचेविरुध्द केलेल्या दि.९.०२.२००९ रोजीच्या लेखी तक्रार अर्जाची साक्षांकित प्रत,तसेच अर्जदार यांचे विरुध्द दाखल अदखलपात्र गुन्हयाची साक्षांकित प्रत तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांच्या जबाबांच्या साक्षांकित प्रतींची मागणी केलेली होती.

सदर विषयास अनुसरुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सर जे.जे.मार्ग पोलीस ठाणे यांनी अर्जदार हे उपरोक्त नमूद गुन्हयातील विरोधक आहेत. सदर अदखलपात्र गुन्हयाची साक्षांकित प्रत अर्जदार यांना सोबत जोडून देण्यात आली होती. परंतु अदखलपात्र गुन्हयाचे संदर्भात कोणत्याही व्यक्तींचा जबाब नोंद करण्यात आलेला नसल्यामुळे सदर जबाबांच्या प्रती अर्जदार यांना पुरविणे शक्य झाले नाही असा अहवाल सादर केला होता.

सदर माहितीने समाधानी न झाल्याने अपीलार्थी यांनी मा.प्रथम अपिलीय अधिकारी व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ यांचेकडे प्रथम दाखल केले होते. सदर अपीलाच्या सुनावणीवर मा.प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जा.क्र.१६२८/पोउआ/परि २/०९ दि.९.०४.०९ अन्वये अपील अर्ज निकाली काढला व अपीलार्थीना केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ भाग - ५ कलम २० अन्वये वेळेत निकाली काढण्यात आलेल्या अपीलाच्या आदेशाची प्रत पुरविण्यात आली होती.

सदर अपील सुनावणीतील आदेशात अपिलार्थीना मागितलेली माहिती अपीलार्थीना देण्यात यावी असे आदेश पारित करुन अपिल निकाली काढण्यात आले होते.

सदर आदेशास अनुसरुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सरजे.जे.मार्ग पोलीस ठाणे यांचेकडून जा.क्र.४१०६/०४/बी/२००९,दि.१२.०५.०९ रोजी अन्वये सदर पोलीस ठाणेचे अभिलेखावर अर्जदार यांनी आपल्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे दि.९.०२.२००९ रोजी कोणतीही तक्रार अर्जाची नोंद आढळून येत नसल्यामुळे निरंक अहवाल सादर केला होता. सदरचा अहवाल अर्जदार यांना या कार्यालयातील जा.क्र.९९१/सपोआ/दप्रावि/माअथि/०९,दि १५.०५.२००९ अन्वये जोडून ठेवण्यात आला व अर्जदार यांनी सदरचा अहवाल दि.१८.०५.२००९ रोजी स्विकारला.

तरी अर्जदार यांनी आपल्याकडे दाखल केलेल्या अपिलासंबंधीत सुनावणीकरीता हजर राहणेकरीता वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सर जे.जे.मार्ग पोलीस ठाणे यांना जा.क्र.१५०४/०९,दि.२१.०७.२००९ रोजी अन्वये लेखी पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे त्यामुळे मागणीबाबत प्रत्यक्षात रेकॉर्डला असलेली माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे असेच दिसून येते.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २९.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ८१३ /२००९

श्री. अर्जुनराव बाबुराव उगलमुगले ------- अपीलकर्ता
मु.पो.पाचोरे बु.ता.निफाड,जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
धर्मादाय आयुक्त,धर्मदाय आयुक्त कार्यालय,व्दारका,नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
अध्यक्ष/सरचिटणिस,ज्ञानगंगा विद्याप्रसारक मंडळ पाचोरे बु. ता.निफाड,जि.नाशिक.

- वि वे च न -

अपीलकार श्री. अर्जुनराव बाबुराव उगलमुगले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी हजर होते. जन माहिती अधिकारी अनपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि. २८.०८.२००६ रोजी अर्ज करुन, ज्ञानगंगा विद्याप्रसारक मंडळ या संस्थेच्या एक ते चौदा (सन १९९१ ते ऑगष्ट २००६) पर्यंतच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नकला व इतर अनुषंगीक माहिती मागितली होती. माहिती पोटी रुपये ९३२/- एवढी रक्कम भरल्यानंतर संस्थेच्या सरचिटणीसाकडून प्रत्यक्ष भेटून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे दि. १४.०९.२००६ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविण्यात आले. यामुळे समाधान झाले नसल्यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे दि.८.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले सदर अपीलावर प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि. २८.०५.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरीता जन माहिती

अधिकारी तसेच अपीलकार अनुपस्थित होते. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन ज्ञानगंगा विद्याप्रसारक मंडळ या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नकला व इतर अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्क विहित कालावधीत मिळवून सुध्दा माहिती दिली नाही. संस्था ट्रस्ट जरी असती तर शुल्क स्विकारले असल्याने जन माहिती अधिकाऱ्याची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी.

<u>आदेश</u>

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २९.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक२००९/सीआर/अपील ७७८

श्री. ॲड.सुधाकर आर.जाधव. ------- **अपीलकर्ता**
पत्रकार सा. शितिल टाईम्स,
एन-४१,जेऐ-३-१२-१, सवतानगर,
४ स्किम, नविन सिडको,
नाशिक-८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
अधिक्षक अभियंता, जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ,
आकाशवाणी चौक, जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता, जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ,
आकाशवाणी चौक, जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. ॲड.सुधाकर आर.जाधव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०६.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलार्थी हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि. ११.०१.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

अधिक्षक अभियंता,जळगांव यांचे पूर्ण नाव, ते जळगांव कार्यालयात केंव्हा रुजू झाले. जळगांव कार्यालयात रुजू होण्यापूर्वी ते कार्यरत होते ते ठिकाण, कार्यालयाचे नाव व पत्त,फोन नंबर,नोकरीची सुरुवातीची तारिख, मासीक पगाराची रक्कम, अधिक्षक अभियंता यांच्या हाताखालील अभियंत्यांची नावे,

कार्यालयाचा पत्ता. सन २००६-०७ या वर्षात शासनाकडून मिळालेला एकूण मंजूर निधी. निधी खर्च केल्या बद्दलची सविस्तर माहिती. कार्यालयाने कमीत कमी व जास्तीत जास्त धनादेश कोणत्या व्यक्तीस ,संस्थेस,कंपनीस एजन्सीत कोणत्या कामासाठी कोणत्या तारखेला अदा करण्यात आले. धनादेशांचे क्रमांक. सदरील आर्थीक वर्षातील देयकाचा प्राधान्यक्रम कोणत्या निकषावर ठरविण्यात आला इत्यादी अनुषंगीक माहिती मागितली होती. माहिती पोटी एकूण

रु.३७/- इतक्या रकमेचा भरणा कार्यालयात करावा.त्यानंतर मागणीप्रमाणे माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थी यांना दि.११.२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे दि.२०.३.२००८रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती पोटी रु.३७/- एवढी रक्कम कार्यालयात भरणा केल्यानंतर मागणीप्रमाणे माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कळविले आहे. त्यामुळे अपीलावर सुनावणीसाठी दिनांक देण्याचा प्रश्न उद्‌भवत असे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी अपिलकारास दि. १९.०४.२००८ च्या पत्रान्वये कळविले.जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता यांनी दिलेली माहिती दिशाभूल करणारी वाटते असा अपिलार्थींने व्दितीय अपीलात सुध्दा उपस्थित केला आहे. अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले यावरुन सदर प्रकरणी अपिलार्थी यांना जन माहिती अधिकाऱ्याने माहिती पुरविली आहे. सविस्तर माहिती पुरविली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे तर रेकॉर्ड असलेली सर्व माहिती दिली असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तेंव्हा याबाबत खात्रीच करुन घ्यावयाची असेलतर अर्जदारांनी इन्स्पेक्शन घेणे हाच सर्वोत्तम तोडगा होऊ शकतो.

<u>आदेश</u>

अपील निकाला काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १२.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ अपील क्रं. ४५५०/२००९

श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज **----- अपीलकर्ता**
घनश्याम दास चाळ, रुम नं.२, संत रोहीदास मार्ग,
काळा किल्ला, धारावी,मुंबई १७

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,
जी/आर विभाग कार्यालय दादर (पश्चिम) मुंबई २८

जन माहिती अधिकारी तथा
वरिष्ठ वसाहत अधिकारी

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ११.०५.२००९

सुनावणीचा दिनांक: १३.०८.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी: उपस्थित

अर्जदारास ओम दत्त एस.आर.ए. गृहनिर्माण संस्थेबाबतीत परिशिष्ट २ मधील अनुक्रमांक ३ येथील महादेव सीताराम जोशी यांना पात्र ठरवतांना त्यांनी जी कागदपत्र जसे फोटोपास, भाडेपावती, लाईट बिल रेशन कार्ड अशा कोणत्या कागदपत्रानुसार त्यांची पात्रता सिध्द करण्यात आली याची माहिती विचारलेली होती.

अर्जदारास श्री. महादेव सीताराम जोशी यांची पात्रता सिध्द करण्यासाठी १९९५ पुर्वी १९८३ सालच्या निवडणूक यादीमध्ये त्यांचे नाव या झोपडपट्टीच्या पत्त्यावर होते या आधारे त्यांना पात्र करण्यात आले अशी माहिती दिलेली आहे. या व्यतिरिक्त इतर कागदपत्र नस्तीत नाही अशी माहिती देण्यात आली. अपिलीय अधिकारी यांनी जरी इतर काही कागदपत्र असल्यास त्याचा कसून शोध घेण्यात यावा असे कागदपत्र मिळाल्यास त्यांची छायांकित प्रत देण्याबाबतचे आदेश जन माहिती अधिकारी यांना दिले होते तरी असे कुठचेही कागदपत्र नाही असे शोधा अंती दिसून आले असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. तसे अर्जदारास कळविण्यातही आलेले आहे

त्यामुळे उपलब्ध सर्व माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे असे दिसून येते व ही परिस्थिती अपिलार्थी सुध्दा मान्य करतात.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १३.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ अपील क्रं. ४५५१/२००९

श्री. चेतन कोठारी **----- अपीलकर्ता**
५२,ओशीयानिक अपार्टमेंट, डॉ. राजाबली पटेल लेन,
बी.देसाई रोड, ब्रिचकँन्ही हॉस्पीटल जवळ,
मुंबई २६

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२, मुंबई

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे.जे.रोड,
नागपाडा मुंबई ०८

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ६.०५.२००९

सुनावणीचा दिनांक: १३.०८.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी: उपस्थित

अर्जदारास ताज महल हॉटेलच्या सुरक्षेसंबंधी सप्टेबर २००८ मध्ये झालेल्या बैठकीची माहिती व २.१०.२००८ रोजी मुंबई पोलीसांनी ताज महल हॉटेलच्या सुरक्षा व्यवस्थापनाला सुरक्षिततेच्या उपाययोजनेबाबत दिलेल्या सूचनांची माहिती पाहिजे होती.

शासकीय माहिती अधिकारी यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही, १) भारताचे सार्वभौतम व अखंडता, राष्ट्राची सुरक्षितता, व्युहतंत्रात्मक, आर्थिक हितसंबंधी, विदेशी राष्ट्राशी असलेले हितसंबध यावर बाधकरित्या परिणाम होईल अशी खात्री पटल्याने कैद्रीय माहिती अधिकारी अधिनियम २००५ कलम ८ (१) (क) अन्वये २) जी माहिती उघड केल्याने वाणिज्यिक क्षेत्रातील विश्वास, व्यापारविषयक गुपिते किंवा बौध्दिक संपदा यासह जी माहिती उघड केल्याने, त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्कम स्थानाला हानी

पोहचेल अशी माहिती केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८ (१) (घ) अन्वये ३) जी माहिती उघड केल्याने अधिकाधीक लोकहिताची हमील मिळेल अशी आमची खात्री पटत नाही. अशी एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे त्यास उपलब्ध झालेली माहिती कैद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८ (१८ (त्र) अन्वये नाकारण्यात आलेली आहे.

अपिलीय अधिकारी हे सुध्दा जन माहिती अधिकारी यांच्याशी सहमत आहे. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याबाबत त्यांच्या पुढील प्रमाणे हरकती आयोगास सादर केल्या.

"अपीलार्थी यांना गुप्तचर यंत्रणा, नवी दिल्ली यांच्या आलेल्या गुप्त माहितीवरुन संबंधित पोलीस ठाणे यांनी ताजमहल हॉटेल आस्थापना यांचेशी सुरक्षिततेविषयी बैठक घेतली त्यानंतर दि.२६.११.२००८ रोजी मुंबईवरील हल्ल्यात ताज महल हॉटेल हे भक्ष्यस्थानी पडले. हल्ल्यामधील हल्लेखोरास अटक होऊन त्यांचेवर विशेष न्यायालयात रितसर खटला चालू आहे. त्यामुळे हॉटेल आस्थापना व पोलीस यंत्रणा यांचेमधील झालेल्या बैठकीचा बृत्तांत सदरबाबत न्यायालयामध्ये प्रलंबित असल्यामुळे देण्यास अद्यापही आमची हरकत आहे. परिणामी अपिलार्थी यांचा अर्ज फेटाळण्यात यावा ही विनंती."

मागितलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता व त्याचा सध्या चालू असलेल्या न्यायालयीन कामकाजाशी संबंध लक्षात घेता व एकूणच प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे असे आयोगास वाटते.

आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १३.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ अपील क्रं. ४५५२/२००९

श्रीमती डॉ.मालिनी जोहरी **----- अपीलकर्ता**
प्राचार्य, श्री.चिनॉय महाविद्यालय
अंधेरी, मुंबई ४०० ०६९

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सह संचालक, उच्च शिक्षण मुंबई विभाग, मुंबई ३, महापालिका मार्ग,
मुंबई ४०० ००१

जन माहिती अधिकारी तथा
सह संचालक, उच्च शिक्षण मुंबई विभाग, मुंबई ३, महापालिका मार्ग,
मुंबई ४०० ००१

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ११.०५.२००९

सुनावणीचा दिनांक: १३.०८.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपिलीय प्राधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्यांच्या पे फिक्सेशन तसेच पेंशन पेपर्स स्विकार करण्यास दिलेला नकार यांच्या बाबतीत माहिती पाहिजे होती.

अर्जदाराचा अर्ज पाहिला असता त्यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप स्पष्टिकरण मागण्याच्या स्वरुपाचे आहे. त्यामुळे अर्जदारास जी कागदपत्रे होती ती देण्यात आली व उर्वरीत माहिती ही माहितीच्या व्याख्येत बसत नसल्यामुळे ती त्यांना देता येऊ शकली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले. सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की अर्जदाराची मुख्य तक्रार ते रिटायर झाल्या नंतर त्यांचे पेंशन पेपर्स अजून तयार झालेले नाही याबाबत ऑडीटर यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहे व अर्जदाराला बोलावून घेऊन पेंशन पेपर्स बाबतीत कार्यवाही करण्यात येईल असे अपिलीय अधिकारी यांनी सांगितले. अर्जदाराचा माहितीच्या अधिकाराच्या अर्जाचा मुळ उद्देश त्यांचे पेंशन

पेपर्स लौकर तयार व्हावेत हाच होता असे अपिलार्थी यांचे म्हणणे. एकंदरीत अर्जदारास अभिप्रेत असलेली कार्यवाही होत असल्याने पुढील आदेश देण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १३.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ अपील क्रं. ४५५३/२००९

श्रीमती इंदिराबाई भोजने. **----- अपीलकर्ता**
ए/४०२,वीणा-बीना अपार्टमेंट,
ए.डी.मार्ग, शिवडी,
मुंबई ४०० ०६९

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
उप मुख्य अभियंता,ग्राहक सेवा (उत्तर/पूर्व) बेस्ट भवन बेस्ट मार्ग,
टपाल पेटी क्र. १९२ मुंबई ४०० ००१

जन माहिती अधिकारी तथा
विभागीय अभियंता ग्राहक सेवा (एफ/दक्षिण) बेस्ट भवन बेस्ट मार्ग,
टपाल पेटी क्र. १९२ मुंबई ४०० ००१

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १४.०५.२००९

सुनावणीचा दिनांक: १३.०८.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी : उपस्थित

श्रीमती इंदिरा भोजने यांनी केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.१२.०१.२००९ रोजी पाठविलेल्या मूळ अर्जाव्दारे वीजमापक क्र.डी ८९८३४४ हा श्री.अनाजी चव्हाण यांच्या नावांवर करताना सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. प्रस्तुत वीजमापक पूर्वी श्री.बी.जी.भोजने यांच्या नावावर होते.

पत्र क्र. CCNE/IGR/F/S/RTI/३३०९]दि.०४.०२.२००९ व्दारे श्रीमती इंदिरा भोजने यांना असे कळविले होते की, दि. ७.०२.२००५ रोजी वीजमापक क्र. ८९८३४४ हा श्री. बी.जी. भोजने यांच्या नावावरुन श्री. अनाजी चव्हाण यांच्या नावावर करण्यात आला परंतु श्री. अनाजी चव्हाण यांनी वीजमापक श्रीमती इंदिरा भोजणेयांच्या नावावर करताना दिलेली कागदपत्रे आमच्या कार्यालयात उपलब्ध नाहीत व ती उपलब्ध झाल्यास लवकरात लवकर देण्यात येतील असे श्रीमती इंदिरा भोजने यांना कळविले होते.

सदर उत्तरावर श्रीमती इंदिरा भोजने यांनी उप मुख्य अभियंता ग्राहक सेवा (उत्तर-पूर्व) यांच्याकडे दि.२६.०२.२००९ च्या पत्राव्दारे केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी दि.२४.०३.२००९ रोजी सकाळी १०.०० वाजता उप मुख्य अभियंता (उत्तर-पूर्व) यांच्या कक्षात झाली. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी ग्राहक सेवा एफ/दक्षिण विभाग, त्यांचे सहकारी तसेच श्रीमती इंदिरा भोजने काही नातेवाईकांसह उपस्थित होत्या. सुनावणी दरम्यान श्रीमती इंदिरा भोजने यांचे म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती जन माहिती अधिकाऱ्यांस श्रीमती इंदिरा भेजने यांना हव्या असलेल्या कागदपत्रांकरिता पुनश्च शोध घेवून त्याचे तपशील दि.८.०४.२००९ पूर्वी कळविण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार सदर कागदपत्रांचा पुनश्च शोध घेवून ती उपलब्ध होत नसल्याचे पत्र क्र.उप मुख्य अभियंता (उत्तर/पूर्व)/प्रशा-४१(अ)/७३/२००९, दि.२.०४.२००९ अन्वये श्रीमती इंदिरा भोजने यांस कळविण्यात आले होते.

वरील उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी व्दितीय अपील दाखल केले आहे. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्र शोधून काढण्यासंबंधी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली होती. कागदपत्र आढळून येत नाही असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. तसेच अर्जदारास मदत करण्याच्या दृष्टीने श्रीयुत अनाजी चव्हाण यांच्या कडून शिधावाटप व निवडणूक आयोगाने जारी केलेले ओळखपत्र यांच्या प्रतीही प्राप्त करुन घेतलेल्या आहेत असेही सांगितले.

अर्जदाराला हवी असल्यास ही कागदपत्रे देण्यात यावेत. प्रयत्न करुनही कागदपत्रे आजमितीस उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती मान्य करण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १३.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ अपील क्रं. ४५५५/२००९

श्री.सुर्यकांत गंगाराम चव्हाण **----- अपीलकर्ता**
३९/२/३,नवजीवन हौ.सोसायटी, इंदिरा नगर,
पोलीस चौकी समोर, सर्वीस रोड,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०५५

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ,९, हिल रोड, वांद्रे (प), मुंबई ५०

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष
कार्टर रोड,वांद्रे (प), मुंबई ५०

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ०५.०५.२००९

सुनावणीचा दिनांक: १३.०८.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

"दि. ११.१२.२००८ ते दि.१५.१२.२००८ पर्यंत निर्मलनगर पोलीस ठाण्यात माझ्याबाबत किंवा माझ्या विरोधात पोलीस ठाणे दैनदिनीमध्ये ज्या नोंदी घेण्यात आल्या आहेत त्याची सविस्तर माहिती साक्षांकित नक्कल प्रतीसह देण्याबाबतचे आदेश देण्याबाबतृ

दि.१२.१२.२००८ रोजी पहाटे १२.३० वाजता मी निर्मलनगर पोलीस ठाण्याचे ठाणे अंमलदार श्री. घाडी यांना माझा भ्रमणध्वनी क्र. ९२२३३९७७८१ या व्दारे पोलीस ठाण्याचा दुरध्वनी क्र. २६४७०९३१ यावर फोन करुन पोलीस हवालदार मोहीते व त्याच्यासोबत असलेल्या इतर दोन पोलीस शिपायांनी मला जी मारहाण केली होती त्याबाबतची माहिती कळविली होती त्याबाबतची ठाणे दैनंदिनीमध्ये घेण्यात आलेल्या नोंदणी संदर्भाच्या सांक्षांकित प्रत मिळणेबाबतचे आदेश देण्याबाबत"

दिलेल्या माहितीचा तपशील व प्रथम अपिलातील निर्णय व कार्यवाही पुढीलप्रमाणे.

"सदर अर्जास अनुसरुन सहाय्यक माहिती अधिकारी व सहाय्यक पोलीस आयुक्त, खेरवाडी विभाग, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निर्मलनगर पालीस ठाणेची माहिती या क्र.५४६/सपोआ/माअअ/पनिक/०९ दि.२६.०९.२००९ अन्वये अपीलार्थी यांना देण्यात आली आहे. अपिलार्थी यांना दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही म्हणून त्यांनी मा. पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-९ व अपिलीय अधिकारी,बांद्रा पश्चिम,मुंबई यांच्या कार्यालयात अपिल अर्ज सादर केला.

सदर अपील अर्जाबाबत मा. पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-९ व अपिलीय अधिकारी,बांद्रा पश्चिम,मुंबई यांच्या कार्यालयात दि.५.०३.२००९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९, बांद्रा पश्चिम मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयाचा जा.क्र.४९९/पोउआ/परि-९/माअअ/०९,दि.५.०३.२००९ रोजीच्या आदेशात "अपिलार्थी यांनी त्यांच्या मुळ अर्जामध्ये त्यांनी दि.११.१२.२००८ रोजी रात्री ११.४५ वाजता पोलीस नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्र.१०० वर दिलेल्या संदेशाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाही संदर्भात माहिती मागितलेली होती. त्या अनुषंगे सहाय्यक पोलीस आयुक्त व माहिती अधिकारी, पश्चिम नियंत्रण कक्षे,बांद्रा (प),मुंबई यांनी अपिलार्थी यांना समाधानकारक माहिती दिलेली आहे. परंतु दि.१२.१२.२००८ रोजी पहाटे १२.३० वाजता यांनी त्यांच्या भ्रमणध्वनीवर फोन करुन पोलीस हवालदार मोहिते व त्यांच्यासोबत असलेल्या इतर दोन पोलीस शिपायांनी त्यांनी जी मारहाण केली त्याअनुषंगे जी माहिती मिळविलेली होती त्याबबातची ठाणे दैनंदिनीमध्ये घेण्यात आलेल्या नोंदणीची साक्षांकित नक्कल प्रत दिलेली नाही. यास्तव वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निर्मलनगर पोलीस ठाणे, मुंबई यानी उपरोक्त दि.१२.१२.२००८ रोजी उपरोक्त नमूद केलेल्या घटनेबाबत ठाणे दैनंदिनीमध्ये घेण्यात आलेल्या नोंदणीची नक्कल प्रत अपिलार्थी यांनी द्यावी"

त्याप्रमाणे उपरोक्त नमूद ठाणे दैनंदिनीची नक्कल प्रत अपिलार्थी यांना देवून, अपिलार्थी यांना देण्यात आलेल्या माहितीचा सविस्तर लेखी अहवाल सादर करणेबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निर्मलगर पोलीस ठाणे, मुंबई यांना १) जा.क्१५३३/सपोआ/माअअ/पनिक/०९,दि.९.३.२००९ अन्वयेच्या पत्राव्दारे व २)जा.क्र.४६८३/सपोआ/माअअ/पनिक/०९,दि.३०.७.२००९ अन्वयेच्या स्मरणपत्राव्दारे कळविण्यात आले होते. त्यावरुन पोलीस ठाणेने अपिलार्थी यांना दि.१२.१२.२००८ रोजीच्या संबंधीत ठाणे दैनंदिनीची प्रत दिनांक ९.५.२००९ रोजी देण्यात येवून त्यांची नमूद आदेश प्रतीवर दिनांकत स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट करण्यात आले की,

प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.१२.२००८ रोजीच्या नोंदीची ठाणे दैनंदिनी प्रत अपिलार्थी यांना देण्याचे वयोनि. निर्मलनगर पो. ठाणेस दि. ५.३.२००९ रोजीच्या लेखी आदेश प्रमाणे दिले होते व त्याबाबत या कार्यालयाकडूनही वपोनि.निर्मलनगर पो.ठाणे यांनी लेखी कळवून पूर्तता करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे पोलीस ठाणेकडून अपिलार्थी यांना दि.९.५.२००९ रोजी दि.१२.१२.२००८ रोजीच्या ठाणे दैनंदिनीची संबंधीत

प्रत त्यांना दिलेली आहे. अपिलार्थी याव्यविरिक्त दि.११.१२.२००८ ते १५.१२.२००८ या कालावधीतील त्यांच्या विरुध्द वा त्यांचया संबधीत नोंदी असलेल्या पो.ठाणेकडील ठाणे दैनंदिनीच्या प्रतींची मागणी केली आहे. याबाबत सादर करण्यात येते की, दि.१२.१२.२००८ रोजीची जी त्यांना ठाणे दैनंदिनीची प्रत दिलेली आहे तीच प्रत त्यांचेशी संबंधीत असून त्या व्यतिरिक्त त्यांच्या संबंधीत वा त्यांच्या विरुध्द इतर कोणतीही नोंद वरील कालावधीत पोलीस ठाणे दैनंदिनीत घेण्यात आलेली नाही. व त्यामुळे त्यांना तशा प्रती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. "

यावरुन जी माहिती उपलब्ध आहे ती अर्जदारास देण्यात आलेली आहे असे स्पष्ट होते. गुन्हा दाखल केलेला आहे मात्र जे शीट अजून दाखल करावयाची आहेत. गुन्हा दाखल केला आहे चौकशी अद्यापही चालू आहे असे ही जन माहिती अधिकारी यांनी यावेळी सांगितले. त्यामुळे उपलब्ध माहिती देण्यात आलेली आहे असे दिसून आले.

आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १३.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ अपील क्रं. ४५५९/२००९

श्री.रमेश नामदेव काटकर ----- **अपीलकर्ता**
निवास क्र.२, बेस्ट अधिकारी निवास
इलेक्ट्रीक बील कॅंश काउंटरच्या वरती, १ ला मजला,
महालक्ष्मी रिसी, स्टे(पॉवर हाऊस), साने गुरुजी मार्ग,
जेकब सर्कल, मुंबई ४०० ०११

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी,
विद्युत भवन, प्लॉट नं. ५, अभ्युदय बँकेजवळ, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४०० ७०५

जन माहिती अधिकारी तथा
उप कायर्कारी अभियंता, कोपरखैरणे उपविभाग,
महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी, विद्युत भवन, प्लॉट नं. ५, अभ्युदय बँकेजवळ,
सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४०० ७०५

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ८.०५.२००९

सुनावणीचा दिनांक: १३.०८.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपिलीय प्राधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्यांच्या २८.०१.२००९ रोजींच्या अर्जानुसार त्यांनी ३.०६.२००८ पर्यंत अनामत रक्कम भरली तरी २२.११.२००८ पर्यंत मिटर्स का लावले नाही याचा तपशील व या कालावधीत इतरांची लावलेली मिटर्स याबाबत माहिती पाहिजे होती व ही माहिती अर्जदारास १८.०२.२००९ रोजीच्या पत्राने दिलेली आहे. दिलेल्या माहितीमध्ये ५३० कनेक्शनची माहिती अनामत रक्कम कधी भरली व कनेक्शन कधी दिलेले आहे. अर्जदाराच्या अपिलामध्ये एका दिवसात जेवढे मिटर्स लावणे शक्य आहे त्यापेक्षाही जास्त मिटर्स लावल्याचे दिसते हा मुद्दा आहे. यासंबंधीचा खुलासाही अर्जदारास ११.०८.२००९ रोजीच्या पत्राने कळविलेला आहे ते पुढील प्रमाणे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.१२१९ दि.१८.०२.२००९ अन्वये आपणास दिलेली माहिती दिशाभूल करणारी नसून सत्य व खरी आहे. आपण नमुद केलेले समीकरण हे आपले वैयक्तीक मत असून त्या कुठला ही तांत्रीक आधार नाही. आपणास दिलेली माहिती ही आमच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या रेकॉर्डस वरुन देण्यात आली आहे.

दि. ५.०७.२००८ रोजी दिलेले ३५ कनेक्शन पैकी ३३ कनेक्शन हे मे. महावरील इंन्टरप्रायझेस,प्लॉट क्र.२५ से.६ घणसोली या एकाच इमारतीचे असून ५.०७.२००८ रोजी यांचा विज पुरवठा सुरू केला.

दि.१२.०७.२००८ रोजी दिलेले ३८ कनेक्शन हे. मे. अंबिका इंन्टरप्रायझेस, प्लॉट क्र. १५,१६,१७ व १८ से.७ घणसोली या एकाच इमारतीचे आहेत व याचा विज पुरवठा दि. १२.०७.२००८ रोजीच सुरू करण्यात आला आह.

त्याच प्रमाणे १७.१०.२००८ रोजी दिलेले १७५ कनेक्शन पैकी १४१ कनेक्शन हे मे. अरिहंत इंन्टरप्रायझेस प्लॉट क्र.२४ व २५ से.७ घणसोली या इमारतीचे असून यावा विज पुरवठा दि. १७.१०.२००८ रोजीच सुरू करण्यात आला.

वरील तीनही इमारतीमधील मीटर केबीन ची वायरींग ही अधिकृत विद्युत परवानाधारक कंत्राट दाराकडून केलेली असून सदर इमारतीतील मीटर केबीन मधील वायंरींगचे काम हे मीटर जोडण्यापूर्वीच पुर्ण केलेले होते व मीटर बसविण्यासाठी लागणारा स्क्रु ची मोज मापासह जोडणी मीटर बसविण्यापुर्वीच केलेली होती. त्यामुळे एका मीटरला वायरी जोडण्यासाठी साधारण पाच मिनिटाचा कालावधी लागतो तसेच इमारतीमध्ये महावितरणच्या पाच तांत्रीक कर्मचाऱ्यांनी मिटर बसविण्याचे काम केले आहे.

यावरुन अपिलार्थीस संपुर्ण माहिती दिलेली दिसते. अर्जदारास प्रशासनीक पध्दत किंवा लॉजिस्टीक बाबतीत तक्रार असेलतर ती त्यांनी प्रशासनीक रित्या संबंधीत वरिष्ठ अधिकाच्यांकडे करावी. सकृतदर्शनी तरी रेकॉडप्रमाणे योग्य माहिती दिलेली आहे असेच दिसून येते

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १३.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र. रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/ अपील क्र . ८३० /२००९

श्री. अरुण एकनाथ साबळे ------- **अपीलकर्ता**
रा.चंदनपुरी गेट,गुरुवार वार्ड, सर्वे नं.२२७,
ता. मालेगांव (नाशिक)

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
सहा.आयुक्त,मालेगांव महानगरपालिका,मालेगांव, जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
आस्था.सुपरवायझर,आस्थापना विभाग,महानगरपालिका,
मालेगांव ता.मालेगांव,जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. अरुण एकनाथ साबळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे ४.४.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि. ६.११.२००७ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली.

१) सतरा लोक उल्लेखनीय व सतरा अनधीकृत वारसाहक्क उमेदवाराची कायम हक्क आस्थापनेवर नेमणूक कोणत्या कायद्यानुसार, अधिकारानुसार कोणत्या आधारावर व कोणत्या परिपत्राकानुसार करण्यात आल्या.२) अनधीकृत नेमणूका नसल्यास त्या कशा नाहित. ३) वारसा हक्क यादीत नाव नसतांना थेट कायम आस्थापनाने नेमणूका का व कोणत्या आधारे,कोणत्या कायद्याच्या अधिकाराने करण्यात आल्या. ४) नाव नसतांना थेट नेमणूका अधिकृत असतील तर त्या कशा व कोणत्या आधारे, कोणत्या कायद्याने आहेत

इत्यादी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहीत कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि.५.२.२००८ रोजी अपीलकारास त्वरीत माहिती द्यावी असे आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी चांगल्याप्रकारे उत्तर दिले. परंतु आस्था विभागाने त्यानुसार कार्यवाही केली नाही आदेशाचा अवमान केला असा अपिलाकाराने व्दितीय अपीलात सुध्दा उपस्थित केला आहे. अपीलकारास दि. १५.२.२००८ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रतिपादन केले. अपीलकारास श्री. अरुण एकनाथ साबळे यांचे नाव प्रथम यादीत तात्कालीन आस्थापना पर्यवेक्षक यांनी त्यांचे स्तरावर समाविष्ठ केले होते. वारस हक्काचे सर्व प्रकरणांची तपासणी केली असता श्री. रवी मनोज यांना सेवेतून कमी केले. शासन परिपत्रकानुसार सेवेतून कमी करण्यात आलेल्या वारसाचे जागेवर वारसा हक्काला नेमणूक देण्यात येत नाही असे परिपत्रक आहे. त्यामुळे अपीलकाराचे नाव वगळण्यात आले आहे अशी जन माहिती अधिकाऱ्यांनी,अपीलकारास उपलब्ध माहिती पुरविली आहे.

या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १३.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र. रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/ अपील क्र . ८११ /२००९

श्री. प्रशांत रमेश जाधव ------- अपीलकर्ता
बस स्टँड समोर,वैष्णव प्रिंटींग प्रेस जवळ,
मु.पो.घोटी,ता.ईगतपुरी,जि.नाशिक
नाशिक ४२२ ४०२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सह जिल्हा निबंधक वर्ग१, एन.डी.टॉवर्स,संभाजी चौक,
उंटवाडी रोड,नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मुद्रांक जिल्हाधिकारी,एन.डी.टॉवर,संभाजी चौक,नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. प्रशांत रमेश जाधव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.८.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि. ३०.०४.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली.

अ) कुळ कायदा कलम ६३ विरुध्द व्यवहार नोंदविला असलेल्या जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार कायेशिररित्या कशा प्रकारे नोंदविता येतात.

ब) दुय्यम निबंधक श्रेणी-१ इमतपुरी यांचेकडे दि १.१०..२००७ रोजीचे दस्त क्र.२०७१/२००७ नुसार श्री.नानासाहेब दगडू गव्हाणे यांनी नोंदविलेले खरेदी खत कायदेशीर आहे काय?

क) सदर व्यवहार बेकायदेशीर असल्यास दुय्यम निबंधक इगतपुरी तसेच श्री.नानासाहेब दगडू गव्हाणे यांचेविरुध्द काय कायदेशीर कारवाई केली.

ड) कायदेशीर कारवाई केलेली असल्यास संबंधीत कागदपत्रांच्या नकलाची मागणी केली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहीत कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.०६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकाऱ्यांनी तात्काळ द्यावी असे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि. २२.०७.२००८ रोजी आदेश पारित केले. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी,प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशाची विसंगत,अपुर्ण व पुर्वी दिलेली माहितीच वेगळया शब्दात सादर केली असा अपिलकाराने व्दितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे. मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरूपात असल्याने कार्यालयातील उपलब्ध कागदपत्रे अपीलकारास देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी सुनावणीचेवेळी प्रतीपादन केले. अपीलकाराने मागणी केलेल्या प्रश्नाचे स्वरूप लक्षात घेता प्रश्नाची उत्तरे जन माहिती अधिकाऱ्याकडून अपेक्षीत करणे माहितीच्या अधिकारात बसत नाही. मात्र माहितीच्या अधिकारानुसार प्रश्नांशी संबंधीत कार्यालयातील माहिती जशी आहे तशी अपीलकारास जन माहिती अधिकाऱ्यांनी उपलब्ध करुन द्यावयाची आहे. सदर प्रकरणी कार्यालयातील उपलब्ध माहिती अपीलकारास, जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १३.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र. रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/ अपील क्र . ८१७ /२००९

श्री. साजिद अहमद निसार अहमद ------ **अपीलकर्ता**
सर्व्हे नं.१५७, प्लॉट नं.१९ मुस्लीमपूरा,
मालेगांव जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,इगतपुरी,जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,इगतपुरी,जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. साजिद अहमद निसार अहमद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०६.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि. २०.०२.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली.

१) श्री.अन्सारी नुरून्नीसा अब्दूल रशिद यांना प्र.शि.भ.नि.नि.क्र.१७१५९ यांचे दि.१.१.१९९६ ते दि.३०.०९.१९९८ पर्यंत ५ वा वेतन आयोगाची रक्कम फंडात जमा केली किंवा कसे?

२) श्री. अन्सारी यांची ५ वा वेतन आयोग फरक शासन नियमानुसार फेब्रुवारी १९९९ मध्ये जे कर्मचारी ज्या गटात कार्यरत आहेत त्या गटाने अदा करावयाचे शासन निर्णय आहेत त्यानुसार फरक फंडात जमा न करण्याचे कारणे काय?

३) श्री. अन्सारी यांची बदली दि.२२.०६.२००१ रोजी पंचायत समिती इगतपुरी येथून महानगरपालिका शिक्षण मंडळ मालेगांव येथे झाली आहे. परंतु त्यांना आजपर्यंत फरक न मिळण्याची कारणे काय ?

४) श्री. अन्सारी यांच्या सेवा पुस्तकात खाडाखोड का करण्यात आली?

५) श्री. अन्सारी यांची भविष्य निर्वाह निधी मध्ये रक्कम आजपर्यंत वर्ग न करण्याची कारण काय ? इत्यादी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकार यांचे दि.१.१.१९९६ ते दि.३०.०९.१९९८ पर्यंतच्या ५ व्या वेतन आयोगाच्या फरक बील तयार करून फरकाच्या रकमेची तरतूद तात्काळ प्राप्त होण्याकरिता प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद नाशिक यांना सादर करत आहेत प्रस्तावास मंजूरी मिळताच रक्कम भविष्य निर्वाह निधी क्र.१७१५९ मध्ये जमा करण्याची कार्यवाही करण्यात येईल. खाते वर्ग होण्याकरिता सविस्तर प्रस्ताव मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हापरिषद नाशिक यांना सादर करण्यात येईल. सदर कार्यवाही दीड महिन्यात करण्याकरिता मुदतवाढ मिळावी अशी जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती इगतपुरी यांना लेखी अहवाल सादर करून विनंती केली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी आश्वासित केल्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी ४५ दिवसाचे आत कार्यवाही करून अपीलकारास माहिती द्यावी.

<u>आदेश</u>

अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १३.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र. मुमाआ २००९/अपील क्र. ४३०१,४३०२ व ४४५३

श्री. पीटर एम.डिमेलो, ------ **अपीलकर्ता**
५०२, बी, रिझवी महल को.हौ.सोसायटी
१०५वॉटरफिल्ड रोड, बांद्रा (प)
मुंबई ४०० ०५०

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३), यांचे कार्यालय,
गृहनिर्माण भवन, तळ मजला,कक्ष क्र. ६९,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग मुंबई, सहकार बाजार,
४ था मजला, बांद्रा (प) मुंबई ४०० ०५०

- वि वे च न -

अपीलकार श्री. पीटर एम.डिमेलो यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन रिझवी महल को.ऑ.हौ.सोसायटी लि.बांद्रा (प) मुंबई या संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) अन्वये दि. २४.०५.२००६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्याबाबत पुढील कार्यवाही झाली याबाबतची अनुषंगीक माहिती मागितली होती. अशाप्रकारची कारणे दाखवा नोटीस दिलेली नाही. त्यामुळे पत्र देण्याचा प्रश्न येत नाही.

संस्थेबाबत मागणी केलेली कागदपत्र कार्यालया समक्ष येऊन प्राप्त करून घ्यावीत असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कळविले आहे. प्रश्नार्थक स्वरूपात मागितलेली माहिती, माहितीच्या अधिकारात येत नाही. मोघम स्वरूपाची माहिती देणे शक्य नाही अनुक्रमे दि.१९.०६.२००८ व दि.३०.७.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. संस्थेच्या कामकाजाबाबत दि. २१.११.२००८ च्या पत्रान्वये १ ते ४ मुद्दे उपस्थित करुन तक्रार केली आहे. अशा प्रकारची प्रश्नार्थक माहिती, माहितीच्या अधिकारात येत नाही असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल केले.

अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केले. त्यानंतर माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी निर्देश देऊनही अपीलकारास माहिती दिलेली नाही. यास्तव जन माहिती अधिकाऱ्यांविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करू नये? याबाबत लेखी अहवाल सादर करण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांना आयोगाच्या दि. २३.०४.२००९ च्या पत्राने कळविण्यात आले होते.

जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाकडे दि.२६.५.२००९ व दि. २५.६.२००९ रोजी लेखी अहवाल सादर केला आहे. श्री. पीटर डिमेलो व संस्था यांचेमध्ये पैशसंबंधीचा वाद आहे. याबाबत कार्यालयाने संस्थेस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९-२ अे अन्वये दि. २३.४.२००९ रोजी निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशामध्ये श्री.डिमेलो यांचेवर आकारण्यात आलेल्या रक्कमा वगळण्याबाबत नमूद केलेले आहे. संस्थेने या कार्यालयाचे निर्देशाचे पालन केले नसल्याने कार्यालयाने पुन्हा संस्थेवर महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० ७८ (१) अन्वये संस्थेवर प्रशासक नेमणेबाबत का?कारवाई करण्यात येऊ नये. याबाबतची कारणे दाखवा नोटीस संस्थेवर दि. ३१.६.२००९ रोजी बजावण्यात आलेली आहे. याबाबतची सुनावणी चालू आहे असा जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगास अहवाल सादर केला आहे. यावरून असे दिसून येते की, अपीलकाराच्या सदर संस्थेच्या तक्रारीसंदर्भात जन माहिती अधिकाऱ्यांकडून आवश्यकती कारवाई करण्यात येत आहे असे दिसून येते. अपीलकाराने मागणी केलेल्या इतर मुद्यांची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली असल्याचे दिसते एम-२० बॉन्डच्या प्रत कार्यालयात उपलब्ध नाहीत संस्थेकडून घ्याव्यात असे जन महिती अधिकाऱ्याने अपीलकारास कळविले असल्याचे दिसते बंधपत्रे ही संस्थेतच असतात. संस्था अपीलकारास

माहिती देत नाही. म्हणून अपीलकाराने जन माहिती अधिकाऱ्यांकडे मागणी केली असल्याचे दिसते. जन माहिती अधिकाऱ्यांनी एम-२० च्या प्रती संस्थेकडून मिळतील अशी व्यवस्था सहकारी कायदा १९६० अंतर्गत करावी.

आदेश

सबब अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १३.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/निरंक /अपील क्र.४४५४/०२

श्री.जगदीश माधवदास अहुजा, ------ अपीलकर्ता
लिटल हट, प्लॉट नं. ५०१,५ वा मजला,
महात्मा फुले नगर, पवननगर,
सिडको, नविन नाशिक-८
विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
पोलीस उप आयुक्त (परिमंडळ), नाशिक शहर, नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-२,नाशिक शहर,नाशिक

सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-२,नाशिक शहर,नाशिक
व्दितीय अपील (सीआर ६७७) यांच्या विरुध्द आहे. मात्र सुनावणी सूचना त्यांना पाठविलेली नव्हती.

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : १५.०४.२००८

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक:
२५.०४.२००८,८.५.२००८,१६.५.२००८,२९.११.२००८,
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. :२७.०५.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : निरंक माहिती देण्याबाबत तोंडी आदेश दिले होते. अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.२३.०६.२००९ च्या अहवालात नमूद केले आहे.

व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २५.०७.२००८ (औरंगाबाद खंडपीठाकडे व्दितीय अपील दाखल केले)

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

अंबड पोलीस स्टेशन मधील कार्यरत असलेले पोलीस कॉन्स्टेबल, रमेश सोनवणे यांनी कार्यकालात कोणकोणत्या पोलीस स्टेशनला काम केले, प्रत्येक बदलीबाबत माहिती, त्यांचे विषयी नागरिक, राजकीय पक्ष याजकडून प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत, त्यांच्या बदलीसाठी सामाजिक राजकीय पक्षाकडून शिफारस केली असल्यास त्याबाबतची माहिती, शासकीय सेवेतील कार्यकालासंबंधी माहिती मागितली.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

मागितलेली माहिती तयार असून अतिरिक्त शुल्क रुपये ७/- प्रदान करुन माहिती घेऊन जावी.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

अपील अर्ज दि.२७.०५.२००८ हा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

सुनावणीचा दिनांक : २४.०६.२००९ (नियोजन हॉल,जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत)
अपिलार्थी : उपस्थित
उत्तरवादी (१) : उपस्थित
उत्तरवादी (२) : उपस्थित
उत्तरवादी (३) : अनुपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

मात्र अपीलार्थीचे म्हणणे असे की त्यांनी अपील हे औरंगाबाद माहिती आयोगाच्या कार्यालयात केले आहे तेव्हा हे अपील त्याच आयुक्तांनी चालवावे. सध्या नाशिक विभागाचा कार्यभार औरंगाबाद राज्य माहिती आयुक्तांकडे आहे. औरंगाबाद विभागाचा कार्यभार फार अवजड असल्याने नाशिक विभागाच्या कांही अपीलांची सुनावणी स्वत: मुख्य माहिती आयुक्त सर्वांची सोय व्हावी, अपीलार्थी व सरकारी अधिकारी यांचा प्रवास खर्च व वेळ वाचावा म्हणून नाशिकला येऊन सुनावणी घेत असतात. या विशेष सुनावणीत अपीलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पूर्ण संधी देण्यात येते. निकाल आपल्याच बाजूने लागावा अशी मात्र अपेक्षा ठेवणे रास्त नाही. त्यामुळे अपीलार्थीची विनंती अमान्य करण्यात आली.

अपिलार्थी यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडून अनवधानाने माहिती विहित वेळेत दिलेली नाही, असे लक्षात येताच दि. २९.११.२००८ रोजीच्या जैत्राने जन माहिती

अधिकारी क्र.. कडून विनामूल्य माहिती पुरविण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी उक्त अधिनियमाच्या कलम १९ (६) मधील तरतूदींचा भंग केला आहे. मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने सर्वसाधारणत: कलम ११ मधील तरतूदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतु जनहिताचा मुद्दा लक्षात घेता माहिती देण्याचा निर्णय योग्यच म्हणावा लागेल.

आदेश

अपिलार्थीस विनामुल्य माहिती देण्यात आलेली आहे त्यामुळे दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांना भविष्यात प्रथम अपिलावर विहित कालावधीत अपिलार्थीस सुनावणीची संधी देऊन आदेश पारित करण्याबाबत कटाक्षाने काळजी घेण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे तसेच सर्व पोलीस स्टेशनला कळवून माहिती घेण्यास वेळ लागला त्यामुळे अर्जदारास माहिती देण्यास वेळ लागला त्यामुळे शास्तीचे आदेश नाही.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,दिनांक: १५.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/४०३६३/अपील क्र.४४७५/०२

श्रीमती कुंदन अहया, **------ अपीलकर्ता**
ए/६०२,गोकूळ नगरी १,
ऑफ हायवे, कांदिवली (पूर्व)
मुंबई ४०० १०१

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था३,गृह निर्माण भवन,
तळ मजला,कक्ष क्र.६९,बांद्रा (पूर्व),
मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी तथा
सहकारी संस्था,आर विभाग,३१५,अे/१ इमारत
३ रा माळा, ट्रक टर्मिनल,आरटीओ ऑफिस जवळ,
वडाळा (पूर्व), मुंबई ४०० ०३७

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: १.१२.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: १८.१२.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	: २३.०१.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	: २४.०२.२००९
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	: १३.०४.२००९
सुनावणीचा दिनांक	: १७.०७.२००९
अपिलार्थी	: उपस्थित
जन माहिती अधिकारी	: उपस्थित
अपिलीय अधिकारी	: उपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

गोकुळ नगरी १ को.हौ.सो. या संस्थेतील कार व टु व्हिलर पार्किंग संबंधातील माहितीची मागणी केली आहे.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे ती संस्थेकडून प्राप्त करून घेण्याबाबत कळविले. त्यांनी माहिती देण्याबाबत संबंधित संस्थेला कळवून अर्जदारास माहिती उपलब्ध करून दिली आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

विचारणा केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांचे अभिलेख कक्षातील नसून सदरची माहिती संस्था स्तरावरील असल्याचे दिसून आल्याने अपील फेटाळण्यात आले.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

जन माहिती अधिकारी यांनी निर्देश दिल्या नंतर अर्जदारास दिनांक २९.१२.२००८ रोजीच्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. मात्र त्या माहितीने अर्जदाराचे समाधान झालेले दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे अर्जदाराने संस्था पातळीवरची माहिती ही सोसायटी कडूनच घ्यावी तर अर्जदाराचा जो माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) येथे माहितीची व्याख्या दिलेली आहे त्यात "माहिती" याचा अर्थ त्यात्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधीत माहिती यावर आहे.

मुंबई हायकोर्टाच्या नागपूर बेंचने स्टिपिटेशन नंबर ५६६६/२०७ (डॉ. पंजाबराव देशमूख अर्बन को.बँक वर्सेस माहिती आयुक्त नागपूर तथा सहकारी आयुक्त) मध्ये १३.०१.२००९ रोजी असा निर्णय दिलेला आहे की, सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार लागू होत नाही आणि या संस्था माहितीचा अधिकार कायद्यान्वये "जन प्राधिकरणे" या संज्ञेत येत नाही.

तसेच मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद बेंचने स्टिपिटेशन नंबर १३०४/२००८(जळगांव जिल्हा अर्बन कोऑपरेटीव्ह बँक्स असोसिएशन लिमीटेड"जळगांव वर्सेस महाराष्ट्र सरकार) मध्ये १७.०२.२००९ रोजी अंतरिम आदेश पारित केलेले आहेत. त्यात सहकारी संस्था, अर्बन बँका आणि पत पेढया यांच्या बाबतीत फक्त बॅलन्सशीट आणि प्रॉफीट आणि लॉस अकाउंट्स एवढे सोडून इतर कोणतीही माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये देण्यात येऊ नये. या पिटीशनचा जेव्हा अंतिम निकाल लागेल त्यावेळी खाजगी निकायाची माहिती

ॲक्सेस करण्यासंबंधी निश्चितच निर्देश मिळतील. मात्र सहकारी कायद्या अंतर्गत ही माहिती मिळविण्याचा अर्जदाराचा हक्क अबाधीत राहतोच.

अर्जदारास संस्थेनी जी माहिती दिलेली आहे त्या माहिती विषयी त्यांची काही तक्रारअसेल तर त्यांनी सहकारी कायदा, १९६० अंतर्गत उप निबंधकांकडे करावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

अर्जदाराने हवे तर वर दर्शविल्याप्रमाणे कारवाई करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १३.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ २००९/ तक्रार क्रं. ८३०

श्री.शशिकांत बाळकृष्ण पोतनीस **----- तक्रारकर्ता**
४-सी, अंबर प्रसाद, वांद्रे रेक्लमेंशन,
मंबई ५०

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
निवासी नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय ता.वेटले,
जि.पुणे

- वि वे च न -

अर्जदार श्री. पोतनीस यांनी जिल्हाधिकारी पुणे यांच्या अखत्यारीत असलेल्या वेल्हे तालुक्यातील घनिष्ठ रुळे गावातील जमीन मे.हॅपी होम लँडस्कप प्रा.लि. या पुणेस्थित खाजगी कंपनी कडून रु.२,५२,०००/- येवढया रकमेत खरेदीचा व्यवहार केला. तथापि, सदर कराराचा भंग झाल्याने उक्त रकमेची व्याजासह परत मिळण्याची मागणी केली असता या कंपनीने त्यांच्या मागणीस प्रतिसाद दिला नाही. या परिस्थितीत अर्जदाराने ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे (पुणे) तक्रार अर्ज दाखल कला. कालांतराने मंचासमोर सनावणी अंती आदेश पारित केले.

सदर आदेशानुसार जिल्हाधिकारी,पुणे यांनी महसूल कायद्यान्वये रकमेची वसुली करुन प्रगती अहवाल मंचास कळविण्याचे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी पुणे यांनी सदर आदेशाच्या अंमलबजावणीला विलंब केल्याने अर्जदार श्री. पोतनीस यांनी माहितीच्या अधिकारात दि.१९.९.२००७ रोजी निहित नमुन्यात अर्ज दाखल केला. तथापि, जिल्हाधिकारी पुणे यांनी हा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी संबंधीत नायब तहसिलदार,ता. वेल्हे यांचेकडे वर्ग केला असल्याचे अर्जदारास कळविले.

नायब तहसिलदार तालुका वेल्हे यांनी उक्त प्रकरणी कार्यवाहीसाठी बराच कालावधी घेतला व कनिष्ठ अधिकारी यांचेकडून माहितीचा अहवाल प्राप्त करण्यात येत असल्याचे कळविले.

या प्रकाराने व्यथील असतांना पुनश्च नायब तहसीलदार वेल्हे यांनी त्यांच्या दि.२३.०५.२००८ च्या पत्रान्वये नवीन अर्ज सादर करण्याची पत्र अर्जदारास पाठविले. अर्जदाराने त्या मागणीनुसार पुनश्च विहित नमुण्यात अर्ज दि.१६.०१.२००७ रोजी दाखल केला. तथापि संबंधीत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार वेल्हे यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतूदींचे पालन न करता हे प्रकरण प्रलंबित ठेवले आहे.

अर्जदाराच्या माहिती अधिकार अधिनियमाखाली केलेल्या अर्जाना समाधानकारक उत्तर मिळाले नाही अशी आयोगाकडे १०.०२.२००९ रोजी तक्रार केलेली आहे. याबाबतची सुनावणी दि.१७.०८.२००९ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्यावेळी तक्रार कर्ते तसेच शासकीय माहिती अधिकारी उपस्थित होते.

शासकीय माहिती अधिकारी यांनी पुढील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

"उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सविनय सादर की, पुणे जिल्हा ग्राहकमंच यांचे कार्यालयाकडील पत्रा क्र. पुजिम/प्रकरणे/कलम२५/२१५/०७ दि.१२.०२.२००७ नुसार हॅपी होम लँड स्केप प्रा.लि. १०१९ दिप बंगला शिवाजीनगर यांचेकडुन रक्कम रु.३०३५३०/- एवढी रक्कम वसुल करणेबाबत कळविले होते.

संबंधित थकबाकीदार यांना नोटीस क्र.१,२व३ बजाविल्या असुन अद्याप थकित असलेली रक्कम संबंधितास अदा न केलेने त्यांचे स्थावर/जंगम मालमत्तेवरीती बोजा चढविणे कामी कामगार तलाठी व मंडलाधिकारी यांजकडून स्थावर/जंगम मालमत्तेचो शोध घेणे साठीचा मागितला आहे. या तालुक्यामध्ये थकबाकीदार यांचे नाव स्थावर/जंगम मालमत्ता आढळुन येत नाही त्यामुळे सदर अहवालानुसार थकबाकीत असणारी रक्कम वसुल करता येत नाही." ही परिस्थिती मंच व अर्जदार या दोघांनाही उत्तरात कळविण्यात आली आहे.

स्थावर मालमत्ता सापडते काय यासंबंधी शोध घेण्यात येत आहे व याबाबत अर्जदाराने सुध्दा त्यांचेकडे काही माहिती असल्यास ती द्यावी असे ही जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी सांगितले.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १७.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ अपील क्रं. ४५१३/२००९

श्री.पुष्पराज पंढरीनाथ शिरधनकर **----- अपीलकर्ता**
प्लॅट नं.१०,बिल्डींग नं.११, दुसरा माळा, इंडीयन,
एअर लाईन बिल्डींग, चिराग हॉटेल समोर,सावसकर मार्ग,
विरअर पूर्व, पिन क्र.४०१ ३०३

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,
हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प.) मुंबई

जन माहिती अधिकारी तथा
वसाहत अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,
हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प.) मुंबई

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ०२.०४.२००९

सुनावणीचा दिनांक: १७.०८.२००९

अपिलार्थी : अनुपस्थित

जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी :उपस्थित

अर्जदारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, दादर.न.भू. क्र.६१६ (पै) ०१.०१.१९९३ पासून आजतागायत मागणी नोंदवहीच्या समाविष्ट केलेल्या हस्तांतरण आणि रुपांतरण सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित नक्कल प्रती पाहिजे होत्या.

प्रथम अपिलीय अधिकारी यानी सुनावणीच्या वेळेला अर्जदारास आवश्यक असणारी मोजक्या झोपडी धारकांची नोंद असलेल्या मागणी नोंदवहीची प्रमाणित नक्कल प्रत देण्याबाबत आदेश देण्यात आले होते. त्यानुसार झोपडी धारकांची यादी अर्जदाराला १७.०३.२००९ रोजी वसाहत अधिकारी यांनी दिलेली आहे. सुनावणीच्या वेळेला रेकॉर्डप्रमाणे फोटो कॉपीज करणे हे क्लिष्ट व जिकरीचे आहे असे सांगितले, त्यामुळे जन माहिती अधिकारी व अर्जदार यांनी एकत्र चर्चा करुन आयोगास असे सांगितले की, अर्जदार श्री.शिरधनकर यांच्या हस्तांतरण प्रकरणातील माहिती

मागणी नोंदवही वरील नोंद असलेल्या उपलब्ध माहिती टिपून घेण्यास जन माहिती अधिकारी स्वत: अर्जदारास मदत करुन त्वरित देण्याची व्यवस्था करतील. याची अंमलबजावणी उशिरात उशीरा १० दिवसात करण्यात यावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १७.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ अपील क्रं. ४५१३/२००९

श्री.पुष्पराज पंढरीनाथ शिरधनकर **----- अपीलकर्ता**
प्लॅट नं.१०,बिल्डींग नं.११, दुसरा माळा, इंडीयन,
एअर लाईन बिल्डींग, चिराग हॉटेल समोर,सावसकर मार्ग,
विरअर पूर्व, पिन क्र.४०१ ३०३

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,
हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प.) मुंबई

जन माहिती अधिकारी तथा
वसाहत अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,
हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प.) मुंबई

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ०२.०४.२००९

सुनावणीचा दिनांक: १७.०८.२००९

अपिलार्थी : अनुपस्थित

जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी :उपस्थित

अर्जदारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, दादर.न.भू. क्र.६१६ (पै) ०१.०१.१९९३ पासून आजतागायत मागणी नोंदवहीच्या समाविष्ट केलेल्या हस्तांतरण आणि रपांतरण सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित नक्कल प्रती पाहिजे होत्या.

प्रथम अपिलीय अधिकारी यानी सुनावणीच्या वेळेला अर्जदारास आवश्यक असणारी मोजक्या झोपडी धारकांची नोंद असलेल्या मागणी नोंदवहीची प्रमाणित नक्कल प्रत देण्याबाबत आदेश देण्यात आले होते. त्यानुसार झोपडी धारकांची यादी अर्जदाराला १७.०३.२००९ रोजी वसाहत अधिकारी यांनी दिलेली आहे. सुनावणीच्या वेळेला रेकॉडप्रमाणे फोटो कॉपीज करणे हे क्लिष्ट व जिकरीचे आहे असे सांगितले, त्यामुळे जन माहिती अधिकारी व अर्जदार यांनी एकत्र चर्चा करुन आयोगास असे सांगितलि की, अर्जदार श्री.शिरधनकर यांच्या हस्तांतरण प्रकरणातील माहिती

मागणी नोंदवही वरील नोंद असलेल्या उपलब्ध माहिती टिपून घेण्यास जन महिती अधिकारी स्वत: मदत करुन त्वरित देण्याची व्यवस्था करतील. याची अंमलबजावणी उशिरात उशीरा १५ दिवसात करण्यात यावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १७.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्रं. २००९/४३७७/०२

श्रीमती कुंदन के.अहया,
अे-६०२, गोकुलनगरी -१, ऑफ हायवे,
कांदिवली (पूर्व)
मुंबई ४०० १०१

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी, **------- उत्तरवादी**
मुद्रांक जिल्हाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय,
एम.एम.आर.डी.ए. इमारत, १ ला मजला,
बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी,
मुद्रांक जिल्हाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय,
एम.एम.आर.डी.ए. इमारत, १ ला मजला,
बांद्रा मुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ००५

- वि वे च न -

दि.३०.०५.२००९ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिले होते.

अर्जदाराचा अर्ज अशा रितीने अपील क्र.४३७७/२००९ मध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०१.२००९ रोजी पाठविला गेल्यानंतर त्यांना मिळालेल्या तारखेपासून एका महिन्याच्या आत ही माहिती देणे आवश्यक होते. जर हा अर्ज दि. १.०२.२००९ रोजी दुय्यम निबंधक, मुंबई उपनगर बांद्रा कार्यालयास प्राप्त झाला असे जर गृहीत धरले तरी दिलेल्या माहितीचा दि. ९.०३.२००९ रोजी दर्शविण्यांत आलेला आहे व अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांना प्रत्यक्षात ही माहिती दि. २८ मे २००९ रोजी प्राप्त झालेली आहे. याबाबतीत माहिती देण्यास झालेला विलंब व अर्जदारास लिहिलेल्या पत्राचा दिनांक व त्यांना प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या दिनांकाची अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणेच तारीख यातील दिर्घ अंतर लक्षात घेता झालेल्या विलंबाबद्दल अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्ती का लादण्यांत येऊ नये याचा लेखी तसेच प्रत्यक्ष खुलासा दुय्यम निबंधक व प्रशासनीक अधिकारी,उपनगर

जिल्हा,बांद्रा यांनी दि. २४.०६.२००९ रोजी सकाळी११.०० वाजता आयोगाच्या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन सादर करावा.

त्यानुसार दुय्यम निबंधक व प्रशासकिय अधिकारी यांनी आयोगापुढे पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला.

१. श्री.कुंदन अहया यांचा केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम सन २००५ अंतर्गत दि.२४.१२.२००८ रोजीचा मुद्रांक जिल्हाधिकारी,बोरीवली यांचेकडे अर्ज प्राप्त दि. २४.१२.२००८

२. सदर अर्जाबाबत मुद्रांक जिल्हाधिकारी,बोरीवली यांचेकडून या कार्यालयास केवळ पत्र प्राप्त दि. २३.०१.२००९ (सदर पत्रासोबत अर्ज जोडलेला नाही.)

३. सबब या कार्यालयाने मुद्रांक जिल्हाधिकारी,बोरीवली यांना दि.५.२.२००९ चे पत्राव्दारे अर्ज उपलब्ध करणेबाबत अवगत केले.

४. मुद्रांक जिल्हाधिकारी,बोरीवली यांचेकडून पत्र दि.१२.०२.२००९ अन्वये अर्जाची छायांकित प्रत या कार्यालयास प्राप्त झाली.

यावरुन असे दिसून येते की, श्री.अहया यांच्या दि.२४.१२.२००८ रोजीचा मुद्रांक जिल्हाधिकारी बोरीवली यांनी दि.२८.१२.२००८ रोजी प्राप्त केलेला केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम सन २००५ अंतर्गतचा अर्ज या कार्यालयास दि. १२.०२.२००९ रोजी कार्यवाहीसाठी प्राप्त झाला.

५. श्री.अहया यांचा केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम सन २००५ अंतर्गत दुसरा अर्ज दि. ५.०२.२००९ मुद्रांक जिल्हाधिकारी,बोरीवली यांचेकडे प्राप्त झाला.

६. सदर अर्ज मुद्रांक जिल्हाधिकारी,बोरीवली यांचेकडून पत्र दि.६.०३.२००९ अन्वये या कार्यालयास प्राप्त झाला.

७. केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम सन २००५ अंतर्गत श्री.अहया यांच्या अर्ज दि. २४.१२.२००८ (पत्र प्राप्त दि.१२.०२.२००९) चे उत्तरादाखल म्हणुन या कार्यालयाने दि.९.०३.२००९ अन्वये मुद्देनिहाय माहिती पोस्टाव्दारे पाठविली श्री. अहया यांचा दुसरा अर्ज दि.५.०२.२००९ मधील मुद्दे हे त्यांच्या अर्ज दि.२४.१२.२००८ मधील मुद्यांमध्ये समाविष्ट असलेने सदर अर्जाला उत्तरादाखल देणेची आवश्यकता या कार्यालयास वाटली नाही. सदरचे उत्तरादाखल पक्षकारास पाठवून देखील पक्षकाराने या कार्यालयास २८.०५.२००९ रोजी समक्ष संपर्क साधला असता उत्तरादाखल पत्राची प्रत हाती देणेत आली, व त्याच रोजी श्री. अहया यांचा दस्त क्र. पीबदर २/१७६/९७ बाबत अभययोजना सन २००८ अंतर्गत न्युन आकारीत मुद्रांक शुल्क व नोंदणी फी वसूलीकरीता पोस्टाने पाठविलेल्या दि.२०.१२.२००८ रोजीच्या नोटीसीची प्रत

देखील देणेत आली व देय मुद्रांक शुल्क व नोंदणी फी अदा करणेबाबत अवगत करणेत आले.तदनंतर या कार्यालयाने दि.१०.०६.२००९ चे पत्रान्वये पक्षकारास सुनावणी आयोजित केली आहे.अद्यापर्यंत सदर पक्षकाराने न्युन आकारीत मुद्रांक शुल्क व नोंदणी फी ही शासकीय रक्कम अदा केलेली नाही.

उपरोक्त नमूद केलेली वस्तुस्थिती लक्षात घेता या कार्यालयाने केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम सन २००५ मध्ये विहित केलेल्या मुदतीतच श्री. अहया यांच्या अर्जावर कार्यवाही केलेली आहे. सबब हे कार्यालय केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम सन २००५ अंतर्गत कोठल्याही शास्तीस लागू होत नाही अशी या कार्यालयाची धारणा आहे."

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की अर्जदाराचा अर्ज हा दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी मुंबई उप नगर जिल्हा यांना दि. १२.०२.२००९ रोजी प्राप्त झाला व त्यांना त्याचे उत्तर दि. ९.०३.२००९ रोजी अर्जदारास मुद्दे निहाय पोस्टाने पाठविलेले आहे. ही पोस्टाने पाठविलेली माहिती अर्जदारास मिळालेली होती व ते जेव्हा प्रत्यक्ष चौकशी करावयास गेले होते त्या वेळेला याच माहितीची प्रत दि.२८.०५.२००९ रोजी त्यांना देण्यात आली.

अर्जदाराच्या मुळ अर्जाचे अवलोकन केले असता अर्जदाराने माहिती पोस्टाने पाठवावी असे लिहीलेले आहे व त्यानुसार अर्जदारास माहिती पोस्टाने पुरविली असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे व त्याच्या समर्थनार्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील पोस्टाच्या जावक नोंदवहीतील नोंद सादर केलेल्या आहेत आणि नोंदीची प्रत अर्जदारास सुध्दा देण्यात आलेली आहे. साध्या पोस्टाने जेव्हा प्रती पाठविल्या जातात तेव्हा त्याचा कुठचाही पुरावा राहत नाही हे खरेच. जर अर्जदाराने रजिष्टर पोास्टाने माहिती पुरवावी असे विवक्षितपणे लिहिले असते तर मात्र तेवढे शुल्क घेऊन अर्जदारास ती माहिती रजिष्टर पोस्टाने पाठविणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक असते व जावक रजिष्टरचा त्याचा पुरावा पडताळून पाहता आला असता. जावक रजिष्टर मधील नोंद पाहिली असता सदरील पत्र अर्जदारास दि.९.०३.२००९ रोजी पाठविण्यात आलेले आहे असे गृहित धरावे लागेल. कारण याच पृष्ठावर दि.२.०३.२००९ ते १२.०३.२००९ पर्यंत पोस्टाने ज्यांना ज्यांना पत्रे पाठविलेली आहेत त्यांची नोंद घेतलेली आढळून येते. मध्येच एखादी नोंद घुसडलेली असेही सकृतदर्शनी दिसत नाही. त्यामुळे अर्जदारास माहिती देण्यास दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या कार्यालयाने उशीर लावलेला नाही या निष्कर्शावर आयोग आलेले आहे.

मात्र याच अनुषंगिक हेही सिध्द झाले आहे की, मुद्रांक जिल्हाधिकारी बोरीवली या कार्यालयाने दि.२३.०१.२००९ रोजीच्या पत्रासोबत अर्जदाराचा मुळ अर्ज पाठविलेला नव्हता व पत्र व्यवहार झाल्या नंतर अतिमत: त्या अर्जाची प्रत दि.१२.०२.२००९ रोजी प्राप्त झाली म्हणजेच आधीच संबंधीत जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज पाठविण्यास उशीर झाला होता व नंतर जोडणीच्या हलगर्जीपणामुळे आणखीन उशीर झाला आहे. या अतिरिक्त

मुद्यांबाबत विद्यमान मुद्रांक जिल्हाधिकारी, बोरीवली यांनी या हलगर्जीपणास कारणीभूत असणाऱ्याचा खुलासा आयोगास दि.१० सप्टेंबर २००९ पर्यंत आयोगाचे सचिव यांना आणून द्यावा.

आदेश

मुद्रांक जिल्हाधिकारी, बोरीवली यांनी वर निर्देशील्याप्रमाणे खुलासा १० सप्टेंबर २००९ पर्यंत सादर करावा.

तसेच सदर आदेशाची प्रत दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,कौटुंबिक न्यायालय इमारत, तळमजला,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे (पूर्व),मुंबई ३ ५१ यांना पाठविण्यात यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/नाशिक/अपील क्र./सीआर. ७६५/०२

श्री.गोविंद पर्वतराव मोरे, **------ अपीलकर्ता**
रेश पर्व, आनंद नगर, नववसाहत,सोयगांव,
ता.मालेगांव,जि. नाशिक

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **-------- उत्तरवादी**
अध्यक्ष, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ,
जळगांव (नि),ता.मालेगांव, जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
सेक्रेटरी, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ,
जळगांव (नि),ता.मालेगांव, जि.नाशिक

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : १.०८.२००७
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : -
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. : ०५.०९.२००७
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : -
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २७.०९.२००७ चे अपील दि.१.१०.२००७ रोजी दाखल केले.

सुनावणीचा दिनांक : २५.०६.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेने श्री.रा.मु.आंबेकर,तसेच सन २००८ मध्ये झालेल्या सर्वसाधारण सभेबाबतची माहिती,संस्थेच्या घटनेच्या कलम १७ (क) बाबतची माहिती.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

उपलब्ध कागदपत्रावरून जन माहिती अधिकाऱ्याने विहित मुदतीमध्ये उत्तर दिलेले नाही असे दिसते.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

उपलब्ध कागदपत्रावरून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीमध्ये आदेश पारित केलेला नाही, असे दिसते.

सुनावणीचे स्थळ: नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक,(विशेष अपील निर्गत कार्यक्रम)

अपिलार्थी : उपस्थित

उत्तरवादी (१) : उपस्थित

उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

माहिती अर्जाला उत्तर देण्यास तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीस/निर्णयास विहित मुदतीपेक्षा विलंब का झाला याबाबतचे स्पष्टीकरण देणे/अनुक्रमे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून अपेक्षित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना रजिस्टर ए.डी. मार्फत पाठविलेले प्रथम अपील देखील त्यांनी स्विकारले नसल्याबाबत अपिलार्थीने अपिलासोबत जो पूरावा जोडला आहे त्याबाबत प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कोणताही खूलासा आयोगासमोर सादर केलेला नाही.

आदेश

अपिलार्थीच्या व्दितीय अपीलाची प्रत (सहपत्रांसह) प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावी. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२०.१२.२००७ च्या प्रथम अपिलावर एक महिन्याच्या आत अपिलार्थीस सुनावणीची संधी देऊन स्वयंस्पष्ट आदेश पारित करावेत व त्याची प्रत मा या आदेशाच्या प्रतीसह संदर्भासाठी पाठवावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती अर्ज तसेच प्रथम अपील अर्ज स्विकारण्याबाबत यापुढे हयगय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/नाशिक/अपील क्र./सीआर. ७६७/०२

श्री.गोविंद पर्वतराव मोरे, **------ अपीलकर्ता**
रेश पर्व, आनंद नगर, नववसाहत,सोयगांव,
ता.मालेगांव,जि. नाशिक

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
अध्यक्ष, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ,
जळगांव (नि),ता.मालेगांव, जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
सेक्रेटरी, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ,
जळगांव (नि),ता.मालेगांव, जि.नाशिक

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: २०.११.२००७
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: -
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	: २०.१२.२००७
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	: -
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	: दि.२९.०२२००८ चे अपील दि.५.०३.२००८ रोजी दाखल केले.
सुनावणीचा दिनांक	: २५.०६.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

संस्थेच्या सन २००५-०६ तसेच २००६-०७ च्या सर्वसाधारण सभांबाबतची माहिती,संस्थेने दि.१.०७.२००७ पासून नेमलेले श्री.

आर.एम.नरोटे,श्री.रा.मू.आंबेकर,श्री.एम.डी.पाटील व श्री.गायकवाड यांच्या नेमणूकांबाबतची माहिती.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

दिलेल्या कागदपत्रावरून जन माहिती अधिकाऱ्याने विहित मुदतीमध्ये उत्तर दिलेले नाही असे दिसते.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

उपलब्ध कागदपत्रावरून प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी विहित मुदतीमध्ये आदेश पारित केलेला नाही, असे दिसते.

सुनावणीचे स्थळ: नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक,(विशेष अपील निर्गत कार्यक्रम)

अपिलार्थी : उपस्थित
उत्तरवादी (१) : उपस्थित
उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

माहिती अर्जाला उत्तर देण्यास तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीस/निर्णयास विहित मुदतीपेक्षा विलंब का झाला याबाबतचे स्पष्टीकरण अनुक्रमे जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून अपेक्षित होते. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधीकारी यांनी अनुक्रमे माहिती अर्ज व प्रथम अपील स्विकारले नसल्याने त्यांनी माहिती देण्यास नकार दिल्याचे अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलात जे नमूद केले आहे त्याबाबतचा खूलासा त्यांच्याकडून आयोगाकडे सादर केलेला नाही.

आदेश

अपिलार्थीच्या व्दितीय अपीलाची प्रत (सहपत्रांसह) प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावी. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२०.१२.२००७ च्या प्रथम अपिलावर एक महिन्याच्या आत अपिलार्थीस सुनावणीची संधी देऊन स्वयंस्पष्ट आदेश पारित करावेत व त्याची प्रत मा या आदेशाच्या प्रतीसह संदर्भासाठी पाठवावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती अर्ज तसेच प्रथम अपील अर्ज स्विकारण्याबाबत यापुढे हयगय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १८.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/नाशिक/अपील क्र./सीआर. ७६९/०२

श्री.गोविंद पर्वतराव मोरे, ------ अपीलकर्ता
रेश पर्व, आनंद नगर, नववसाहत,सोयगांव,
ता.मालेगांव,जि. नाशिक

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,नाशिक विभाग,
जानकी प्लाझा, १ ला मजला, नाशिक-पुणे रोड,
व्दारका बस स्टॉपजवळ, नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
सचिव, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ,
जळगांव (नि),ता.मालेगांव, जि.नाशिक

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : २०.०२.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : -
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. : २५.०३.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : २८.०४.२००८
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : दि.३१.०५.२००८ चे अपील दि.३.६.२००८ रोजी दाखल केले.

सुनावणीचा दिनांक : २५.०६.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सन २००७-०८ या वर्षात झालेल्या सभांच्या इतिवृत्ताच्या प्रती,सन २००७-०८ मध्ये झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताची, अजेंडाबाबतची माहिती,संस्थेच्या सर्व सभासदांची यादी,संस्थेच्या आजीव सदस्यांपैकी काही सदस्यांचे सदस्यत्व रद्द केल्याबाबत,संस्थेचे सचिव व अध्यक्ष कोणत्या अधिकारात संस्थेचे कामकाज हाताळतात इत्यादी माहिती.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

उपलब्ध कागदपत्रावरून कोणतीही माहिती दिली असल्याचे दिसून येत नाही.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

माहिती अधिकारी नेमून अपिलकारास योग्य ती माहिती एका महिन्याच्या आत पुरवावी.

सुनावणीचे स्थळ: नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक,(विशेष अपील निर्गत कार्यक्रम)

अपिलार्थी : उपस्थित

उत्तरवादी (१) : अनुपस्थित/तथापि संस्थेचे अध्यक्ष उपस्थित होते.

उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

अपिलार्थी यांनी संस्थेच्या अध्यक्षांकडे प्रथम अपील दाखल न करता ते सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक विभाग या प्राधिकरणाच्या प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे का दाखल केले तसेच ते त्यांनी कोणत्या अधिकारात निकाली काढले हे अनाकलनीय आहे.

आदेश

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे दाखल केलेल्या दि.२०.०२.२००८ च्या माहिती अर्जास अनुसरून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सदर आदेशाच्या प्रतीसह मला दि.१०.०९.२००९ पर्यंत सादर करावा.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/नाशिक/अपील क्र./सीआर. ७६८/०२

श्री.गोविंद पर्वतराव मोरे, **------ अपीलकर्ता**
रेश पर्व, आनंद नगर, नववसाहत,सोयगांव,
ता.मालेगांव,जि. नाशिक

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **-------- उत्तरवादी**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,नाशिक विभाग,
जानकी प्लाझा, १ ला मजला, नाशिक-पुणे रोड,
व्दारका बस स्टॉपजवळ, नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
सचिव, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ,
जळगांव (नि),ता.मालेगांव, जि.नाशिक

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : १७.०९.२००७
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : -
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. : २७.०३.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : २८.०४.२००८
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : दि.३१.०५.२००८ चे अपील दि.३.६.२००८ रोजी दाखल केले.

सुनावणीचा दिनांक : २५.०६.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

संस्थेच्या कार्यकारणी सभा व संस्थेच्या शाळेतील श्री. फस्पले जी.एस.यांच्या पर्यवेक्षक पक्षवरील नेमणूकीबाबत माहिती.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

उपलब्ध कागदपत्रावरून कोणतीही माहिती दिली नसल्याचे दिसते.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

संस्थेने माहिती अधिकारी नेमून अपिलकारास योग्य ती माहिती फक्त एम महिन्याच्या आत पुरवावी.

सुनावणीचे स्थळ: नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक,(विशेष अपील निर्गत कार्यक्रम)

अपिलार्थी : उपस्थित

उत्तरवादी (१) : अनुपस्थित/तथापि संस्थेचे अध्यक्ष उपस्थित होते.

उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

'नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जळगांव (नि), ता.मालेगांव, जि.नाशिक' या सार्वजनिक प्राधिकरणाचे सचिव हे जन माहिती अधिकारी असून त्यांच्याकडे दाखल केलेल्या माहिती अर्जांच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी यापूर्वी वरील सार्वजनिक प्राधिकरणाच्या अध्यक्षांकडे दि.५.०९.२००७ व दि.२०.१२.२००७ रोजी कलम १९८१ अन्वये प्रथल अपील केली असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. (नाशिक /अपिल /सीआर ७६५व सीआर७६७). असे असताना अपिलार्थी यांनी प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपील मात्र संस्थेच्या अध्यक्षांकडे न दाखल करता सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,नाशिक विभाग या प्राधिकरणाच्या प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे ते सुध्दा ५ महिन्यांपेक्षा जास्तीच्या विलंबाने का दाखल केले तसेच त्यांनी ते कोणत्या अधिकारात निकाली काढले हे अनाकलनीय आहे.

आदेश

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे दाखल केलेल्या दिनांक १७.०९.२००७ च्या माहिती अर्जास अनुसरून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सदर आदेशाच्या प्रतीसह मला दि.१०.०९.२००९ पर्यंत सादर करावा.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ २००९/ तक्रार क्रं. ४०४

श्री.शिवाजी दत्तू सुर्यवंशी, **----- तक्रारकर्ता**
माटुंगा नवीन पोलीस लाईन बी ब्लॉक खाली क्रमांक १३,
पहिला माळा,किंग सर्कल, माटुंगा, मुंबई ४०० ०१९

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
तहसिलदार,तहसिल कार्यालय,तासगांव, जि.सांगली

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ०४.०५.२००९
सुनावणीचा दिनांक: १८.०८.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी: उपस्थित

सुनावणीच्या वेळेला अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार तासगांव जिल्हा यांच्या तर्फे पुढील निवेदन देण्यात आले यावरून संपुर्ण परिस्थिती स्पष्ट होते.

"श्री.शिवाजी दत्तु सर्यवंशी रा.मुंबई यांनी त्यांचे वडील श्री.दत्तु अमृता सुर्यवंशी हे मयत झालेले त्यांच्या वारसांची नोंद होणेबाबत गावकामगार तलाठी कचरेवाडी यांचे कडे दि.२९.०८.२००८ रोजी केले अर्जाबाबत पुढील काय कार्यवाही केली त्याची माहिती मिळावी म्हणून माहिती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत दि.१०.११.२००८ रोजी माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केला आहे सदरच्या अर्जाची माहितीबाबत गाव कामगार तलाठी कचरेवाडी यांना दि.१२.१२.२००८ रोजीच्या पत्राने विचारना केली असता. त्यांनी संदर्भीय अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला नसलेचा अहवाल दि.२१.१२.२००८ रोजी सादर केलेला आहे. तदनंतर अर्जदार यांना मुदतीत उत्तर न दिलेने त्यांनी माहिती अधिकार अंतर्गत तहसिलदार तासगांव यांचेकडे दि.२६.१२.२००८ रोजी अपील केलेले आहे. सदरहू अपीलाची चौकशीची तारीख दि.२८.०५.२००९ रोजी नेमणेत आलेली होती.

वरील कालावधीत अपील अर्जदार यांचेशी संपर्क साधून त्यांना विाचारणा केली असता त्यांची जमीन मौजे नरसेवाडी येथे असलेचे दिसून आले तदनंतर संबंधीत तलाठयांना सूचना देवून त्यांच्या वारसांची नोंदीचे कागदपत्र

तात्काळ कार्यालयास सादर करणेस सुचीत केले व सदरचे कागदपत्र प्राप्त करून घेवून त्यांना दि.२०.०५.२००९ रोजी समक्षात देवून त्यांनी स्वाक्षरी घेणेत आली त्यावेळी त्यांनी आता कोणत्याही प्रकारची तक्रार नाही म्हणून लिहून दिले आहे. तसेच अपीलाची कार्यवाही रद्द करणेत यावी म्हणून दि.२०.०५.२००९ रोजी लेखी म्हणणे दिलेले आहे.

अपिलाच्या सुनावणीचे कामी जन माहिती अधिकारी व संबंधीत लिपीकांचे म्हणने घेणेत आले असून माहिती अधिकारी यांचेकडे महसुल नायब तहसिलदार या पदाचा मुळचा कार्यभार असून वरील कालावधीत त्यांचेकडे निवासी नायब तहसिलदार संजय गांधी नायब तहसिलदार,निवडणूक नायब तहसिलदार या तीन पदाचा अतिरिक्त कार्यभार असलेने माहिती मुदतीत देणेस विलंब झाला म्हणून दिले आहे. तदनंतर अपील अर्जदार यांनी अपील रद्द करावे म्हणून दिले अर्जानुसार इकडील कार्यालयीन आदेश क्र./माहिती अधि/रन ७१/०९ दि.१०.०६.२००९ रोजी अपील रद्द केलेला आदेश पारित केरणेत आलेला आहे त्याची प्रत अपीलदार यांना पोष्टाने पाठविणेत आली आहे. "

तसेच तक्रारकर्ते श्री.शिवाजी सुर्यवंशी यांनी दि.१६.०८.२००९ रोजी आयोगास पुढीलप्रमाणे पत्र लिहून दिलेले आहे.

सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने मी, आपणास विनंती करतो की, मी केलेल्या माहिती अधिकार अधिनियम,२००५ अन्वये मा. माहिती अधिकारी,तहसिलदार कार्यालय तासगांव येथे दि.५.११.२००८ रोजी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने मी,मागणी केल्या प्रमाणे मला माहिती दि.२०.०५.२००९ रोजी मा.तहसिलदार कार्यालय तासगांव येथे मी स्तत: हजर राहिल्याने मला देण्यात आलेली आहे.

त्यामुळे मी दि.४.०५.२००९ रोजी आपल्या कार्यालयात केलेल्या तक्रार अर्ज मला माहिती मिळाल्याने निकाली काढण्यात यावा. आता माझी काही तक्रार नाही.

पुढील आदेश देण्यात येत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ अपील क्रं. ४५४०/२००९

श्री.शंकर लक्ष्मण सिंग **----- अपीलकर्ता**
२६,नटवरलाल गनात्रा चाळ,
साई नगर कंम्पाउंड,एम.जी.क्रॉस रोड,
मुंबई ४०० ०६७

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका पी/आर उत्तर विभाग,
मामलदारवाडी लिबर्टी गार्डन मालाड (प.) मुंबई ६४

जन माहिती अधिकारी तथा
सहा.अभियंता, (परिरक्षण) बृहन्मुंबई महानगरपालिका पी/आर उत्तर विभाग,
मामलदारवाडी लिबर्टी गार्डन मालाड (प.) मुंबई ६४

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २८.०४.२००९

सुनावणीचा दिनांक: १७.०८.२००९

अपिलार्थी : अनुपस्थित

जन माहिती अधिकारी :उपस्थित

अर्जदारास आनंद रोड,ईश्वरलाल पारेख रोड व साईनाथ रोडवरील वायडनिंग करिता ज्यांना नोटिस देण्यात आलेली आहेत त्यांची नावे व पत्त्याबाबत माहिती पाहिजे होती.

अर्जदारास या नोटीसेसच्या झेरॉक्स कॉपी व वायडनिंग प्लॅनच्या प्रती पाहिजे आहे. वास्तविक पाहता अर्जदाराचा अर्ज सुस्पष्ट आहे. अर्जदारास कागदपत्रांची तपासणी करावी व माहिती घेऊन जावी असेच जन माहिती अधिकारी यांनी कळविले व हाच निर्णय प्रथम अपिलात सुध्दा कायम करण्यात आला मात्र तरीही अर्जदाराने आयोगाकडे व्दितीय अपील केलेले आहे.

तपासणीची मागणी अर्जदारास करता येते किंवा मागितलेली माहिती ही फार मोठया प्रमाणात असेल किंवा क्लिष्ट स्वरूपाची असेलतर पुढे अपील/व्दितीय अपील याची वेळ येऊ नये व सुरूवातीलाच चर्चा करुन योग्य ती माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे सुध्दा तपासणी करुन अर्जदाराने माहिती घ्यावी असे सुचवू शकतात. मात्र बऱ्याच केसेसमध्ये असे दिसून येते की,मेकॅनिकली अर्जदाराचे कागदपत्रांची तपासणी करावी व माहिती प्राप्त करून घ्यावी अशा पध्दतीची पत्र जन माहिती अधिकाऱ्यांकडून पाठविल्या जात असतात.

सदरील केसमध्ये अर्जदाराचा अर्ज सुस्पष्ट आहे व सुनावणीच्यावेळी अंदाजे असे किती व्यक्ती असतील ज्यांना या नोटीसेस पाठविल्या आहेत असे विचारले अंदाजे १०० लोक असतील असे सांगण्यात आले. त्यामुळे अर्जदाराचा माहितीच्या अधिकाराचा अर्ज हा सुस्पष्ट आहे त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे. अर्जदाराने त्याच्या अर्जामध्ये माहिती स्वत: घेऊन जाईल असे लिहीलेले असल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांच्या कार्यालयास ७ सप्टेंबर २००९ रोजी भेट द्यावी व त्यामुळे अर्जदारास हवी असलेली माहिती (नोटीसच्या प्रती+प्लॅन) विनामुल्य देण्यात यावी.

<u>आदेश</u>

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्रं. २००९/४५४४/०२

श्री.सय्यद नबी शाह, ------ **अपीलकर्ता**
गोडाऊन नं, शेड नं. ११,
हनुमान मंदीर जवळ,
मुंबई ४०० ०१५

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
विभागीय कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका,
एफ/दक्षिण विभाग कार्यालय,२ रा मजला, डॉ.बी.ए.रोड,
परळ, मुंबई ४०० ०१२

जन माहिती अधिकारी,
सहा.अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका,
एफ/दक्षिण विभाग कार्यालय,२ रा मजला, डॉ.बी.ए.रोड,
परळ, मुंबई ४०० ०१२

- वि वे च न -

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : २६.०३.२००९
सुनावणी तारीख : १८.०८.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदार श्री. सय्यद नवी शाह यांनी मुळ माहिती अर्जामध्ये सी.एस.क्र.१९८ व १/१९८ परेल शिवडी डिव्हिजन,जी.डी.आंबेकर मार्ग,टँक रोड,मुंबई-३३ भुभागावरील स्टेज, व्यायामशाळा व कार्यालयाचे कोणत्या मान्यतेने बांधकामे करण्यात आली व कोणाच्या शिफारशीने व सदर माहिती या कार्यालयात उपलब्ध नसल्याने व अर्जदारास कोणती माहिती हवी ते स्पष्ट न झाल्याने कलम २ (च) व २ (झ) अन्वये दता येत नाही असे जन माहिती अधिकारी असे विहित मुदतीत कळविले होते.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मात्र जन माहिती अधिकारी यांना स्थळ निरीक्षण करून अर्जदारास उत्तर द्यावे असे निर्देश दिले होते. त्यानुसार स्थळ निरीक्षण करुन सदरील बांधकामे ही एम.एल.ए. फंडातून म्हाडा अथॉरिटीतून केली असल्याचे निदर्शनास आल्या वरुन अर्जदारास सदरील माहिती चीफ ऑफिसर स्लम बोर्ड (म्हाडा) यांच्या कडून घेण्यासंबंधी सुचविण्यात आले. अर्जदाराने वास्तविक पाहता अशा परिस्थितीत अर्जदाराचा मुळ अर्ज हा स्वत:च जन माहिती अधिका-यांनी चीफ ऑफिसर स्लम बोर्ड म्हाडा यांच्याकडे पाठवावयास पाहिजे होता. अर्जदारास विचारले असता त्यांनी म्हाडाकडे माहितीचा अर्ज केला होता पण त्यांच्याकडून मिळालेल्या उत्तराने समाधान झाले नाही असे त्यांनी सांगितले. अर्जदाराचे जर दिलेल्या माहितीने समाधान झाले नसेल तर माहितीचा अधिकार अधिनियम या प्रमाणे पुढील अपिलीय कार्यवाही करु शकतात.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/निरंक/अपील क्र. ४४५४/०२

श्री.जगदीश माधवदास अहुजा, **------ अपीलकर्ता**
लिटल हट,फ्लॅट नं.५०१,५ वा मजला,
फ्लॅट २३८, २७ वा रोड,
बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०० ०५०

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३),
गृह निर्माण भवन, तळमजला,कक्ष क्रमांक १९,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी तथा
उप निबंधक, सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग,
सहकार बाजार,४ था मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: ०९.१२.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: २२.१२.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	: २०.०१.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	: ०२.०२.२००९
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	: २३.०३.२००९
सुनावणीचा दिनांक	: ०८.०७.००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

दि.२२.११.२००८ रोजी लिटल हट का.ऑ.हौ.सोसायटीच्या सचिवांना/अध्यक्षांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत अर्जदाराने उप निबंधक,एच/पश्चिम विभाग यांना पृष्ठांकित केली होती. त्या संदर्भात उप निबंधक कार्यालयाकडून सोसायटीमकडे पत्रव्यवहार झाला असल्यास त्यांया प्रतींची मागणी अर्जदाराने केली होती.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

मागणी केलेली माहिती संस्था स्तरावरील असल्याने ती संस्थेकडून प्राप्त करून घ्यावी याबाबत त्वरीत माहिती देणेबाबत संस्थेला निदेश देण्यात येत आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

अपीलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार (अपिलार्थी) यांना कार्यालयात उपलब्ध असलेली संबंधीत संस्थेची धारीका निरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात यावी.

अपिलार्थी : उपस्थित
उत्तरवादी (१) : अनुपस्थित
उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीस लिटल हट का.ऑ.हौ.सोसायटी संदर्भात सोयटीकडून माहिती मिळवून ती एक महिन्याच्या आत उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन दिले होते व त्यास अपिलार्थी यांनी अनुमोदन दिले होते. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ११.०८.२००९ रोजीच्या अहवालान्वये संबंधित संस्थेकडून उपलब्ध झालेली काही माहिती पुरविण्यात आली असून उर्वरित माहिती अपिलार्थीस देण्यात येत आहे असे आयोगास कळविले आहे. त्याप्रमाणे अपिलार्थीनेही त्यांच्या दिनांक १०.०८.२००९ रोजीच्या अर्जान्वये उर्वरित माहिती दिनांक ३१.०८.२००९ पर्यंत मिळण्याच्या अधिन राहून प्रस्तूत प्रकरण निकाली काढण्याबाबत आयोगास कळविले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/४०४७९ /अपील क्र. ४५६८/०२

श्री.रोजश पांडुरंग ठाकुर, **------ अपीलकर्ता**
इमारत क्र.६०, खोली क्र. १९७१,
नेहरू नगर, कर्ला (पूर्व),
मुंबई ४०० ०२४

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **-------उत्तरवादी**
उपनिबंधक, सहकारी संस्था,
मुंबई गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी तथा
सहकार अधिकारी श्रेणी-१, उपनिबंधक सहकारी संस्था,
मुंबई मंडळ, मुंबई

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: ०६.०१.२००९
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: आदेश दिला नाही.
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	: १३.०२.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	: २४.०३.२००९
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	: ०७.०५.२००९
सुनावणीचा दिनांक	: २५.०८.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

नेहरू नगर कर्ला येथील रत्नदिप को.ऑ.हौ.सोसायटी लि. इमारत क्र.६० चे माजी अध्यक्ष यांनी माजी सचिवा विरूध्द दि.२८.११.२००७ रोजी केलेल्या तक्रारीसंदर्भात.

व्दितीय अपील दाखल करेपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशानुसार देखील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश : १५ दिवसांत माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

अपिलार्थी : उपस्थित

उत्तरवादी (१) : उपस्थित

उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

अर्जदारास जरी सोसायटीकडची सर्व माहिती मिळालेली असली तरी अर्जातील अर्जदाराला हवी असणारी माहिती म्हणजे त्या सोसायटीच्या माजी अध्यक्षाने जी तक्रार केली होती त्या तक्रारीवर झालेल्या कारवाईची माहिती मिळण्यासंदर्भात आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात माहिती दिलेली नाही व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.हांडे यांनी अजुनही माहिती दिलेली नाही असे सांगितले. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांना अजुन संपुर्णपणे कागदपत्र प्राप्त झालेली नाहीत. श्री.हांडे यांच्या विरुध्द आयोगाने या आधिही कारवाई केलेली आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी या अर्जदाराने केलेल्या तक्रारीत लक्ष्य घालून सद्य स्थिती १५ दिवसाच्या आत अर्जदारास कळवावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २५.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/४०४७५ /अपील क्र. ४५७३/०२
मुमाआ. २००९/४०४७६ /अपील क्र. ४५७२/०२
मुमाआ. २००९/४०४७७ /अपील क्र. ४५७१/०२
मुमाआ. २००९/४०४७३ /अपील क्र. ४५७०/०२
मुमाआ. २००९/४०४७८ /अपील क्र. ४५६९/०२

श्री.प्रमोद लक्ष्मण कदम, ------ अपीलकर्ता
१६/डी ३, श्री.साई सोसायटी,
एस.व्ही.पी. नगर, म्हाडा,अंधेरी (प),
मुंबई ४०० ०५३

प्रथम अपिलीय अधिकारी -------उत्तरवादी
उपनिबंधक, सहकारी संस्था,
मुंबई गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था,
मुंबई गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१

- वि वे च न -

अपीले दाखल केल्याचा दिनांक :७.०५.२००९
सुनावणीचा दिनांक :२५.०८.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

वरील सर्व अपीलांच्या मुळ अर्जामध्ये एकतर अर्जदाराने दि.६.११.२००६,६.१२.२००७ व १३.१०.२००८ रोजी जे अर्ज दिले होते त्या अर्जावर काय

कारवाई करण्यात आली किंवा को.ऑ.सोसायटी ॲक्ट च्या वेगवेगळया तरतूदींबाबत इंटरप्रिटेशन किंवा मत विचारलेले आहे.

कायद्याच्या इंटरपिटेशन वगैरे बाबतीत अर्जदाराने आपल्या वकीलांचा सल्ला घेणे जास्त श्रेयस्कर ठरेल. इतर बाबतीत जन माहिती अधिकाऱ्यांना अपिलीय अधिकाऱ्यांनी माहिती देण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे माहिती ही १५ दिवसाच्या आत देण्यात यावी. माहितीचा अधिकारामध्ये एखाद्या विवक्षीत केसमध्ये काही लीगल ओपिनीयन अस्तित्वात असेल अशी परिस्थिती असेल तर ती केस नमूद करून त्या विषयी माहिती मागता येईल मात्र मुद्या उपस्थित करुन त्यावर विभागाने माहिती अधिकार कायद्यानुसार मत द्यावे अशी अपेक्षा चुकीची आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २५.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/४०३८२ /अपील क्र.४६५१ /०२

डॉ.सुधाकर पांडुरंग जोशी, ------ अपीलकर्ता
ए २/डी३ + डी +४, पंचवटी को.ऑप.हौ.सोसायटी,
मरोळ,अंधेरी (पूर्व),
मुंबई ४०० ०५९

प्रथम अपिलीय अधिकारी तथा -------उत्तरवादी
उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पूर्व विभाग,
३१५ ऐ/१,इमारत,३ रा माळा, ट्रक टर्मिनल,
आर.टी.ओ.ऑफीस जवळ, वडाळा,(पूर्व),मुंबई ४०० ०३७

जन माहिती अधिकारी तथा
सचिव, पंचवटी को.ऑप.हौ.सोसायटी,
मरोळ,अंधेरी (पूर्व),
मुंबई ४०० ०५९

- वि वे च न -

अपिलार्थी,डॉ.सुधाकर पांडुरंग जोशी यांनी दि.२१.०३.२००९ रोजी माहितीच्या अधिकारात सेक्रेटरी,पंचवटी पंचवटी को.ऑप.हौ.सोसायटी,मरोळ,अंधेरी (पूर्व),मुंबई ४०० ०५९ यांच्याकडे माहिती अर्ज केला होता. तथापि त्यास विहित मुदतीमध्ये प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपिलार्थी यांनी दि.२४.०४.२००९ रोजी उपरोक्त प्रथम अपिलीय प्राधिकारी यांजकडे माहितीचा अधिकारी अधिनियम,२००५ च्या कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले होते. तथापि प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखील उक्त अधिनियमाच्या कलम १९ (६) मध्ये विहित मुदतीमध्ये आदेश पारित न केल्यामुळे अपिलार्थी यांनी दि.२९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील केलेले आहे.

ज्या प्राधिकरणाकडे अपिलार्थी यांनी माहितीच्या अधिकारात माहिती मागितलेली आहे ती एक सहकारी गृहनिर्माण संस्था असून सदर संस्थेच्या सेक्रेटरींनी दि.१०.०५.२००९ रोजी अपिलार्थीस पत्र लिहून त्यांच्या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा कायदा लागू होत नसल्याबद्दल कळविलेले आहे. अशा प्रकारचा निर्णय हा उच्च न्यायालयाच्या

नागपूर खंडपीठाने दिले आहे. रिट पिटीशन क्रमांक १३०४/२००८ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने अंतरिम आदेशान्वये सहकारी सोसायटया,अर्बन बँका तसेच पतपेढींसंदर्भात त्यांच्या बॅलन्सशीट व प्रॉफिट अँड लॉस अकाऊन्ट्स व्यतिरिक्त अन्य माहिती सर्वसाधारण जनतेस आणि/किंवा सभासदांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये तूर्त देऊ नये असे निर्देशिलेले आहे. त्यामुळे अपिलार्थीस म्हणून सहकारी सोसायटीसंबंधात सोयटीकडे माहितीच्या अधिकारात माहिती मागता येऊ शकत नाही. मात्र सहकारी संस्था कायद्याअंतर्गत त्यास माहिती मिळू शकते सबब पुढील आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २५.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/४०४७९ /अपील क्र. ४५७५/०२

श्री.बगोरिया प्रेमचंद शिवनाथ, **------ अपीलकर्ता**
प्लॉट नं.९०, खेरवाडी, वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०० ०५१

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **-------उत्तरवादी**
पोलीस उपआयुक्त,परिमंडळ-९,वांद्रे (प),मुंबई ४०० ०५०

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त, पश्चिम नियंत्रण कक्ष,वांद्रे (प),
मुंबई ४०० ०५०

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: ०१.०९.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: १३.०९.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	: ०६.१०.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	: २७.१०.२००८
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	: १३.०४.२००९
सुनावणीचा दिनांक	: २५.०८.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

अपिलार्थी यांनी दि.५.०६.२००८ च्या पत्रान्वये त्यांना त्रास देणाऱ्या काही समाज विघातक प्रवृत्ती विरूध्द तक्रार केली होती पोलीसांनी त्यांचे घेतलेले जाबजबाब, त्यांच्या विरूध्दच्या तक्राी इत्यादी माहिती विचारली होती.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर :-

तक्रार अर्जामध्ये नमूद केलेल्या इसमाविरूध्द कोणताही दखलपात्र गुन्हा नाही. तसेच या प्रकरणाच्या चौकशी अहवालाची दुय्यम प्रत पोलीस ठाण्यात उपलब्ध नसल्याचे कळविले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जातील मुद्या क्र.२ व३ बाबतीत समाधानकारक माहिती दिली आहे. मुद्या क्र.१ ची माहिती समाधानकारक नाही तरी त्यांनी तक्रार अर्जावरील चौकशी अहवालाच्या निष्कर्षाची प्रत अपिलार्थींना द्यावी असे आदेश दिले.

अपिलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

वरिष्ठ पोलीस निरीक्षक निर्मलनगर पोलीस ठाणे यांनी दि.१.०६.२००८ च्या तक्रार अर्जावरील चौकशी अहवालाच्या निष्कर्षाची प्रत अपिलार्थी यांना द्यावी असे निर्देश दिले होते. हे निर्देश अजुनही अर्जदारास प्राप्त झाले नाहीत. उपआयुक्त पोलीस यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या निर्देशाची प्रत अर्जदारास ७ दिवसाच्या आत देण्याचे आदेश देण्यात आले. अर्जदाराचे म्हणणे असे की त्यांनी श्री.प्रकाश चावला व त्यांचे कुटुंब यांच्या विरोधात दखल पात्र गुन्हयाच्या प्रतींची मागणी केली होती याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी असे सांगितले की,

" सदरबाब अपिलार्थी यांनी कोणत्या कालावधीतील गुन्हयाच्या प्रती पाहिजे याबाबत कालावधी नमूद न केल्याने त्यांना देता आल्या नाहीत. तसेच सदर कालावधीत श्री.प्रकाश चावला व त्यांचे कुटुंबाच्या विरोधात दाखल झालेल्या गुन्हयाची माहिती मा.माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि.१२.०३.२००९ रोजी सादर केलेल्या अर्जान्वये मागणी केल्याने वरील माहिती दिल्यानंतर प्रकाश चावला व इतर यांच्या विरूध्द दि.५.११.२००८ रोजी दाखल गुन्हा नोंद क्रं.२९६/०८ क.१४३, १४४,१४६, १४७,१४८, १४९,३२३, ३२४, ५०४,५०६(२) अन्वये गुन्हा दाखल झाल्याने सदर गुन्हयाची योग्य ती माहिती अपिलार्थींना देण्यात आलेली आहे."

अदखल पात्र गुन्हयाबाबत तृतीय पक्ष मध्ये असल्यामुळे अधिनियमाच्या कलम ११ मधील तरतूदीनुसार पुर्ण करून अर्जदारास माहिती द्यावयाची किंवा नाही याबाबत निर्णय घ्यावा.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,

दिनांक: २५.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ. २००९तक्रार क्र. ३७९/०२

डॉ.मुनाफ इब्राहीम बागवान ------ तक्रारकर्ता
१४६२, वंजार गल्ली, अहमदनगर

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा -------उत्तरवादी
जनरल मॅनेजर, अहमदनगर,सेंट्रल को.ऑ.कंझ्यूमर
अँड रिटेल स्टोअर्स लि.अहमदनगर

- वि वे च न -

क्र.मुमाआ २००९/नाशिक/अपील क्र.१५/०२, दि.१९.०५.२००९ अन्वये असे आदेश दिले होते की, ज्या अर्थी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.१७.०४.२००८ रोजीच्या आदेशाने अपिलार्थीस माहिती देण्यात यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिलेले होते व त्याचे पालन झाले नाही म्हणून आयोगाकडे व्दितीय अपील करण्यात आलेले आहे.

ज्या अर्थी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी या अगोदरच माहिती द्यावी असे निर्देश दिलेले होते त्यामुळे ही माहिती देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले. मात्र तरीही माहिती न मिळाल्यामुळे अर्जदाराने आयोगाकडे दि.१८.०६.२००९ रोजी तक्रार केलेली आहे. त्या तक्राराची सुनावणी दि.२६.०८.२००९ रोजी घेण्यात आली. त्या वेळेला तक्रारकर्ते अनुपस्थित राहीले तर जन माहिती अधिकारी, जनरल मॅनेजर अहमदनगर,सेंट्रल को.ऑ.कंझ्यूमर अँड

रिटेल स्टोअर्स लि.अहमदनगर हे उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.१७.०४.२००८ रोजीचा आदेशच त्यांना प्राप्त झाला नव्हता. त्यामुळे अर्जदारास माहिती दिलेली नाही. या अगोदर माहिती न देण्याचे कारण अर्जदाराचा अर्ज हिंदूस्थान पेट्रोलियम कंपनीने अर्जदारास सोबत १० रूपयाचा डी.डी. हिंदूस्थान पेट्रोलियम या नावाने पाठवावा व त्या नंतर माहिती दिली जाईल असे लिहीले असल्यामुळे माहिती दिलेली नव्हती. मात्र आता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाची प्रत आयोगाने जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करून दिलेली आहे ती मिळाल्यामुळे त्या आदेशाची अंमलबजावणी केली जाईल.

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २६.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार.

मुमाआ. २००९तक्रार क्र. ४४४/०२

श्री.एस.आय.मेहता ------ तक्रारकर्ता
ब-२,साई चंदतारा,साईबाबा कॉम्प्लेक्स,
गोरेगांव (पूर्व), मुंबई ४०० ०६३

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा -------उत्तरवादी
उपविबंधक,सहकारी संस्था पी वॉर्ड, मुंबई ४०० ०३७

- वि वे च न -

अपीलकर्ता यांच्या तक्रार क्र.४१७५ च्या दि. ६.०४.२००९ रोजी निर्णय देतांना अर्जदारास हवी असणारी माहिती ही सहकारी गृहनिर्माण संस्था पातळीवरची आहे. त्यामुळे त्यांच्या कडील माहिती ही को.ऑप.सोसायटी ॲक्ट अंतर्गत अपिलार्थीस मिळाली पाहिजे व तसे देण्याचे आदेश सहकार जिल्हा उपनिबंधक यांनी दिले होते पण त्याचे पालन झालेले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे असल्यावरून आपल्या आदेशाचे पालन करून घेण्याची जबाबदारी ही उप निबंधकांनी पार पाडावी असे निर्देश देण्यात आले होते. मात्र तरीही माहिती मिळाली नाही असे दि.४.०७.२००९ रोजीच्या तक्रारीत अर्जदाराने म्हटलेले आहे यासंदर्भात सुनावणी दि.२६.०८.२००९ रोजी घेण्यात आली. त्या वेळेला तक्रारकर्ते अनुपस्थित होते तर जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उपनिबंधक सहकारी संस्था पी विभाग यांनी आयोगाच्या असे निदर्शणास आणले की संस्थेस माहिती देण्याचे निर्देश वेळोवेळी देण्यात आले होते. संस्थेचे कामकाज सहकारी कायद्यानुसार चालले नसल्यामुळे संस्थेचे संचालक मंडळ सुध्दा निषप्रभावी करण्यात येऊन दि.१३.०७.२००९ रोजी संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती केलेली आहे. संचालक मंडळ बरखास्त करण्याची कठोर कारवाई केलेली आहे. त्यामुळे माहिती मिळवून देण्याच्या बाबतीत कठोर पावले त्यांनी उचललेली आहे. प्रशासकांच्या नियुक्तीच्या बाबत संस्थेने अपील केलेले आहे व ते विभागाने सहनिबंधक यांच्या समोर चालू आहे. त्याचा निर्णय झाल्यानंतर उचित कार्यवाही उपनिबंधकांनी करावी.

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २६.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.९९५/०२

श्री. अरूण नामदेव पाटील, **------ अपीलकर्ता**
रा.कुंभारटेक, मु.पा.ता.एरंडेल,
जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **-------उत्तरवादी**
अधिक्षक,भूमि अभिलेख,नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक भूमि अभिलेख एरंडोल,
जि.जळगांव

- वि वे च न -

अपीले दाखल केल्याचा दिनांक :१५.१२.२००८
सुनावणीचा दिनांक :३१.०७.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.९.०६.२००८ च्या अर्जान्वये मौजे एरंडोल येथील पुर्वीचा सर्व्हे नंबर १२०० व १२०१ मिळून एकत्रित सर्व्हे नं.२३७ बाबत माहिती मागितली. जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती अपूर्ण असल्याचे कारण दर्शवून

अपीलार्थींनी दि. १७.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर निर्णय देतांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केले की अपीलार्थींना गट क्र.२३७ चे उतारे, नक्कल इत्यादी पुरविण्यात आल्या आहेत. योग्य ती माहिती परुरविली असल्याने अपील निकाली काढयात येत आहे.

यावर समाधान न झाल्याने अपीलार्थींनी आयोगाकडे दि.१५.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीचे वेळी अपीलार्थींनी असे सांगितले की त्यांचा दि. २९.११.२००६ रोजीचा नकाशा दुरूस्तीबाबतचा अर्ज प्रलंबित असून त्याबाबत त्यांना माहिती अप्राप्त आहे. नकाशा दुरूस्तीचा अधिकार वरिष्ठ कार्यालयाला आहे व ते प्रकरण वरिष्ठ कार्यालयास पाठविले असल्याने तेव्हा त्यांच्याकडून निर्णय प्राप्त होताच अपिलार्थींना पुरविण्यात येईल. यावर असे निदेश देण्यात येतात की वरिष्ठ कार्यालयाकडून नकाशा दुरूस्तीबाबत निर्णय प्राप्त होताच त्याबाबत अपिलार्थींस अवगत करण्यात यावे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २५.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.९९६/०२

श्री. संजय शिवाजी पवार, **------ अपीलकर्ता**
शनि चौक, भडगांव ता.भडगांव,
जि.जळगांव ४२४ १०५

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **-------उत्तरवादी**
उपविभागीय अधिकारी पाचोरा,जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
तासिलदार तहसिल कार्यालय,भडगांव
जि.जळगांव

- वि वे च न -

अपीले दाखल केल्याचा दिनांक :२१.११.२००८
सुनावणीचा दिनांक :३१.०७.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.१.०९.२००८ च्या अर्जान्वये एप्रिल २००५ ते दि.३१ ऑगस्ट या कालावधीची संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार योजना व त्यात अंतर्भुत इतर योजनांच्या रोख पुस्तकांच्या झेरॉक्स प्रतींची मागणी केली होती. त्यांना ही माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.८.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर सुनावणी होऊन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि.८.१२.२००८ रोजी आदेश

पारित केले. त्यानुसार अपिलार्थींनी मागणी केल्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत माहिती पुरवायची होती. प्रथम अपीलावरील निर्णय ३० दिवसांच्या आत न झाल्यामुळे अपीलार्थींना दि.२१.११.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की प्रथम अपीलावरील सुनावणी नंतर अपीलार्थींना माहिती देण्याचे आदेश देण्यात आले असून त्यानुसार त्यांना माहिती पुरविण्यात येईल. ही बाब विचारात घेऊन असे निदेश देण्यात येतात की जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थींना या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क माहिती पुरवावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २६.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.९९०/०२

श्री. सचिन लहू पाटील, **------ अपीलकर्ता**
मु.पो.टेकवाडे,ता.चाळीसगांव,
जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **-------उत्तरवादी**
गटविकास अधिकारी,पंचायत समिती चाळीसगांव, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,ग्रा.पं.टेकवाडे,ता.चाळीसगांव
जि.जळगांव

- वि वे च न -

अपीले दाखल केल्याचा दिनांक :१६.१०.२००८
सुनावणीचा दिनांक :३१.०७.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.२९.०७.२००८ रोजी अर्ज करून सन २००५-०६ ते २००७-०८ या कालावधीत ग्राम पंचायतीला विकास कामांसाठी मिळालेला निधी व त्यातून केलेला खर्च याचा हिशोब बँक स्टेटमेंटस् च्या प्रतीसह मागितला होता.

याच्या उत्तरात त्यांना असे कळविण्यात आले की योजनेचे तत्पर जन माहिती अधिकारी यांना मिळालेले नाही ते प्राप्त होताच माहिती पुरविण्यात येईल. या उत्तराने

समाधान न झाल्याने अपिलार्थींनी दि.१८.०८.२००८ रोजी प्रथम अपील सादर केले. यावर असा निर्णय देण्यात आली की अपिलार्थींना १० दिवसाच्या आत विनाशुल्क माहिती पुरविण्यात यावी.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशाचे पालन न झाल्याचे नमूद करून अपीलार्थींनी दि.१६.१०.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. यावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की अपिलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थींना पुरविलेल्या माहितीचा तपशील त्यांना सुनावणीच्या वेळी सादर केला. त्याचे अवलोकन केले असता असे दिसते की अपिलार्थींनी मागणी केल्या प्रमाणे त्यांना माहिती पुरविण्यात आली आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २६.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/२९३३४ /अपील क्र. ३१९५/०२

श्री.मच्छिंद्र सुर्यकांत बांगर, ------ अपीलकर्ता
शिक्षणशास्त्र विभाग, श्रीमती नाथीबाई दामोदर
ठाकरसी महिला विद्यापीठ,१, नाथीबाई ठाकरसी रोड,
चर्चगेट,मुंबई ४०० ०२०

प्रथम अपिलीय अधिकारी तथा -------उत्तरवादी
कुलगुरू श्रीमती नाथीबाई दामोदर
ठाकरसी महिला विद्यापीठ,१, नाथीबाई ठाकरसी रोड,
चर्चगेट,मुंबई ४०० ०२०

जन माहिती अधिकारी तथा
कुल सचिव श्रीमती नाथीबाई दामोदर
ठाकरसी महिला विद्यापीठ,१, नाथीबाई ठाकरसी रोड,
चर्चगेट,मुंबई ४०० ०२०

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : १५.११.२००७
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : १५.०१.२००८ व
क्रमांक: कमिटी-आरटीआय/२००७-०८/५२५
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. : ०७.१२.२००७
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : निरंग
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : १८.०१.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ सिनेट निवडणूकीबाबत एकूण १५ मुद्यांची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर :-

१ ते १५ मुद्यांची मुद्देसुद माहिती माहिती परिशिष्ट- अ,ब,क,ड, आणि इ सोबत दि.१५.०१.२००८ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आली.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या दि.७.१२.२००७ च्या प्रथम अपिलावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(६) अन्वये प्रकरणपरत्वे ३०/४५ दिवसांत अपिलार्थीस सुनावणीची संधी देऊन आवश्यक ते आदेश पारित न केल्यामुळे मी दिनांक १७.०९.२००९ रोजी अंतरिम आदेश निर्गमित केले होते. अपीलीय अधिकारी यांनी आयोगास दि.१३.०८.२००९ च्या पत्रान्वये अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालानुसार अपिलार्थीच्या दिनांक दि.७.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपिलासंदर्भात विद्यापीठाकडून दि.१५.०१.२००८ रोजीच्या पत्रान्वये (परिशिष्टासह) अपिलार्थीस माहिती पाठविली असून ती अपिलार्थीस दि.१७.०१.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे दिसते. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे दि.१८.०१.२००८ रोजी अपिलार्थी यांनी आयोगाकडे अपिल वजा तक्रार अर्ज सादर केला असून त्यात मात्र अपिलार्थी यांनी त्यांना आजतागायत कोणतीही माहिती दिलेली नाही असे जे विधान केलेले आहे. ते वस्तूस्थितीस धरून नाही. माहिती योग्य प्रकारे दिलेली आहे. पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम १९ (६) अन्वये प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी अशी त्यांना अशी समज देण्यात येत आहे की, यापुढे त्यांनी कलम १९ (६) मधील तरतुदीस अनुसरून विहित कालावधीत आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २६.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेल्या तक्रारी.

क्रमांक:मुमाआ २००८/३६७५१/तक्रार ४५६/०१
क्रमांक:मुमाआ २००८/४०७७१/तक्रार ४७०/०१

श्री.कमलाकर रत्नाकर शेणॉय, ------ तक्रारदार
२/१३,आदिनाथ को.ऑप.हौ.सोसायटी,
एली कॅदूरी स्कूल समोर, माझगांव, मुंबई ४०० ०१०

विरूध्द

१)जन माहिती प्राधिकारी -------उत्तरवादी
कर्मचारी गृह कर्ज व्रिभाग,
बृहन्मुंबई म.न.पा.,खोली क्र ८४, २ रा मजला,
जुनी इमारत,महापालिका मुख्यालय, मुंबई ४०० ००१

२ अपिलीय प्राधिकारी
गृह विभाग, (पोल १२,), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

३)जन माहिती अधिकारी
गृह विभाग, (पोल १२,), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

- वि वे च न -

तक्रारदार श्री कमलाकर र.शेणॉय यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.११.२००८ व दि. ०२.०५.२००९ या दोन तक्रारी दाखल केल्या होत्या. सदर तक्रारींवर सुनावणी दि.०५.०९.२००९ रोजी ठेवण्यात आलेली आहे. तत्पूर्वी दि.२८.०८.२००९ च्या पत्रान्वये तक्रारदाराने त्यांना सर्व माहिती प्राप्त

झाली असल्यामुळे त्यांच्या तक्रारी मागे घेण्यात येत आहेत. असे कळविले त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

दोन्ही तक्रारी निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ५.९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९५९/०२

श्री.किशोर भबुतमल शहा, ------ अपीलकर्ता
प्लॉट नं.२०+२१/३ पार्वती नगर,
जळगांव-४२५ ००१

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
औरंगाबाद,जि.औरंगाबाद

जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,धुळे,जि.धुळे

- वि वे च न -

अपीलकार श्री.किशोर भबुतमल शहा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०२.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि.३१.७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २१.०८.२००६ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

"जळगांव येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातंर्गत भुखंड क्रमांक १५१/१,१५१/२ व १६२ येथील अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.६.०९.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी दि.१५.११.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती

आयोगाडके व्दीतीय अपील दाखल केले. अपीलातील कागदपत्रांची पडताळणी केली असता असे दिसून येते की, जळगांव औद्योगिम क्षेत्रातील भुखंड क्र.एम १५१/१,१५१/२ यावरील अनधीकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उप विभाग जळगांव यांनी ४३६ दि. १५.०२.२००५ च्या क्रमांकाचे कोणतेहि पत्र पाठविलेले नाही सद्यस्थितीत भुखंड क्र.एम-१६२ वर कोणतीही अतिक्रमीत बांधकाम अस्तित्वात नाही अशी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९८९/०२

श्री.विलासचंद्र शिवनारायण बसेरा ------ अपीलकर्ता
नर्मदा सदन, ओम चेंबर मागे, कोर्टा समोर,
जिल्हा पेठ, जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
पोलीस अधिक्षक कार्यालय,जळगांव, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलिस अधिक्षक कार्यालय,
जळगांव, जि. जळगांव

- वि वे च न -

अपीलकार श्री.विलासचंद्र शिवनारायण बसेरा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.१२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि.३१.७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ११.०८.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

"दि.५.१२.२००७ च्या अर्जावर उप विभागीय पोलीस अधिकारी, जळगांव योचे दि.२३.०४.२००८ च्या आदेशानुसार केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. श्री. अशोक चोपडा व इतर यांनी अपीलकारास रु.७१,०००/- ला फसवल्याबाबत तक्रार केली होती. सदर प्रकरण सरकारी अभियोक्ता जळगांव यांचेकडे अभिप्रायाकरिता पाठविले असता, सदर तक्रार दिवाणी स्वरुपाची असल्याचे आढळून आले. सदर तक्रारीबाबत मा. न्यायालयाकडे दाद मागावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.९.०४.२००८ च्या पत्रान्वये

कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१.१०.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल केले. उप विभागीय अधिकारी, जळगाव उप विभाग, जळगांव यांनी दि.२४.१०.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली आहे असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.१६.१०.२००८ च्या पत्रान्वये कळवून प्रथम अपील निकालात काढले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

श्री.अशोक चोपडा व इतर यांनी अपीलकाराची रु.७१,०००/- फसवणूक केली. याबाबत चौकशी करण्याची आपीलकाराने तक्रार केली. सदर तक्रार दिवाणी स्वरुपाची असल्याचे सरकारी अभियोक्ता जळगांव यांचे अभिप्राय आहेत. तक्रारीबाबत अपीलकाराने मा. न्यायालयात दाद मागावी असे दि.९.०४.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती दिली असल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते. सदर प्रकरणी सरकारी अभियोक्ता यांचे अभिप्राय लक्षात घेता अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांनी समर्पक उत्तर दिले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९८५/०२

श्री.रामराव अनंतराव देवकर ------ अपीलकर्ता
मु.घुसर्डी बु.,ता.पाचोरा,जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
गटविकास अधिकारी,पंचायत समिती,पाचोरा,
ता.पाचोरा,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलकार श्री.रामराव अनंतराव देवकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि.३१.७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.०१.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

"१९९२-९३ व १९९७-९८ सर्वे प्रमाणे परिपत्रक "ब" ची नक्कल मिळणेबाबत मागणी केली होती"

अपीलार्थीनं व्यक्तीश:हा माहिती घेणार असल्याचे अर्जात नमूद केले होते. म्हणून अपीलकारास हवी असलेली माहिती मौजे घुसर्डी बु. ग्रामपंचायतमध्ये असलेली माहिती अपीलकारास देण्यात येईल. ती अपीलकाराने घेऊन जावी असे दि.४.०४.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास

कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपलकाराने दि.८.०५.२००८ रोजी प्रथम अपील अपील दाखल केले. ग्रामपंचायत घुसर्डी यांनी सन १९९७-९८ ची माहिती अपीलकारास दिली. सन १९९२-९३ ची माहिती ग्रामपंचायत ,घुसर्डी मध्ये उपलब्ध नसल्याचे ग्रामपंचायतीने कळविले. तरी सदरची माहिती उपलब्ध नसल्याने देता येत नाही असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.५.०५.२००८ च्या पत्रान्वये कळविले.

यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.३१.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलातील कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसून येते की, अपूर्ण राहिलेली माहिती, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक घुसर्डी (बु) यांनी सन १९९२-९३ मधील विकास पत्रिकाची छायाप्रत अपीलकारास उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे अपील अर्ज मागे घेत असून त्यांचे समाधान झाले असल्याने अपीलकाराने दि.२९.०७.२००९ रोजी लेखी प्रथम अपीलीय अधिकारी, तथा गट विकास अधिकारी (उ.श्रेणी) पंचायत समिती पाचोरा यांना कळविले असल्याचे दिसून आले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९६०/०२

श्री.गोविंदराव फुजी सुर्यवंशी ------ अपीलकर्ता
चाळीसगांव, जि. जळगांव, जळगांव ४२४ १०१

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
आयुक्त प्रादेशिक संचालक,न.पा.प्रशासन,
विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,नगर परिषद,चाळीसगांव,
ता.चाळीसगांव,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलकार श्री.गोविंदराव फुजी सुर्यवंशी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०९.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि.३१.७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.०७.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

"सार्वजनिक निवडणूक झाल्यानंतर लगेच चाळीसगांव नगर परिषद शिक्षण मंडळाची निवडणूक का घेतली नाही. याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागितली होती." माहिती पुरविण्याबाबत विहित केलेली मुदत संपुष्टात येण्याच्या आतच अपील दाखल केले आहे. असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.७.०८.२००८ च्या पत्रान्वये कळविले. वेळोवेळी शासन आदेशान्वये कार्यालयाने, माहिती मागणी केल्यानुसार सदर केली असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.२१.०८.२००८ च्या

पत्रान्वये कळविले. अपीलकारास दोन दिवसात आवश्यक ती माहिती विनामुल्य पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.२९.०८.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतर अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलार्थी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अनुपस्थित होते. यावरुन अपीलार्थीस मागणीप्रामणे माहिती प्राप्त झाली असावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९९४/०२

श्री.नरेंद्र रामपाल चौधरी ------ अपीलकर्ता
रा.टिंबर मार्केट एरिया, डॉ. वसंत चौधरी यांचे शेजारी,
भुसावळ,जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
जिल्हा पोलीस अधिक्षक,जळगांव,जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा पोलीस अधिक्षक,जळगांव,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलकार श्री.नरेंद्र रामपाल चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.१२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि.३१.७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन, दि.२३.०७.२००३ रोजी साकेगावाजवळ मिनी लक्झरी बस क्र.एम.एच-२८/बी ५४८८ चे अपघातात ललीत हिरालाल जैस्वाल रा.जळगांव यांना अपघात झालेबाबत अनुषंगीक माहिती मागितलेली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहती कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.८.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. ललीत हिरालाल जैस्वाल यांचा अपघात हा भुसावल तालुका पोलीस ठाणे हद्दीत झालेला असून भूसावल तालुका पोलीस ठाण्यातील क्राईम रजिस्टर तसेच अपघात रजिस्टर पाहावा सदर अपघाबाबत नोंदी आढळून आलेल्या नाहीत असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलकारास

दि.१५.०९.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती दिली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९९७/०२

श्री.अशोक बन्सी पवार ------ अपीलकर्ता
आकाशवाणी कॉलनी,जिल्हा पेठ, जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
अप्पर जिल्हाधिकारी, जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
उप विभागीय अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव ४२५ ००१

- वि वे च न -

अपीलार्थींनी दि.३०.०६.२००८ च्या अर्जान्वये अनुसुचित जाती प्रमाण पत्र क्र.एम. ए.जी ./एस. आर/३८/२००१ दि.१३.०२.२००१ च्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या सर्व दस्तऐवजाच्या प्रती,नोंद वहीचा उतारा मार्गदर्शक सूचनांचया सन २००१ आणि २००८ शासन निर्णय इत्यादिच्या प्रतींची मागणी केली. त्यांची अशी ही मागणी होती की "ठाकूर" या जातीकरिता अनुसूचित जमाती प्रमाण पत्र देण्यात येऊ नये अशा विशेष सूचना असलेला शासन निर्णय/परिपत्रक याच्या प्रती पुरविण्यात याव्यात. या अर्जाच्या अनुषंगाने अपीलार्थींना असे कळविण्यात आले की जातीच्या प्रमाण पत्राच्या दस्तऐवजासाठी त्यांनी तहसील कार्यालयाशी संपर्क साधाव व उर्वरित कागदपत्रांच्या प्रतीसाठी जमा करावी म्हणजे त्यांना कागदपत्रे पुरविण्यात येतील.

पैसे भरुन सुध्दा माहिती मुदतीत पुरविली नाही तसेच तहसिल कार्यालयाकडून माहिती मिळाली नाही या सबब खाली त्यांनी दि. ५.०८.२००८ रोजी प्रथम अपली दाखल केले. यावरील निर्णयानुसार असे निदेश देण्यात आले की अपीलार्थींना त्यांनी मागितलेली माहिती आठ दिवसांत पुरविण्यात यावी. तथापि त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.३.११.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी आयोगासमोर जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे कथन केले की अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. अपीलार्थी उपस्थित नसल्याने त्यांचे यावर म्हणणे आहे हे समजून घेता आले नाही जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या काथनानुसार माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९१०/०२

श्री.शिवकुमार काशिनाथ ससाणे ------ अपीलकर्ता
रा.के.डी. गायकवाड हायस्कूल जवळ,
अमळनेर ता.अमळनेर जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
आरोग्य निरिक्षक,नगर परिषद अमळनेर, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
आरोग्य निरिक्षक,नगर परिषद अमळनेर, जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थींनी दि. ५.०२.२००८ च्या अर्जान्वये आराग्य विभागातील १५३ कायमस्वरुपी सफाई कामगारांची यादी मागितलेली होती. ही यादी अपीलार्थींना पुरविण्यात येईल असे त्यांना दि.१६.०२.२००८ रोजी कळविण्यात आले व यासाठी रु.१०/- शुल्क भरण्यास सांगण्यात आले. यानंतर अपीलार्थींनी दि. १०.०३.२००८ रोजी नव्याने अर्ज सादर केला व ५४ कामगारांशी संबंधित आदेशांच्या सत्यप्रतींची मागणी केली. यावर दि.८.०४.२००८ रोजी अपीलार्थींना असे कळविण्यात आले की त्यांनी कागदपत्रांचे शुल्क रु९०/- चा भरणा करावा. तथापि यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि.८.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर असा निर्णय देण्यात आला की अपीलार्थींना अपीलावरील आदेशाच्या दिनांकापासून ७ दिवसाच्या आत माहिती विनामुल्य माहिती पुरविण्यात यावी. या आदेशाने समाधान न झाल्याने त्यांनी दि.५.०८.२००८ रोजी अयोगाकडे व्दितीय अपली दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की ४८ कामगारांच्या नेमणूकीच्या आदेशाची प्रती अपीलार्थींना विहित मुदतीत

पुरविल्या आहेत. उर्वरित कामगारांच्या आदेशाच्या प्रती उपलब्ध झालेल्या नसल्याने पुरविता आल्या नाहीत. यावर असे निर्देश देण्यात येतात की उर्वरित ६ सफाई कामगारांच्या नेमणूकीच्या आदेशांचा शोध घ्यावा व त्याच्या प्रती अपीलार्थींना सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत पुरविण्यात याव्यात.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९०४/०२

श्री.सुरेशचंद्र कुंदनलाल वर्मा ------ अपीलकर्ता
योगेश ज्वेलर्स, सराफ बाजार, अमळनेर,जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
आरोग्य निरिक्षक,नगर परिषद अमळनेर, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
आरोग्य निरिक्षक,नगर परिषद अमळनेर, जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थींनी दि. ५.०२.२००८ च्या अर्जान्वये आराग्य विभागातील १५३ कायमस्वरुपी सफाई कामगारांची यादी मागितलेली होती. ही यादी अपीलार्थींना पुरविण्यात येईल असे त्यांना दि.१६.०२.२००८ रोजी कळविण्यात आले व यासाठी रु.१०/- शुल्क भरण्यास सांगण्यात आले. यानंतर अपीलार्थींनी दि. १०.०३.२००८ रोजी नव्याने अर्ज सादर केला व ५४ कामगारांशी संबंधित आदेशांच्या सत्यप्रतींची मागणी केली. यावर दि.८.०४.२००८ रोजी अपीलार्थींना असे कळविण्यात आले की त्यांनी कागदपत्रांचे शुल्क रु९०/- चा भरणा करावा. तथापि यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि.८.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर असा निर्णय देण्यात आला की अपीलार्थींना अपीलावरील आदेशाच्या दिनांकापासून ७ दिवसाच्या आत माहिती विनामुल्य माहिती पुरविण्यात यावी. या आदेशाने समाधान न झाल्याने त्यांनी दि.५.०८.२००८ रोजी अयोगाकडे व्दितीय अपली दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की ४८ कामगारांच्या नेमणूकीच्या आदेशाची प्रती अपीलार्थींना विहित मुदतीत पुरविल्या आहेत. उर्वरित कामगारांच्या आदेशाच्या प्रती उपलब्ध झालेल्या नसल्याने पुरविता आल्या नाहीत. यावर असे निर्देश देण्यात येतात की उर्वरित ६ सफाई कामगारांच्या नेमणूकीच्या आदेशांचा शोध घ्यावा व त्याच्या प्रती अपीलार्थींना सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत पुरविण्यात याव्यात.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४२२१/०२

श्री.सुमिर सभरवाल **------ अपीलकर्ता**
२ ग्रॉटो बिल्डिंग,३३ वा रस्ता व ९ रस्ता,
यांच्या नाक्यावर,ओल्ड खार,
मुंबई ४०० ०५२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग वांद्रे

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (इमा व कार)
बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग कार्यालय वांद्रे

- वि वे च न -

अपीलकार श्री.सुमिर सबरवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर दि.२१.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२९.१०.२००८ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती. एचडब्ल्यु/०७२०२१६५५७/अेईबी या कागदपत्रानुसार मान्य केलेल्या अवैधबाबी संबंधी महानगरपालिका अधिनियमांतर्गत केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि. १०.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. २१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

अर्जदाराच्या व्दितीय अपीलात त्यांना माहिती देण्यास उशीर लागला/ माहिती दिलीच नाही म्हणून दंडाची मागणी केली आहे. जन माहिती अधिका-यांनी त्यांना अधिनियमाच्या कलम २० नुसार विलंबाबद्दल दंड का करु नये यांचा लेखी खुलासा आयोगापुढे उपस्थित राहून दि.१८.०९.२००९ रोजी करावा.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४२१४/०२

श्री.सुमिर सभरवाल **------ अपीलकर्ता**
२ ग्रॉटो बिल्डिंग,३३ वा रस्ता व ९ रस्ता,
यांच्या नाक्यावर,ओल्ड खार,
मुंबई ४०० ०५२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग वांद्रे

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (इमा व कार)
बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग कार्यालय वांद्रे

- वि वे च न -

अपीलकार श्री.सुमिर सबरवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर दि.२१.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१८.११.२००८ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती. "अपीलकाराच्या दि.१७.११.२००८ च्या पत्रावर केलेल्या कारवाईच्या अहवालाची मागणी केली होती" आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रतीसाठी रु.५/- एवढे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कळविले असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. परंतू अपीलकाराने विहित शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतली नाही असे दिसते. अर्जदाराचे म्हणणे असे की माहितीसाठी शुल्क मागत असतांना किती पृष्ठे माहिती देण्यात येत आहे हा आकडा कळवावयास पाहिजे. अर्जदाराची मागणी रास्त आहे याची जाणीव जन माहिती अधिकाऱ्यांनी ठेवावी व अर्जदारास माहिती अजूनही दिली नसल्यास ती सात दिवसाचे आत विनामुल्य द्यावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४२१८/०२

श्री.सुमिर सभरवाल **------ अपीलकर्ता**
२ ग्रॉटो बिल्डिंग,३३ वा रस्ता व ९ रस्ता,
यांच्या नाक्यावर,ओल्ड खार,
मुंबई ४०० ०५२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग वांद्रे

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (इमा व कार)
बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग कार्यालय वांद्रे

- वि वे च न -

अपीलकार श्री.सुमिर सबरवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२९.१२.२००८ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" दिनांक १.०९.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त/एच,पश्चिम विभाग यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते सदर अपीलावर दि.२२.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी पारित केलेल्या आदेशाची प्रत मागितली होती. "

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.७.०१.२००९ च्या पत्रान्वये दिनांक ४.११.२००८ च्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिली. सदर आदेशाची प्रत अपीलकारास उपलब्ध करुन दिली असल्याचे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.२०.४.२००९ रोजी लेखी अहवाल सादर करुन आयोगास कळविले आहे.

मात्र प्रथम अपीलातील आदेशात जे निर्देश देण्यात आलेत त्याचे मुदतीत पालन होणे आवश्यक आहे याची जन माहिती अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी. सबब मी खालीलप्रमाणे आदेश दत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ९५६/०२

श्री.सुरेशचंद्र कुंदनलाल वर्मा ------ **अपीलकर्ता**
योगेश ज्वेलर्स,सराफ बाजार
अंमळनेर जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
सहाय्यक धर्मादाय आयुक्त जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थींनी दि.२६.०२.२००७ च्या अर्जान्वये सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या दि.१.०९.२००६ च्या आदेशाच्या अनुषंगाने अशी माहिती मागितली की या आदेशाची अंमलबजावणी कोणत्या प्रकारे झाली आहे. तथापि यावर माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. २६.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर सुनावणी होऊन अपील अशंतः मंजूर करण्यात आले व त्यानुसार अपीलार्थींना माहिती देण्याचे आदेश दि.१८.१२.२००७ रोजी पारित करण्यात आलेत. यावर समाधान न झाल्याने अपीलार्थींनी दि.२९.०१.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी असे निदर्शणास आणण्यात आले की, अपीलार्थींनी निरीक्षण अहवालासंबंधी मागितलेली माहिती निरीक्षण अहवालावर आदेश न झाल्याने पुरविता आलेली नाही. तथापि इतर माहिती अपीलार्थींना पुरविण्यात आलेली आहे. निरीक्षण अहवालच्या अनुषंगाने सहाय्यक धर्मादाय

आयुक्त यांना आदेश पारित करण्याबाबतची बाब माहिती आयोगाच्या अधिकार कक्षेत येत नाही. याचा विचार करता असे निर्देश देण्यात येतात की आदेश पारित झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना त्याबाबत लवकरात लवकर अवगत करावे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ९५६/०२

श्री. चंद्रकांत भानुदास भदाणे ------ **अपीलकर्ता**
समर्थ नगर, कॉटन मार्केट समोर,
रा.अमळनेर,जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
सहाय्यक धर्मादाय आयुक्त अमळनेर, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
श्रमसाफल्य एज्यूकेशन सोसायटी अमळनेर, जि. जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. चंद्रकांत भानुदास भदाणे,यांनी दि.१६.०९.२००८ रोजी अर्ज सादर करुन समाजकार्य महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते अर्जाच्या तारेखेपर्यंत महाविद्यालयात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतन विश्चितीची माहिती तसेच रमाई बी.पी.एड. विद्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीचा तपशील इत्यादिची मागणी केली. या माहिती अर्जाला उत्तर न मिळाल्याने त्यांनी दि. १६.१०.२००८ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला या अर्जावर दि.११.१२.२००८ रोजी आदेश पारित करण्यात येऊन अपील निकाली काढण्यात आले. यानंतर अपीलार्थींनी दि.४.०२.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी अपीलार्थी गैरहजर होते. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणेले की अपिलार्थींनी विचारलेली माहिती संस्था देण्यात तयार आहे परंतु वारंवार निरोजप देऊन देखिल अपीलार्थी संस्थेत उपस्थित राहून माहिती घेण्यास आले नाहीत. संस्था

अपिलार्थींस माहिती देण्यास तयार असल्याने अपलार्थींचे अपील निकाली काढण्यात येत आहे. याचवेळी असेही आदेश देण्यात येतात की अपीलार्थींनी संस्थेशी संपर्क साधून संस्थेच्या कार्यालयातून त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ९५६/०२

श्री. चंद्रकांत भानुदास भदाणे ------ **अपीलकर्ता**
समर्थ नगर, कॉटन मार्केट समोर,
रा.अमळनेर,जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
सहाय्यक धर्मादाय आयुक्त अमळनेर, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
श्रमसाफल्य एज्यूकेशन सोसायटी अमळनेर, जि. जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. चंद्रकांत भानुदास भदाणे,यांनी दि.१६.०९.२००८ रोजी अर्ज सादर करुन समाजकार्य महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते अर्जाच्या तारेखेपर्यंत महाविद्यालयात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतन विश्चितीची माहिती तसेच रमाई बी.पी.एड. विद्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीचा तपशील इत्यादिची मागणी केली. या माहिती अर्जाला उत्तर न मिळाल्याने त्यांनी दि. १६.१०.२००८ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला या अर्जावर दि.११.१२.२००८ रोजी आदेश पारित करण्यात येऊन अपील निकाली काढण्यात आले. यानंतर अपीलार्थींनी दि.४.०२.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी अपीलार्थी गैरहजर होते. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणेले की अपिलार्थींनी विचारलेली माहिती संस्था देण्यात तयार आहे परंतु वारंवार निरोजप देऊन देखिल अपीलार्थी संस्थेत उपस्थित राहून माहिती घेण्यास आले नाहीत. संस्था

अपिलार्थींस माहिती देण्यास तयार असल्याने अपलार्थींचे अपील निकाली काढण्यात येत आहे. याचवेळी असेही आदेश देण्यात येतात की अपीलार्थींनी संस्थेशी संपर्क साधून संस्थेच्या कार्यालयातून त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ९९१/०२

श्री. शामसोद्दीन शेख चिरांगोद्दिन, **------ अपीलकर्ता**
खिर्नीपुरा, खल्ला वाडा, यावल,
मु.पो.ता.यावर,जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
मुख्याधिकारी, नगर परिषद, यावल,ता.यावल,जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ट अभियंता, नगर परिषद, यावल,ता.यावल,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. शामसोद्दीन शेख चिरांगोद्दिन, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १.१२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३१.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.०८.२००८ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

"दि.२१.०६.२००८ च्या नोटीसी अन्वये श्री. शरुफोद्दीन गयासोधीन यांना विनापरवानगीने शौचालयाचे बांधकाम काढून टाकणेबाबत सूचना दिली. परंतू शौचालय बांधकाम किती दिवसात काढावे याबद्दल लिहिले नाही. नोटीसीत मुदत घालणे विषयी नियम आहेत काय? याची माहिती मुदतीत बेकायदेशिर बांधकाम संबंधीत इसमाकडून काढण्यात आले नाही तर किती दिवसात बेकायदेशिर बांधकामाबाबत नगर

पालिकेडून कारवाई करण्यात येते याबाबत नियम असतील तर माहिती द्यावी " जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१२.०९.२००८ रोजी माहिती पुरविली. यामळु समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि. २६.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली परंतू आदेश परित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१२.०९.२००८ रोजी माहिती दिली आहे. त्याबाबत अपिलकाराचे संपूर्ण समाधान झालेले आहे. याबाबत आता काहीही तक्रार राहिलेली नाही. म्हणून दि. १.१२.२००८ चे व्दितीय अपील निकाली काढावे असे लेखी निवेदन अपीलकाराने आयोगास सुनावणीचेवेळी सादर करुन विनंती केली आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९६१ /०२

श्री. ओमप्रकाश सिताराम अग्रवाल **------ अपीलकर्ता**
१२२, नवी पेठ, जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.लि.
एम.आय.डी.सी. जळगांव,जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.लि.एम.आय.डी.सी. जळगांव,
जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. ओमप्रकाश सिताराम अग्रवाल,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १.०२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३१.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१४.११.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" एच.टी.कंझुमर तिरूपती पाईप आणि अलाइड इंडस्ट्री लि. यांच्या बीलात दार्शविलेल्या थकबाकी एकूण ४ मुद्यावर माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने दि.२४.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी

सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.या प्रकरणी बाब न्याय प्रविष्ट असल्याच्या कारणावरुन अपीलकारास माहिती पुरविलेली नाही असे दिसते. अपीलकारास माहिती पुरविण्यास मा. न्यायालयाने मनाई केलेली नाही असे दिसते. तरी जन माहिती अधिकाऱ्यानी हे आदेश प्राप्त झाल्यापासुन १० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाण आदेश देत आहे.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९६६ /०२

श्री. मुरलीधर पांडू बुंदे, **----- अपीलकर्ता**
दांडेकर नगर, प्लॉट नं.६७, पिंप्राळा,
जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
जळगांव शहर महानगर पालिका, जळगांव जि. जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
जळगांव शहर महानगर पालिका, जळगांव जि. जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. मुरलीधर पांडू बुंदे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०१.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३१.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३.११.२००८ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" जळगांव नगरपालिका/महानगरपालिका, जळगांव यांनी जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत किती आरक्षण केले आहेत. त्यापैकी किती आरक्षण, मुळ आरक्षण वगळून रहिवाशी भागात समाविष्ट करणेबाबत ठराव केलेले आहेत. त्याचा अंतिम निर्णय काय लागला" इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि. ३.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. दरम्यान जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.३.१२.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले. प्रथम अपीलांवर दि.३१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकाऱ्यांनी उशिराने माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले होते. आता अपीलकारास ७ दिवसाचे आत विनामुल्य माहिती द्यावी असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.३१.१२.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती देणेस टाळाटाळ केले. चुकीची माहिती परंविली यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले. अर्जातील मुद्दा क्र.१ ते ३ ची माहिती मिळाली असल्याने अपीलकाराने दिलेली पोच, जन माहिती अधिकाऱ्यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९७२ /०२

श्री. रामकृष्ण शंकर पाटील, ----- अपीलकर्ता
महालक्ष्मी कॉलनी, भडगांव, जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,जळगांव, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य,शासकीय आय.टी.आय.भडगांव,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. रामकृष्ण शंकर पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३१.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.६.१०.२००८ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" धुळे नंदुरबार जिल्हा सरकारी नोरांची सहकारी बँक लि.धुळे शाखा चाळीसगाव या बँकेने श्री.निवृत्ती धोंडीराम कोरडे यांची माहे एप्रिल २००६ ते माहिती आक्टोंबर २००७ या कालावधीतील पगारातून मागणी केलेली संपूर्ण रक्कम वसूल करून सदर बँकेकडे पाठविली नाही.

१) कोणत्या कागदपत्रकांच्या आधारे श्री निवृत्ती धोंडीराम कोरडे यांची सदर बँकेस देया असलेली रक्कम पगारातून कपात करुन सदर बँकेकडे पाठविली नाही. त्या कागदपत्रकांच्या सत्यप्रती देण्याची कृपा करावी. "

जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.११.१०.२००८च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे अपीलकारास उत्तर दिले.

" संस्थेतील माजी लेखापाल श्री. डी.एस.कात्रे, यांची बदली समयोजनाव्दारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,जळगांव जि.जळगांव येथे झालेली असुन त्यांनी त्यांच्या कडील लेखा विभागाची संपुर्ण कार्यभार अद्यापर्यंत लिपीकाकडे दिलेला नाही तसेच कार्यभार देण्याविषयी वरिष्ठ कार्यालयाकडुनही कार्यवाही सुरू आहे.

तरी सदर कार्यभाराची कार्यवाही पुर्ण होताच संदर्भीय विषयानुसार मागणी केलेले रेकॉर्ड आपणास उपलब्ध केले जाईल. "

जन माहिती अधिकाऱ्यांनी दिशाभूल करणारे उत्तर दिले असल्याच्या कारणावरुन प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे दि.१३.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणी देऊन दि.१६.१२.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. सुनावणीचेवेळी प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी लेखी अहवाल सादर करुन असे प्रतिपादन केले की अपीलकारास प्रथम अपीलाच्या दिवशी माहिती दिलेली आहे. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९६९ /०२

श्री. महमंद शफी अकमलोद्दीन काझी **----- अपीलकर्ता**
काझीवाडा, वाडी चौक, मु.पो.ता. अमळनेर,
जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
अधिक्षक भूमी अभिलेख, जळगांव, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक भूमी अभिलेख, जळगांव, जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. महमंद शफी अकमलोद्दीन काझी, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०१.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३१.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१६.०८.२००८ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" अपीलार्थीने खरेदी केलेल्या जमिनीसंदर्भात नोंद त्याचे नावे मिळकत पत्रिकेवर घेण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्याकडून विलंब झालेला आहे. अशा प्रकारच्या बेपवाईबाबत त्यांचेवर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची अधिक्षक भूमी अभिलेख जळगांव यांना शिफारस केली. तरी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे संबंधीत कर्मचाऱ्याविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. " याबाबत राज्य माहिती आयुक्त,खंडपीठ औरंगाबाद यांनी अपील क्र.२००७/११८१ मध्ये आदेश पारित केले आहेत. त्यानुसार संबंधीत कर्मचाऱ्यावर करण्यात आलेल्या कारवाईची अपीलकाराने

माहिती मागीतली आहे. प्रशासकीय कारवाई सुरू आहे असे जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

श्री.व्हि.व्हि.जाधव, तत्कालीन परिरक्षण भूमापक,अमळनेर,विद्यमान मुख्यालय सहाय्यक यांच्याकडे नगर भूमापन क्र.१३९३ व १४१० या मिळकत पत्रिकेवर नाव दाखल करण्यासाठी श्री.खलील शेख खलील यांनी अर्ज केला होता. श्री.जाधव यांनी दि.६.०१.२००७ रोजी टिप्पणी तयार केले. दि.१.२.२००७ रोजी आदेश तयार केले. अर्जदार यांनी अर्ज दाखल केल्यानंतर सव्वा वर्षांनी अत्यंत विलंबाने मिळकत पत्रिकेवर नोंद घेण्याची कार्यवाही करावी असे राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांनी अपील क्र. ११८१ मध्ये आदेश दिले आहेत. सदर आदेशानुसार केलेल्या कारवाईची मागणी अपीलकारास दिल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. माहितीच्या अधिकाराखालील प्राप्त माहिती अथवा इतर स्त्रोताव्दारे प्राप्त झालेले शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्याविरुध्दचे पुरावे सादर झाल्यास त्वरित कारवाई करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत. श्री.जाधव यांची एक वेतनवाढ रोखण्याचे, भूमी अभिलेख विभागाने दि.१५.०१.२००९ रोजी आदेश पारित केले असल्याचे सुनावणीचेळी आदेश सादर करुन जन माहिती अधिकाऱ्यांनी तसे प्रतिपादन केले. तसेच अर्जदारास त्याची प्रत माहिती म्हणून दिली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ८६० /०२

श्री. कृष्णराज हेमराज पाटील **----- अपीलकर्ता**
कमलनगर, जी.आय.एस. कॉलनी, बाळद रोड,
भडगांव, जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं),जिल्हा परिषद,जळगांव,जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
गटविकास अधिकारी ,पंचायत समिती, भडगांव,जा.भडगांव,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. कृष्णराज हेमराज पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.०७.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२५.०३.२००८ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" पंचायत समिती भडगांव,च्या कार्यक्षेत्रात किती सार्वजनिक स्वच्छतागृहे, (शौचालय) असलेल्या ग्रामपंचायती आहेत. शौचालयाची गावनिहाय संख्या (अस्तित्वात असल्यास) तसेच शौचालय बांधण्याचे प्रस्तावित असल्यास त्याबाबतची अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे दि.२६.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने माहितीपोटी शुल्क भरले नसल्याने माहिती पुरविली नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नव्हती. आता माहिती दिली आहे. परंतु सदर माहिती चुकीची असल्याचे अपीलकाराचे म्हणणे आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास संबंधीत फाईल/कागदपत्र प्रथम अपीलकारास निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून फाईल/कागदपत्रे निरीक्षण करावे. त्यानंतर मागणीनुसार उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास द्याव्यात.

आदेश

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/४०४५२/अपील क्र. ४५८२/०२

श्री.नियाज अहमद अब्दुल मजीद, ---- --- अपीलकर्ता
व्दारा, इस्टंट पॉवर सप्लाय,२७३/१,
गरीब जवाज कंपाउंड, गुलाब शाह इस्टेट समोर,
३ री गल्ली, एलबीएस मार्ग,कर्ला (प)
मुंबई ४०० ०७०

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३,
मध्य प्रादेशिक नियंत्रण कक्ष, बावळा कंपाउंड,
भायखळा, मुंबई

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त मध्य प्रादेशिक नियंत्रण कक्ष,
बावळा कंपाउंड, भायखळा, मुंबई

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: २०.१२.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: २२.१२.२००८
शुल्क भरल्यानंतर माहिती दिल्याचा दिनांक	: २६.१२.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	: २९.०१.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	: ०९.०२.२००९
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	: ०२.०५.२००९
सुनावणीचा दिनांक	: ०७.०९.००९
अपिलार्थी	: उपस्थित
जन माहिती अधिकारी	: उपस्थित
अपिलीय अधिकारी	: अनुपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

दि.१६.१२.२००८ रोजी एम.एम.आर.डी.ए. यांनी कुर्ला पोलीस स्टेशनच्या पोलीस कर्मचारी अधिकारी यांची सुरक्षा घेऊन तोडण्यात आलेल्या गाळयाबाबत. उपस्थित पोलीस अधिकारी कर्मचारी यांची माहिती.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

संबंधीत पोलीस स्टेशनकडून माहिती मिळवून घेऊन प्रत्येक प्रशासन उत्तर देण्यात आले

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

प्रथम अपील मुदतबाहय असल्याने फेटाळण्यात आलेले आहे.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

अर्जदाराचे म्हणणे असे की, एम.एम.आर.डी.ए.ने पोलीस बंदोबस्त मागविण्यासाठी जे पत्र पाठविले आहे त्याची प्रत त्यांना पाहिजे आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे की एम.एम.आर.डी.ए.यांनी त्यांना पत्र दिले नव्हते. मात्र एम.एम.आर.डी.ए.चे काम करणारी एजन्सी एम.एस.आर.डी.सी. यांनी पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी पत्र पाठविले होते. व त्या पत्राची प्रत अर्जदारास देण्यात आलेली आहे. ज्या ठिकाणी निष्कासन करण्यात आले ते ठिकाण व ज्या ठिकाणी निष्कासन करण्यासाठी पोलीस बंदोबस्त पाहिजे होता ते दर्शविलेले आहे ते ठिकाण वेगळे आहे असे अर्जदाराचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ही एकाच रस्त्यावरील अतिक्रमणे होती. मात्र ज्या पत्रावरून पोलीस बंदोबस्तदेण्यात आला होता त्या प्रत देण्यात आलेलीच आहे या व्यतिरिक्त त्या दिवसाच्या निष्कासन प्रक्रियेसाठी इतर पत्र नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे जसे रेकॉर्ड असेल त्याप्रमाणे माहिती द्यावयाची असते व ती दिलेली आहे असे दिसून येते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ०७.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/४०४५२/अपील क्र. ४५८९/०२

श्री.डी.आर.सिंह, -------- अपीलकर्ता
संघर्ष कार्यालय, वकरी रोड,
मंगतराम पेट्रोल पंपाच्या समोर,
भांडूप (प) मुंबई ६०

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
शिक्षक निरीक्षक (पश्चिम विभाग), शिक्षण निरिक्षक,
के-पूर्व विभाग, शिक्षण निरीक्षक कार्यालय,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ६०

जन माहिती अधिकारी तथा
शिक्षक उपनिरीक्षक, शिक्षण निरिक्षक,
के-पूर्व विभाग, शिक्षण निरीक्षक कार्यालय,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ६०

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ४.०१.२००९
सुनावणीची तारीख : ७.०८.२००९
अपीलार्थींचे प्रतिनीधी व जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराचा जो कलम ६ खालचा दिनांक २४.०९.२००७ रोजीचा अर्ज होता त्यास दिनांक ८.०१.२००७ रोजीच्या पत्राने मुद्देसुद माहिती देण्यात आलेली आहे असे दिसून आले. आता फक्त प्रश्न श्रीयुत. तिवारी यांच्या सिनॉरीटीच्या माहितीचा आहे यासंबंधी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की त्यांनी स्वत: संबंधीत शाळेत जाऊन दोघांची सेवा पुस्तके पाहून सिनिऑरीटी संबंधीत सुध्दा त्याचे मत श्रीयुत तिवारी यांना सांगितलेले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार सिनिऑरीटी

ठरविण्याचा अधिकार हा शाळेच्या मॅनेज मेंटचा आहे व निर्णयाविरुध्द अपील अर्थी शाळा निरीक्षक यांच्याकडे करु शकता. असे जर लेखी अपील असेल तर अर्थातच त्याचा निर्णय हा शाळा निरीक्षक हे देतील माहितीच्या अधिकारामध्ये माहिती देतांना योग्य ती माहिती दिलेली आहे असे दिसून आले.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ०७.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ८७२ /०२

श्री. भिमराव परबत पाटील ----- अपीलकर्ता
रा. येवती,पो.जामठी,ता.बोदवड,जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
गटविकास अधिकारी,पंचायत समिती,बोदवड,जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
गटविकास अधिकारी,पंचायत समिती,बोदवड,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. भिमराव परबत पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०९.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते तसेच अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३.०४.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मातिगतली होती.

" मौजे येवती येथील ग्रामपंचायतीच्या मनमानी व भ्रष्टाचाराबाबत केलेल्या तक्रारीवरील कारवाईबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिनी नसल्याने अपीलार्थीने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.३०.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलार्थीस ७ दिवसाचे आत माहिती द्यावी असे आदेश पारित केले. सदर आदेशास अनुसरून जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१०.०७.२००८ च्या पत्रानुसार एकूण २४ पृष्ठ माहिती पुरविली. त्यानंतरही माहिती मिळाली नसलच्या कारणावरुन अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलातील कागदपत्रांची तपासणी केली असता मुळ

माहितीच्या अर्जामध्ये कोणतीही स्पष्ट माहितीची मागणी नाही.फक्त उपोषणचे वेळी दिलेल्या आश्वासनानुसार कारवाई/कामे झाली नसल्याचा अर्जात उल्लेख आहे. अपीलार्थी यांना दि.१०.०७.२००८ च्या पत्रानुसार एकूण २४ पानाच्या छायाप्रती पुरविल्या असल्याचे दिसते. त्यामध्ये येवती गावातील २ रस्त्याचे कांक्रीटीकरण.गटर बांधकाम,शौचालय बांधकाम इत्यादी कामाबाबतचा खर्च केलेल्या कामाची माहिती अपीलार्थी यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी पुरविली असल्याचे दिसते. मात्र अर्जदारांना माहिती बरोबरच ग्रामपंचायती विरुध्द कारवाई अपेक्षित आहे. तत्कालीन ग्रामसेवक व संरपंच यांचे विरुध्द असा प्रस्ताव हि सादर केलेला आहे असे जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांना सांगितले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे. "

आदेश
अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.९५८/०२

श्री. चंद्रकांत भानुदास भदाणे **------ अपीलकर्ता**
समर्थ नगर,कॉटन मार्केट समोर,
अमळनेर जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी (१) **-------उत्तरवादी**
श्रमसाफल्य एज्यूकेशन सोसायटी जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा (२) **-------उत्तरवादी**
सहाय्यक धर्मदाय आयुक्त जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
चेअरमन, श्रमसाफल्य एज्यूकेशन सोसायटी जळगांव

- वि वे च न -

अपील दाखल केल्याचा दिनांक :०४.०२.२००९
सुनावणीचा दिनांक :३१.०७.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी (१) : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी (२) : उपस्थित

अपिलार्थींनी त्यांच्या विरुध्द सुरू असलेल्या विभागीय चौकशीच्या संदर्भात संस्थेकडे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची मागणी दि.१४.०५.२००८ च्या अर्जान्वये केली होती.

तथापी त्यांना अपेक्षित माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.२६.१२.२००८ रोजी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी दि. १६.१२.२००८ च्या आदेशाव्दारे अपील खारीज केले. यानंतर अपीलार्थींनी वर उल्लेख केल्याप्रमाणे दुसऱ्यांदा प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते.

माहिती अप्राप्त असल्याचे कारणे दर्शवून अपीलार्थींनी दि.४.०२.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीचे वेळी सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी स्पष्ट केले की त्यांना प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून अपील चालविण्याचा अधिकार नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की अपीलार्थींना कागदपत्रे पुरविण्यात आली आहेत तसेच अपीलार्थीच्या विरुध्द विभागीय चौकशी पुर्ण झाली असून त्यांना दि.२०.०७.२००८ पासून संस्थेच्या सेवेतून कार्यमुक्त करण्यात आले आहे. ही बाब विचारात घेता अपीलार्थींचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ५.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ८६३ /०२

श्री. भिला निंबा पाटील **----- अपीलकर्ता**
मु.टेकडेवाडी, पो. वाडे, ता.चाळीसगांव, जि. जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, जळगांव, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, संत सोमगीर माध्यमिक विद्यालय, भिलाली,ता.पारोळा,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. भिला निंबा पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०७.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते तसेच अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२५.०४.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मातिगतली होती.

" संत सोमगीर माध्यमिक विद्यालय भिलाली संबंधीत शाळा व संस्थेची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.१०.०६.२००८रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती तयार असून ती अपीलकारास उपलब्ध करुन देण्याची जन माहिती

अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तयारी दर्शविली या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. "

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ८३५ /०२

श्री. विजय सुकदेवराम यादव ------- **अपीलकर्ता**
घर नं.१६ एक,एम,एम,पार्क महाविर नगर,
दुध फेडरेशन जवळ जळगांव,
जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
मुध्याध्यापक, सेंट जोसेफ कॉन्हवेंट हायस्कुल,जळगांव,जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
सेंट जोसेफ कॉन्हवेंट हायस्कुल,जळगांव,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. विजय सुकदेवराम यादव, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०७.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते तसेच अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२५.०३.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मातिगतली होती.

" सेंट जोसेफ कॉन्हवेंट हायस्कुल,जळगांव या शाळेत नववी ते दहावी पर्यंत किती वर्ग संस्था आहे. वर्गनुसार विद्यार्थी संख्या,शिक्षक संख्या,त्याच्या व्यक्तीगत अर्हता व त्यांना प्रदान करण्यात येणारे मासीक वेतन. नर्सरी ते दहावी इयताच्या विद्यार्थ्यांना लावण्यात आलेली वार्षिक फी वर्गवारीनुसार किती इत्यादी माहिती

मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. म्हणून अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.२३.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित५ केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता संस्थेचे चेअरमन श्री. थेरेस,शाळेचे प्राचार्य उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. शाळा खाजगी संस्थेची आहे. शासनाकडून शाळेस अर्थ सहाय्य दिले जात नाही. यामुळे सेंट जोसेफ कॉनव्हेंट हायेस्कूल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. यामुळे अपीलकारास माहिती देणे बंधणकारक नाही. म्हणून माहिती नाकारली यावरुन असे सिध्द होते की शाळा खाजगी संस्थेची आहे. खाजगी संस्थांना जेथे शासनाकडून अर्थसहाय्य दिले जात नाही त्यांना माहितीचा अधिकार कायदा लागू नाही या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे. "

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ८४५ /०२

श्री. माधवराव शंकर पाटील, **------- अपीलकर्ता**
रा.पारोळा,जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, जळगांव, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, संत सोमगीर माध्यमिक विद्यालय, भिलाली,ता.पारोळा,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. माधवराव शंकर पाटील,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०६.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होत तर अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२५.०४.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" संत सोमगीर माध्यमिक विद्यालय भिलाली संबंधीत शाळा व संस्थेची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.१०.०६.२००८रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती तयार असून ती अपीलकारास उपलब्ध करुन देण्याची जन माहिती

अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तयारी दर्शविली या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिकाऱ्यांविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार शास्तीची कारवाई करण्यात येईल "

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.४६०५/०२

श्री. डॉ.के.एस.पिलाई **------ अपीलकर्ता**
बी-१/१,नारायण पुजारी नगर, ए.जी.खान रोड,
वरळी, मुंबई- ४०० ०१८

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **-------उत्तरवादी**
कार्यकारी आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग,
बृ.मु.मनपा,एफ/साऊथ वार्ड, इमारत ३ रा मजला,
डॉ.आंबेडकर रोड,परेल,मुंबई ४०० ०१२

जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अधिकारी आरोग्य अधिकारी (मुख्यालय),
सार्वजनिक आरोग्य विभाग, बृ.मु.मनपा,एफ/साऊथ वार्ड,
इमारत ३ रा मजला, डॉ.आंबेडकर रोड,
परेल,मुंबई ४०० ०१२

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक :२२.०६.२००९
सुनावणीचा दिनांक : ८.०९.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
अपीलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्यांना प्रमोशन नाकारले गेले असल्यामुळे त्यांनी हायकार्टात धाव घेतली होती. मात्र गोपनीय अहवालाच्या आधारे ते अर्जदार प्रमोशनचा निष्कर्ष पुर्ण करु शकत नसल्यामुळे प्रमोशासाठी त्यांचा विचार करण्यात आला नव्हता असे दिसून येत होते. त्या वेळेला अर्जदारानी हायकोर्टाकडे पिटीशन परत घेत असल्याची विनंती केली होती व गोपनीय

अहवाला विरुध्द प्रतिवेदन करणार असल्याचे निवेदन हायकोर्टाला दिले होते. त्यानुसार पिटीशन परत घेण्यास परवानगी दिली होती व अर्जदाराने त्यांचे प्रतिवेदन ही महापालिकेला दिले होते. सदरील प्रतिवेदनाच्या बाबतील माहितीची मागणी ही अर्जदाराने त्यांच्या दि.२६.०३.२००९ रोजीच्या अर्जाने केलेली होती. मात्र अर्जदाराची विनंती ही वैयक्तीक स्वरुपाची आहे व त्याचा जन हिताशी काही संबंध नाही म्हणून नाकारण्यात आली हाती व हाच निर्णय अपीलात कायम करण्यात आलेला होता. त्या अर्थी सदरचे अपील.

अर्जदाराने प्रतिवेदन दिले होते त्यावर महापालिकेच्या सक्षम प्राधिकाऱ्याने निर्णय दिलेला असल्यास अर्जदार मागत असलेले कागदपत्र त्यांना देण्यास काहीच हरकत नाही. तसेच ज्या ज्या वेळेला श्रीयुत पिले यांना प्रमोशन नाकारण्यात आले त्या वेळच्या डिपार्टमेंटल प्रमोशन कमिटीचा (डिपार्टमेंटल प्रमोशन कमिटीच्या व्यक्तिगत सदस्यांच्या नोंदी न देता) अंतिम जो निर्णय असेल त्यासंबंधीची माहिती सुध्दा अर्जदारास देण्यात यावी. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

<u>आदेश</u>

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी व अर्जदारास माहिती देण्यात यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ८.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ८४५ /०२

श्री. माधवराव शंकर पाटील ------- अपीलकर्ता
रा.पारोळा,जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, जळगांव, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, संत सोमगीर माध्यमिक विद्यालय, भिलाली,ता.पारोळा,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. माधवराव शंकर पाटील,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०६.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होत तर अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२९.०४.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" संत सोमगीर माध्यमिक विद्यालयाचे कामकाज, मुख्याध्यापकाचे कामकाज व वैयक्तीक माहिती, सेवा पुस्तकाची सत्यप्रत, कर्मचाऱ्याची रजा,गोपनीय अहवालाची प्रत,शाळा सुरु झाल्यापासून वर्षभर आर्थी पत्रके शाळेचे झेंडावंदनसाठी अध्यक्ष व व्यवस्थान यांना का आमंत्रीत करीत नाहीत यांचा खुलासा,जळगांव जिल्हा बँकेत शाळेच्या नावाने किती खाते आहेत. कोण्याच्या सहाय्यानी व्यवहार केला जातो त्यांची नावे,शाळा समितीच्या प्रोसीडींगची प्रत इत्यादी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत

माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलार्थी हे सदर महाविद्यालयाचे संचालक संस्थेचे अध्यक्ष होते. त्यामळे मुख्याध्यापक कर्मचारी विरुध्द संस्था यांच्यात वाद असून मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे याचिका क्र.११४८/०४ दाखल करण्यात आली असल्याचे उत्तरवादीनी व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अपीलकाराने मागणी केलेली काही माहिती त्रयस्थ पक्षाची आहे. त्रयस्थ पक्षाची माहिती अपीलकारास द्यावी किंवा नाही याबाबत प्रथम संबंधीतांची सम्मती घ्यावी व त्यानुसार कारवाई करावी. गोपनीय अहवालाच्या प्रती अपीलकारास देता येत नाहीत. शाळा समितीच्या प्रोसिंडींगची छायाप्रत तसेच इतर माहिती अपीलकारास देण्यात यावी."या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील अंशत:मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ८४६ /०२

श्री. माधवराव शंकर पाटील ------- अपीलकर्ता
रा.पारोळा,जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, जळगांव, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, संत सोमगीर माध्यमिक विद्यालय, भिलाली,ता.पारोळा,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. माधवराव शंकर पाटील,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०६.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होत तर अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०१.०२.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मातिगतली होती.

"१. संत सोमगीर माध्यमिक विद्यालयाची सन १९९७-९८ ची मंजूर कर्मचारी सूची.

२. मुख्याध्यापक यांचे वेतनवाढ व रजा कोणत्या व्यवस्थापनाने अध्यक्ष यांचे सहीने मंजूर केले आहे. त्या अध्यक्षाचे नाव व संस्थेचे नाव.

३. शाळेत कोणत्या वर्गास पोषण आहारासाठी मदत मिळत आहे.

४. शाळेची बेकायदेशिर शाळा समिती दि.७.०५.२००६ ला स्थापन केली त्या समिती सदस्यांची नावे व पत्र (५) वर्गनिहाय पट संख्या (६)शाळेच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची यादी, नेमणूक तारीख वेतन इत्यादीसह (७) शाळेच्या कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठता यादी (८) बिंदू नामावलीची प्रत (९) बॅकेतील व्यवहार कोणत्या अध्यक्षांच्या सहीने सुरू आहेत त्यांचे नाव इत्यादि माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.२२.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित होते व त्यामुळे त्यांचे अपील निकाली काढल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिलेली नव्हती. अपीलकारानी मागणी केलेली माहिती देण्याची उत्तरवादीनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी तयारी दर्शविली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देतो की जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यानंतर १० दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. तसेच अपीलीय अधिकारी यांनी जरी अपीलार्थी अनुपस्थित असले तरी कागदपत्रांच्या आधारे निर्णय देता येतो हे लक्षात घ्यावे व यापुढे प्रथम अपीलाचा निर्णय देत जावा.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ८३४ /०२

श्री. विजय सुकदेवराम यादव ------- **अपीलकर्ता**
घर नं.१६ एक,एम,एम,पार्क महाविर नगर,
दुध फेडरेशन जवळ जळगांव,
जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
मुध्याध्यापक, सेंट जोसेफ कॉन्हवेंट हायस्कुल,जळगांव,जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
सेंट जोसेफ कॉन्हवेंट हायस्कुल,जळगांव,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. विजय सुकदेवराम यादव, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०७.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते तसेच अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१५.०३.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मातिगतली होती.

"१. जळगांव शहर महानगरपाकिा मार्फत आपल्या शाळेसाठी एकूण किती स्केअरुफुट जागा मिळाली ?केंव्हा कोणत्या वर्षी.

२. एकूण जागेपैकी किती स्क्वेअरफुट बांधकाम करण्यात आले व किती स्क्वेअरफुट ओपनस्पेस ठेवण्यास साठी आवश्यक ते कागदपत्र छायांकित.

३. एकूण वार्षीक भाडे,जागेचे,व एकूण किती ?

४. आपसामध्ये करण्यात आलेल्याची करारनामा छायांकित प्रत. "

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.२३.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केले नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलार्थींनी सेंट जोसेफ कॉन्हवेंट हायस्कुल,जळगांवला जळगांव नगरपालिकेने किती चौ.फुट जागा दिली. केंव्हा काणत्यावर्षी दिली याबाबत अनुषंगीक माहिती मागितली आहे. सदर इंग्रजी माध्यमाची शाळा खाजगी संस्थेमार्फत चालविण्यात येते.शाळेस शासनाकडून प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष कोणतेही अनुदान मिळत नाही. यामुळे सदर शाळेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही शाळेच्या प्राचार्यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. सदरबाब लक्षात घेता खाजगी संस्था,शाळांना शासनाकडून अनुदान देण्यात येत नसल्यास माहितीचा अधिकार बंधनकारक होत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.४६११/०२

श्री. अशोककुमार मारुती शिंदे ------ अपीलकर्ता
सुर्य-किरण को.ऑ.हौ.सोसायटी अे विभाग,
दुसरा माळा, रुम नं. २०१, आकुर्डी रोड,
कांदिवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------उत्तरवादी
अधिक्षक अभियंता, रा.बा.मंडळ, मर्झबान रोड, मुंबई ०१

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता मध्य विभाग,गणपत जाधव मार्ग वरळी मुंबई १८

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक :२२.०४.२००९
सुनावणीचा दिनांक : ८.०९.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

सुनावणीच्या वेळेला अर्जदाराने त्यांना माहिती मिळालेली असून त्यांचे समाधान झालेले आहे असे त्यांनी सांगितले.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ८.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९८७ /०२

श्री. उमाकांत मुरलीधर पाटील ------- अपीलकर्ता
मु.पो.फुलगांव,ता.भुसावळ,
जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
मुख्यकार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जळगांव, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा,जिल्हा परिषद,जळगांव,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री. उमाकांत मुरलीधर पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३१.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होत तसेच अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०७.०७.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

"मौजे फुलगांव ग्रामपंचायतबाबत माजी सैनिकाना दिलेल्या इंदिरा आवास घरकूलबाबत.

१. इंदिरा आवास योजनेसाठी पास होण्याचे निकष काय?

२. प्रकरणाची छाननी करणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम काय?

३. फुलगावातून किती प्रस्ताव त्यांची कागदपत्राची सत्यता आपल्या छाननी अधिकाऱ्यांनी केलेली आहे काय?

४. खोटे कागदपत्रक तयार केलेले आढळले काय ? असल्यास काय कार्यवाही करण्यात आली.

५. अर्जासोबत खोटे कागदपत्रे पुराव्यासह सादर केले असतांना गुन्हे का दाखल करण्यात आले नाही?

६. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.विरुध्द तक्रार कोणाकडे करावी. "

जन माहिती अधिकाऱ्यांनी यांना दि.१.०८.२००८ च्या पत्रानुसार माहिती दिली. १) इंदिरा आवास योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांचे निकष ठरवण्याबाबत दि.१.०४.२००४ ची " मार्गदर्शक पुस्तीका" ची झेरॉक्स प्रत.२) प्रकरणाची छाननी जिल्हा सैनिक बोर्ड जळगांव यांनी केली. ३) फुलगावातून १२ माजी सैनिकांचे घरकुल प्रस्तावाची छाननी जिल्हा सैनिक बोर्ड जळगांव यांनी केलेली आहे अशी अपलिर्थींना माहिती दिली. अपूर्ण व खोटी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि. २५.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केलेली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.अपीलार्थीनं एकूण ६ मुद्दयाबाबत माहिती मागितली होती. उत्तराने फक्त ३ मुद्यांबाबत माहिती दिली. सदर माहिती खोटी व अपूर्ण असल्याचा अपीलार्थींनी व्दितीय अपीलात मुद्या उपस्थित केला आहे. माहिती गटविकास अधिकारी यांनी दिलेली आहे. पण प्रकरणात अर्जदाराची मागणी फेरचौकशीची होती. सुनावणीच्या वेळी अपिलीय अधिकारी यांनी प्रशासकिय रित्या एक महिन्यात पुन्हा चौकशी करुन काही एदल असल्यास अर्जदारास पुन्हा माहिती देण्यात येईल असे सांगितले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा व जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलार्थींना हे आदेश प्राप्त झाल्यापासून १ महिन्यात चौकशी करुन माहिती द्यावी.

आदेश

अपील अंशत:मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.४६५८/०२

श्री. अरुण टी. नाडर ------ अपीलकर्ता
११/१०३,शार्दुल सी.एच.एस.लि.,
छत्रपती शिवाजी राजे कॉम्प्लेक्स,
म्हाडा, चारकोप,कांदिवली (प)
मुंबई ६७

प्रथम अपिलीय अधिकारी तथा -------उत्तरवादी
पोलीस उपआयुक्त, झोन-१२, पोलीस उपायुक्त,
परिमंडळ १९, शैलेंद्र नगर,
दहिसर (पूर्व),मुंबई ६८

जन माहिती अधिकारी तथा
सहायक पोलीस आयुक्त, उत्तर विभाग कक्ष,ठाकूर व्हिलेज,
कांदिवली (पूर्व) मुंबई १०१

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक :१९.०६.२००९
सुनावणीचा दिनांक : ९.०९.२००९ व १०.०९.२००९
अपीलार्थी : उपस्थित (१०.०९.२००९)
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्यांच्या अर्थी भोपाल कोर्टाने कांदिवली चोरका पोलीस स्टेशन कडे कलम १३८ अनुसार वॉरंट जारी केले याची माहिती पाहिजे होती व ही माहिती नाकारण्यात आल्याने व प्रथम अपीलीय सुनावणीच्या वेळेला अर्जदार उपस्थित न राहिल्यामुळे त्यांनी आयोगाकडे अपील केलेले आहे. सुनावणीच्या वेळेला पुढील प्रमाणे अहवाल जन माहिती अधिकारी यांनी सादर केला.

"उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन कळविण्यात येते की, अर्जदार श्री.आरोन टी.नाडर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अनवये माहिती मिळण्याकरिता दि.१३.०३.२००९ रोजी या कार्यालयात अर्ज केला होता. सदर अर्जात त्यांनी त्यांचे नावाने भोपाळ कोर्ट येथून कलम १३८ एन.ए.ॲक्ट प्रमाणे समन्स अथवा वॉरंट चारकोप पोलीस ठाणे येथे प्राप्त झाले किंवा कसे याबाबतची माहिती सांगितली होती. मागितलेली माहिती चारकोप पोलीस ठाणे येथे प्राप्त झाले

किंवा कसे याबाबतची माहिती मागितली होती. मागितलेली माहिती चारकोप पोलीस ठाणेशी संबंधीत असल्याने चारकोप पोलीस ठाण्याकडून मागविण्यात आली.

चारकोप पोलीस ठाणे येथुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८-छ प्रमाणे नाकारण्यात आलेबाबतचा अहवाल प्राप्त झाला तो अर्जदारांनी दि.५.०३.२००९ रोजी प्रतिनिधीमार्फत स्विकारली.

अर्जदाराचे दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी व पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१२,मुंबई यांचेकडे अपिल दाखल केले. अर्जदार हे प्रथम अपिलीय अधिकारी व पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१२,मुंबई यांनी लेखी वारंवार कळवूनदेखील सुनावणीस गैरहजर राहीले करीता सदरचे अनील निकाली काढण्यात आल्याचे आदेश पारित करण्यात आले.

प्रस्तुत सुनावणीच्या अनुषंगाने अर्जदार यांनी विचारलेल्या माहितीस अनुसरून चारकोप पोलीस ठाणेकडून अहवाल मागीतला असता अर्जदार यांचेविरुध्द मा.न्याय दंडाधिकारी,भोपाळ यांचेकडून कोर्ट के.नं.२२३६६/०८ प्रमाणे वॉरंट प्राप्त झाल्याचे कळविण्यात आले तसेच अर्जदार हे त्यांचे राहते घरी मिळून न आल्याने जा.क्र.१६९/०९,दि.१३.०३.२००९ प्रमाणे अहवाल सादर करण्यात आला.

अर्जदार यांना त्यांचेविरुध्द चारकोप पोलीस ठाणे येथे वॉरंट प्राप्त झाल्याचे माहित असून देखील पोलीस ठाणे येथे समक्ष जावून अथवा घरी घेण्याचे देखील जाणुन-बुजून टाळाटाळ केल्याचे दिसून येते व या अधिनियमातर्गत अर्ज केल्याचे दिसुन येते.

सदर प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे तरतुदीनुसार काटेकोरपणे पालन करीत कारवाई करण्यात आलेली आहे. "

अर्जदार यांचे विरुध्द वॉरंट आहे असे जन माहिती अधिकारी यांना चारकोप पोलीस स्टेशनने कळविले आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास जो दि.८.०९.२००९ रोजी अहवाल सादर केला त्यात नमूद केले आहे तसेच या अहवालाची प्रत श्री.नाडर अपलीर्थी यांनाही त्यांचे घरी पोच पावती करण्यात आली आहे व त्याची प्रत त्याचेजवळ आहे असे दि.१०.०९.२००९ रोजी श्री.नाडर यांनी सांगितले.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ९.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/४१४४४/अपील क्र.४६२३/०२

श्री. कपूरचंद डी.गुप्ता **------ अपीलकर्ता**
रु.न. नटवरलाल गणाया चाळ,
साई नगर कंपाउंड, म.गांधी मार्ग,
कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **-------उत्तरवादी**
पोलीस उपआयुक्त, परिमंडळ -१२, शैलेंद्र नगर,
दहिसर (पूर्व),मुंबई ६८

जन माहिती अधिकारी तथा
सहायक पोलीस आयुक्त, उत्तर विभाग कक्ष,ठाकूर व्हिलेज,
कांदिवली (पूर्व) मुंबई १०१

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: २०.०२.२००९
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: १८.०३.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	: ३१.०३.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	: ०२.०५.२००९
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	: २८.०५.२००९
सुनावणीचा दिनांक	: ०९.०९.००९
अपिलार्थी	: अनुपस्थित
जन माहिती अधिकारी	: उपस्थित
अपिलीय अधिकारी	: अनुपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कांदिवली पोलीस ठाणे यांनी कॉ.कपूरचंद गुप्ता व इतर यांच्या विरुध्द चॅप्टर केस दाखल करण्यासाठी सहा. पोलीस आयुक्त,मालवणी विभाग,यांना पाठविलेल्या प्रस्तावाची छायाप्रत इत्यादी माहिती उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

जन माहिती अधिकारी यांनी या संबंधात वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कांदिवली पोलीस ठाणे यांचेकडून मागविलेली माहिती अर्जदारास उपलब्ध करुन दिली आहे. यामध्ये चॅप्टर केस प्रस्तावाची प्रत कलम८ नाकारण्यात येऊन उर्वरित माहिती देण्यात आली आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

चॅप्टर केस प्रस्ताव ही बाब गोपनीय असल्याने व ती उघड केल्याने साक्षीदारांवर दबाव येऊ शकतो असे नमूद करून अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेली माहिती बरोबर असल्याचे नमूद केले आहे.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

सुनावणीच्या वेळेला या प्रस्तावाच्या अनुषंगाने त्यांच्याकडून बाँड का देण्यात येऊ नये अशा पध्दतीची नोटीस जारी केली असल्यास आलेल्या प्रस्तावाची प्रत ही अर्जदारास देण्यात यावी. असे निर्देश देण्यात आले.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ९.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.४६२७/०२

श्री.किशोर रघुनाथ राजदेव ------ अपीलकर्ता
६०४,विश्वास को.हौ.सोसायटी,
संकल्प सहनिवास,नागरी निवारा परिषद,
फिल्म सिटी रोड,गोरेगांव (पूर्व) मुंबई ४०० ०६५

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------उत्तरवादी
अधिक्षक भूमि अभिलेख,मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत १० वा मजला, चेतना कॉलेजसमोर,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी मालाड यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत,
५ वा मजला, डॉ.करोडे मार्ग, नाटकवाला लेन,
बोरीवली (प), मुंबई ४०० ०९२

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक :०५.०६.२००९
सुनावणीचा दिनांक : ९.०९.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी : उपस्थित

अर्जदाराला पुढील विषयासंबंधीची माहिती पाहिजे होती.

"अति अति वातडीची फी भरुनसुध्दा व प्रत्यक्षजागेवर मोजणी झाली तरीसुध्दा संबंधीत अधिकारी जा मो.१६ दि.२४.०६.२००८ हद्द कायम पुर्ण संचीकेची प्रत व मो.र.नं.१६ नोंदवहीत प्रकरण आढळत नाही त्याबद्दल"

व ती न मिळाल्यामुळे त्यांनी अंतिमत: हे अपील केलेले आहे. अर्जदाराचा अर्ज व प्रथम अपील प्रकरणाच्या स्थिती यासंबंधी अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक भुमी अभिलेख यांनी आयोगास पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.

श्री.किशोर रघुनाथ राजदेव यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नगर भूमापन अधिकारी मालाड यांचेकडे दि.२०.०२.२००९रोजी अर्ज करुन मौजे मालाड (पुर्व) न.भू.क्र.६५३/१अ मो.र.नं.१६ दि.२४.०६.२००८ अति.अति.तातडी हद्द कायम मोजणीच्या पुर्ण संचीकेची नकाशा सहित मागणी केली होती.

सदर अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा नगर भूमान अधिकारी मालाड यांनी दि.१६.०३.२००९ चे पत्राने अतितातडी मो.र.नं. च्या नोंदवहीत सदरचे प्रकरण आढळ झाले नसलेने आपले मागणी प्रमाणे नकला पुरविता येत नाहीत. तरी आपण मो.र.नं.च्ची खात्री करुन फेर अर्ज सादर करावा असे अर्जदार यांना कळविले होते. सदर अर्जास चुकीचे उत्तर दिलेने अर्जदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(१) अन्वये इकडे अपील दाखल केले होते.

प्रकरणी सदरचे अपील दाखल करुन घेऊन अपील क्र.९३/०९ दि.२०.०५.२००९ अन्वये निर्णय पारित करणेत आले होते. (प्रत संलग्न) सदर निर्णयात नगर भूमापन अधिकारी मालाड यांनी अर्जदार यांनी मागणी केलेल्या अति.अति.तातडी मो.र.नं.१६/०८ चे धारीकेतील आवश्यक त्या प्रती पुरावाव्यात असे नमूद केले होते.

दि.४.०५.२००९ रोजीचे सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे दि.०६.०५.२००९ रोजी अर्जदार यांना हव्या असलेल्या नकला र.रु.१८८/- भरुन देणेत आलेल्या आहेत. असे दि.७.०९.२००९ च्या अहवालावरुन दिसून येते. परंतु विषयांकित मिळकतीत अर्जदार यांची वहिवाट वादग्रस्त असल्याने त्यांच्या अर्जाप्रमाणे मोजणी होऊन नकाशा तयार झालेला नसल्याने अर्जदार यांना मो.र.नं.१६/१८ चा नकाशा पुरविणेत आलेला नाही. त्याबद्दल अर्जदार यांना कळविणेत आलेले आहे. तसेच अर्जदाराने आपली वहिवाट दाखविलेस त्याची मोजणी करुन नकाशा पुरविणेची नगर भूमापन अधिकारी मालाड यांनी दक्षता घेतलेली आहे.

सबब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये नियमांर्गत कार्यवाही चालू असलेने अर्जदार यांचे आपले कडील अपील विनाकार्यवाही निकाली करणेत यावे ही विनंती.

जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितलेकी थोडक्यात अर्जदाराच्या जागेवरील ताबा हा वादग्रस्त असल्यामुळे त्या ठिकाणी मोजणी होऊन नकाशाच तयार झालेला नसल्याने अर्जदारास तो नकाशा देता येत नाही. ही परिस्थिती मान्य करावी लागेल.

<u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ९.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.९०६/०२

श्री. हेमचंद्र अवचित चौधरी ------ अपीलकर्ता
मनुश्री,फॅब्रिकेशन जवळ,विकास कॉलनी,
जामखेड रोड,भुसावळ

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------उत्तरवादी
अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
सर कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक :०२.०६.२००८
सुनावणीचा दिनांक : ३०.०७.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.१९.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितली होती. तथापि माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. यावर दि.२२.०१.२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले. या आदेशानुसार अर्जदारांना त्यांना अपेक्षित माहिती आदेशाच्या दिनांकापासून कारण नमूद करुन ८ दिवसांच्या आत द्यावयाची होती. तथापि माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.१८.०२.२००८ रोजी अप्पप जिल्हाधिकारी यांचेकडे पुन्हा अर्ज केला. यावर सुनावणी होऊन त्यांना असे कळविण्यात आले की त्यांना माहिती पुरविण्यात आलेली असल्याने त्यांचे अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे.

यावर समाधान न झाल्याने अपिलार्थींनी दि.०२.०६.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ११.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.८९३/०२

श्री. संजय पोपट लहांगे **------ अपीलकर्ता**
संजय नगर, आर.पी.विद्यालयासमोर,
पंचवटी,नाशिक

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------उत्तरवादी**
मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग,
जि.प. जळगांव

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक :३०.०१.२००८
सुनावणीचा दिनांक : ३०.०७.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
व प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

अपिलार्थींनी दि.२०.११.२००७ च्या अर्जान्वये शासनाच्या दि.२९.०९.२००७ च्या पत्रानुसार अनुकंपा तत्वावरील परिचर कर्मचाऱ्यांची प्रसिध्द केलेल्या सेवा जेष्ठता यादीची मागणी केली. तसेच कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता,चाळीसगांव पाणी पुरवठा योजनेवर अनुकंप तत्वावर नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नस्तीतील टिप्पणीची प्रत व या अनुषंगाने शासनाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती मागितल्या. त्यांच्या अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दि.२८.११.२००७ च्या पत्राव्दारे उत्तर दिले. या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.१७.१२.२००७ रोजी प्रथम

अपील केले. यावर सुनावणी होऊन अपीलार्थीस १५ दिवसात माहिती देण्याचे आदेशित करण्यात आले. तथापी सेवा जेष्ठता यादी मिळाली नाही व शासनाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील मिळाला नाही हे नमूद त्यांनी दि.३०.०१.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, अपीलार्थींना वेळोवेळी माहिती पुरविली आहे. तथापि त्यांचे समाधान होत नाही.त्यांना पुनश्च दि.२८.०७.२००९ रोजी त्यांनी मागितलेली अतिरिक्त माहिती पुरविण्यात आली आहे. सुनावणीचे वेळी अपीलार्थी हजर नसल्याने त्यांची बाजू समजून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या कादपत्रावरुन असे दिसते की अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार माहिती पुरविण्यात आली आहे. सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ११.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.४६६०/०२

श्रीमती नंदिनी अनिल आधवडे ------ अपीलकर्ता
ए/१,हार्मनी को.ऑ.हौ.सोसायटी,
जेसल पार्क, भाईंदर (पुर्व)

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------उत्तरवादी
नगर रचनाकार, मिरा-भाइंदर महानगरपालिका,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) ता.जि.ठाणे

जन माहिती अधिकारी तथा
सहायक नगररचनाकार, मिरा-भाइंदर महानगरपालिका,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प) ता.जि.ठाणे

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक :२१.०५.२००९
सुनावणीचा दिनांक : १०.०९.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
व प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

"मौजे नवघर जुने सर्वे २८६/१२ हया जागी चालु असलेल्या बांधकामाच्या बांधकाम परवानगीची प्रत मिळावी.नोव्हेंबर २००४ ते आजतागायत उपरोक्त नमूद केलेल्या जागेतील बांधकामास देण्यात आलेल्या परवानगीच्या संदर्भात सर्व दस्ताऐवजाच्या सत्यप्रती मिळाव्या"

माहिती अधिकार जा.क्र.मनपा/नर/१४२६/२००८-०९ दिनांक ११.०७.२००८ यांमधील कागद पत्रात मिळालेल्या माहिती मधिल जागामालक श्रीमती कुसुम आत्माराम भोईर व इतर आठ मधील इतर आठ नावे व त्यांचे तपशील मिळावेत तसेच जागामालक व ते. स्वास्तिक कंस्ट्रक्शन

यांच्यातील करार (Sale Development Agreement) याची प्रत व स्वास्तिक कंस्ट्रक्शन व सेवन ईलेव्हन यांच्यातील करार (Sale/Development Agreement) याची प्रत मिळावी.

सदरील माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे व अर्जदाराने संचिकेचे अवलोकनही केले आहे असे दिसून आले. अर्जदाराची तक्रार अशी दिसते की संबंधीत जमिनीच्या सात बाऱ्याच्या उताऱ्यात त्यांच्या वडिलांचे नाव आहे मात्र पॉवर ऑफ अटर्नी एक्झीक्युट करीत असतांना त्यात ज्यांनी पॉवर ऑफ अटर्नी केलेली आहे त्यात अर्जदाराचे नाव नाही. असे असताना सुध्दा कॉमेन्समेन्स सर्टिफिकेट मध्ये श्रीमती कुसूम आत्माराम व इतर आठ असे लिहीलेले आहे याचा तपशील मिळावा अशी अर्जदाराची मागणी आहे. या रेकॉर्ड मध्ये इतर आठ असे स्पेसिफिकली नसल्यामुळे या आठ व्यक्ती यांची नावे दिलेली नाहीत. याचाच अर्थ बांधकाम प्रस्ताव तपासत असताना पॉवर ऑफ अटर्नी व सात बाराचा उतारा हा बरोबर चेक न करता कॉमेन्समेंट सर्टीफिकेट दिल्या गेले असा होऊ शकतो. ही प्रशासनिक बाब असल्यामुळे याबाबत अर्जदाराने महापालिका आयुक्त यांच्याकडेच तक्रार करणे हे योग्य राहील. माहितीच्या अधिकारान्वये जसे रेकॉर्ड असेल त्याप्रमाणे रेकॉर्डच्या प्रती देणे अभिप्रेत आहे. मात्र प्रशासनिक दृष्टया अर्जदार हे निश्चीतपणे महापालिका प्रशासनास विचारु शकतात व त्याचे उत्तर देणे किंवा तपासत असताना चुक झाली असल्यास त्या चुकीचे निराकरण करणे हे महापालिका प्रशासनाला करावे लागेल. त्याप्रमाणे अर्जदाराने महापालिका आयुक्ताकडे तक्रार करावी.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ११.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.८६२/०२

श्री. सुरेश लक्ष्मण पाटील, **------ अपीलकर्ता**
शिव मंदिराजवळ, सेंट ॲलोसेस स्कुल मागे,
भुसावळ,जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------उत्तरवादी**
मुख्याधिकारी न.प.भुसावळ

जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी न.प.भुसावळ

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २३.०७.२००८
सुनावणीचा दिनांक : ३०.०७.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
व प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.०६.०५.२००८ रोजी अर्ज करुन सन २००७-०८ या वित्तीय वर्षात नगर परिषदेने नगरपरिषदेतील सर्व कर्मचाऱ्यांना अदा केलेल्या ओव्हर टाईम रक्कमेच्या बिलाच्या प्रतिंची मागणी केली. त्यानुसार त्यांना दि. १८.०६.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले की, नगरपरिषदेने सन २००७-०८ या वर्षात रु.५,४०,५०५/- ओव्हर टाईम पोटी कर्मचाऱ्यांना अदा केले आहेत. ही माहिती अपुरी असल्याचे कारण नमूद करुन त्यांनी दि.२०.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले ओव्हर टाईमच्या बिलाच्या नक्कलेची मागणी केली. प्रथम अपिलावरील सुनावणीचे

वेळी अपीलार्थी हजर नव्हते. यावरील निर्णय त्यांना दि.८.०७.२००८ रोजीच्या आदेशान्वये कळविण्यात आला. त्यानुसार त्यांचे अपील अमान्य करण्यात आले.

अपिलार्थींनी या विरुध्द दि.२३.०७.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपिलावरील सुनावणीचे वेळी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता दिसून आले की, अपिलार्थींनी मागणी केल्यानुसार बिलाची नक्कल त्यांना पुरविण्यात आलेली नाही. यास्तव असे निर्देश देण्यात येतात की, अपिलार्थींच्या मागणीनुसार त्यांना ओव्हर टाईमच्या बिलाची प्रत सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत पुरविण्यात यावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ११.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.८६१/०२

श्री. सुरेश लक्ष्मण पाटील, **------ अपीलकर्ता**
शिव मंदिराजवळ, सेंट ॲलोसेस स्कुल मागे,
भुसावळ,जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------उत्तरवादी**
मुख्याधिकारी, नगरपरिषद भुसावळ

जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना विभाग, नगरपरिषद भुसावळ

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २३.०७.२००८
सुनावणीचा दिनांक : ३०.०७.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.०६.०५.२००८ रोजीच्या अर्जान्वये नगरपरिषदकडे नगरपरिषदेतील सर्व कर्म कर्मचाऱ्यांना अदा केलेल्या ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार अदा केलेल्या वेतनाच्या फरकाच्या बिलाच्या प्रतींची मागणी केली. या अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दि.३.०८.२००८ रोजी खालीलप्रमाणे उत्तर दिले.

" नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांना वेतन आयोगामुळे देय असलेल्या वेतनाची रक्कम अदा केलेली नाही. परंतु त्यापोटी अग्रिम म्हणून रु.११,०००,रु.८०००/- व रु.१,५०० अदा केले आहेत"

जन माहिती अधिकारी यांच्याकडून उत्तर प्राप्त होण्याआधी त्यांनी दि.२०.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावरील सुनावणीचे वेळी अपिलार्थी उपस्थित नव्हते. त्यांचे प्रथम अपील दि.५.०७.२००८ रोजीच्या आदेशान्वये अमान्य करण्यात आले. यावर अपिलार्थींनी दि.२३.०७.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आपली बाजू मांडतांना सांगितले की अपिलार्थींना दि.३.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविण्यात आली आहे. नगरपरिषदेने माहिती पुरविलेली असल्याने सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ११.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.९७७/०२

श्री. जगन्नाथ कौतिक पाटील, **------ अपीलकर्ता**
मथुरा भवन, ममुदाबाद, जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------उत्तरवादी**
सहाय्यक धर्मदाय आयुक्त जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
सचिव,शिक्षण प्रसारक मंडळ ममुराबाद,जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १३.१०.२००८
सुनावणीचा दिनांक : ३१.०७.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.१९.०५.२००८ च्या अर्जान्वये अशी माहिती मागितली की, अपिलार्थींना मंडळातर्फे दि.५.०३.२००८ रोजी जी नोटीस दिली होती त्यात त्यांनी खोटी माहिती सादर केल्याचे म्हटले आहे. तेव्हा त्यांना या संबंधी संस्थेकडून पुराव्या दाखल अनुषंगीक कागदपत्रे पुरविण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी दि.२६.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर दि.१८.०७.२००८ रोजी सुनावणी होऊन दि.२१.०७.२००८ रोजी निर्णय

घेण्यात आला. यानुसार त्यांचे प्रथम अपील नामंजूर करण्यात आले. यावर व्यथित होऊन अपिलार्थींनी दि.१३.१०.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी अपीलार्थी व जन माहिती अधिकारी गैरहजर असल्याने त्यांचे म्हणणे ऐकता आले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन आयोगाला सादर केले. त्यानुसार त्यांना अधिनियमानुसार अपील चालविण्याचा अधिकार नाही. याबाबत असे निर्देश देण्यात येतात की अपिलार्थींनी सचिव,शिक्षण प्रसारक मंडळ,मुमराबाद यांच्याकडे संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी आयोगासमोर सादर केलेल्या कागदपत्रांत प्रसारक मंडळाच्या दि.१६.०६.२००८ च्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसते की शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास मंडळाने तयारी दर्शविली आहे. सबब खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ११.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.८७०/०२

श्री. अशोक तोताराम तायडे ------ अपीलकर्ता
गट नं. ९४४, प्लॉट नं.४, शिव कॉलनी, भुसावळ रोड,
फैजपूर ता.यावल,जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------उत्तरवादी
मुख्य वन संरक्षक, धुळे वन वृत्त,धुळे

जन माहिती अधिकारी तथा
मुख्य वन संरक्षक, धुळे वन वृत्त, धुळे यांचे कार्यालय, धुळे

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १८.१०.२००८
सुनावणीचा दिनांक : ३१.०७.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.३०.०७.२००८ च्या अर्जान्वये श्री. खलीलशहा कादरशहा,रा.किनगांव ता.यावल जि.जळगांव यांच्या फर्निचर धंद्याबाबत कार्यालयात उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती मागितल्या त्यांनी विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपील अर्जात त्यांनी मुख्य वन संरक्षक, धुळे यांच्या अधिपत्त्याखालील इतर कार्यालयाशी संबंधित माहिती मिळावी अशी मागणी केली. अपीलावर दि.२२.०९.२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार अपिलार्थींना

सुचविण्यात आले की, माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधीत आहे त्या प्राधिकरणाशी त्यांनी संपर्क साधावा. तसेच त्यांना कळविण्यात आले की त्यांनी अपील अर्जात अतिरिक्त माहिती मागितली आहे ती पुरविण्याबाबत अधिनियमात तरतूद नसल्यामुळे ती पुरविण्यात येत नाही.

यावर व्यथित होऊन अपिलार्थींनी दि.१८.१०.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी असे सांगितले की अपिलार्थींना हवी असलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे ते निश्चिम करण्यासाठी रेकॉर्ड बघण्यास कार्यालयात बोलाविले होते. परंतु ते आले नाहीत. यावर असे निदेश देण्यात आले की अपिलार्थींना कार्यालयातील कागदपत्रांची तपासणी करु द्यावी. तपासणी अंती ज्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना हव्या असतील त्या विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ११.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.८९०/०२

श्री. प्रकाश रघुनाथ चौधरी ---- अपीलकर्ता
हतनूर धरण वसाहत,पो.टहाकळी,
ता.भुसावळ, जि.जळगांव

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------उत्तरवादी
कार्यकारी अधिकारी, बांधकाम विभाग, जि.प.जळगांव

जन माहिती अधिकारी

बांधकाम विभाग, जि.प.जळगांव

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १२.०८.२००८
सुनावणीचा दिनांक : ३०.०७.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.२१.०१.२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली. तथापि थोडक्यात खालीलप्रमाणे.

"१) मौजे चांगदेव ता. मुक्ताईगर येथील नवीन गावठाण ते जुने गावठाण रस्ता कोणत्या कार्यालयाच्या अखत्यारित आहे.

२) आपल्या अखत्यारित असल्यास त्यावरील दुरूस्तीखर्चाचा तपशील व अनुषंगिक कामांच्या खर्चाचा तपशील.

३) रस्त्याच्या दुरावस्थेबाबत केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने केलेल्या

४) चांगदेव येथे चुकीच्या ठिकाणी बांधलेल्या एच.पी.ड्रेनच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी पंचायत समिती मुक्ताईनगर यांनी पाठविलेल्या अहवालावरील कार्यवाहीचा तपशील.

५) शासकीय यंत्रणेच्या अकार्यक्षमतेमुळे शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांबाबत अहवाल.

६) चांगदेव गाव ते जुने गावठाण मार्गे मेहून मुक्ताई मंदिर पर्यंत प्रस्तावित रस्त्याच्या कामात क्रॉस ड्रेनची तरतूद केली आहे काय ?

माहिती अर्जाला दि.२९.०२.२००८ च्या पत्रान्वये उत्तर देण्यात आले. तथापि अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे नमूद करुन त्यांनी दि.२५.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर निर्णय न झाल्याने अपिलार्थीनी दि.१२.०८.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की अपिलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. अपीलार्थी गैरहजर असल्याने त्यांचे म्हणण ऐकता आले नाही. अपीलार्थींना माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ११.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ९०२ /०२

श्रीमती सुशीलाबाई मधुकर पाटील ------- **अपीलकर्ता**
गिरणा कॉलनी , जळगांव खोली नं.३३,
आकाशवाणी समोर,जि. जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
अधिक्षक अभियंता, जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ,
जळगांव, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, जळगांव मध्यम प्रकल्प उपविभाग,
जळगांव,जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्रीमती सुशीलाबाई मधुकर पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.०५.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होत तसेच अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०९.०१.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" श्री.मधुकर लोटू पाटील यांचे संदर्भात उपविभागीय अभियंता हिवरा धरण उपविभाग पाचारा या कार्यालयामार्फत रोजंदारी व कार्यव्ययी आस्थापनेवरील ५ वर्षानंतर रुपांतरित अस्थाई आस्थापनेवर घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला त्या प्रसतावाची छायांकित प्रतीची मागणी केली होती. "

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी हिवरा मध्यम प्रकल्प उपविभाग पाचोरा यांनी अपीलकारास दि.२७.१२.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पाठविण्यात येत असल्याचे कळविले. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलाकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांकडे दि.५.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२८.०४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. संपुर्ण कागदपत्रांच्या छायाप्रती अपीलकारास देणेबाबत प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी, जन माहिती अधिकाऱ्यांना आदेश दिले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. श्री मधुकर लोटू पाटील यांची हिवरा मध्यम प्रकल्प उपविभागांतर्गत पाचोरा येथील सेवा सुरूवातीची दि.१६.०७.१९७८ असून त्यांना या विभागाने दि.१५.०४.१९७९ रोजी कार्यवाही आस्थापनेवरुन सेवेतून काढून टाकले होते. सन १९७८-७९ मध्ये त्यांची सेवा ९ महिने इतकीच असल्याने त्यांचा प्रस्ताव पाठविल्याचा संबंधीत उपविभागात दिसून येत नाही. त्यामुळे श्री. पाटील हया या विभागाचे अंतर्गत उपविभागातून न पाठविलेल्या प्रस्तावाच्या (अस्तीत्वात नसलेल्या) माहितीचा आग्रह धरत आहेत असे उत्तरवादीने व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतीपादन केले. यामुळे अपीलकारास माहिती पुरविता आली नसल्याचा खुलासा केला.तसेच श्री. पाटील मजूर यांचे मा.कामगार न्यायालय जळगांव व उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे प्रकरण न्याप्रविष्ठ आहे. सदर केसला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने मा. कामगार न्यायालयात पुढील तारखा मिळतात असेही उत्तर वादीने प्रतिपादन केले संदर्भाधीन माहिती अस्तित्वातच नव्हती असे माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश दत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९ /सीआर/अपील ८६४ /०२

श्री.कैलाश फकिरा महाजन ------- अपीलकर्ता
महात्मा फुले चौक,रा.रावेर,
जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगरपालिका, रावेर,ता. रावेर, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगरपालिका, रावेर,ता. रावेर, जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलार्थी श्री.कैलाश फकिरा महाजन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.०६.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्याक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,जळगांव येथे दि.३०.०७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होत तसेच अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.०३.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" स्थान क्रमांक २० मधील शॉपींगसेंटर गाळा क्रमांक ४ बु.दानपुर रोड वरील वरच्या मजल्यावरील गाळा क्रमांक १ ते १६ मध्ये सद्या वापर सुरू आहे. सदर वापर सुरू करण्याबाबत नगरपालिकेने कागदपोपत्री जी कार्यवाही केली असेल त्याची माहिती मिळावी, व लिलावात तहकुब करण्यात आलेले गाळे कोणाच्या ताब्यात आहेत हयाबाबत माहिती मिळावी "

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.२.०४.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. असमाधानकारक माहिती मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलार्थीने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे

दि.७.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२५.०४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. " लिलाव करतेवेळी गाळे कोणाचे ताब्यात होते. तसेच लिलावात तहकुब झालेले गाळे हे कोणाच्या ताब्यात होते व आहेत. या गाळयामध्ये सद्या कोणाचा वापर सुरू आहे " याबाबत अपीलार्थीस १५ दिवसाचे आत माहिती द्यावी असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलार्थीस माहिती दिली नसल्याने अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.२५.०४.२००८ रोजी पारित केलेल्या आदशास अनुसरून अपीलार्थी यांना दि.१७.०६.२००८ च्या पत्रान्वये गाळयाबाबत अपेक्षित माहिती पुरविली असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी/जन माहिती अधिकाऱ्यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आवश्य कागदपत्रासह सादर करून प्रतिपादन केले यावरून अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १४.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक:मुमाआ २००८/५४४५/तक्रार ४८४/०१

श्री.संतोष शरद पवार, **------ तक्रारदार**
ई-११,सहकार विश्व सोसायटी,
नाहूर रोड,मुलूंड (प) मुंबई ८०

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा **-------उत्तरवादी**
सहाय्यक आयुक्त,टी-विभाग,मुंबई महानगरपालिका,
मुलूंड, मुंबई ८०

- वि वे च न -

श्रीयुत संतोष पवार यांनी आयोगाकडे दि.३०.०६.२००६ रोजी तक्रार करुन बृहन्मुंबई महानगरपालिका टी विभाग कार्यालयातून खाद्यी विक्री करणाऱ्या उपहारगृह, दुकाने व कँटीन यांच्या परवान्याची व इतर माहिती दि.१७.०५.२००६ रोजी मागितली होती. श्रीयुत संतोष पवार यांनी सदर माहिती देण्यास महापालिका टाळाटाळ करीत आहे अशी तक्रार केली होती व तक्रारीची चौकशी दि.१५.०९.२००९ रोजी ठेवली होती त्या वेळेला अर्जदार अनुपस्थित होते तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराचे तक्रारीच्या बाबतीत पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी सादर केले.

"श्री.संतोष शरद पवार यांनी त्यांच्या दि.१५.०५.२००६ च्या व या कार्यालयात दि.१७.५.२००६ च्या अर्जान्वये टी विभागाच्या हद्दीतील खाद्यविक्री करणाऱ्या उपहारगृहे,दुकाने व कँटीन यांच्या परवान्याची व त्याअनुषंगाने इतर बाबींची माहिती मागितली होती.

उपरोक्त माहिती व्यापक व विस्तृत असून विविध खात्यांशी समन्वय साधावा लागणार होता यास्तव या कार्यालयाच्या क्र.टी/जन/४०६/आस्था दि.२०.०६.२००६ च्या पत्रान्वये अर्जदारास पुढील एका महिन्याच्या कालावधीत सदर माहिती उपलब्ध करण्यात येईल असे कळविण्यात आले.

तद्नंतर,क्र.टी/जन/५८१/आस्था दि.७.७.२००६ च्या पत्रान्वये अर्जदारास हव्या असलेल्या माहितीच्या छायांकित प्रतीसाठी रु.५६/- इतक्या रकमेचा भरणा केल्याची पावती दाखवून इच्छित माहिती घेऊन जाण्यास कळविले होते. तथापि, अर्जदाराने या कार्यालयाशी संपर्क साधला नाही.

महानगरपालिकेच्या परिपत्रक क्र.एमओएम/८९५दि.२.१.२००६ नुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी हे या प्रकरणातील जन माहिती अधिकारी असून त्यांनी सदर माहिती उपलब्ध केली होती. तथापि, अर्जदाराने संपर्क साधून शुल्काचा भरणा न केल्यामुळे माहिती प्राप्त झालेली नाही असे दिसते. तसेच अर्जदाराने या कार्यालयात प्रथम अपिलही केलेले नाही. सदर माहिती सी.डी./प्रींट आऊट व्दारे उपलब्ध आहे."

अर्जदार उपस्थित नसल्यामुळे त्यांचे काय म्हणणे आहे हे समजून घेता आले नाही.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १५.९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक:मुमाआ २००८/२२०३३ /तक्रार ४८६/०१

श्री.पराग द.दाभोळकर, ------ तक्रारदार
शॉप नं.३,कमल एन्टरप्राईजेस,
माणेक अपार्टमेंट,छत्रपती शिवाजी मार्ग,
सावे नगर बस स्टॉप समोर,
दहिसर (पुर्व) मुंबई-४०० ०६८

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा -------उत्तरवादी
दुय्यम निबंधक, यांचे कार्यालय २,
तलावपाळी,ठाणे (प),ठाणे

- वि वे च न -

तक्रारकर्ता : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

श्री. पराग दाभोळकर यांनी दि.२४.०७.२००७ रोजी आयोगाकडे त्यांना हवी असलेली माहिती न मिळाल्या बद्दल तक्रार केली होती. या तक्रारीची सुनावणी दि.१५.०९.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारीच्या संदर्भात या अगोदरच सहकार दुय्यम निबंधक, ठाणे तथा जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर केला होता. मात्र त्याची प्रत आयोगास मिळालेली नव्हती. तो खुलासा पुढीलप्रमाणे.

" उपरोक्त संदर्भित विषयान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये श्री. पराग दाभोळकर (हेगडे बिझनेस सेंटर) यांनी दि.१२.०३.२००७ रोजी या कार्यालयात अर्ज सादर केला होता.

सदरील अर्जामधील मुद्दा क्र.४ मध्ये माहिती व्यक्तीशः हवी आहे व मुद्दा क्र.५ मध्ये माहिती टपालाव्दारे नको असे लिहिले आहे. त्यामुळे त्यांच्याकडून कुठल्याप्रकारच्या टपालखर्च या कार्यालयाने घेतलेला नाही.

तरी देखील या कार्यालयाने सदरील माहिती वेळेत तयार करुन ठेवलेली होती तरंतु सदरील अर्जदार हे वेळेत हजर राहिले नाही. मात्र नंतर ते त्यांची माहिती स्वतः दि.१८.०४.२००७ रोजी या कार्यालयातून घेऊन गेलेले आहेत. घेऊन गेल्याबाबतची पोहचवर सही घेतलेली आहे.

करिता त्यांनी दिलेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वयेचा अर्ज दि.१२.०३.२००७ व या कार्यालयाने संदर्भ क्र.२ अन्वये केलेली कार्यवाही या सोबत अवलोकनास्तव सादर करण्यात येत आहे. सदरील प्रकरणाबाबत या कार्यालयाने सदरील माहिती देण्यास कुठल्याही प्रकारची दिरंगाई केलेली नाही असे वाटते."

अर्जदाराचे माहितीने समाधान झाले असल्यामुळे कदाचित ते तक्रारीच्या सुनावणीच्या वेळी उपस्थित राहिले नसावे.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १५.९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र.४७०३/०२

श्री. मिर्झा अब्दुल हसन, **------ अपीलकर्ता**
बी-४०८,सागर अपार्टमेंट, पीटर परेडा रोड,
सीटी हॉस्पीटल मागे, सोनपूर लेन एल.बी.एस.मार्ग,
कुर्ला (प) मुंबई ७०

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------उत्तरवादी**
कार्यकारी अभियंता (विशेष), बृहन्मुंबई
महानगरपालिका एल.वार्ड. लक्ष्मणराव यादव मार्केट,
१ ला मजला एस.जी.बर्वे मार्ग,
कुर्ला (प) मुंबई ७०

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (विशेष), बृहन्मुंबई
महानगरपालिका एल.वार्ड. लक्ष्मणराव यादव मार्केट,
१ ला मजला एस.जी.बर्वे मार्ग,
कुर्ला (प) मुंबई ७०

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ११.०६.२००९
सुनावणीचा दिनांक : १५.०९.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की आधीही त्यांना माहिती देण्यात आली होती व अपीलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अतिरिक्त माहिती सुध्दा देण्यात

आलेली आहे. अर्जदाराने त्यांच्या दिनांक २४.०८.२००९ रोजीच्या पत्राने असे कळविले आहे की, त्यांना जी माहिती पाहिजे होती ती त्यांना मिळालेली आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १५.०९.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार व कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.

क्रमांक : मुमाआ २००८/३३९१०/तक्रार क्र. २०८/०१
क्रमांक : मुमाआ २००९/३८६५८/तक्रार क्र.३३४/०१
क्रमांक : मुमाआ २००८/३६६५५/अपील क्र.३८६८/०२

श्री. दिपक एल. फुरिया ------ अपीलकर्ता
ए-१०५,श्रीयोग को.ऑ.हौ.सोसयटी,
जयराज नगर वजीरा नाका,
बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९१

प्रथम अपिलीय अधिकारी, तथा ------उत्तरवादी
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३) पश्चिम उपनगरे मुंबई,
गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्रमांक ६९, बांद्रा (पूर्व),
मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी, तथा
उपनिबंधक (आर वॉर्ड) ६ वा मजला, मल्होत्रा हाऊस,
जी.पी.ओ.समोर, मुंबई ४०० ००१

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ११.०६.२००९
सुनावणीचा दिनांक : १५.०९.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

श्री. दिपक एल. फुरिया यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक (आर वॉर्ड) यांच्याकडे दिनांक १० जुलै २००८ रोजी माहिती अर्जाव्दारे त्यांनी अगोदर म्हणजे दि.१५ मे २००८ रोजी उपनिबंधक, आर वॉर्ड यांना पाठविलेल्या पत्राची सद्यस्थिती

(Status) व प्रगती अहवाल (Progress Report) याबाबत माहिती मागितली होती. विहित मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी कडून काहीच प्रतिसाद न मिळाल्याने श्री. दिपक एल.फुरिया यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०८.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यावर आयोगाच्या दि. २७.०१.२००९ रोजी पत्र क्रमांक रामुआ २००८/३३९१००/त.क्र.२०८/०१ अन्वये जन माहिती अधिकारी कडून तक्रारीच्या अनुषंगाने १५ दिवसात अहवाल मागविण्यात आला व त्याची प्रत श्री. दिपक एल.फुरिया यांनाही माहितीस्तव पाठविण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी वरील पत्रास अनुसरुन आयोगाकडे अहवाल पाठविला असल्यास त्याची प्रत मिळावी असा विनंती अर्ज श्री. दिपक एल.फुरिया यांनी आयोगास दि.२६.०२.२००९ रोजी केला. त्यासंदर्भात आयोगाकडून दि.२२.०४.२००९ रोजीच्या पत्र क्रमांक रामाआ २००९/३८६५८/तक्रार३३४/०१ अन्वये मा. मुख्य माहिती आयुक्तांसमोर दि.१८.०५.२००९ रोजी तक्रारीवर सुनावणी आयोजित केल्याचे सर्व संबंधितांना कळविण्यात आले. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांच्यावतीने श्रीमती कल्पना दिपक फुरिया उपस्थित होत्या जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे दोघेही अनुपस्थित होते. तथापि त्यांच्या वतीने श्री. एस.ए.सुर्यवंशी,सहकारी अधिकारी श्रेणी-२ हे उपस्थित होते. श्रीमती कल्पना दिपक फुरिया यांनी सुनावणीच्यावेळी श्री. दिपक एल.फुरिया यांचा दि.१५.०५.२००९ चा लेखी जबाब सादर केला. सदर जबाबात श्री. दिपक एल.फुरिया यांनी दि.१०.०७.२००८ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाकडे कलम १९ (३) अन्वये वरील उत्तरवादींविरुध्द दि.२८.११.२००८ रोजी व्दितीय अपीलही (क्र.३८६८) केले होते व त्यावर आयोगाकडून दि.२६.०२.२००९ रोजी सुनावणीदेखील झाली असल्याचे नमूद केले आहे. सदर सुनावणीच्यावेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार दि.२६.०३.२००९ रोजी अपेक्षित माहिती पुरविली असल्याचेही दि.१५.०५.२००९ च्या लेखी जबाबात नमूद केलेले आहे मात्र संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लादण्यासंदर्भात कोणतेही औपचारिक आदेश आयोगाकडून पारित न झाल्याचे निदर्शनास आणले होते.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंध,सहकारी संस्था आर विभाग मुंबई यांनी त्यांच्या दि.२६.०२.२००९ च्या पत्र क्रमांक जा.क्र.उपनि/आरवि/मुंबई/मा.आयोग/२८५७/०९ अन्वये पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

" श्री. दिपक एल.फुरिया यांनी या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दि.१०.०७.२००८ रोजी मागणी अर्ज केलेला होता. सदर मागणी अर्जामध्ये अर्जदार यांनी या कार्यालयाकडे श्रीयोग का.ऑप.हौ.सोसायटी लि. या संस्थेच्या कामकाजा संदर्भातील त्यांना असणारे आक्षेप नमुद केलेले होते. सदर तक्रार अर्जावर या कार्यालयाने काय कार्यवाही केली याबाबत त्यांनी मुद्या क्र.अे ते डी मधील माहिती मिळणे विषयी मागणी केलेली होती. या कार्यालयाने दि.११.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांना त्यांचे उपरोक्त पत्रासंदर्भात संस्थेच्या दप्तराची तपासणी घेवून तक्रार अर्जामधील मुद्यांबाबत कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत त्यांना अवगत केलेले होते. तथापि अर्जदार यांनी या कार्यालयाचे विरुध्द मा.जिल्हा उपनिबंधक, यांचेकडे अपिल दाखल केलेले होते. सदर अपीलावर निर्णय देताना मा.जिल्हा उपनिबंधक यांनी दि.१८.०९.२००८ रोजीच्या आदेशानुसार अर्जदार यांचे तक्रारअर्जाचे अनुषंगाने या कार्यालयातील संबंधीत तक्रार धारिकेच्या प्रती देण्यासंदर्भात आदेश दिलेले होते. त्या अनुषंगाने या कार्यालयातील कागदपत्रे घेऊन जाणे संदर्भात त्यांना कळविले होते. मात्र अर्जदार यांनी जिल्हा उपनिबंधक यांनीही त्यांचे अर्जावर कार्यवाही न केल्यामुळे अपील दाखल केलेले आहे. सदर बाबतीत या कार्यालयाने व मा.जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने आदेश पारित केले असल्याने सदरचे अपील फेटाळण्यांत यावे अशी या कार्यालयाची धारणा आहे. अर्जदार यांचे तक्रारअर्जावर या कार्यालयाकडून संस्थेच्या दप्तराची तपासणी कार्यबाहूल्यामुळे होऊ शकली नाही. सदरची तपासणी या पुढे प्राधान्य घेण्यांत येऊन अर्जदार यांना अवगत करण्यांत येईल"

श्री. दिपक एल.फुरिया यांनी कलम १९ (१) अन्वये दि.१८.०८.२००८ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर निर्णय देताना प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३) पश्चिम उपनगरे,मुंबई यांनी त्यांच्या दि.१८.०९.२००८ च्या आदेश क्रमांक

जा.क्र.मुंबई/जिऊनि३/बी-२/मा.अ.०५/अपील क्र ४६/२००८/२८७८ च्या परिच्छेद क्रमांक ३ मध्ये जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,सहकारी संस्था, आर विभाग,मुंबई यांनी अर्जदार (श्री. दिपक एल.फुरिया) यांना उत्तर दिलेले नाही.असे विधान केलेले आहे. सबब श्री. दिपक एल.फुरिया यांच्या दोन तक्रार अर्ज एक व्दितीय अपील संदर्भात मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या श्री. दिपक एल.फुरिया यांच्या दि.१०.०७.२००८ च्या माहिती अर्जावर कार्यवाही करुन उत्तर नक्की कधी दिले याबाबतचा वस्तुस्थिती निदर्शक अहवाल योग्य त्या पुराव्यासह आयोगासमोर व्यक्तीशः दि.७.१०.२००९ रोजी उपस्थित राहून सादर करावा. तसेच त्यांच्यावर विलंबाने माहिती दिल्याबद्दल कलम २० अन्वये शास्ती का लाऊ नये याबाबतचा खुलासाही सादर करण्यात यावा.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २४.०९.२००९

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ३३६/०७

श्री. सुरेश जगन्नाथ पाटील **------ अपीलकर्ता**
रा.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
जळगांव पाटबंधारे विभाग जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभिंयता जळगांव पाटबंधारे विभाग जळगांव जि. जळगांव

- वि वे च न -

श्री. सुरेश जगन्नाथ पाटील यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक १९.११.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दिनांक ३.०२.२००९ रोजी जळगांव मुक्कामी घेण्यात आली. त्यावेळेला जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित राहीले नाहीत.

अपिलार्थीनी दिनांक ४.०४.२००७ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत दि. १.०४.२००६ ते ३१.०३.२००७ या कालावधीत प्राप्त झालेला निधी, विभागीय व कामानिहाय झालेला खर्च, कामांची माहिती,इत्यादी तपशिलवार माहितीची मागणी केली होती. परंतू माहिती दिली नाही असे नमूद करुन दि. ४.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. तद्नंतरही विहीत वेळेत स्मरणपत्र देऊनही माहिती दिली नाही. परंतू तद्नंतर अपूर्ण माहिती इंग्रजीत दिली परंतू सदर माहिती कोणत्या अधिका-यानी दिली? असे नमूद करुन आयोगाकडे दि. १९.११.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले.

आयोगाकडील व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी प्रत्यक्ष त्या ठिकाणी उपस्थित नव्हते. त्यामुळे उपस्थित अधिका-यांना त्यांची बाजू मांडण्यास संधी देण्यात आली. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची सखोल तपासणी करण्यात आली असता असे निदर्शनास आले की, अपिलार्थीना अपेक्षीत माहिती जन माहिती अधिकारी यानी दि. २८.०८.२००७ च्या पत्रान्वये त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या स्वरुपात विनाशुल्क दिली आहे. असे असूनही अपिलार्थीचे समाधान होत नसेल तर त्यानी जन माहिती अधिकारी त्यांच्याकडे पुन्हा संपर्क साधावे व जन माहिती अधिकारी यानी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संबंधीत कागदपत्रे अपिलार्थीना तपासण्यास उपलब्ध करावीत. व अपिलार्थीनी मागणी केल्यास उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात असे आदेश या कार्यकारी अभियंत्याच्या एका उपविभागाकडे अर्जदारांनी अशाच

स्वरुपांचा अर्ज दिला होता व दिलेत्या माहितीने समाधान झाले असे अपिलार्थीनी लिहून दिले होते. मात्र ही माहिती देण्यास उशीर झाला आहे. पण दिलेली कारणे बघता यावेळी विलंब क्षमापित कररण्यात येत आहे. मात्र रेकॉर्ड ठेवण्यात अजूनही इंग्रजीत ठेवण्यात येते ही बाब खटकते. ही गोष्ट सचिव पाटबंधारे यांचे निदर्शनास आणण्यात यावी. आदेशाची प्रत व दिलेल्या माहितीची इंग्रजी प्रत सचिवांच्या निदर्शनास आणण्यात यावी. खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

आदेश

अपील निकालात काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक :-१२/०५/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ३३६/०७

श्री. सुरेश जगन्नाथ पाटील ------ **अपीलकर्ता**
रा.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
जळगांव पाटबंधारे विभाग जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभिंयता जळगांव पाटबंधारे विभाग जळगांव जि. जळगांव

- वि वे च न -

श्री. सुरेश जगन्नाथ पाटील यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक १९.११.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दिनांक ३.०२.२००९ रोजी जळगांव मुक्कामी घेण्यात आली. त्यावेळेला जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित राहीले नाहीत.

अपिलार्थीनी दिनांक ४.०४.२००७ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत दि. १.०४.२००६ ते ३१.०३.२००७ या कालावधीत प्राप्त झालेला निधी, विभागीय व कामानिहाय झालेला खर्च, कामांची माहिती,इत्यादी तपशिलवार माहितीची मागणी केली होती. परंतू माहिती दिली नाही असे नमूद करुन दि. ४.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. तद्नंतरही विहीत वेळेत स्मरणपत्र देऊनही माहिती दिली नाही. परंतू तद्नंतर अपूर्ण माहिती इंग्रजीत दिली परंतू सदर माहिती कोणत्या अधिका-यानी दिली? असे नमूद करुन आयोगाकडे दि. १९.११.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले.

आयोगाकडील व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी प्रत्यक्ष त्या ठिकाणी उपस्थित नव्हते. त्यामुळे उपस्थित अधिका-यांना त्यांची बाजू मांडण्यास संधी देण्यात आली. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची सखोल तपासणी करण्यात आली असता असे निदर्शनास आले की, अपिलार्थीना अपेक्षीत माहिती जन माहिती अधिकारी यानी दि. २८.०८.२००७ च्या पत्रान्वये त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या स्वरुपात विनाशुल्क दिली आहे. असे असूनही अपिलार्थीचे समाधान होत नसेल तर त्यानी जन माहिती अधिकारी त्यांच्याकडे पुन्हा संपर्क साधावे व जन माहिती अधिकारी यानी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संबंधीत कागदपत्रे अपिलार्थीना तपासण्यास उपलब्ध करावीत. व अपिलार्थीनी मागणी केल्यास उपलब्ध

कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात असे आदेश या कार्यकारी अभियंत्याच्या एका उपविभागाकडे अर्जदारांनी अशाच स्वरुपांचा अर्ज दिला होता व दिलेत्या माहितीने समाधान झाले असे अपिलार्थीनी लिहून दिले होते. मात्र ही माहिती देण्यास उशीर झाला आहे. पण दिलेली कारणे बघता यावेळी विलंब क्षमापित कररण्यात येत आहे. मात्र रेकॉर्ड ठेवण्यात अजूनही इंग्रजीत ठेवण्यात येते ही बाब खटकते. ही गोष्ट सचिव पाटबंधारे यांचे निदर्शनास आणण्यात यावी. आदेशाची प्रत व दिलेल्या माहितीची इंग्रजी प्रत सचिवांच्या निदर्शनास आणण्यात यावी. खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

आदेश

अपील निकालात काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक :-१२/०५/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४६२

श्री. बाळू गंगाराम गवळी ------ अपीलकर्ता

व श्री. शरद प्रल्हाद देवरे
जि.प.मराठी शाळा,नगारे, ता.नवापूर,जि.नंदूरबार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
जी.आय.एस. ऑफिर्स. जि.आय.एस. ऑफीस,
शॉप नं. ९ व १० गंगानिवास अपार्टमेंट,मामा मुंगी कार्यालयासमोर,
गंगापूर रोड, नाशिक, जि.नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा
जी.आय.एस. अधिकारी, जि.आय.एस. ऑफीस, नाशिक,
शॉप नं. ९ व १० गंगानिवास अपार्टमेंट,मामा मुंगी कार्यालयाजवळ,
गंगापूर रोड,नाशिक,जि.नाशिक

- वि वे च न -

श्री. बाळू गंगाराम गवळी व श्री. शरद प्रल्हाद देवरे यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक २४.०३.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दिनांक २८.०४.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. त्यावेळेला अपिलार्थी श्री. गवळी उपस्थित होते. परतू जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते.

अपिलार्थीनी दिनांक २४.०१.२००८ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी, जी.आय.एस. कार्यालय,नाशिक कडून त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले श्री किशोर अहिरराव यांचे नेमणूकीचे पद, इत्यादी सहा मुद्यांवर माहिती मागविली होती. परंतू सदर माहिती न मिळाल्याने दिानांक ३.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. त अनुषंगानेही माहिती न मिळाल्याने आयोगाकडे दिनांक २४.०३.२००८ रोजी व्दितीय अपील केले.

आयोगाकडील व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी उपस्थित होते. त्यांनी माहिती उपलब्ध करणे व कसूरदार अधिका-ंवर दंडात्मक कारवाई करण्याचे नमूद केले.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. हे कार्यालय जनप्राधिकरण आहे का, कि पूर्णत: खाजगी आहे. या कार्यालयाचे लाँग फॉर्म मध्ये नांव किंवा कोणत्या प्रकारचे कार्य सदरील ऑफिस करते, याविषयी कोणतीहि माहिती अर्जदार सांगू शकले नाही. त्यामुळे सदर प्रकरणात खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

अपील निकालात काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक :-१४/०५/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४२९३/०२

श्री. मोईन अख्तर कुरेशी ------ **अपीलकर्ता**
बैतुल अख्तर बिल्डींग,रुम नं.१८/१९,
पी.बी.मार्ग,फॉकलंड रोड, मुंबई ४

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
पोलीस उपआयुक्त,परिमंडळ २ सर
जे.जे.रोड. नागपाडा, मुंबई

जन माहिती अधिकारी तथा
सहा.पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग
सर जे.जे.रोड मुंबई ०८

- वि वे च न -

श्री. मोईन अख्तर कुरेशी यांनी आयोगाकडे दिनांक २७.०१.२००९ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दिनांक १४.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. त्यावेळेला अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास त्यानी दाखल दाखल केलेल्या चॅप्टर केस नंबर ३८/२००५ च्या नस्तिची तपासणी करावयाची होती. अर्जदारास नस्तिची तपासणी देण्यात आली नाही मात्र त्यांच्या जबावाची प्रत देण्यात आली. तसेच सदरील चॅप्टर ३० मधील पृष्ठांकाच्या बंद करण्यात आल्या बाबतचे विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्या आदेशाची प्रत सुध्दा देण्यात आली. प्रथम अपिलात अर्जदारानी मागितलेली माहिती ही ८(१) ञ त्या मध्ये सदरचा अपील आहे. अपिलार्थीनी केलेली तपासणीची मागणी ही लोकहीताच्या सुसंगत नाही असे त्यात दिलेले आहे. व नस्तित असलेला मुद्या कोणत्याही सार्वजनीक कामकाजाशी संबंधीत नसल्याने तपासणी मागणी मान्य करु नये असे कारण देण्यात आले आहे. मात्र चॅप्टर केस चे प्रकरणच बंद करण्यात आले असल्याने तपासणीची मागणी पुर्ण करण्यास हरकत नाही. असे आयोगाचे मत आहे. यांना पुढील आदेश देण्यात येत आहे. अपील मान्य करण्यात येत आहे. अर्जदारास नस्तीची तपासणी करण्यासाठी १५ दिवसाच्या आत बोलावून नस्तिची तपासणी करु द्यावी.

आदेश

अपील निकालात काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १४.०५.२००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४२८३/०२

श्री. भगवानजी राययानी, **------ अपीलकर्ता**
कुबेर भवन,अजाज रोड,विले पार्ले (पश्चिम)
मुंबई ४०० ०५६

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
पशुसंवर्धन,दुग्ध व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२

जन माहिती अधिकारी तथा
पशुसंवर्धन,दुग्ध व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य,पुणे ०१

- वि वे च न -

श्री. भगवानजी राययानी यांनी आयोगाकडे दिनांक १५.०४.२००९ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दिनांक १४.०५.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास विदर्भातील ६ जिल्हयात शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात शासनाने दारिद्र रेषेखालील व्यक्तींना व आत्महत्या ग्रस्त कुटंबियांना मदत करण्यासाठी जे पशुधन देण्याचा कार्यक्रम हाती घेतला होता त्या कार्यक्रमातील पैशाचा दुरुपयोगाच्या बाबतीत १३.०९.२००८ रोजी टाईम्स ऑफ इंडिया मध्ये जी बातमी आली होती त्यासंदर्भात लाभाधारकांची यादी, दिलेली सबसिडी, त्यात झालेला गैरव्यवहार,अपात्र लाभार्थी व दोषी अधिकारी यांचे विरुध्द केलेल्या कारवाईबाबत माहिती पाहिजे होती. हा अर्ज १८.०९.२००८ जन माहिती अधिकारी पशुसंवर्धन विभाग यांच्याकडे देण्यात आला. हा अर्ज १९.०९.२००९ रोजी पशुसंवर्धन आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आला व २५.०९.२००८ रोजी महाराष्ट्र पशुधन विकास अकोला यांच्याकडे पशुसंवर्धन आयुक्तांनी तो अर्ज पाठविला. या अर्जाच्या प्रती संबंधीत जिल्हयाच्या पशुसंवर्धन उपसंचालक यांनी अर्जदारास माहिती देण्यासाठी पाठविण्यात आल्या. काही पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी अर्जदारास माहितीसाठी शुल्क भरण्यास सांगितले. अर्जदारांना सर्व लाभार्थीची माहिती बाबत हवी होती. व तशी माहिती फक्त जिल्हा पातळीवर उपलब्ध होती अशी माहिती मंत्रालय विभागाच्या पातळीवर ठेवली जात नाही, त्यामुळे अर्जदारांने

केलेला कलम १९(१) खालील मंत्रालयीन अपीलीय अधिका-याकडे पाठविलेले अपील हे संबंधीत प्रादेशिक सह संचालकांकडे पाठविण्यात आले.

सुनावणीच्या वेळेला असे सांगण्यात आले की प्रादेशिक सहसंचालकांनी अर्जदारास आता संपुर्ण माहिती पाठविलेली आहे. अर्जदाराच्या माहितीच्या अर्जाचा रोख लक्षात घेता पुढील अतिरीक्त निर्देश जन माहिती अधिकारी पशुसंवर्धन विभाग यांना देण्यात आले. विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात पशुधन विकास कार्यक्रमाच्या बाबतीत जी सविस्तर टिपणी अहवाल उपलब्ध आहेत ती टिप्पणी १० दिवसाच्या आत पाठविण्यात यावी. तसेच पशुधन वाटपाच्या कार्यक्रमात अनियमितता दिसून आल्याने शासनाने चौकशी सुरु केली आहे व त्याचा अहवाल शासनास नुकताच प्राप्त झालेला आहे. असे अवर सचिव पशुसंवर्धन यांनी सांगितले. तेव्हा सदरील अहवालाची प्रत ही अर्जदारास १ महिन्याच्या आत उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिण्यात आले.

अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पशुसंवर्धन उपसंचालकांची होती. अर्जदाराचा मुळ अर्ज प्राप्त झाल्याच्या दिवसापासून ३० दिवसाच्या आत शुल्क भरण्याचे पत्र पाठविणे आवश्यक होते. व तसे न केल्यास माहिती ही विनाशुल्क द्यावयाची असते. तेव्हा पशुसंवर्धन उपसंचालक यांनी अर्जदारास केलेली शुल्काची मागणी अधिनियमाच्या सुसंगत नाही. आता मात्र अर्जदारास संपूर्ण माहिती विनाशुल्क देण्यात आलेली आहे असे सांगण्यात आले. अर्जदारास माहिती देण्याच्या बाबतीत जी दिरंगाई झाली त्या बाबत जिल्हा उपसंचालक यवतमाळ,अकोला,बुलढाणा यांनी उशीरा का होईना प्रतीसाद दिला. वर्धा, अकोला, वाशीम येथील जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक यांनी यासंदर्भात माहिती देण्याच्या संदर्भात जी कारवाई केल्याचे दिसून येत नाही. माहिती देण्यास विलंब लागला म्हणून अधिनियमाच्या कलम २० नुसार रु. १५.०००/- पर्यंत शास्ती का लादण्यात येवू नये याबद्दल त्यांचे सारे म्हणणे त्यांनी १५ जून २००९ पूर्वी आयोगास कळवावे. ही सर्व प्रतिवेदने उपसंचालकांनी पुशसंवर्धन आयुक्तांना १० जून २००९ पर्यंत पाठवावी व त्यांनी ती आयोगास १५ जून

पर्यंत पाठवावी.सर्वांचे सर्व संबंधीत उपसंचालकाचे खुलास प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी ही पशुसवर्धन आयुक्त,पुणे यांच्यावर टाकण्यात येत आहे.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे. वरील प्रमाणे कारवाई करावी आदेशाची प्रत ही संबंधीत पशुसंवर्धन उपसंचालक यांना जन माहिती अधिकारी पशु संवर्धन विभाग मंत्रालय यांना त्वरित पाठवावी. या आदेशाची प्रत आयोगही सर्व संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक यांना पाठवीत आहे. मात्र पशुसंवर्धन संचालकांनी हि एक प्रत सर्व संबंधित उपसंचालकांना पाठवावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १४.०५.२००९

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

तक्रार क्र .२००८/सीआर- ३५१/०२

श्री. जहांगीर बी.गई ------ अपीलकर्ता

वाडीया बिल्डींग, ५९८ अे,गिरगांव रोड,
मुंबई ४०० ००२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
धर्मदाय आयुक्त भवन, ८३,डॉ.अॅनी बेझंट रोड,
वरळी मुंबई ४०० ०१८

जन माहिती अधिकारी तथा
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
धर्मदाय आयुक्त भवन, ८३,डॉ.अॅनी बेझंट रोड,
वरळी मुंबई ४०० ०१८

- वि वे च न -

श्री. जहांगीर बी.गई यांनीआयोगाकडे सादर केलेल्या अपीलावर निर्णय दिनांक २२.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बृहन्मुंबई विभाग यांनी न्यु ईरा ट्रस्टच्या ऑडीटेड अकाऊंटस प्रत अर्जदारास सात दिवसात द्यावी असे निर्देश दिले. मात्र ही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे ३०.०३.२००९ रोजी तक्रार केली होती. त्याची चौकशी व सुनावणी दिनांक १४.०५.२००९ रोजी त्यावेळेला तक्रार कर्ते व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनीधी उपस्थित होते.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे निवेदन केले होते की, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील फ्रँकिंग मशीन नादुरुस्त झाल्याने व टपाल टिकीटांचा तुटवडा निर्माण झाल्याने अर्जदारांना माहिती पाठविण्यात आली नाही. नोंदविलेल्या ट्रष्टची संस्था फार मोठी असल्यामुळे माहिती शाधून काढणे जिकरीचे जाते.

सदरच्या तांत्रिक अडचणीमुळे दिरंगाई झाली असून यापुढे दिरंगाई होणार नाही याची हमी त्यांनी दिलेली आहे. सुनावणीच्या वेळेला अर्जदारास हवी ती माहिती देण्यात आली. असे जरी असले तरी आयोगाच्या आदेशचे पालन वाजवी मुदतीत झाले नाही असे दिसून येते. पोस्टेज शिल्लक नाही वा फ्रँकींग चार मशीन चालू नाही म्हणुन चार महिने पत्र पाठविता आले नाही. ही बाब खटकण्यासारखी आहे. जन माहिती अधिकारी यानी माहिती देण्यासाठी पुरेपूर प्रयत्न न केल्याचेच हे द्योतक आहे.

जन माहिती अधिकारी यांना सुनावणीची संधी देऊनही ते हजर राहिले नाहीत. मात्र वरील कारणे लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांच्यावर पूर्ण विलंबाची शास्ती न लावता २० दिवसाच्या विलंबाची शास्ती रुपये ५,०००/- लावण्याचे आयोगाने ठरविले आहे. ही शास्तीची रक्कम धर्मादाय आयुक्त कार्यालयाने संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या एक जुलै रोजी होणा-या पगारातून वसुल करुन करुन शासनाने विहित केलेल्या बजेट हेडखाली जमा करावी व तसा अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अर्जदारास सुनावणीची माहिती दिली. धर्मदाय उपआयुक्त यांनी १५ जुलै पर्यंत अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १४.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४१५९/०२

श्री. प्रभाकर चतुवैदुला ------ **अपीलकर्ता**
बि.क्र.१३,फ्लॅट क्र. ए १ ,तळमजला,
के.के.खाडये मार्ग,शासकीय अधिकारी निवासस्थान,
हाजी अली,महालक्ष्मी,मुंबई ४०० ०३४

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
सहसचिव,पोल/१,गृह विभाग,महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय मुंबई

जन माहिती अधिकारी तथा
अवर सचिव,पोल/१,गृह विभाग,
मंत्रलय

- वि वे च न -

श्री. प्रभाकर चतुवैदुला यांनी आयोगाकडे दिनांक ११.०२.२००९ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दिनांक ४.४.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास त्यांच्या ३०.०९.२००८ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या १९९७ ते २००८ पर्यंतच्या वार्षिक गोपनीय अहवालाच्या साक्षांकित प्रती पाहिजे होत्या. श्री.सी.प्रभाकर हे पोलीस उपमहानिरीक्षक असून भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी आहेत. त्यांना दिनांक ३ नोव्हेंबर २००८ रोजीच्या पत्राने अधिनियमाच्या कलम ८ (१) ञ मधील तरतूदी नुसार सदरील माहिती देता येत नाही असे कळविले. व प्रथम अपिलाचा दिनांक ५ जानेवारी २००९ रोजीचा आदेश सुध्दा अर्जदाराने केलेल्या माहितीचा जन हिताशी संबंधीत नाही. म्हणून गोपनिय अहवाल न देण्याचा निर्णय कायम करण्यात आला. त्या विरुध्द सदरचे अपील.

गोपनीय अहवालाची प्रत देणे अगर न देणे याबाबतचा निर्णय गोपनीय अहवाल दिल्यास जन हित साध्य होईल किंवा नाही हे बघणे हाच होय. केवळ स्वत:चा गोपनीय अहवाल बघावयास मिळणे ही उत्सुकता

किंवा कुतूहल हे जन हित ठरु शकणार नाही. मात्र उच्च न्यायालयाने ७६३१/०२ देवदत्त विरुध्द भारत सरकार या केस मध्ये पुढील प्रमाणे निर्देश दिले आहेत.

"In our opinion, every entry (and not merely a poor or adverse entry) relating to an employee under the state or an instrumentality of the state, whether in civil, judicial, Police or other service (except the military) must be communicated to him, within a reasonable period, and it makes no difference whether there is a bench mark or not. Even if there is no bench mark, non-communication of an entry may adversely affect the employee's chances of promotion (or getting some other benefit), because when comparative merit is being considered for promotion (or some other benefit) a person having a 'good' or 'average' or 'fair' entry certainly has less chances of promotion (or getting some other benefit), because when comparative merit is being considered for promotion (or some other benefit) a person having a 'good' or 'average' or 'fair' entry certainly has less chances of being selected than a person having a 'very good' or 'outstanding' entry.

"In most services there is a gradation of entries, which is usually as follows:-

i) Outstanding
ii) Very good
iii) Average
iv) Fair
v) Poor

A person getting any of the entries at items (ii) to (vi) should be communicated the entry so that he has an opportunity of making a representation praying for its upgradation and such a representation must be decided fairly and within a reasonable period by the concerned authority."

"In our opinion every entry in the ACR of a public servant must be communicated to him within a reasonable period, whether it is a poor, fair, Average, Good or Very good."

In the present case, we are developing the principles of natural justice by holding that fairness and transparency in public administration requires that all entries (whether poor, fair, average, good or very good) in the Annual Confidential Report of a public servant, whether in civil, judicial, police or any other state service (except the military), must be communicated to him within a reasonable period so that he can make a representation for its upgradation. This in our opinion is the correct legal position even though there may be no Rule / G.O. requiring communication of the entry, or even if there is a Rule / G.O.prohibiting it, because the principle of non-arbitrariness in state action as envisaged by Article 14 of the construction in our opinion requires such communication. Article 14 will override all rules or government orders."

नुकतेच All India services performance Appraisal Report Rules २००७) हे लागू करण्यात आलेले आहे. यात भारतीय पोलीस सेवेचाही समावेश होतो. या नियमानुसार १४ मार्च २००७ नंतर अखील भारतीय सेवेच्या अधिका-यांना त्यांचा गोपनीय अहवाल उपलब्ध करुन देणे हे अनिवार्य ठरविले आहे. अर्जदारास त्यामुळे २००७-२००८ चा अहवाल हा त्या नियमानुसार सुध्दा उपलब्ध करुन द्यावा लागेल. त्या अगोदरच्या कालावधीसाठीचे गोपनीय अहवाल हे द्यावयाचे किंवा नाही हा प्रश्न विचारात घ्यावा लागेल. सुप्रीम कोर्टाचे वरील निर्देश वाचले अर्ज नैसर्गिक न्याय प्रशासनात पारदर्शकता आणि निःपक्षपाती पणे दृगोचर होणे या दृष्टीकोनातून गोपनीय अहवाल उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता प्रतीत होते. गोपनीय अहवाल व त्यावरील आधारीत बढतीची संधी ही मुख्यत्वेकरुन वैयक्तिकबाब असली तरी बढतीच्या बाबतीत कोणावरही अन्याय होवू नये व अन्याय वाटत असल्यास परिमार्जन करुन घेण्याची संधी असावयास पाहिजे हे मान्य करावेच लागेल. विशेष करुन ज्यांना प्रतिकूल शेरे कळविले नाही जरी हि बढती मिळाली नाही व त्यांच्या पेक्षा कनिष्ट अधिका-यांना बढतीची संधी मिळाली हे शल्य दुर करण्यासाठी अशा परिस्थितीत गोपनीय अहवाल पाहावयास मिळणे हे जन हिताचेच होईल. त्यामुळे अशा केसेस मध्ये तरी गोपनीय अहवाल उपलब्ध करुन द्यावेत असे आयोगास वाटते. त्यामुळे श्रीयुत सि.पी.प्रभाकर यांच्या माहितीची मागणी ही जन हिताच्या संकल्पनेशी सुसंगत असल्यामुळे ती माहिती देण्यात यावी आदेश आयोग देत आहे.

आदेश

अर्जदाराचे अपील मान्य करण्यात येत आहे त्यांना हवी असलेली माहिती ही १५ दिवसाच्या आत देण्यात यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १४.०५.२००९

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ३४९/०७

श्री. संतोष नामदेव परतणे **------ अपीलकर्ता**
रा.फैजपूर जि. जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, विभागीय कार्यालय नाशिक,
विभाग नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भुसावळ जि.जळगांव

- वि वे च न -

श्री. संतोष नामदेव परतणे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ६.११.२००७ रोजी व्दीतीय अपील दाखल केले. अपीकाराने जन

माहिती अधिकारी यांचेकडे दि. १७.०४.२००७ रोजी अर्ज करुन श्री.एस.बी.अंधारे,सहाय्यक निबंधक,सहाकारी बँक,सहकारी संस्था व पतसंस्था यांनी दाखल केलेल्या १०१ च्या वसूली प्रमाणपत्र मिळणेबाबतच्या अर्जासंबंधी दिलेल्या निवाडयाबाबतची विस्तृत माहिती व त्यासंबंधीची कागदपत्राच्या नकला करुन मिळणेबाबत मागणी केली होती.

त्रयस्थ इसम,कर्जदार,जमिनदार यांच्या सन्मानाला हानी पोहचेल अशा प्रकारची अपीलकाराने माहिती मागीतली असल्याने र्जात नमूद केलेली माहिती देता येत नाही असे जन महिती अधिका-यांनी अपीकारास दि. २९.०९.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दिनांक ४.०६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. २४.०७.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भुसावल यांनी कार्यालयात अपलब्ध असलेली माहिती / कागपत्रे अपीलकारास पुरवावीत असे दि. २४.०८.२००७ रोजी आदेश पारीत केले. यानंतरही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दीतीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत कँप जळगाव येथे दि. ३.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुावणीकरिता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरीन विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भुसावळ यांच्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणा-या सर्व नागरी सहकारी बँका, सहकारी संस्था, पतसंस्था यांनी दाखल केलेल्या कलम १०१ च्या वसुली प्रमाणपत्र मिळणेबाबतच्या अर्जासंबंधी दिलेल्या निवाडयाबाबतची आगष्ट २००९ ते दि. ३१ मार्च २००९ या कालावधीची विस्त.त माहिती मागितली होती. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास देणेबाबत प्रथम अपीलय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले होते.

अर्जदारांनी सुनावणीच्या वेळी जे निदेश दिले आहे त्यारुन त्यांना जी माहिती दिली आहे त्याने त्यांचे समाधान झालेले दिसत नाही. तेव्हा संदर्भित कागदपत्रे अर्जदारास दाखवावीत व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्यात असे निर्देश देण्यात येत आहे.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्देशांचे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात प्राप्त करावे

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक :-१४/०५/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर-४१६

श्री. राजेंद्र काळू नानकर ------ **अपीलकर्ता**
एन.५३,महात्मा फुले नगर, पवन नगर,
सिडको नविन नाशिक-८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी जि.प.कार्यालय आवार नाशिक

- वि वे च न -

श्री. राजेंद्र काळू नानकर यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक १८.०९.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दिनांक २७.०४.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. त्यावेळेला अपिलार्थी श्री. राजेंद्र काळू नानकर उपस्थित होते. परतू जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते.

अपिलार्थीनी दिनांक २५.०४.२००७ च्या अर्जान्वये नऊ प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचा-याची नावे, पदे, केव्हा पासून कार्यरत आहे इत्यादी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ८.०६.२००७ च्या पत्रात अपीलार्थीच्या दि. ३.०५.२००७ च्या पत्राचा उल्लेख करुन सदर कर्मचारी वेगवेगळया संवर्गातील असल्याने अपीार्थीनी संबंधीत पंचायत समिती स्तरावरुन माहिती उपलब्ध करुन घेतल्यास योग्य होईल असे कळविले तसेच माहिती अर्ज हस्तांतरीत करण्यात आल्याचे पत्र मिळाले परंतू माहिती मिळाली नाही असे नमूद करुन दि. २५.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतू माहिती व प्रथम अपिलाचा निकाल मिळाला नाही असे नमूद करुन दिनांक १८.०९.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले.

आयोगाकडील व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला अपिलार्थीनी कायद्याचा भंग केल्याने दंडात्मक कारवाई करण्याचे नमूद केले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी सुनावणीच्या वेळेला उपस्थित राहीले नसल्याने त्यांची बाजू समजून घेता आली नाही. असे असले तरी अपिलार्थीना अद्याप माहिती मिळाली नसल्याचे अपिलार्थीकडून समजले तेव्हा जन माहिती अधिकारी यानी संबंधीत प्राथमिक आरोग्य केंद्रे किंवा पंचायत समिती स्तरावरुन अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती प्राधान्याने मागवून घेऊन अपीलार्थीना हे आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत उपलब्ध करुन द्यावी. तसेच यापुढे आयोगाच्या सुनावणीच्या वेळेला उपस्थित राहण्याची संबंधीत अधिकारी यानी दक्षता घ्यावी. तेव्हा खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

अपील निकालात काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,

दिनांक :-१४/०५/२००९.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर-४१५/०८

श्री. राजेंद्र काळू नानकर ------ **अपीलकर्ता**
एन.५३,महात्मा फुले नगर, पवन नगर,
सिडको नविन नाशिक-८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
माहिती अधिकारी आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नाशिक

- वि वे च न -

श्री. राजेंद्र काळू नानकर यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक १८.०९.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दिनांक २७.०४.२००९ रोजी

नाशिक येथे घेण्यात आली. त्यावेळेला अपिलार्थी श्री. राजेंद्र काळू नानकर उपस्थित होते. परतू जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते.

अपिलार्थीनी दिनांक २५.०४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री. विजय पवार,एकनाथ मोरे व रविंद्र गोसावी याना शिक्षक पदावरुन बडतर्फ केल्यानंतर त्याना अदा केलेले वेतन/भत्ते सदर रक्कम वसूल केली असल्यास चलनाची प्रत व गट विमा योजना/भविष्य निर्वाह निधी रकमा अदा केल्या असल्यास कोणत्या अधिका-यानी मंजूर केल इत्यादी माहिती मागविली होती. परंतू माहिती अर्जदाराने दि. २३.०७.२००७ रोजी मिळाल्याने दि. २५.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले असे असले तरी माहिती मिळाली नाही, अपीलाचा निकाल मिळाला नाही असे नमूद करुन दि. १८.०९.२००७ रोजी व्दितीय अपील केले.

आयोगाकडील व्दितीय अपीलाच्या सुनावणी दि. २७.०४.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थीनी माहिती मिळाली नाही दंड रावे असे नमूद केले.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित न राहील्याने त्यांची बाजू समजून घेता आली नाही परंतू प्रथम अपिलात अपिलार्थीनीच दिनांक २३.०७.२००७ रोजी माहिती मिळाल्याचे नमूद केलेआहे. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसते की, आरोग्य विभाग, जि.प.नाशिक, यानी अपिलार्थीना अन्य दि. ३.०५.२००७ च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. १३.०६.२००७ च्या पत्रान्वये संबंधीत कर्मचारी यांचे वेतन,भत्ते,भविष्य निर्वाह निधी गट विकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे तसेच व्हते. ,भविष्य निर्वाह निधी गट विमा योजना व कुढलेही लाभ प्रदान न करणेबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प. नाशिक याना कळविल्याचे व त्याची प्रत सोबत जोडण्यात आल्याचे अपीलार्थीना कळविले आहे.

आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित राहीले नाहीत ही बाबत उचीत नाही. तेव्हा असे प्रकार यापुढे टाळण्याची दक्षता संबंधीत अधिका-यांनी घ्यावी तसेच प्रथम अपीलय अधिकारी यांचेकडे आलेला अपीावर सुनावणी देऊन त्वरीत निर्णय द्यावा अशी समज देण्यात येते.

सदर अपीलाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

अपील निकालात काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक :-१४/०५/२००९.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- २९०/०७

श्री. प्रभाकर मंगा वालडै ------ अपीलकर्ता
रा.जळगाव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सहाय्यक धर्मदाय आयुक्त, आंबेडकर मार्केट,
२ मजल्यावर जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
अध्यक्ष सावतामाळी शिक्षण प्रसारक मंडळ,जळगांव,
के.के. महाजन वस्तीगृह आर.आर.विद्यालयासमोर,
जिल्हापेठ जळगांव

- वि वे च न -

श्री. प्रभाकर मंगा वालडे आयोगाकडे दिनांक २७.०४.२००७ राजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील केले त्या अपिलाची सुनावणी दिनांक २.०२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यात आली. त्यावेळेला केवळ तथाकथीत (Socalled) प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दि. ५.०३.२००७ च्या अर्जान्वये श्री. सावतामाळी शिक्षण प्रसारक मंडळ,जळगाव या संस्थेचे महात्मा फुले हायस्कूल,एरंडोल तसेच महात्मा फुले हायस्कूल,धरणगाव येथे सन २०००,२००१ व २००२ मध्ये विशिष्ट कालावधीत शिक्षण सेवक म्हणून कार्यरत होते असे नमूद करुन अपिलार्थीनी अधिक माहिती मागविली होती. परंतू मागणी केलेली माहिती न मिळाल्याने अपिलार्थीनी दि. ७.०४.२००७ रोजी तथाकथीत (Socalled) प्रथम अपिल अधिका-यांकडे प्रथम अपिल केले. परंतू ते प्रथम अपिलीय अधिकारी नसल्याने सदर अपिल टिकण्यासारखे (Maintenable) नसल्याचे दि. २४.०४.२००७ रोजी आदेश निर्गमीत केले. अपिलार्थीना अपेक्षीत माहिती न मिळाल्याने त्यानी दि. २४.०४.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपिल केले.

व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला केवळ तथाकथित (Socalled) प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यानी ते संबंधित अपिलीय अधिकारी नसल्याने अपिल खरीज केल्याचे नमूद केले. तसेच एका रिट याचिकेच्या संदर्भात उच्च न्यायालयाने त्यांचे म्हणणे मान्य केल्याचेही सांगितले.

सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी व तथाकथित अधिकारी उपस्थित नसल्याने प्रकरणाची वस्तुस्थिती जाणून घेता आली नाही. शिवाय सदर संस्था अधिनियमाच्या कक्षेत येते किंवा कसे याचा निश्चित बोध होत नाही त्यामुळे माहिती पुरविण्याबाब तविशिष्ट आदेश पारीत करणे आयोगाला अवघड झाले आहे. अर्जदाराने ज्या शाळेत ते शिक्षण सेवक म्हणून काम करीत होते त्या शाळेच्या मुख्याध्यापकांकडे माहितीचा अर्ज दिल्यास ते श्रेयस्कर ठरेल.

आदेश

अपील फेटाळण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर-५०९

श्री.वसंतराव जेसा चव्हाण ------ **अपीलकर्ता**
नितीननगर शहादा, जि.नंदुरबार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हापरिषद धुळे

जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हापरिषद धुळे

- वि वे च न -

श्री.वसंतराव जेसा चव्हाण यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक १.०८.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दिनांक २८.०४.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. त्यावेळेला अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दिनांक ३.१२.२००७ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ,धुळेच्या कायदेशीर आस्तीबाबत शिक्षण उपसंचालक,नाशिक यांच्याकडे चौकशी अहवालाची नक्कल उपलब्ध करण्याची मागणी केली परंतू त्या अनुषंगाने माहिती प्राप्त न झाल्याने दि. २४.०१.२००८ रोजी दिलेला निर्णय मान्य नसल्याचे नमूद करुन दि.१.०८.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले.

आयोगाकडील व्दितीय अपीलाची सुनावणी दि. २८.०४.२००९ रोजी घेण्यात आली असता अपेक्षीत माहिती न मिळाल्याचे अपीलार्थीनी नमूद केले तर वेळोवेळी माहिती दिली आहे परंतू अपिलार्थीचे समाधान होत असल्याचे अधिका-यानी नमूद केले आहे. अर्जदार यांना संस्थेने सेवेतून काढून टाकले होते, त्यांच्यावर हद्दपारीची नोटीस बजावण्यात आली होती. त्यांच्या वागणूकीबाबत मा. हायकोर्टाने कडक ताशेरे ओढले आहे. उल्लेखीत मुद्दे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या निवेदनात मांडले आहेत. अर्जदारास संस्थेवर त्यांचा रोख असल्याने लोकशाही दिन अंतर्गत तसेच माहितीचा अधिकार अंतर्गत माहिती मागत असतात व माहिती त्यांना दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले. असे असले तरी आठ दिवसात सर्व माहिती पोष्टाने (आर.पी.ए.डी.) पुन्हा पाठविण्याचे जन माहिती अधिकारी यानी मान्य केले. तेव्हा अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात अपिलार्थीना देण्याची जन माहिती अधिकारी यानी देक्षता घ्यावी तेव्हा खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

आदेश

अपील निकालात काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक :-१८/०५/२००९.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

तक्रार क्र .२००८/सीआर- १४४/०२

डॉ. विनोदकुमार एल.धवन ------ **अपीलकर्ता**
१०१,कृष्णा कुंज,सी.एच.एस.लि.
प्लॉट नं.१३, एल.टी.नगर रोड नं.१,
एम.जी.रोड,गोरेगांव(पश्चिम)

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी ------- **उत्तरवादी**
धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालय
बृहन्मुंबई विभाग,मुंबई,धर्मादाय आयुक्त भवन,
८३ डॉ.ॲनी बेंझंट रोड, वरळी मुंबई

- वि वे च न -

अपील क्रमांक २०२ मध्ये दिनांक १०.०८.२००८ आयोगानी जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसाची चौकशी पुर्ण करुन अर्जाचे उत्तर द्यावे व इतर जी माहिती अपेक्षित होती ती माहिती विनामुल्य द्यावी असे निर्देश दिले होते. याबाबत माहिती न मिळाल्यामुळे अर्जदारानी दि. २८.०७.२००८ रोजी आयोगाकडे तक्रार दिलेली आहे. या तक्रारीची सुनावणी दिनांक १८.०५.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला त्यावेळेला तक्रार कर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास दिनांक ७.०८.२००८ रोजी ७.१२.२००८ रोजीच्या पत्राने आपली माहिती घेऊन जावी असे पत्र देण्यात आलेले आहे. अर्जदाराकडे चौकशी केली असता त्यांना वरील पत्र मिळाले नाही असे त्यांनी सांगितले आहे. तसेच चौकशी करण्यात झालेल्या विलंबासाठी हायकोर्टाच्या आदेशानुसार इंडिजंट पेशंटला च्या बाबतीत करावयाची पाहणी ही अग्रहक्काने करावयाची असल्यामुळे व ते काम सतत करीत असल्याने चौकशी करण्यास वेळ लागला असे कारण दिलेले आहे. अर्जदारास द्यावयाची माहिती त्यांनीच सुनावणीच्या वेळेला आणलेली होती ती देण्याचे आदेश देण्यात आले. तक्रार कर्त्याचे माहितीने समाधान होत नसल्यास अर्जदाराने यासंदर्भात असलेल्या नस्तीची पाहणी करावी व त्यांना हवे असलेले अतिरिक्त कागदपत्रे प्राप्त करुन द्यावीत.

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

तक्रार क्र .२००८/सीआर- ७० व ४९/०२

श्री.सुरेश गावडे ------ **अपीलकर्ता**

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी ------- **उत्तरवादी**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,५ वा मजला,
गृहनिर्माण भवन,मुं.५१

श्री.सुरेश गावडे ------ **अपीलकर्ता**

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी ------- **उत्तरवादी**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,५ वा मजला,
गृहनिर्माण भवन,मुं.५१

- वि वे च न -

तक्रारीचा दिनांक ९.०९.२००८ व १४.१०.२००८

सुनावणीची तारीख १८.०५.२००९

२४.०१.२००८ रोजीचे कलम सहा खालील अर्जानुसार त्यांना परिश्रम सहकारी गृहनिर्माण संस्था व शास्त्री नगर मुनसीपल व्यापारी सेवा संघ यांच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प बांद्रा (प.) यासंबंधी माहिती पाहिजे होती. ही माहिती ब-याच प्रमाणात विस्तृत असल्यामुळे त्यांना दि.११.०२.२००७ रोजीच्या अर्जाने रेकॉर्डची तपासणी घेऊन कागदत्रांची निवड करण्यासाठी बोलाविण्यात आलेले होते, पण असे जरी असले तरी माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे तक्रार केलेली आहे. सुनावणीच्या वेळेला अर्जदारानी या अगोदरही तपासणी केलेली आहे व अजूनही तपासणी चालू आहे असे सांगण्यात आले. अशी तपासणी करीत असताना अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी संपुर्ण पणे सहकार्य करावे व त्याला हवी असणारी माहिती जास्तीत जास्त कशी देता येईल हे बघावे. नजीकच्या आठवडयात पुन्हा एकदा अंतीम तपासणी करणार असल्याचे तक्रार कर्ते व जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

दुस-या तक्रारीत अर्जदारास मुखत्यार पत्र पाहिजे होते पण ते देण्यात आले नाही. त्या ऐवजी करारपत्राची प्रत देण्यात येईल असे सांगण्यात आले. त्यामुळे त्यांची तक्रार आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, झोपडपट्टी पुनर्वसन नियमा मध्ये मुखत्यार पत्र नसते. करार पत्र असते त्याच्या प्रती अर्जदाराकडे या अगोदरच आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

आदेश

तक्रारी निकाली काढण्यात येत आहे
संबंधीताना वरील निर्देशा प्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४२१६/०२

श्री.सुमिर सभरवाल **------ अपीलकर्ता**
२ ग्रॉटो बिल्डिंग,३३ वा रस्ता व ९ रस्ता,
यांच्या नाक्यावर,ओल्ड खार,
मुंबई ४०० ०५२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग वांद्रे

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (इमा व कार)
बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग कार्यालय वांद्रे

- वि वे च न -

अपीलकार श्री.सुमिर सबरवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १९.११.२००८ रोजी अर्ज करुन जुन खार,मुंबई येथील ग्रॉटो व जॅसीनटो इमारतीमधील अवैधतेबाबत महानगरपालिका आणि एमआरटीपी अधिनियमानुसार निर्गमित केलेल्या नोटीसीच्या छायाप्रती व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि. २९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. २८.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकारास जन माहिती अधिकारी यांनी त्वरित माहिती द्यावी असे दि. १२.०२.२००९ रोजी आदेश पारित केले त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीकाराने राज्य माहिती आयोगाकाडे व्दितीय

अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२१.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

सनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन ग्रोटो, जॅसीनटो इमारती संबंधी तसेच जॅसीनटो कुटुंबाबत महानगरपालिका, एम आर टी पी अधिनियमानुसार निर्गमित करण्यात आलेल्या नोटीसाच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यानी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार या अगोदर माहिती पुरविली नसल्यास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरवावी. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी विहित वेळेत माहिती दिली नाही. यामुळे उक्त अधिनियमातील कलम ७ चा भंग झाला आहे. यासाठी जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द उक्त निनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई का? करु नये याबाबत जन माहिती अधिका-यांनी आयोगास १८ सप्टेंबर २००९ रोजी प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४१०४/०२

श्री.विजय के मंथेना **------ अपीलकर्ता**
अब्दूल मेन्शन ई क्र.७ खोली क्र. ३४,हरीयानावाला लेन,
स्टेशन रोड, कुर्ला(प), मुंबई ४०० ०७०

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
नगर भूमापन अधिकारी टोपीवाला कॉलेज इमारत,
सरोजिनी नायडू मार्ग, मुलुंड (प)

जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक भूमि अभिलेख प्रशासकीय इमारत,
१० वामजला चेतना कॉलेज समोर,
बांद्रा ४०० ०५१

- वि वे च न -

अपीलकार श्री.विजय के मंथेना यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.०१.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. त्या अपीलाची सुनावणी दि. २४.०३.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनीधी उपस्थित होते.

श्री.विजय के मंथेना यांनी माहिती मिळण्यासाठी ४.०८.२००८ रोजी अर्ज सादर केला. यातील ठळक बाबी १. अशोक माधव नाईक यांनी नगर भूमापन क्रमांक ३७३,३७३/१ मे ६ आराखडयात १९४ ते २००/१५.०४.१९०१ वास्तु विकत घेतलेल्याचे प्रकरणी कोणत्या प्रकारचे अधिकृत पुरावे सादर केले.२. सिटी सर्व्हे ३७३/१ ते ६ या वास्तूची कोर्टाची डिक्री ऑर्डर.३. नोंदवहीत कोणत्या अधिनियमानुसार नोंद झाली

या व्यतिरिक्त त्यांनी नोंदीबाबत खुलासा विचारला आहे. माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीना उत्तर दिले. त्यांनी मागितलेल्या कागदपत्रांची नक्कल रु १९८/- भरुन प्राप्त

करण्यास त्यांना कळविण्यात आले. यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि. ३१.०७.२००८ रोजी अपील दाखल केले. त्यावर सुनावणी होऊन खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

अपीलदार यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या नकला त्यानी प्रत्यक्ष संपर्क साधल्यावर त्यांना पुरवण्यात याव्यात. कार्ट डिक्री क्रमांक ५७८/१९५९ ची प्रत सरकारी वकील, सिटी सिव्हील कोर्ट याचंकडे समक्ष संपर्क साधून दि. २३.१२.२००८ रोजी प्राप्त करुन घेण्यात आली व अर्जदाराने दि. १३.०१.२००९ रोजी नक्कल फी भरल्यानंतर त्यांना त्याच दिवशी ती देण्यात आली. अर्जदारास इतर माहिती आधीच देण्यात आली होती.

प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या विरोधात या अगोदरच अपीलार्थीनी व्दितीय अपील सादर केले. अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम जन माहिती अधिकारी अपीलीय अधिकारी यांनी आपले म्हणणे लेखी सादर केले. याचे अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, अर्जदाराला त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्यात आली आहे. अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल करतांना जे मुद्दे उपस्थित केले आहेत ते वाजवी नाहीत. जन माहिती अधिकारी यानी दिलेला खुलासा अधिनियमानुसार दिला आहे काय, कोर्टाची ऑर्डर नसतांना फेरुफार कसा केला, वास्तू त्रयस्थ व्यक्तीच्या नावे कशी करण्यात आली याचे स्पष्टीकरण इत्यादि प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत. हे सर्व मुद्दे माहिती या सदरात मोडत नाहीत.

आदेश

अपील खारीज करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १७.०४.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४२१५/०२

श्री.सुमिर सभरवाल **------ अपीलकर्ता**
२ ग्रॉटो बिल्डिंग,३३ वा रस्ता व ९ रस्ता,
यांच्या नाक्यावर,ओल्ड खार,
मुंबई ४०० ०५२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग वांद्रे

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (इमा व कार)
बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग कार्यालय वांद्रे

- वि वे च न -

अपीलकार श्री.सुमिर सबरवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १९.११.२००८ रोजी अर्ज करुन, जुन खार, मुंबई येथील प्लॉट क्र. ५५३ ग्रॉटो इमारती संबंधीच्या तक्रारी, सर्व अवैध प्रकरणे महानगरपालिकेचा कोण अधिकारी हाताळतो. तसेच इमारती व कारखाने विभागाच्या एच-पश्चीम विभाग सर्व अधिकारी /कर्मचारी नावे व पदनामाची व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि. २९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. २८.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी तथा सहाय्यक अभियंता (इ.व वा.) एच/पश्चीम विभाग यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-यांना दंडीत न करता प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि. १२.०२.२००९ रोजी

आदेश पारीत केले. यामुळे व्यथीत होऊन अपीकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दीतीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. २१.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिका-यांनी हजर होते. अपीकार अनुपस्थित होते.

सनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन एच/पश्चीम इमारती व कारखाने विभागातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांची नावे व पदनाम तसेच प्लॉट क्र. ५५३ ग्रोटो, इमारतीच्या तक्रारी/सर्व अवैध प्रकरणे हाताळणा-या अधिका-याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर निश्चीतच योग्य नाही. राज्या केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिका-यांनी अपीकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. याबाबत त्यांना जबाबदार धरुन जन माहिती अधिका-यांविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई का ? करु नये याबाबत १५ दिवसाचे आत समक्ष भेटुन लेखी खुलासा सादर करावा.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.०८.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४०८४/०२

श्री.अमरजित सिंग गुप्ता **------ अपीलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
उपमुख्य अभियंता इमारत प्रस्ताव विभाग
१ ला मजला,आर.के.पाटकर मार्ग,बांद्रा(प),
मुंबई ४०० ०५०

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
इमारत प्रस्ताव विभाग,बांद्रा (प) मुंबई ४०० ०५०

- वि वे च न -

अपीलकार श्री.अमरजित सिंग गुप्ता यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०१.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. त्या अपीलाची सुनावणी दि. २४.०३.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपीलाथी उपस्थित होते तर जन माहिती अधिकारी उपस्थित होते,तर प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित होते.

श्री. अमरजित सिंग गुप्ता यानी दि. २५.०८.२००८ च्या अर्जान्वये खालील कागदत्रांची मागणी केली होती.

Certified copies of

१.Correspondence exchanged among EX.Engineer (B.P) & M.C. subsequent to Subrrission of ruch letter of Ex.Engr.

२. Order/diuctoions by Chief Eng (D.P.) and M.C.subsequent to subonission of ruch letter of Ex.Eng at २३.०८.२००५

उपरोक्त माहिती अपीलार्थीनाआवश्यक शुल्क भरुन उपलब्ध करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १९.०९.२००८च्या पत्रान्वये कळविले. यावर अपिलार्थीनी दि.२९.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. यात त्यांनी असे नमूद केले की त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती देण्यात आलेल्या नाहीत. अपीलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यात आलेत की, त्यांना अपिलार्थींना त्यांना हवी असलेली कागदपत्रे पुरवावी व संबंधित नस्तीचे त्यांना अवलोकन करु द्यावे. तथापि अपिलार्थींना माहिती व कागदपत्रे मिळाली नाही.

अपिलार्थीनी दि. १६.०१.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय दाखल केले. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, अपिलार्थीना कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती सूपूर्त करण्यात आल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे आयोगाकडे लिखित स्वरुपात सादर केले आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, अपिलार्थीना हवी असलेली कागदपत्रे त्यांना देण्यात आलेली आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४२६९/०२

श्री.फमिदा बानो ------ अपीलकर्ता
शॉप नं. ए/२,कालाकिल्ला,शिव शंकर रहिवाशी संघ,
९० फिट रोड, धारावी
मुंबई ४०० ०१७

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सहाय्यक मनपा आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय दादर मुंबई २८

जन माहिती अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय जी/नार्य दादर मुंबई २८

अपील क.२००८/सीआर- ४२७०/०२

श्री.शमसुद्दीन मोहम्मद हलीम ------ अपीलकर्ता

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सहाय्यक मनपा आयुक्त जी/नार्य विभाग, दादर मुंबई २८

जन माहिती अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय जी/नार्य दादर मुंबई २८

अपील क.२००८/सीआर- ४२७१/०२

श्री.रामसुद्दीन मोहम्मद हलीम ------ अपीलकर्ता

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सहाय्यक मनपा आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय
जी/नार्य विभाग, दादर मुंबई २८

जन माहिती अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,

जी/नार्य दादर मुंबई २८

- वि वे च न -

अपिलाची तारीख - २१.०३.२००९
सुनावणीची तारीख - ६.०५.२००९

अपिलार्थी अनुस्थित, उपस्थितीत राहण्याच्या नोटीसेसची पाकिटे राहत नाही म्हणून पोस्टाकडून परत आली.

सदरील तिन्ही अपीलाचे विषय एकच आहे अर्जदारांस धारावीतील २० फूटी जे.पी.रोड लगतच्या बांधकामासंबंधी,१.११.२००९ ची जी डिमॉलेशन नोटीसेसच्या संदर्भात देऊ केलेले पीच संबंधात माहिती पाहिजे होती. तसेच दि. १५.१२.२००९ रोजीच्या कोर्ट डि,कीनुसार पर्यायी जागा का देण्यात आली नाही याची माहिती पाहिजे होती.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश दिल्याप्रमाणे पुन्हा एकदा कागदपत्रांचा पारीने शोध घेण्यात आला. पण अर्जदाराच्या विषयासंबंधाने कुठलेही कागद उपलब्ध नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा, प्रकल्प अधिकारी (धारावी) व वसाहत अधिकारी यांनी लिहून दिले आहे अपीलकर्ते हि सुनावणीच्या वेळी उपस्थित नाहीत. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

आदेश

तिन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १८.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४२१७/०२

श्री.सुमिर सभरवाल **------ अपीलकर्ता**
२ ग्रॉटो बिल्डिंग,३३ वा रस्ता व ९ रस्ता,
यांच्या नाक्यावर,ओल्ड खार,
मुंबई ४०० ०५२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग वांद्रे

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (इमा व कार)
बृहन्मुंबई मनपा अेंच/पश्चिम विभाग कार्यालय वांद्रे

- वि वे च न -

अपीलकार श्री.सुमिर सबरवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ३१.१०.२००८ रोजी अर्ज करुन, प्रथम अपील मिळाल्याच्या दिनांकापासून एकूण ४५ दिवसापेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत कारणे लेखी नमूद करुन निकालात काढण्याबाबत माहितीच्या अधिकाराच्या कोणत्या नियमानुसार कार्यवाही बंधनकारक आहे त्या माहितीच्या अधिकाराच्या नियमाच्या प्रतीची माहिती तसेच प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या तारखा लावण्याचे काम अधीकृतरित्या ज्या अधिका-याकडे दिले आहे त्या अधिका-याचे नाव व पदनाम कळविण्याची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहीत कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. २१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. माहितीपोटी आवश्यक शुल्क भरण्याबाबत अपीकारास कळविण्यात आले हाते. दूरध्वनीवरुन संपर्क साधला होता. परंतू दुरध्वनीवरचा संपर्क ग्राहय धरता येत नाही. असे विशद केले. आवश्यकते शुल्क भरण्याचे पत्र प्राप्त झाले नाही असे अपीकाराने सुनावणीचेवेळी

प्रतिपादन केले. आवश्यक ते शुल्क आकारुन अपीकारास माहिती देण्यात यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि. १२.०२.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीवर दि. २१.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्या आली. सुनावणीकररीता अपीलकार अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन माहितीच्या अधिकाराच्या नियमाची प्रत तसेच प्रथम अपीलावर सुनावणीच्या तारखा लावण्याच्या अधिकृत अधिका-याचे नाव पदनाम याबाबत माहिती मागितली होती. माहितीपोटी आवश्यक शुल्क भरण्याबाबत अपीलकारास दि. ३.११.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. तसेच दूरध्वनिवरुनही संपर्क साधला होता असे जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले. माहिती पोटी शुल्क भरण्याबाबतचे पत्र प्राप्त झाले नसल्याचे अपीलकाराचे म्हणणे आहे. हया तारखा अपिलीय अधिका-यांनी तपासल्या आहेत. अर्जदाराचा अर्ज वाचला असता त्यांना माहिती ही स्वत: अपिलीय अधिका-यांनी विनामूल्य द्यावी असे निर्देश देत आहे.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.
अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम यांची माहिती द्यावी

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क.२००८/सीआर- ४२७३/०२

श्री.सय्यद नबी शाह **------ अपीलकर्ता**
गोडाऊन नं.४,रो नं. ११,हनुमान मंदिराजवळ,शिवडी क्रॉस रोड,
मुंबई ४०० ०१५

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
मुख्य अधिकारी झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन,कलानगर बांद्र(पूर्व),
मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा
उप मुख्य अभियंता मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व),
मुंबई ५१

- वि वे च न -

श्री.सय्यद नबी शाह, यांनी दि. १४.०१.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता (शहर) म्हाडा, वांद्रे (पूर्व) मुंबई यांना दि. १४.०१.२००९ रोजी सादर केला. सदर अर्ज दि. १६.०१.२००९ रोजी उप मुख्य अभियंता,मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्याकडे वर्ग केला. श्री.शाह यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने कळविण्यात आले होते की, त्यांना हवी असलेली माहिती त्यांनी कार्यालयात येवून प्रत्यक्ष निरीक्षण करुन निश्चित करावी. निश्चित केलेली माहिती योग्य ते शुल्क आकारुन उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री.शाह यांनी दि. २०.०२.२००९ रोजी सचिव,म्हाडा गृहनिर्माण भवन,यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपीलावर दि. १६.०३.२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, कक्षात सुनावणी घेऊन दि. १८.०३.२००९ रोजी त्याबाबतचे आदेश पारीत कले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाने समाधान झाले नाही म्हणून अपिलार्थीनी दि. २४.०३.२००९ रोजी पूर्व माहिती मिळाली नाही हे कारण देऊन व्दितीय अपील दाखल केले.

श्री. शाह यांनी दाखल केलेल्या व्दितीय अपिलाची सुनावणी दि. ६.०५.२००९ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थीसह जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी

सदर सुनावणीस उपस्थित होते. सुनावणी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाकडे दिलेले निवेदन व इतर कागदपत्रे पाहता अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती रवा,पी देवी इमारतीच्या जवळचे स्टेजच्या बांधकामासंबंधी प्रशासकिय मान्यता वगैरे दिलेली आहे. इतर दोन बांधकामाबाबत जी म्हाडाने केलेली पाणी त्याबाबत संबंधित गृहनिर्माण संस्थेकडेच अर्जदाराने विचारणा करणे योग्य राहील. यास्तव खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

तक्रार क्र .२००८/सीआर- ३२८/०२

श्री. जयंतीलाल व्ही.वोरा, ------ **अपीलकर्ता**
ब्लॉक नं.४,२ रा मजला,मेघदुत बिल्डींग,२८३,फलॅक रोड,

किकाभाई हॉस्पीटल समोर,गांधी मार्केट जवळ,
किंग सर्कल,सायन(पू), मुंबई ४०० ०२२

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी **------- उत्तरवादी**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बृहन्मुंबई विभाग,
वरळी,मुंबई १८

- वि वे च न -

श्री. जयंतीलाल व्ही.वोरा यांनी आयोगाकडे वर्धमान स्थानक वाशी,जैन श्रावक संघ मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्टनुसार नाही व त्यांच्या विरुध्द कारवाई करावी असा अर्ज केला होता. हा अर्ज दि. ११.१२.२००८ रोजी धर्मदाय आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आला होता. या अर्जानुसार काही कारवाई न झाल्यामुळे अर्जदार यांनी २४.०२.२००९ रोजी आयोगाकडे तक्रार केली आहे. या तक्रारीची सुनावणी दि. १९.०५.२००९ रोजी घेण्यात आली, त्यावेळेला अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीना श्री. वर्धमान स्थानक वाशी,जैन श्रावक संघाची जी चौकशी करण्यात आली या चौकशी अहवालाची प्रत या अगोदरच देण्यात आलेली आहे. पणी चॅरीटी धर्मदाय आयुक्त यांनी दि. २८.०२.२००७ रोजी चे आदेश दिलेले आहेत त्यानुसार नोटीशी संबंधीत संस्थेस नोटीस काढण्यात आलेली आहे. पण त्यापुढील कारवाई झालेली दिसत नाही. त्यामुळे संस्थे विरुध्द करीत असलेल्या कारवाईची सद्यस्थितीची माहिती त्वरित अर्जदारास देण्यात यावी. यासंदर्भात क्रमांक ५५८/०१/८६०५/०८ दि.२०.१२.२००८ ने संबंधीत माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविली. अर्जदाराचा अर्ज हा धर्मदाय आयुक्त कार्यालय यांनी माहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयास २६.१२.२००८ रोजी माहिती देण्यासाठी पाठविला. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० अन्वये आता काही माहिती दिलेली आहे. हे लक्षात घेता पूर्ण विलंबाची शास्ती न लावता फक्त १० दिवसाच्या विलंबासाठी २५००/- ही नाममात्र शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती धर्मदाय आयुक्त कार्यालयानी अर्जदाराच्या १.०७.२००९ रोजी होणा-या पगारातून वसुल करुन शासनाने विहीत केलेल्या बजेट हेड मध्ये जमा करावी व तसा अनुपालन अहवाल १५ जुलै पर्यंत आयोगास पाठवावा.

आदेश

तक्रारी निकाली काढण्यात येत आहे
संबंधीताना वरील निर्देशा प्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४१३७/२००८

श्री. मोहम्मद उस्मान सुमरा **------ अपीलकर्ता**
२०३,रुबी अपार्टमेंटस्,
जेम पवई विहार,सी एच एल लिमिटेड,
पवई विहार कॉम्प्लेक्स, पवई,

मुंबई ४०० ०७६

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
उपमुख्य अभियंता इमारत (प्रस्ताव विभाग)
राज लिगसी जवळ,पेपर मिल कंपाऊंड,
विक्रोळी(प),
मुंबई ४०० ०८३

जन माहिती अधिकारी तथा
उपमुख्य अभियंता इमारत (प्रस्ताव विभाग) कार्यालय,(पश्चिम उनगरे)
राज लिगसी जवळ,पेपर मिल कंपाऊंड, एल.बी.एस.मार्ग, विक्रोळी (पश्चिम)
मुंबई ४०० ०८३

- वि वे च न -

अपीलकार श्री. मोहम्मद उस्मान सुमरा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. त्या अपीलाची सुनावणी दि. १.०४.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपीलाथी उपस्थित होते तर जन माहिती अधिकारी अनुउपस्थित होते,तर प्रथम अपीलीय अधिकारी ऊपस्थित होते.

श्री. मोहम्मद उस्मान सुमरा यानी दि. २.१२.२००८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मागविली.

A. Layout plan of lake homes,Ekla-Supreme Housing,Powai

B. Location map

C. Map of the plot showing actual area of the plot.

D. Sale-pruchare agreement or ownership dowcuments.

E. सदर प्रकरणाच्या फाईल मधील कागद पत्रांच्या प्रती.

अर्जाच्या अनुषंगाने दि. १२.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की त्यांनी शुल्क भरुन उपरेक्त कागदपत्रे कार्यालयीन वेळा संपर्क साधून घेऊन जावीत. यावर अपीालार्थीने खालील कारणास्तव दि. ७.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

१. Fees charged are not an per sec. ३ &४ of the RTI Act

२. Fee structure is completely illegal

प्रथम अपीलावर सुनावणी झाली सुनावणीच्या वेळी शुल्क कसे आकारण्यात येते याबाबत अपीलार्थींना निदर्शनास आणण्यात आले.शुल्क भरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती व कागदपत्र द्यावी असे नमूद करुन उपील निकाली काढण्यात आले. यावर समाधान न झाल्याने अपीालार्थीनी दि. १०.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या अपीालार्थी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी लेखी निवेदन दिले. प्रथम अपिलीय अधिका-याच्या निवेदनानुसार अपीलार्थीना जेवढया छायांकित प्रतींच्या शुल्काचा भरणा केला आहे त्या प्रती पुरविण्यात आल्या आहेत. इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती शुल्क भरुन देण्यास तयारी दर्शविली आहे. अशा परिस्थितीत अपिलार्थीनी शुल्क भरुन छायांकित प्रती प्राप्त करुन घ्याव्यात असे निर्देश देण्यात आले.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १९.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ३५६/२००८

श्री. आनंद लालसिंग पाटील ------ **अपीलकर्ता**
रा.जैतपीर ह.मु. आर.के.नगर,
रुम नं. ३९:४०,मु.पो.ता. अमळनेर,

जि.जळगाव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
विभागिय जाती प्रमाणपत्र तथा विभागिय समाज कल्याण अधिकारी नाशिक
जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
विभागिय जाती प्रमाणपत्र जळगांव विभागिय समाज कल्याण अधिकारी नाशिक
जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. आनंद लालसिंग पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम ६नुसार जन माहिती अधिका-याकडे दि. २६.०३.२००७ रोजी अर्ज करुन अपीलकाराच्या राजपूत भामटा या जातीच्या दाव्याच्या पडताळणीबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती जन माहिती अधिका-यांनी विहीत कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि. २७.०४.२००७ च्या प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.०६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत कँप जळगांव येथे दि. ३.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणीकरीता हजर राहणेबाबत आपणास राज्य माहिती आयोग अपील/जळगांव/२००८/सीआर-३५६/२८६,दि. २१.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिलेली नाही. व्दितीय अपीलाच्या सुनावणीवेळी हजर राहिले नाही. तेव्हा सदर आपल्या कृतीबद्दल उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती का लाऊ नये याबाबत हे पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा. लेखी खुलाशाच्या डाव्या बाजूला व पाकिटावर □ अशी खूण असावी. तसेच अर्जदारास माहिती हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसाचे आत देण्यात यावी.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिका-यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ३७५/२००८

श्री. रोजेंद्र पांडुरंग वाघ ------ **अपीलकर्ता**
रा.दंवपूर धुळे
जि.धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
अध्यक्ष दंदादेवी निद्याप्रसारक संस्था प्लॉट नं ५३,
प्रमोद नगर सेक्टर नं. २,
धुळे ४२४ ००२

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक इंदाईदेवी माध्यमिक विद्यालय जवाहर कॉलनी,
साक्री रोड,
धुळे ४२४ ००१

- वि वे च न -

श्री. रोजेंद्र पांडुरंग वाघ, यांनी दि. ४.०७.२००७ च्या अर्जानुसार इंदाईदेवी माध्यमिक विद्यालय धुळे मधील माध्यमिक विद्यालयातील हजेरी रजिस्टर जून १९९७ ते जून २००७ ची प्रमाणित प्रत मागितली होती. जन माहिी अधिकारी यांनी जून १९९ ते जून २००७ पर्यंतच्या हजेरीपटाच्या साक्षांकित प्रती अपीलार्थींना दिल्या व असे नमूद केले की विद्यालयाला जून १९९९ मध्ये मान्यता मिळाली व तेव्हा पासून विद्यालय सुरु झाले. या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थींनी दि. २०.०८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. यात त्यांनी असे नमूद केले की विद्यालय जून १९९७ पासून सुरु असल्याने जन माहिती अधिका-यानं दिलेले उत्तर चुकीचे व दिशाभूल करणारे आहे.सदर अपील फेटाळण्यात आल्याचे उपीलार्थींना दि. ६.०९.२००७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. प्रथम अपिलीय अधिका-यानं त्यांच्या पत्रात असे नमूद केले आहे की, विद्यालयाला त्रास देण्याच्या हेतूने अपीलार्थी माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहे. अपीलार्थींना त्यांनी मागितलेली माहिती पुरवण्यिात आली आहे.

यावर समाधान न झाल्याने अपीलार्थींनी दि. २०.०९.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलावरील जळगांव येथे घेतलेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्याचे म्हणणे लिखित स्वरुपात सादर केले. या सोबत विद्यालयास सन १९९९-२००० या शेक्षणिक वर्षात परवानगी मिळाल्याचे शिक्षण उपसंचालक,नाशिक यांचे पत्र सादर केले. त्यांनी केलेल्या निवेदनावरुन ही बाब स्पष्ट होते की, शाळेला मान्यता मिळाल्यापासून ते जून २००७ पर्यंतच्या कालावधीची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २२.०४.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र. - ४०८५/०२

श्री.अमरजित सिंग गुप्ता ------ अपीलकर्ता

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
उपमुख्य अभियंता इमारत प्रस्ताव विभाग
१ ला मजला,आर.के.पाटकर मार्ग,बांद्रा(प),
मुंबई ४०० ०५०

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
इमारत प्रस्ताव विभाग,बांद्रा (प) मुंबई ४०० ०५०

- वि वे च न -

अपीलकार श्री.अमरजित सिंग गुप्ता यांनी दि. २५.०८.२००८ रोजीच्या अर्जान्वये ३१ रोड,बांद्रा(पू),मुंबई-५० येथे असलेल्या आशियानी बिल्डिंग, परागान को.सोसायटी संबंधी नस्ती क्र. सी ई १४४०/डब्लू एस/ए एच मधील माहिती मागविली होती याच्या स्तरात अपीलार्थींना असे कळविण्यात आले की संबंधित नस्ती त्यांना वेळोवेळी दाखविण्यात आली आहे. त्यांना त्यातील जी कागदपत्रे हवी आहेत ती त्यांनी प्रति पृष्ठ रु.४/- या प्रमाणे शुल्क भरुन कार्यालयात कामाच्या दिवशी सकाळी ११ ते दूपारी १.३० या दरम्यान येऊन घेऊन जावी.

या जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे दि. २९.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल के. त्यात त्यांनी त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या सविस्त५र उल्लेख केला. यावर सुनावणी होऊन असे आदेश देण्यात आले की, जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती त्वरीत उपलब्ध करुन घ्याव्या, तसेच अप्रमाणित प्रती ७ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्याव्या.

प्रथम अपीलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयामुळे समाधान न झाल्याने अपीलार्थीनी दि. १६.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीालावरील सुावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले. यानुसार अपीलार्थींना संबंधित नस्ती यापूर्वीच दाखविण्यात आल्याचे व त्यांना असलेल्या कागदपत्रांच्या प्रती पुरविण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या उत्तराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलार्थींना त्यांनी मागितलेल्या कागद पत्रांच्या प्रती देण्यात आल्या असून, संबंधित प्रकरणाची नस्ती अवलोकनार्थ देण्यात आली आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १५.०४.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३३४ व ४३३५/०२

श्री. पी.पी.तलाठी ------ अपीलकर्ता
अदराबाद प्लॅट क्र. ४३,
३४ एन.एस.पाटकर मार्ग, मुंबई ७

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था मुंबई (१) शहर,
मल्होत्रा हाऊस फोर्ट मुंबई ०१

जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,डी विभाग मुंबई,
मल्होत्रा हाऊस जी.पी.ओ.समोर फोर्ट

- वि वे च न -

सदरील दोन्ही व्दितीय अपीलात अदराबाद को. ऑ. हौ. सोसायटी या सोसायटीची झालेली निवडणूक, सदयाची मॅनेजिंग व्यवस्थापक समिती, मॅनेजिंग कमिटीचे सदस्यांनी बंधपत्रे मुदतीत दिली किंवा कसे यासंदर्भात अर्जदाराने माहिती मागितलेली होती. अर्जदारास दिनांक १८.११.२००८ रोजीच्या २ पत्राने अतिशय विस्तृतपणे व मुद्देसूद उत्तरे रेकॉर्ड प्रमाणे दिलेली आहेत. त्यात प्रशासकाची नेमणूक, झालेली निवडणूक, व्यवस्थापक समितीने कार्यभार सांभाळल्याची तारिख,बंधपत्रे दिल्याची तारिख व समिती कार्यकाल नमूद केलेला आहे. असे सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे एकूण घेतल्यानंतर आयोगाचे मत झाले आहे. त्यामुळे अर्जदाराचा प्रथम अपिलीय निर्णय सुध्दा योग्यच आहे व त्याना मदत करण्याची गरज नाही असे आयोगाचे मत आहे.

अर्जदारास दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने त्यांनी उपस्थित केलेला एक तांत्रिक मुद्दा असा की निवडणूकीचा कार्यक्रम २००७-२०१२ असा लिहिलेला आहे. मात्र बॉडीच्या व्यवस्थापक समितीने कार्यभार २३.०२.२००८ रोजी घेतला असल्यामुळे त्यांचा कार्यभार २२.०२.२०१३ (२००८-२०१३) पर्यंत राहीला असे नमूद करण्यात आलेले आहे. उपनिबंधकांनी हा कार्यकाल कार्यभार स्विकारल्या पासून ५ वर्षासाठी असतो असे स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे रेकॉर्ड प्रमाणे व निकाला अनुरुप असलेली माहिती अर्जदारास निश्चितपणे देण्यात आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

आदेश

दोन्ही अपीले अमान्य करण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २०.०४.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

तक्रार क्र .२००८/सीआर- १९३/०२

श्रीमती. सुरेखा बबन मोरे ------ तक्रारकर्ता
८२/५६, वरळी बी.डी.डी.
चाळ,एच.आर.डी.मार्ग
वरळी मुंबई ४०० ०१८

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ------- उत्तरवादी
व्यवस्थापक,मुंबई विकास विभाग(चाळ) यांचे कार्यालय,
बी.डी.डी.चाळ क्र.५१,तळमजला,वरळी,
मुंबई ४०० ०१८

- विवेचन -

तक्रारीचा दिनांक: ४.०८.२००८
सुनावणीची तारीख: २०.०५.२००९

आयोगाच्या अपील क्रमांक १०१४ वरील दि. २५.०४.२००७ रोजीच्या अर्जदाराच्या आदेशात असे नमूद करण्यात आलेले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास परिपुर्ण माहिती दिनांक २०.०४.२००७ रोजी पाठविण्यात आली ती त्यांनी घेण्यास नकार दिला. मात्र संपूर्ण माहितीचा संच जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या सुनावणीच्या वेळी आणला होता तो अर्जदाराने स्विकारला. त्यानंतरही अर्जदारानी काही अर्ज अपीले त्यांनी केली आहेत. या सर्व अपील अर्जासंदर्भात अर्जदाराने दि.४.०८.२००८ रोजीच्या त्यांच्या तक्रार अर्जात जे मुद्दे मांडलेले आहेत त्या मुद्याबाबत जन माहिती अधिका-यांचे म्हणणे पुढील प्रमाणे.

अ) मुद्दा क्र. ८ मधील अ संबंधात या कार्यालयाचे पत्र कमांक व्यविविचा / २१७५/ दि.३.११.२००७ मध्ये उल्लेख केलेल्या कागदपत्रांच्या प्रती अर्जदारास पुरविण्यात आलेल्या आहेत.

ब) मुद्दा क्र. ८ मधील ब संबंधात स्पष्ट करण्यात येते की, श्री. दिगंबर मानाजी खरात यांनी दिनांक १८.०८.२००७ रोजी दिलेल्या अर्जाची प्रत अर्जदारास दिनांक १८.११.२००८ रोजी देण्यात आलेली आहेत. (पुन्हा १ प्रत देण्यात येत आहेत)

क) मुद्दा क्र. ८ मधील क संबंधात स्पष्ट करण्यात येते की संचालक, मुंबई विकास विभाग चाळी यांनी शासनास पाठविलेले पत्र दिनांक ८.०७.२००८ ची प्रत अर्जदाराने दिनांक २१.०८.२००८ रोजी स्विकारलेली आहे. तसेच त्यासोबत पाठविण्यात आलेल्या तपासणी अहवालाच्या प्रती अर्जदारास दि.१८.११.२००८ रोजी देण्यात आलेल्या आहेत.

ड) मुद्दा क्र. ८ मधील ड संबंधात स्पष्ट करण्यात येते की, शासनपत्र दिनांक २६.०९.२००८ अन्वये सदर प्रकरण शासन स्तरावरुन बंद केल्याचे कळविले आहे.

या प्रकरणी झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती संबंधातील सर्व कागदपत्रे वेळोवेळी अर्जदारास दिलेली आहेत. श्री.दिगंबर मानाजी खरात यांच्या नावे झालेल्या भाडेदारी संदर्भात सर्व माहिती शासनास कळविण्यात आलेली होती. सदर हस्तांतरण संदर्भात या कार्यालयास पुढे कोणतेही स्पष्टीकरण सादर करण्याची आवश्यक नसल्याने पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

१. मुद्दा क्र. ८ मधील १ संबंधात स्पष्ट करण्यात येते की, अर्जदाराने दिनांक २४.०६.१९९६ रोजी जी कागदपत्रे व्यवस्थापक, मुंबई विकास विभाग चाळी यांना सादर केलेली होती तीच कागदपत्रे त्यांनी संचालकांना सादर केलेली होती. सदर कागदपत्रांच्या छायांकीत प्रती अर्जदारास पुरविण्यास आलेल्या आहेत. तरीही अर्जदार व्यवस्थापकांना सादर केलेल्या अर्जदाराच्या प्रतीसाठी आग्रही आहे.

२. मुद्दा क्र. ८ मधील २ संबंधात स्पष्ट करण्यात येते की, अर्जदाराने त्यांचा अर्ज दिनांक २७.०८.२००७ मध्ये नमूद केलेल्या मुद्दा क्र.१ व २ बाबत अर्जदाराने स्वत: संबंधित विभागाकडे तक्रार अर्ज करणे आवश्यक असतांना अर्जदार सदर कार्यवाहीची जबाबदारी कार्यालयास सोपवित आहे. श्री.दिगंबर मानाजी खरात यांचे नावे खोलीची भाडेदारी हस्तांतरीत करतांना जर काही बेकायदेशीर कृत्य झाले आहे तर त्याबाबत तशा पुराव्यानिशी अर्जदारास स्वत:पोलीसात तक्रार नोंदविणे आवश्यक आहे. अर्जदाराने त्यांच्या अर्जात या कार्यालयाच्या कर्मचा-यांवर केलेल्या आरोपांबाबत त्यांचेकडे तसे पुरावे असल्यास त्यांनी स्वत: योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे वाटते.

३. मुद्दा क्र. ८ मधील ४ संबंधात स्पष्ट करण्यात येते की, सदर खोलीत वास्तव्य करणारी श्री. मनिषा दिपक जावळे या अधिकृत भाडेकरुची विवाहीत नात आहेत. तसेच अधिकृत भाडेकरु हे देखील वरील खोलीत वास्तव्य करीत आहेत. त्यामुळे शासकिय वास्तू निस्कासन अधिनियम-१९५५ अन्वये कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

त्यामुळे अर्जदारानी केलेल्या अर्जानुसार त्यांना योग्य माहिती देण्यात आलेली आहे. तसेच कृतिबाबत मार्गदर्शनही केलेले दिसून येते. संपुर्ण प्रकरणाचा अहवाल मागवून शासनाने शासन स्तरावर विषयाधीन नस्ती बंद केल्याचे कळविले आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

<u>आदेश</u>

तक्रार अमान्य करण्यात येत आहे

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४०९१/२००८

श्री. रवी नामदेव जोशी **------ अपीलकर्ता**
नारळी आग्रीपाडा, १९ वा रस्ता,
रामकोचाळ, रुम नं. ४, खार(प),
मुंबई ४०० ०५२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक महानगरपालीका आयुक्त के/पूर्व विभाग अंधेरी

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) बृहन्मुंबई मनपा कार्यालय के/पूर्व विभाग,अंधेरी

- वि वे च न -

अपीलकार श्री. रवी नामदेव जोशी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.०१.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल.

त्या अपीलाची सुनावणी दि. २५.०३.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपीलाथी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते, तर प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित होते.

श्री. रवी नामदेव जोशी यांनी त्यांच्या दि. २४.०९.२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

१. दि. १.०१.२००८ ते ३१.०८.२००८ पर्यंत के/पूर्व कार्यालयाच्या हद्दीमध्ये अनधिकृतपणे सुरु असलेल्या बांधकामांना देण्यात आलेल्या स्टॉपवर्क ३५४ ए अन्वये बजावण्यात आलेल्या नोटीशीच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती.

२. उपरोक्त कालावधीत अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने महानगरपालीका अधिनियम ३५१ बजावण्यात आलेल्या नोटीशीच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती.

३. याच कालावधीच्या बांधकामाच्या अनुषंगाने ५३(१) एम.आर.टी.पी. अन्वये ५२(४३) बजावण्यात आलेल्या नोटीशीच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती.

४. उपरोक्त कालावधीच्या कोर्ट रजिस्टरच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती.

५. उपरोक्त कालावधीच्या डिटेक्शन रजिस्टरच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती.

६. याच कालावधीच्या डिमोलेशन रजिस्टरच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती.

अपीलार्थीना त्यांनी मागितलेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने असे कळविण्यात आले की, मागितलेली माहिती अती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असल्याने यासाठी कार्यालयाचे मनुष्यबळ वापरणे अप्रस्तुत ठरेल. तथापि एखाद्या विशिष्ट प्रकरणाची माहिती अर्ज करुन मागितल्यास ती पुरविण्यात येईल.

यावर समाधान न झाल्याने अपीलार्थीनी ३.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर निर्णय देतांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केले की, अपिलार्थीनी मागितलेली माहिती सात दिवसांच्या आत त्यांना देण्यात यावी. हे आदेश दि. २९.११.२००८ रोजी देण्यात आले. तथापि त्यांना सदर माहिती देण्यात आली नाही. म्हणून त्यांनी दि. १९.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीच्या दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. असे आदेश देण्यात आले की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीना विनाविलंब त्यांनी मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्या.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १७.०४.२००९

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क. -४७२/२००८

श्री. वसंतराव उत्तमराव पाटील ------ **अपीलकर्ता**
संभाजीनगर, देवपूर,धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
गट विकास अधिकारी पंचायत समिती, शिंदखेडा
ता. शिंदखेडा,जि.धुळे

जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत कार्यालय, शिंदखेडा ता.शिंदखेडा,जि.धुळे

- वि वे च न -

श्री. वसंतराव उत्तमराव पाटील यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक ८.०२.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दिनांक २८.०४.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. त्यावेळेला अपिलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. परतू जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार ते औरंगाबाद खंडपीठाकडे सुनावणीसाठी हजर राहणार असल्याच्या कारणास्तव सुनावणीच्या वेळेला नाशिक येथे उपस्थित नव्हते.

अपिलार्थीनी दिनांक १२.०९.२००७ च्या अर्जान्वये दि. २२.०५.२००७ रोजी नवीन घराचे बांधकामाची परवानगी न घेता बेकायदेशीर बांधकाम थांबवणे व पाडण्याबाबत झालेल्या तक्रारी विषयी व त्यांच्यावर कोणत्या शासकीय नियमानुसार कार्यवाही करण्यात आली, त्या शासकीय नियमांची सत्यप्रती इत्यादी पाच मुद्यांवर माहिती मागविली होती परंतु माहिती न मिळाल्याचे नमूद करुन दि. २५.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. त्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यानी दि. ५.११.२००७ रोजी सुनावणी घेऊन अपील मान्य केल्याचे दि. २६.११.२००७ रोजी आदेश पारीत केले. तद्नंतरही माहिती न मिळाल्याने दि. ८.०२.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले.त्यानुसार माहिती मोफत मिळण्याची व संबंधित अधिका-यांवर शास्ती लादण्याची विनंती केली आहे.

आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला अपिलार्थीनी व्दितीय अपीलात केलेली मागणी मान्य करण्याचे नमूद केले तर प्रथम अपील मान्य केल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यानी नमूद केले.

अपिलार्थीनी माहितीसाठी आग्रह धरला आहे. जन माहिती अधिकारी निलंबित आहेत. त्यांनी संपूर्ण दप्तर हस्तांतरीत केलेले नाही. दप्तर ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. असे निदर्शनास आले आहे. सदर कार्यवाही अंती दप्तर ताब्यात घेतल्यानंतर १५ दिवसाच्या आत अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती त्यांना देण्यात यावी. तेव्हा सदर प्रकरणात खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

आदेश

अपील निकालात काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक :-१४/०४/२००९.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३५५/२००९

श्री. मनिष महादेव काळे, ------ **अपीलकर्ता**
इंदिरा नगर, दत्त मंदिरा जवळ, सर्व्हे नं. ४,
परिघ खाडी, एल.बी.एस.मार्ग,कुर्ला (प),मुंबई ४०० ०७०

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-३,
भायखळा,मुंबई २७

जन माहिती अधिकारी तथा
सहा.पोलीस आयुक्त,मध्य नियंत्रण कक्ष बावला कंपाउंड,
डॉ.बी.ए.रोड,भायखळा (पूर्व),मुंबई

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक: १५.०४.२००९
सुनावणीची तारीख: २८.०५.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित

अर्जदार श्री. मनिष महादेव काळे यांनी दि. २६.१२.२००८ रोजी केलेल्या कलम ६ खालील अर्जामध्ये त्यांनी दि. २८.०८.२००८ रोजी गृह राज्य मंत्री यांच्याकडून आलेल्या तक्रार अर्जाबाबत गुन्हे दाखल केले आहे किंवा नाही याबाबत तसेच दि. १७.०९.२००८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जामध्ये श्रीयुत. दिनकर घाडगे व इतर लोकांविरुध्द काय कारवाई केली याबाबत माहिती मागितली आहे.

ही माहिती अर्जदारास दि. १६.०१.२००९ रोजीच्या पत्राने देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय आदेशात दिलेली माहिती योग्य आहे असे निर्देश दि. २४.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपिलीय अधिका-याच्या निर्देशात आहे. त्या विरुध्दचे सदरचे अपील.

अर्जदाराने मागितलेली माहिती व त्यांना दिलेली उत्तरे पुढील प्रमाणे.

मागितलेली माहिती खोटी व दिशाभुल करणारी असून विरोधी पार्टीस सहकार्य होईल असा तपास केला आहे. दि. ३.०३.२००९ रोजीचा अपिल अर्जाबाबत समाधानकारक माहिती मिळाली नाही. दिलेली माहिती खोटी आहे. दिनांक २६.०९.२००८ रोजीचा अर्ज याबाबत संपूर्ण माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे. दि. १६.०१.२००९ रोजी दिलेले उत्तर खोटे आहे. अर्जातील क्रमांक २ मध्ये विचारलेली माहिती पूर्ण खोटी व चुकीची आहे.	अर्जदार यांचे वडील नामे श्री. महादेव दामोदर काळे यांनी पोलीस ठाणेत स्थावर मालमत्तेच्या संदर्भात केलेल्या अर्जाचे अनुषंगाने अर्जातील विरोधक यांना पोलीस ठाणेत बोलावून चौकशी केली असता सदरची जागा ही अर्जदार यांच्या वडीलांनी गैरअर्जदार श्री.मुलाम हजरतअली शहा यांना विकली असल्याबाबत कागदोपत्री पुराव्यावरुन निष्पन्न होत आहे. दिनांक २६.०९.२००८ रोजीच्या अर्जान्वये केलेला तपास हा बरोबर आहे. दिनांक १६.०१.२००९ रोजी दिलेले उत्तर हे अर्जाच्या वेळी केलेल्या चौकशीवरुन दिलेले आहे. व ते खरे आहे. अर्जदार यांचे वडील श्री. महादेव काळे यांनी गैरअर्जदार श्री. गुलाम हजरतअली शहा यांच्या विरोधात सिव्हील सुट नं. ७७३/०७ अन्वये मा. उच्च न्यायालयात दाद मागितली असता मा. उच्च न्यायालय अपील आदेश क्रं. ५५५/०७ अन्वये गैरअर्जदार यांच्या बाजुने निकाल दिला असल्याचे कागदोपत्री पुराव्यावरुन निष्पन्न झाल्याने सदरची माहिती पुरविण्यात आली आहे. तसेच अर्जदार यांचे वडील श्री. महादेव काळे यांनी श्री. मुलाम हजरतअली शहा यांच्या विरोधात परत मा. दिवाणी न्यायालयात केस क्रं. १३९५/०७ अन्वये सिव्हील केस दाखल करण्यात आली असून ती मा. दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे. अर्जदार यांचे वडील श्री. महादेव काळे यांनी दिलेल्या अर्जाप्रमाणे सखोल चौकशी करण्यात आली असता त्यामध्ये दखलपात्र स्वरुपाचा गुन्हा घडल्याचे निष्पन्न होत नसून सदरची बाब ही दिवाणी स्वरुपाची असून खटला दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे.

तसेच प्रत्यक्ष सुनावणीवरुन असे दिसून आले की, अर्जदारास रेकॉर्ड प्रमाणे असलेली सर्व माहिती देण्यात ओलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २८.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३३०/२००८

श्री. रमेश नागनाथ कदम **------ अपीलकर्ता**
ए/१,नागनाथ मिस्त्री चाळ,गणेश चौक,
काजुपाडा बोरीवली (पूर्व),
मुंबई ४०० ०६६.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
कार्यासन टेक्स-१ (ब) सहकार पणन व बस्त्रोद्योग विभाग

जन माहिती अधिकारी तथा
कार्यासन टेक्स-१ (ब) सहकार पणन व बस्त्रोद्योग विभाग

- वि वे च न -

अपीलकार श्री. रमेश नागनाथ कदम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०१.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. त्या अपीलाची सुनावणी दि. १९.०५.२००९ रोजी आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात घेण्यात आली. त्यावेळेला जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी उपस्थित होते. परंतू अपीलार्थी उपस्थित नव्हते.

अपिलार्थीनी दिनांक २४.११.२००८ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून राज्यातील एकूण सुत गिरण्यांची संख्या, मागासवर्गीय संचालक/सभासद संख्या, शासनाने दिलेले अनुदान,कर्ज,भाग भांडवल इत्यादी सविस्तर माहिती मागविली होती. सदर माहिती सूत गिरण्यांचे विबंधक तथा

संचालक,वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्याशी संबंधीत असल्यने त्या अपिलाकडे पुढील पत्रव्यवहार करण्याचे तसेच माहितीचा मूळ अर्ज त्या कार्यालयाकडे पाठवून तसे अपिलार्थीना दि. २.१२.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी कळविले. मागणी केलेली माहिती न मिळाल्याने ३० दिवसात माहिती दिली नाही असे नमूद करुन दि. ३.१.२००९ रोजी प्रथम अपील केले. त्या अनुषंगाने पुढील पत्रव्यवहार संचालक वस्त्रोद्योग संचालनायल,नागपूर यांच्याकडे करण्याचे दि. ९.०१.२००९ च्या पत्रान्वये अपिलार्थीना कळविले. तसेच प्रथम अपिलही संचालनालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले.

माहिती ३० दिवसात मिळाली नाही, अर्जावर वेळीच कार्यवाही न झाल्याबाबत चौकशी करणे, अपिलाची सुनावणी झाली नाही. माहिती मिळावी असे नमूद करुन दि. ३०.०१.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले. आयोगाकडे अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी उपस्थित राहिले नसल्याने त्यांची बाजू समजून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीच्या वेळेला उपस्थित होते. त्यांची बाजू ऐकूण घेण्यात आली. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वास्तविक अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती वस्त्रोद्योग संचालनालय,नागपूरकडे असल्याने त्या कार्यालयाकडे अपिलार्थीनी पत्रव्यवहार करणे संयुक्तीक झाले असते. असे असले तरी अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती अद्याप अपिलार्थीना वस्त्रोद्योग संचालनालयाने दिली नसल्यास ती ते आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलार्थीना देण्याबाबत वस्त्रोद्यो संचालनालय जन माहिती अधिकारी / अपिलीय अधिकारी यानी विनाविलंब कळवावे व पूर्तता झाल्याची खात्री तसेच वस्त्रोद्योग संचालनालयाच्या जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मंत्रालयाकडून अर्जदाराचा अर्ज मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत माहिती का दिली नसल्यास ती मुदतीत दिली नाही यांचा व त्यांचेवर शास्तीची कारवाई का करु नये याचा खुलासा करावा. तसेच संचालनयाच्या अपिलीय अधिका-यांनी मुदतीत अपीलावर का निर्णय दिला नाही याचा खुलासा करावा. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

या आदेशाच्या प्रती संचालनलयाशी संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचाही वर नमूद केलेला खुलासा देण्यासाठी जन माहिती अधिकारी वस्त्रोद्योग विभाग यांनी पाठवाव्यात .

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३४९/२००८

श्री. चेतन कोठारी **------ अपीलकर्ता**
आशियानीक अपार्टमेंट,डॉ.राजाबली परेल लेन,
बी.देसाई रोड,मुंबई २६

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
अतिरीक्त पोलीस महासंचालक ट्रॅफिक भगतसिंग मार्ग मुंबई - ०१

जन माहिती अधिकारी तथा
सह पोलीस आयुक्त (प्रशासन) ट्रॅफिक वरळी मार्ग मुंबई - १८

- वि वे च न -

अपीलकार श्री. चेतन कोठारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केल. त्या अपीलाची सुनावणी दि. २१.०५.२००९ रोजी मुंबई येथील आयोगाच्या कार्यालयात घेण्यात आली. त्यावेळेला अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दिनांक १७.११.२००८ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी गृह विभाग,मंत्रालय यांच्याकडून मागील ५ वर्षात हेल्मेट परिधान न करणा-या दुचाकी मोटार वाहन चालक यांच्यावर केलेल्या कारवाईतील एकूण प्रकरणे व त्यांच्यावर केलेल्या दंडात्मक कारवाईची रक्कम तसेच केवळ मराठीत नंबर प्लेट असल्याच्या कारवाईतील एकूण प्रकरणे व त्यांच्यावर केलेल्या दंडात्मक कारवाई रक्कम इत्यादी बाबतची माहिती मागविली होती. सदर विषयी सहपोलीस आयुक्त (वाहतू)मुंबई व अपर पोलीस महासंचालक (वाहतू), महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याशी संबंधीत असल्याने सदर अर्जाच्या प्रती त्या कार्यालयांकडे गृह विभागाकडून

पाठविण्यात आल्या व तसे अपिलार्थीना कळविले त्या पत्रांच्या प्रती पोलीस विभागास दि. ६.१२.२००८ व ३.०१.२००९ रोजी प्राप्त झाल्या असता सह पोलीस आयुक्त (वाहतूक) कार्यालय व अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी अनुक्रमे दि. १५.०१.२००९ व ६.०१.२००९ च्या पत्रान्वये अपिलार्थीना माहिती पाठविली. अपिलार्थीना माहिती विहीत कालावधीत न मिळाल्याने व्यतिथ होऊन दि. २७.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. त्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यानी दि. १५.०५.२००९ रोजी माहिती पाठविल्याचे आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला सांगण्यात आले.

अपूर्ण व उशीराने माहिती मिळाली असे नमूद करुन अधिनियमाच्या कलम २० खाली शिस्तभंगाची कारवाई करणे व रु २५,०००/- दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सदर व्दितीय अपीलाच्या अनुषंगाने सुनावणीच्या वेळेला दोनही पक्षकारांनी बाजू ऐकूण व समजून घेण्यात आली तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची तपासणी केली जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही योग्य आहे असे दिसून आले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराच्या अर्जात नव्हते तरी अधिक खुलासेवार माहिती दिली आहे. मात्र सदर माहिती अर्ज पोलीस विभागाच्या माहिती अधिका-यांकडे विहीत कालावधीत प्राप्त झालेले दिसत नाहीत. त्यामुळे माहिती पाठविण्यास विलंब झलेला आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनीही अपिलाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन आदेश पारीत करण्यासही विलंब केला आहे. २६ नोव्हेंबर २००८ रोजी घडलेल्या आतंकवादी हल्ल्यानंतर मुंबई पोलीस यंत्रणेवर पडलेल्या प्रचंड ताणामुळे माहिती देणे व प्रथम अपिलावरील निर्णय याबाबत झालेल्या विलंबाच्या बाबत सौम्य दृष्टीकोन घेऊन या पुढे अधिनियमाच्या अनुषंगाने मागविलेली माहिती अधिनियमातील तरतूदीना अधीन राहून विहीत वेळेत कार्यवाही कण्याची संबंधीत अधिका-यांनी दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात येत आहे. तसेच अर्ज आपलया विभागाशी संबंधीत नसेल किंवा विभागाअंतर्गत क्षेत्रीय अधिकारी यांचेशी संबंधीत विषय आल्यास तो अर्ज मिळाल्यापासून पाच दिवसाचे आत संबंधीत कार्यालयाकडे पाठवावयास पाहिजे १७ नोव्हेंबरचा अर्ज १९ नोव्हेंबर पर्यंत निश्चितपणे गृह विभागास मिळालेला आहे कारण गृहविभाच्या पत्रावर तारीख १९ नोव्हेंबर व तदनंतर १.१२.२००८ अशी तारिख टाकण्यात आली आहे त्यामुळे २४.११.२००८ पर्यंत हा अर्ज संबंधीताना पाठविणे आवश्यक होते. २६ नोव्हेंबरच्या घटनांमुळे निर्माण झालेली पी किती गृह विभाग व पोलीस यंत्रणा यांचेवर पडलेला ताण लक्षात घेता गृह विभागाच्या जन माहिती अधिकारी यांनी केलेला विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३२८/२००८

श्री. एस.हरीहरन, **------ अपीलकर्ता**
३०१,राजश्री वाटीका, बिल्डीग नं. ३४ , पंत नगर,
घाटकोपर(पुर्व)मुंबई ४०० ०७५

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहकारी अधिकारी गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ बांद्रे

जन माहिती अधिकारी तथा
उप निबंधक सहकारी अधिकारी गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ बांद्रे

- वि वे च न -

अपीलकार श्री. एस.हरीहरन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केल आहे ते सदर अपिल आयोगाकडे दि.२.०२.२००९ रोजी नोंद झाले आहे. सदर व्दितीय अपिलाची अपीलाची सुनावणी दि. १९.०५.२००९ रोजी मुंबई येथील आयोगाच्या कार्यालयात घेण्यात आली. त्यावेळेला अपीलार्थी उपस्थित होते, परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित नव्हते.

अपिलार्थीनी दिनांक ११.०७.२००८ च्या अर्जान्वये राजश्री वाटीका सहकारी अधिकारी गृहनिर्माण संस्था, मर्यादितच्या अनुषंगाने जन माहिती अधिका-याकडून खालील स्वरुपाची माहिती मागविली होती.

" Bonds executed are per section 73(1AB) + the co-operative society Act, 1956 by the elected members pantnagar Rajshree Vatika C.H.S. from the date of registration i.e.9.12.2003 to 2007-08"

जन माहिती अधिकारी यांनी दि. ८.०८.२००८ च्या पत्रान्वये सदर माहिती संस्थेकडे अर्ज करुन प्राप्त करता येईल असे अपिलार्थीना कळविले तसेच दि. ४.११.२००८ च्या पत्रान्वये अपिलार्थीना माहिती देण्याचे संस्थेला कळविले. त्यामुळे व्यतिथ होऊन दि. १२.११.२००८ रोजी प्रथम अपिल केले. सदर अपिलावरील सुनावणी नंतर जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्याचे नमूद करुन दि.२४.१२.२००८ च्या आदेशान्वये अपिल फेटाळले.

प्रथम अपिल फेटाळल्याने अपिलार्थीनी आयोगाकडे व्दितीय अपील केले. त्यामध्ये माहितीची मागणी केली आहे. अन्यथा संस्थेला माहिती देण्याचे आदेश नमुद केले आहे. तसेच संस्थेने माहिती न दिल्यास संस्थेवर कारवाई करण्याचेही विनंती केली आहे.

आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. त्यामुळे त्यांची बाजू समजून घेता आली नाही. सदर प्रकरणातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली तसेच अपिलार्थीची बाजू समजून घेण्यात आली.

नुकतेच कर्नाटक हायकोर्ट व मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत सहाकारी संस्था या एकाच राज्य सरकारचे त्यांचेवर नियंत्रण असते या एकाच मुद्यांमुळे सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेत येत नाही. यामुळे सदस्यांना आपल्या सोसायटीची माहिती ही सहकारी कार्यक्रमाअंतर्गत प्राप्त करुन द्यावी लागणार आहे. सोसायटी संबंधीची जी माहिती सहाकर कायद्यानुसार सहाय्यक निबंधक/उपनिबंधक यांचेकडे असतेती भात्र माहितीच्या अधिकाराअंतर्गत शासकीय प्राधिकरणाकडून मागता येईल. अर्जदाराने मागितलेली माहिती ही सहाकारी संस्था स्तरावरील असल्यामुळे ती संस्थेकडून द्यावी हा निर्णय योग्यच आहे. पण संस्थेकडे माहिती देण्याचा अर्ज करुन व त्यासाठी आगऊ शुल्क भरुन ही अर्जदारास माहिती मिळाली नाही असे अर्जदाराने व्दितीय अपील नमूद केले आहे. जर संस्था ही सहकार विभागाच्या प्राधिकृत अधिका-यांच्या निर्देशाचे पालन करीत नसेल तर आपल्या आदेशाचे पालन करवून घेणे ही त्या अधिका-यांची जबाबदारी निश्चीतपणे ठरते. तेव्हा सहकारी अधिकारी श्रेणी १ तथा माहिती अधिकारी,उपनिबंधक सहाकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,मुंबई यांनी हे आदेश मिळाल्यापासून ७ दिवसाचे आत संस्था ही अर्जदारास दाद देत नसल्यामुळे अर्जदारास ही माहिती मिळवून देण्याची जबाबदारी पार पाडावी.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कारवाई करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३३१/२००८

श्रीमती मंगला विनायक वागळे **------ अपीलकर्ता**
बी/८०६,आकुर्ली गोल्डन पॅलेस को.हौ.सो.ली.प्लॉट क्र २,
आरडीपी १, म्हाडा ले आउट रोड,
लोखंडवाला टाउनशिप,
कांदिवली (पूर्व),मुंबई ४०० १०१

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक पोलीस आयुक्त उत्तर नियंत्रण कक्ष ठाकूर व्हिलेज,
कांदिवली मुंबई १०१

जन माहिती अधिकारी तथा
पोलीस आयुक्त परिमंडळ १२ रौळेंद्र नगर, दहिसर (पूर्व) मुंअई ६८

- वि वे च न -

अपीलकार श्रीमती मंगला विनायक वागळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केल त्या अपीलाची सुनावणी दि. १९.०५.२००९ रोजी मुंबई येथील आयोगाच्या कार्यालयात घेण्यात आली. त्यावेळेला अपीलार्थी व माहिती अधिकारी उपस्थित होते

अपिलार्थीनी दिनांक १२.११.२००८ च्या अर्जान्वये समता नगर पोलीस ठाणे, कांदिवली (पूर्व),मुंबई येथे दिनांक २१.०६.२००८ रोजी (एफआरआय-७/०८) श्री मदने,श्री.भागवे, श्री.पटेल व इतर यांच्या विरुध्द श्री.तरुण प्राणलाल बजारीया यानी दाखल केलेल्या तक्रारी संबंधातील सर्व तपासाच्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून केली होती. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत पोलीस ठाण्याकडून माहिती मिळवून दि. २१.११.२००८ च्या पत्रान्वये अपिलार्थीना पाठविली त्यामध्ये सदर गुन्हयाचा तपास सुरु असल्याने मागणी केलेली माहिती देता येणार नाही असे नमूद केले होते. त्यामुळे माहिती नाकारल्याचे नमूद करुन दि. १७.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. त्या अनुषंगाने त्रयस्थ पक्षाची माहिती प्रकट करण्यास हरकत नासल्यास माहिती प्राप्त करुन पुरविण्याचे दि. २.०१.२००९ रोजी आदेश पारीत केले. अपील आदेशाचे अनुषंगाने कृति केली असता त्रयस्थ पक्षाने माहिती देण्यास हरकत घेतली असल्याने तसेच गुन्हा तपासाधीन आल्याने माहिती देता येऊ शकत नाही असे अर्जदारास कळविण्यात आले त्यामुळे त्यतिथ होऊन अपिलार्थीनी दि. २७.०१.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले.

आयोगाकडील सुनावणीाच्या वेळेला दोनही पक्षकारांची बाजू ऐकूण घेण्यात आली. तसेच सदर प्रकरणात आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली असता असे निदर्शनास आले की, संबंधीत सदर गुन्हयाच्या अनुषंगाने अद्याप तपास व एका आरोपीस अटक करणे अजून बाकी आहे. त्यामुळे सुरु असल्याने अपीलार्थीनी मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध न करण्याच्या जन माहिती अधिका-यांच्या निर्णयाशी आयोग सहमत आहे. तेव्हा खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३८२/२००९

श्री.रविंद्र एच.भंडारी, ------ **अपीलकर्ता**
१, राज महल बिल्डीग,
१ ला मजला, बजाज रोड,
कांदिवली (प.) मुंबई ४०० ०६७

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
तंत्र शिक्षण संचालनायय,महाराष्ट्र राज्य,३ ,महानगरपालीका मार्ग,
पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१

जन माहिती अधिकारी तथा
तंत्र शिक्षण संचालनायय,महाराष्ट्र राज्य,३ ,महानगरपालीका मार्ग,
पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१

- वि वे च न -

अपीलकार श्री.रविंद्र एच.भंडारी, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल सदर अपीलावर दि. ३०.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी उपस्थित होते.

पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग,ठाणे येथे भेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थास्थरावरील प्रवेश प्रक्रियेमध्ये गैरप्रकार करिता असल्याबाबत दिनांक ११.०९.२००८ च्या पत्रान्वये

अपीलार्थी यांनी तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवईची माहिती मागितली होती. तसेच भेट व्दितीय वर्षासाठी मायनॉरिटी कोटा अंतर्गत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. १३.०२.२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थी यांना माहिती पुरविली. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थी यांना विलंबाने माहिती दिली असल्याचे दिसून येते. दरम्यानच्या कालावधीत अपीलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. अपीलार्थी यांना जन माहिती अधिका-यांनी उत्तर दिले असल्यामुळे प्रथम अपील निकाली काढण्यात येत असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २६.०२.२००९ च्या पत्रान्वये कळविले यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विहीत कालावधीत माहिती दिली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्याची अपीलार्थी यांनी व्दितीय अपीलात मुद्या उपस्थित केला आहे.

श्री.व श्रीमती भंडारी यांचा मुलगा रोनक भंडारी याने पार्श्वनाथ अभियांत्रिकी महाविद्यालय,ठाणे येथे थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास अल्पसंख्यांक कोटयामधून प्रवेश मिळण्याकरिता अर्ज केला होता. सदर संस्था जैन धर्माची अल्पसंख्यांक मान्यता प्राप्त संस्था आहे. श्री. रोनक भंडारी यांनी अर्जासोबत जोडलेल्या शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये उमेदवार जैन धर्माचा असल्याचा उल्लेख नाही. उमेदवाराने सादर केलेल्या शपथपत्रामध्ये सुध्दा तो जैन धर्माचा असल्याबाबतचा उल्लेख नाही. फक्त त्यामध्ये जैन धर्म मानत असल्याबाबतचा उल्लेख केला आहे. त्यामुळे श्री.रोनक भंडारे या उमेदवारास अल्पसंख्यांक कोटयामध्ये प्रवेश देण्यात आला नाही. तसे संस्थेने उमेदवारास दिनांक १५.११.२००८ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. मात्र अर्जदाराचे म्हणणे त्यांनी दिलेले जैन धर्माबाबतचे ॲफिडेव्हीट हे कॉलेजेने दिलेल्या नमुन्या मध्येच दिले आहे. ही बाब तपासून पाहत असल्याचे संबंधित अपिलीय अधिका-याच्या प्रतिनिधीनी सांगितले. हा तक्रार निवारणाचा भाग आहे. सद्यस्थितीत रेकॉर्डप्रमाणे असलेली माहिती दिल्याचे दिसून येते. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यात येतो.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,

दिनांकः ६.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३८६/२००९

श्री.सुभाष सुंदरवास बंगेरा, **------ अपीलकर्ता**
९५/१३,गारोडीया इस्टेट,डॉ.वसंत अवसारे मार्ग,
मिलन सबवे रोड, सांताक्रुज (प,)
मुंबई ४०० ०५४

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
उपमुख्य अभियंता (इ.प्र) यांचे कार्यालय,पश्चिम उपनगरे, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा(प.) मुंबई - ५०

जन माहिती अधिकारी तथा
उपमुख्य अभियंता (इ.प्र) यांचे कार्यालय,पश्चिम उपनगरे, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा(प.) मुंबई - ५०

- वि वे च न -

अपीलकार श्री.सुभाष सुंदरवास बंगेरा, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल सदर अपीलावर दि. ३०.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ३.११.२००८ रोजी अर्ज करुन,साई बाजार शॉपींग सेंटर सांताक्रुझ (प.) मुंबई येथील कार पार्कीगसाठी खुल्या ठेवलेल्या टेरेसवर अवैधरित्या बांधकाम

केलेल्या व्यापारीगाळयाच्या अनुषंगीक माहिती मागितली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती ३४ वर्षाहून अधिक कालावधीची जुनी आहे. यासंबंधीच्या फाईल क्र. सीई ४८९०/बीएसएच/एएच आणि सीई/एमआयएससी/डब्लू/एएच च्या शोध घेऊनही सदर फाईल सापडली नाही. यामुळे अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दिनांक ९.०२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संबंधीची फाईल फार जूनी असल्याने ती सापडत नाही असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपीलार्थी यांना कळविले.

टेरेसवर बांधकाम करण्यास परवानगी दिलेली नाही. शॉप ॲक्ट अनुसार नोंदणी प्रमाणपत्र दिलेले नाही असे निरीक्षक महानगरपालिका यांनी अपीलकारास कळविले असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. इमारत बांधकाम प्रस्तावाची फाईल क्र. सीई/४९८०/बीएस ii/एएच आणि सीई/३७एमआयएससीएलएल/डब्ल्यू एस/ एएच जाणिवपूर्वक शोध घेऊनही सापडत नाही असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.) एच विभाग यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश दतो की, नुकतेच महानगरपालिका आयुक्त यांना ज्या नस्त्या गहाळ झालेल्या आहेत त्या पुनर्गठित करण्यात येतील. असे प्रतिपादन आयोगाकडे केलेले आहे. यासाठी या केसमध्ये दोन महिन्याचा कालावधी देण्यात येत आहे. नस्ती पुनर्गठित करुन अर्जदारास आवश्यक ती माहिती देण्यात यावी.

<u>आदेश</u>

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २८/०६/२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३८४/२००९

श्री.प्रशांत रमेश उन्हावणे, ------ **अपीलकर्ता**
फ्लॅट नं.२, नार्टन राज भवन कॉम्प्लेक्स जवळ,
वाळकेश्वर रोड, मुंबई ४०० ०३५

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
राज्य पालांचे परिवार प्रबंधक कार्यालय,राजभवन,
मलबार हिल, मुबई ४०० ०३५

जन माहिती अधिकारी तथा
राज्य पालांचे परिवार प्रबंधक कार्यालय,राजभवन,
मलबार हिल, मुबई ४०० ०३५

- वि वे च न -

अपीलकार श्री.प्रशांत रमेश उन्हावणे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर दि. ३०.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपीलार्थी हजर होते.

अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १४.१२.२००८ रोजी अर्ज करुन महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक कार्यालयातील श्री.आर.बी.पाटील, उच्चश्रेणी लघुलेखक यांचे संबंधीची अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३.०१.२००९ च्या पत्रानुसार अपीलार्थी यांना कार्यालयातील उपलब्ध माहिती दिली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झ ाले नसल्याने अपीलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २३.०१.२००९ रोजी प्रथम अपील

दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सदर अपीलावर प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ७.०३.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

मा.राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक कार्यालयातील अधिकारी परंपरा (Hierarchy) बाबत तसेच अर्जातील इतर मुद्यांबाबत दिलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान झालेले नाही. श्री.आर.बी.पाटील यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबतच्या प्रमाणपत्राच्या छायाप्रतीची अपीलार्थी यांनी मागणी केली होती. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी सेवापुस्तकाच्या पहिल्या पृष्ठाची प्रत अपीलार्थी यांना पुरविली आहे. उच्चश्रेणी लघुलेखकाकरिता टंकलेखनाची ४० शब्द प्र.मि. लघुलेखनाची १२० शब्द प्र.मि. वेग मर्यादा धारण करणारी शासन मान्य संस्थेने दिलेली प्रमाणपत्र आवश्यक आहेत. सदर प्रमाणपत्राच्या छायाप्रतीची अपीलार्थीने मागणी केली आहे. तरी सर्व संबंधीत प्रमाणपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पुरवाव्यात.

<u>आदेश</u>

सबब अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३८५/२००९

श्री.सत्यवान शंकर राऊळ, **------ अपीलकर्ता**
न्यु ओ-२ बिल्डींग,रुम नं. ३०५/३४,
३ रा मजला, पी.एम.रोड,खोटवाडी,
अपो. शिवसेना शाखा सांताक्रुझ (प.) मुंबई ४०० ०५४

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
बृहन्मुंबई महानगरपालिका अेच/पश्चिम वॉर्ड, सेंट मर्टिन्स रोड,
बांद्रा (प.) मुंबई ४०० ०५०

जन माहिती अधिकारी तथा
बृहन्मुंबई महानगरपालिका अेच/पश्चिम वॉर्ड, सेंट मर्टिन्स रोड,
बांद्रा (प.) मुंबई ४०० ०५०

- वि वे च न -

अपीलकार श्री.सत्यवान शंकर राऊळ, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर दि. ३०.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

फ्लॅट क्र.४०२ सी.डी.रोड खार (प.) मुंबई येथील जैन आर्केड नावाने ओळखल्या जाणा-या इमारतीच्या बेसमेंट येथील जागा कार पार्कींगकरीता आरक्षीत आहे. तरी सदर ठिकाणी व्यापारी गाळयाचे बांधकाम चालू असल्याने त्यासंबंधीची अपीलार्थी यांनी अनुषंगीक माहिती मागितली होती. सदर बांधकामाकरिता महानगरपालिकेने परवानगी मंजूर केली नसल्याचे कार्यालयातील कागदपत्रावरुन दिसून येते असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना दि. २७.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान

झाले नसल्याने अपिलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी १३.०३.२००९ आदेश पारित केले योग्य माहिती मिळाली नाही. म्हणून व्यतीथ होऊन अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

जैन आर्केड इमारतीच्या बेसमेंटमध्ये बांधकाम केलेल्या व्यापारी गाळयास महानगरपालिका अधिनियमातील ३७४ अन्वये अनुज्ञाप्ती (Licence) मंजूर केलेली नाही. व्यापारी गाळयाच्या बांधकामास परवानगी दिलेली नसल्याचे अपीलार्थी यांना कळविले असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसुन येते. महानगरपालिकेने व्यापारी गाळयाच्या बांधकामास परवानगी दिलेली नाही. अनुज्ञाप्ती दिली नाही. तेंव्हा सदर अवैध बांधकामाविरुध्द सुरु करण्यात आलेल्या /केलेल्या कारवाईची माहिती मिळावी अशी अपिलार्थीची मागणी आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जैन आर्केड इमारतीच्या बेसमेंट मधील अवैध व्यापारी गाळयाविरुध्द केलेल्या कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून २१ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

सबब अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३९०/२००९

श्री.धनराज दामोधर लिखार ------ **अपीलकर्ता**
बी-२७३/५, गव्हर्नमेंट कॉलनी,
बांद्रा (पुर्व) मुंबई ४०० ०५१

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
उपमुख्य अभियंता (ई.प्र.) भाभा रुग्णालयाच्या जवळ आर के पाटकर मार्ग बांद्रा

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (इ.प्र) उपनगरे/अेच विभाग

- वि वे च न -

अपिलाचा दिनांक - १३.०४.२००९
सुनावणीची तारीख - ८.०६.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित
अर्जदाराने उपस्थित केलेले मुद्दे व त्यावर महापालिकेचे म्हणणे हे पुढील प्रमाणे आहे.

Query No.	Description information sought	Clarifications to the information south
८(१)अ.	सुंदरनगर सिध्दीविनायक को.ऑ.हौ.सोसायटी लि.म्हाडा,इमारत क्रमांक १०, सुंदर नगर,कलिना भूमापन क्र. ४८५३ (भाग) गांव कोलेकल्याण, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई-४०० ०९८ या संस्थेच्या इमारतीच्या भोगवटा प्रमाणपत्राचे प्रत द्यावी अशी विनंती म्हाडा कार्यालयास माहिती अधिकारा अंतर्गत दि. ६.११.२००८ च्या अर्जान्वये करण्यात आली होती. त्यानुसार भोगवटा प्रमाणपत्राची प्रत न देता म्हाडा कार्यालयाने दि. १२.१२.२००८ च्या पत्रान्वये असे कळविले की, सदरची माहिती महानगरपालिका कार्यालयाकडून घेण्यात यावी.	सदर बाबतीत महाराष्ट्र गृहनिर्माण महामंडळ यांचे अभिप्राय घ्यावेत.
८-१ ब	त्यामुळे महानगरपालिका कार्यालयास माहिती अधिकाराअंतर्गत दि. २०.१२.२००८ च्या अर्जान्वये भोगवटा प्रमाणपत्राच्या प्रतीसाठी अर्ज सादर करण्यात आला होता. महानगरपालिका कार्यालयातील माहिती अधिका-यांनी सुध्दा भोगवटा प्रमाणपत्राची प्रत न देता दि. ५.०२.२००९ च्या पत्रान्वये असे कळविले की, त्यांच्या कार्यालयाच्या सव्हेक्षण विभागामध्ये जतन केलेल्या अभिलेखात जुन्या इमारत प्रस्तावाच्या धारीणी क्रमांकाची नोंद नाही. त्यामुळे अपेक्षित असलेली	हे खरे नाही. अपिलार्थीने या कार्यालयात दि. २०.१२.२००८ च्या अर्जान्वये सदर माहिती विचारली होती. परंतू या कार्यालयाच्या पत्र क्र. उप प्र.अभि/इ.प्र./मा.अ./२५९३/प.उ. १ दि. १५.०१.२००९ अन्वये अपिलार्थीस असे कळविले की, उपरोक्त इमारतीचा नगर भूमापन क्रमांक/गांव नमूद न केल्याने या कार्यालयाने कुठला प्रस्ताव मंजूर केलेला आहे किं ंवा नाही हे शोधता येत नाही. तरी आपण उपरोक्त इमारतीचा नगर भूमापन क्रमांक व गांव कळवावे जेणेकरुन आपणास अपेक्षित असलेली माहिती देणे शक्य होइर्ल्. अथवा आपण या कार्यालयास कामाच्या दिवशी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत येऊन

	माहिती देणे शक्य नाही. अशी असमाधानकारक व त्रुटीयुक्त माहिती कळविली.	विषयांकित भूखंडाचे विकास नियोजन आराखडयावर स्थान दर्शन करावे जेणेकरुन सदर भूखंडावर कुठला इमारत प्रस्ताव वा मजुर झाला आहे हे शोधता येईल. तदनूसार दि. २७.०१.२००९ रोजी या कार्यालयात अपिलार्थी उपस्थित राहून या कार्यालयाच्या सर्वेक्षण अभिलेखावर उपरोक्त इमारतींचे स्थान दर्शन केले. तेंव्हा असे आढळून आले की उपरोक्त भूखंडावर नवीन इमारत प्रस्तावाच्या धारिणी क्रमांकाची नोंद आहे. परंतु त्यांच्याशी केलेल्या चर्चेनुसार त्यांना सद्यस्थितीत जागेवर उभ्या असलेल्या इमारतीच्या भोगवटा प्रमाणपत्राची प्रत हवी होती. परंतु या कार्यालयाच्या सर्वेक्षण विभागामध्ये जतन केलेल्या अभिलेखांवर जुन्या इमारत प्रस्तावाच्या धारीणी क्रमांकाची नोंद नाही. त्यामुळे त्यांना अपेक्षित असलेली माहिती देणे शक्य नव्हते. याबाबत या कार्यालयामधील संबंधित अधिका-यांनी त्यांच्याबरोबर केलेल्या चर्चेच्या वेळी सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणली होती. तसेच या कार्यालयाच्या पत्र क्र उप.प्र./इ.प्र./मा.अ./२९३७/प.उ-१ दि. ५.०२.२००९ अन्वये देखील कळवले होते.
८-१ क	त्यामुळे उप.प्रमुख अभियंता (इ.प्र.) प.उप.१ यांच्याकडे दि. २७.०२.२००९ रोजी अपील करण्यात आले होते. अपील अधिका-यांनी (पहिले) सुध्दा अपेक्षित प्रमाणपत्र न देता दि. २४.०३.२००९ च्या पत्रान्वये असे कळविले की, इमारत प्रस्ताव धारीणी क्रमांकाची खात्री करण्याकरीता अर्जादारास बोलावून आवश्यक कागदपत्रे देण्याविषयीच्या सूचना माहिती अधिका-यास देण्यात आलेल्या आहेत. वास्तविक धारीणी क्रमांकाची खात्री करण्याची बाब अर्जदाराशी संबंधीत नाही. त्यामुळे अर्जदारास त्यासाठी बोलविण्याची आवश्यकता नव्हती. भोगवटा प्रमाणपत्राची माहिती देण्याविषयीची अंतिम कार्यवाही पूर्ण होण्यापूर्वी माझे अपील निकाली काढले आहे. त्यामुळे सदर दुसरे अपील उचित कार्यवाहीसाठी सादर करीत आहे.	अपिलार्थीने दि. ४.०३.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपील सादर केले होते. त्यानुसार त्यांना दि. २०.०३.२००९ रोजी दुपारी ३.४५ वाजता सुनपावणीसाठी बोलविले होते. तदनूसार ते सुनावणीसाठी उपस्थित राहिले. सुनावणीच्यावेळी या कार्यालयाच्या सव्हेक्षण विभागाच्या कर्मचारी बोलवून उपरोक्त भूखंडाची टिकशीट अपिलार्थीना उपरोक्त इमारतीचे स्थान दर्शनप करण्याकरीता दाखविली. परंतू सदर टिकाशीट वर अपिलार्थी उपरोक्त इमारतीचे स्थान दर्शन करु शकले नाहीत. म्हणून प्रथम अपिलीय अधिका-यांनी त्यांच्या दि. २४.०३.२००९ च्या पत्रान्वये सुंदर नगर अभिन्सासाची धारीणी धोधून सदर अभिन्यासावर उपरोक्त४ इमारतीच्या धारीणीची नोंद आहे का याची खातरजमा करण्यास सांगितले. अपिलार्थीनी दोन तीन दिवसात या कार्यालयात येऊन अभिन्यासावर उपरोक्त इमारतीचे स्थान दर्शन करण्याचे मान्य केले. त्युानसार अपिलार्थी मार्च २००९ महिन्याच्या शेवटच्या आठवडयात या कार्यालयात आले व त्यांना या कार्यालयात उपलब्ध असलेला सुंदर नगर अभिन्यास दाखविला. परंतु सदर अभिन्यासातदेखील इमारत क्र. १० ची नोंद इ ाालेली नाही. करण सदर अभिन्यास हा १९९० पर्यंत सुधारीत केलेला आहे व सदर इमारत ही सन १९९४ मधील आहे ही बाब अपिलार्थीस या कार्यालयाच्या कर्मचा-यांनी त्यावेळेस सांगितली.

थोडक्यात महापालिकेकडे म्हाडाने सदरील बिल्डींगसाठी इमारती बांधकामाचा प्रस्ताव पाठविला होता किंवा नाही आक्युपेशन सर्टिफीकेट मिळविण्यासाठी योग्य ती माहिती महापालिकेला पुरविली होती किंवा नाही याबाबतीत संदिग्धता असल्याने व महापालिकेच्या रेकॉर्डनुसार खोटी सर्व्हे नंम्बर मध्ये अजूनही या इमारतीच्या नोंदी दिसून येत

नसल्याने महापालिका अर्जदारास आक्युपेशन सर्टिफीकेट प्रत देवू शकत नाही. अशा परिस्थीतीत म्हाडाने नुसतेच अर्जदाराला ॲक्युपेशन सर्टिफीकेट महापालिकेकडून घ्यावे असे न कळवता त्यांच्या या इमारतीचा बिल्डींग प्लॅन महापालिकेकडे मंजूरीसाठी कधी पाठविला होता याची माहिती व आक्युपेशन सर्टिफीकेट साठी कधी प्रस्ताव पाठविला होता त्याची माहिती बी.एम.सी. ला त्यांनी द्यावी व त्या नंतर माहिती १५ दिवसात बी.एम.सी. ने शोध घेऊन अर्जदारास द्यावी. म्हाडाने बी.एम.सी.कडे आक्युपेशन सर्टिफीकेट साठी अर्ज केला नसेल तर तशी परिस्थिती म्हाडाने अर्जदारास स्पष्टपणे कळवावी.

आदेश

सबब अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
संबंधीतांनी वर निर्देशील्याप्रमाणे कारवाई करावी.
सदरील आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी म्हाडाच्या संबंधित प्राधिका-याकडे पाठवावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३९१/२००९

श्री.सुरेंद्र विष्णू मसुरकर, ------ **अपीलकर्ता**
गायत्री भवन,रुम नं.७, १ ला मजला,लिबर्टी गार्डन रोड नं.२,
मालाड (प.),मुंबई ४०० ०६४

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
सहा.आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका आर/साऊथ विभाग,
ओम सी कॉस रोड,कांदिवली (प) मुंबई ६७

जन माहिती अधिकारी तथा
सहा.अभियंता बृहन्मुंबई महानगरपालिका आर/साऊथ विभाग,
कांदिवली (प) मुंबई ६७

- वि वे च न -

अपिलाचा दिनांक - १६.०४.२००९

सुनावणीची तारीख - ८.०६.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित

अर्जदारास एन.जी.रोड निअर एस.एम.व्ही. स्विमींग पुल (प.) येथील चाळीच्या बाबतीत २५.०३.२००६ रोजीच्या जल व मलनिस्सारण आकार देयकात जल जोडणी धारकाचे नाव बी.ए.शर्मा असे दाखविलेले आहे. तेच २५.०९.२००६ रोजीच्या देयकात नरेश लिलाराम बालवणी असे दाखविलेले आहे. या बदलाच्या नस्तिची प्रत अर्जदारास पाहिजे होती. मात्र अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही नस्ती मिळाली नाही व तसे अर्जदारास कळविण्यात आलेले आहे. सुनावणीच्या वेळेला नवीन जल जोडणी धारक किंवा महापालिकेचे इतर विभाग याच्या कडून रेकॉर्ड मागवून घेवून अर्जदारास हव्या असलेल्या नस्तिचे पुनर्गठण करावे व अर्जदारास आवश्यक ती माहिती १५ दिवसाच्या आत देण्यात यावी असे निदेश देण्यात येत आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधीतांनी वरील कारवाई १५ दिवसात पुर्ण करावी

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३९१/२००९

श्री.एम.बी.लाल, ------ अपीलकर्ता
प्लॉट नं. ६४, बांद्रा (HIG)आनंद सागर को.हौ.सो.
बांद्रा (प.) मुंबई ५०

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
उपनिबंधक सह.संस्था मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ वांद्रे मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा
सहकारी अधिकारी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ वांद्रे

- वि वे च न -

अपिलाचा दिनांक - ०५.०४.२००९

सुनावणीची तारीख - ८.०६.२००९

अपिलार्थी - अनुपस्थित

जन माहिती अधिकारी - उपस्थित

अर्जदारास त्यांच्या सोसायटीच्या अगोदरच्या कमिटीच्या पदाधिका-यांमुळे जो सोसायटीला तोटा सहन करावा लागला त्याच्या वसुलीबाबत कारवाई सुरु करण्याच्या बाबतीत काय पाऊल उचलले आहे त्याची माहिती मागितलेली होती. त्याची समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने व तसेच प्रथम अपिलाची सुनावणी ज्या दिवशी होती त्याच दिवशी पत्र मिळाले व त्याच दिवशी सुनावणी असल्यामुळे उपस्थित राहू शकले नव्हते. सदरील अपिलामध्ये अजूनही प्रथम अपिलाचा आदेश मिळाला नाही असे नमूद केलेले आहे. तेव्हा प्रथम अपिलीय अधिकारी यांना असा निर्देश देण्यात येत आहे की, त्यांनी सदरील प्रथम अपिलाची सुनावणी १ महिन्याच्या आत घ्यावी व त्यांच्या प्रथम अपिलाचा निर्णय द्यावा. जर त्यानंतरही अपिलार्थी समाधानी नसतीलतर ते आयोगाकडे प्रथम अपिलकाराच्या आदेशाविरुध्द येवूशकता.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.
प्रथम अपिलीय अधिका-यांनी वर निर्देशील्याप्रमाणे कार्यवाही करावी.
आयोगाकडे आलेल्या व्दितीय अपिलाची प्रत प्रथम अपिलीय अधिकारी यांना या आदेशा सोबत पाठविण्यात यावी

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४२९९/२००९

श्री. अे.एन.गिरी, ------ अपीलकर्ता
मेसर्स एम.पी.वशी आणि कंपनी,
१३ श्रीनाथ भुवन, २७ पिकेट क्रॉस रोड,मुंबई ४०० ००२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
निवासी उपजिल्हाधिकारी प्रशासकीय इमारत वांद्रे

जन माहिती अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी प्रशासकीय इमारत वांद्रे (पू) मुंबई ५७

- वि वे च न -

अपिलाचा दिनांक - २०.०८.२००८

सुनावणीची तारीख - ९.०६.२००९

जन माहिती अधिकारी उपस्थित

अपील क्रमांक ४२९९ यामध्ये दिनांक २३.०४.२००९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देश दिल्याप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी माहिती द्यावी. तसेच मुदतीत माहिती न दिल्यामुळे कलम २० अन्वये शास्तिची कारवाई का करु नये याबाबतचा लेखी खुलासा समक्ष सादर करण्यासंबंधीचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी हे ९.०६.२००९ रोजी उपस्थित राहिले.

अर्जदाराच्या २०.०८.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी ३०.०८.२००८ रोजी पत्र पाठवून शुल्क भरुन कागदपत्रे देण्याची तजवीज ठेवली असल्याचे पत्र पाठविलेले आहे. तसेच याच विषयावरील दिनांक २९.०९.२००८ रोजीच्या अर्जावर २७.१०.२००८ रोजी पत्र लिहून सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत निर्गमीत करण्यात आलेल्या परिशीष्ट २ मध्ये कागदपत्रांच्या संचिकेची तपासणी करुन निवडकेलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात येतील असे ही पत्र पाठविण्यात आलेले आहे व तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचा आदेश झाल्यानंतर माहिती देण्यात आली मात्र निवडणूकीची कामे व संबंधीत अव्वल कारकून सेवानिवृत्त झाले असल्यामुळे माहिती देण्यास उशीर झाला. असे कारण दिलेले आहे. वरील खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ९.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३९६/२००९

श्री. विनोद आब्रोळ, ------ अपीलकर्ता
फ्लॅट नं.३/ए, दुर्गानिवास,
खारपाली रोड, खार(प.)
मुंबई ४०० ०५२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
उपमुख्य अभियंता बृहन्मुंबई महानगरपालिका
इमारत प्रस्ताव विभाग वांद्रे

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता बृहन्मुंबई महानगरपालिका
आर के पाटकर मार्ग वांद्रे

- वि वे च न -

अर्जाचा दिनांक - २३.१२.२००८

माहिती दिल्याचा दिनांक - १६.०१.२००९

प्रथम अपिलाचा दिनांक - ३.०२.२००९

प्रथम अपिलाचा आदेशाचा दिनांक - २.०३.२००९

व्दितीय अपिलाचा दिनांक - ८.०४.२००९

सुनावणीची तारीख - ९.०६.२००९

अर्जदारास दुर्गामोहन को.ऑ.हौ.सोसायटी, खार वेस्ट च्या इमारतीचे मंजुर नकाशे, कम्प्लिशन सर्टिफिकीट, आक्युपेशन सर्टिफिकीट, मध्यावधीच्या काळात वापरातील बदल यासंदर्भात माहिती पाहिजे होती तसेच अर्जदारास ही माहिती १९६५ साला पासूनची पाहिजे होती.

नस्ती बरीच जुनी असल्यामुळे आढळून येत नाही. मात्र २९.०९.२००४ रोजी एका युनीटच्या बाबतीत निवासी ते प्रोफेशनल डिझायनर्स असा बदल अटी व शर्तीसह मंजुर करण्यात आलेला आहे. अर्जदाराने संबंधीत नस्तीची पाहणी करुन त्यांनी आवश्यक ती कागदपत्र घेतलेली आहे. मात्र इतर फाईल्स त्यांना मिळाव्यात अशी त्यांची मागणी आहे. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पुन्हा एकदा शोध घेवून ही माहिती अर्जदारास द्यावी असे निर्देश दिले होते. परंतु शोध घेऊनही संबंधीत कागदपत्रांच्या नस्ती आढळून येत नाही. असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. नुकतेच महापालिका आयुक्त यांनी अशा सर्व नस्तिचे पुनर्गठन करण्यात येईल असे निवेदन आयोगासमोर केलेले आहे. तेव्हा या नस्तिचे पुनर्गठन २ महिन्याच्या कालावधीत करण्यात यावे व अर्जदारास आवश्यक ती माहिती देण्यात यावी.

आदेश

आदेश अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधीतांनी वरील निर्देशील्याप्रमाणे कारवाई करावी

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ९.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४३९७/२००९

श्री. प्रविण शामराव माने, ------ अपीलकर्ता
२०२/३ हंसाभुवन,दौलतनगर रोड नं.१०,
बोरीवली (पुर्व) मु.क्र.४०० ०६६

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
उपमुख्य अभियंता बृहन्मुंबई महानगरपालिका
आर विभाग कांदिवली मुंबई

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता बृहन्मुंबई महानगरपालिका
इमारत प्रस्ताव विभाग

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २४.११.२००८

उत्तराचा दिनांक : १६.१२.२००८

प्रथम अपिलाचा दिनांक : २८.१.२००९

अपिलाचा निर्णय : २७.०२.२००९

व्दितीय अपिलाचा दिनांक : ६.०४.२००९

सुनावणीची तारीख : ९.०६.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित

अर्जदाराला दौलतनगर बोरीवली (पुर्व) येथील हंसाभुवन या इमारतीचे मंजूर नकाशाची प्रत पाहिजे होती. पण संबंधीत नस्ती सापडून येत नसल्यामुळे अर्जदारास माहिती देता येत नाही. यासंदर्भात जन महिती अधिकारी यांनी पुढील प्रमाणे निवेदन दिलेले आहे.

श्री. प्रविण शामराव माने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दि. २५.११.२००८ रोजी दौलत नगर,बोरीवली (पुर्व) येथील हंसाभुवन या इमारतीचे मंजूर झालेले नकाशे मिळण्याबाबत हया कार्यालयात अर्ज सादर केला. सदर इमारतीची बिल्डींग फाईल क्रमांक या कार्यालयात नोंदवहीनुसार पाहून अर्जदार श्री. प्रविण शामराव माने यांना सदर नस्तीची पाहणी करण्याकरिता या कार्यालयाचे पत्र क्र.ई.ई.बी.पी./९७३/पी व आर/सी.आर आय दि. १६.१२.२००८ अन्वये कळविण्यात आहे होते.

नोंदवहीनुसार सदर फाईल या कर्यालयाच्या तसेच मध्यवर्ती गोदामात शोध घेतला असता ती सापडली नाही. यास्तव श्री. माने यांनी दिनांक २८.०१.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम क्र. १९(१) अन्वये अपील सादर केले. सदर अपीलाची सुनावणी पहिले अपिलीय अधिकारी, यांच्याकडे विहित मुदतीत दि. २५.०२.२००९ रोजी दुपारी ३.३० वाजता करण्यात आली, त्यावेळेस अपीलकार श्री.माने व माहिती अधिकारी हजर होते. अपीलकारास तो रहात असलेल्या इमारतीविषयीचे मंजूर नकाशे,क्षेत्रफळ इत्यादी माहिती हवी आहे. माहिती अधिकारी यांनी अपिलकाराने दिलेल्या नस्तीच्या आधारे संबंधित कागदपत्र शोधण्याचा प्रयत्न केला. संबंधित कागदपत्र ५० वर्षापुर्वीचे असल्याचे दिसते. सदर कागदपत्र या विभागात असलेल्या नोंदीनुसार शोधण्याचा कसोशीने प्रयत्न करुनही सदर कागदपत्र सापडले नाहीत. सदर सुनावणीनंतर पहिले अपिलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले.

माहिती अधिकारी यांनी संबंधित कागदपत्र या विभागात ठेवलेल्या नोंदवहीनुसार पडताळून कसोशीने शोधण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न करावा व १५ दिवसात कागदपत्र न सापडल्यास कागदपत्र ५० वर्षे जुने असून उपलब्ध होत नसल्याचे अपीलकारास कळवावे.

सदर आदेशानुसार आर व पी विभागातील सर्व इमारत मुकादमांना संबंधित कागदपत्र शोधण्यासंबदर्भात लेखी कळविण्यात आले, परंतु सर्व विभागात शोधूनही सदर नस्ती सापडली नाही. त्याचप्रमाणे सहाय्यक अभियंता (जलकामे) आर/मध्य विभाग व उप-करसंकलक (आर/मध्य) यांना त्यांच्या अभिलेखामध्ये सदर इमारतीच्या मंजूर आराखडयाची प्रत शोधून या कार्यालयात पाठविण्यासंबंधी लेखी कळविण्यात आले आहे. तसेच आर विभागातील प्लान रजिस्टरमध्ये पडताळणी केली असता नस्ती क्र. सी.ई/५९१/बी.एस.दोन/ए.आर हयाची नोंद असून रजिस्टरवरील नोंदीनुसार असे दिसून येते की, सदर इमारत सर्व्हे क्र. ५८,हिस्सा क्र.१,छत्रपती शिवाजी रोड,दहिसर (पुर्व) येथील आहे.

त्यानुसार अपीलकार श्री. प्रविण शामराव माने यांना या कार्यालयाचे पत्र क्र.उप.प्र.अभि/इ.प्र. १५९०/प.उ.-दोन/पी व आर दि. २.०६.२००९ अन्वये लेखी कळविण्यात आले.

सदर इमारतीचे नकाशे सहाय्यक अभियंता (जलकामे) आर/मध्य विभाग अथवा उप-कर संकलक (आर/मध्य) यांच्याकडून प्राप्त झाल्यास अपीलकारास त्याची साक्षांकित प्रत योग्य ती फी आकारुन पुरविण्यात येईल.

नस्ती पुनर्गठीत करण्याचा प्रयत्न जन माहिती अधिका-यांनी या आधीच सुरु केला आहे. त्यामुळे २ महिन्याच्या आत नस्ती पुनर्गठीत करुन अर्जदारास आवश्यक ती माहिती देण्यात यावी असे निर्देश देण्यात येत आहे.

आदेश

आदेश अपील मान्य करण्यात येत आहे.
जन माहिती अधिका-यांनी उपरिनिर्दीष्ट कारवाई करावी

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ९.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४२८६/२००९

श्री. बी.बी.शेट्टी **------ अपीलकर्ता**
एफ-४५२, ओशीवारा शांतिवन डी सीएचएस लिमी.
न्यु लिंक रोड, ओशीवारा,
अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०५३

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस,६ वा मजला,
जीपीओ समोर,फोर्ट,मुंबई ०१

जन माहिती अधिकारी तथा
विशेष वसुली अधिकारी, ग्रेटर बॉम्बे को.ऑप.बॅक लि. २१२, अमिर इंडस्ट्रिअल इस्टेट,
लोअर परेल, मुंबई १३

- वि वे च न -

अपीलकार श्री. बी.बी.शेट्टी, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे जे व्दितीय अपील केले ते दि. १३.०४.२००९ रोजी

आयोगाकडे प्राप्त झाले. सदर अपीलाची सुनावणी मुंबई यैथील आयोगाच्या कार्यालयात दि.७.०५.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी दि. १७.०३.२००८ व दि. २८.११.२००८ च्या अर्जान्वये खालील प्रमाणे माहिती माहिती जन माहिती अधिकारी तथा विशेष वसुली अधिकारी यांच्याकडून मागविली होती.

(i) "Copy of the Panchnama dated २५.०२.२००५ of execution of possession taking proceeding of the property for Recovery of loan with respect to Saket Bung low, plot No.४ A, City survey No.८६६, Dadabai Road, Vile Parle West, Mumbai ४०० ०५६

(ii) Copy of the Guarantee Documents executed by the owners ubder which Property was attached. "

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी मागणी केलेली माहिती न मिळाल्याने अपिलार्थीनी दि. २९.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील दिनांक ५.०१.२००९ रोजी कार्यालयास प्राप्त झाले. त्या अनुषंगाने सुनावणी घेऊन अर्जदारानी दि. २८.११.२००८ च्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती देण्याचे दि. १७.०२.२००९ रोजी आदेश पारीत केले. असे असूनही अपीलार्थीनी चुकीची, अपूर्ण माहिती दिल्याचे नमूद करुन आयोगाकडे व्दितीय अपील केले.

आयोगाकडील व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यांची बाजू एकूण घेण्यात आली तसेच सदर प्रकरणात आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची सेखोल तपासणी करण्यात आली. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यानी अपिलार्थीना लिहीलेल्या दि. ७.०५.२००९ च्या पत्राची प्रत आयोगाला उपलब्ध केली त्यावरुन असे दिसते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे केवळ पोलीस पंचनामा उपलब्ध आहे. तसेच हमीपत्राविषयी कागदपत्र उपलब्ध करुन देण्याचे त्यानी नाकारले आहे.

उपलब्ध कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांच्या दि. ७.०५.२००९ च्या प्रत्राच्या प्रतीवरुन असे दिसते की, मागणी केलेल्या कागदपत्रांशी अपिलार्थीचा प्रत्यक्ष संबंध नाही. तसे असेल तर अधिनियमाच्या कलम ११ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे अपिलार्थीना उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने त्रयस्थ पक्षाची हरकत आहे किंवा कसे याची खात्री करुन उपिलार्थीनी मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध करावयाची किंवा कसे याचा निर्णय जन माहिती अधिकारी यानी हे आदेश प्राप्त झ

ाल्यापासून एक महिन्याच्या आत द्यावा व त्याप्रमाणे अपिलार्थीना कळवावे. तेव्हा खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

आदेश

अपील निकालात काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ३६९०/२००९

श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले ------ अपीलकर्ता
सिध्दिविनायक प्रसाद, डॉ.शामा प्रसाद मुखर्जी रोड,
डोंबिवली (पुर्व) ४२१ २०१
ता.कल्याण,जि.ठाणे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सहसचिव (नवि-२८) नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

जन माहिती अधिकारी तथा
सहसचिव (नवि-२८) नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

- वि वे च न -

अपीलकार श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले यांनी दि. २०.१०.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी मुंबई यैथील आयोगाच्या कार्यालयात दि.९.०२.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपिलार्थी उपस्थित नव्हते. परंतू जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दि. २१.११.२००७ च्या अर्जान्वये ठाणे, नवी मुंबई,मिरा भाईंदर, कल्याण - डोंबिवली महानगरपालीकांच्या परिवहन सेवेच्या अनुषंगाने तीन मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविली होती. परंतू विहित कालावधीत माहिती न मिळाल्याने दि. २७.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. त्यावरही विहीत कालावधीत निर्णय न झाल्याने दि.१०.०३.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले. त्या अनुषंगाने राज्य माहिती आयुक्त कोकण यानी दि. २४.०७.२००८ च्या अंतरीम आदेशान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांना प्रथम याना प्रथम अपिलाच्या अनुषंगाने सुनावणी घेऊन देय माहिती अपिलार्थीना उपलब्ध करण्याचे आदेश दिले त्या अनुषंगानेही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीनी दि. २०.१०.२००८ रोजी पुन्हा व्दितीय अपिल केले.

दुस-या व्दितीय अपिलाची सुनावणी दि. ९.०२.२००९ रोजी घेण्यात आली त्यावेळेला अपिलार्थी उपस्थित नसल्याने सद्य:स्थिती समजू शकली नाही परंतू उपस्थित जन माहिती अधिकारी यानी अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती विनामूल्य पाठविल्याचे नमूद केले. त्याबाबत जावक रजिस्टर पाहून खात्री करण्यात आली. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

अपिलकर्त्यानी ते अपील सुनावणीत येऊ शकत नसल्यास तसे कळविणे आवश्यक आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र .४३९४

श्री. श्रीपाद कृष्णाजी नेरुळकर ------ **अपीलकर्ता**
ए-११,साधना,१६ रोड,४९४,
खार (प),मुंबई ४०० ०५२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
जिल्हा उपनिबंधक सह संस्था (३) म्हाडा कडानगर बांद्रा (पू) मु ५१
जन माहिती अधिकारी तथा
उपनिबंधक सह संस्था सहकार बाजार ४ था मजला वांद्रे (प) मुंबई ५०

- वि वे च न -

अपीलकार श्री. श्रीपाद कृष्णाजी नेरुळकर यांनी २६.०९.२००८ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था एच/(प) विभाग मुंबई यांच्या कडे मॉडर्न को.ऑ.हॉ.हौ.सोसायटी लिमीटेड खार (प) या संस्थेच्या संदर्भात माहिती विचारलेली होती. अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी मुंबई येथील आयोगाच्या कार्यालयात दि.८.०६..२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थीनी त्यांच्या २६.०९.२००८ रोजीच्या अर्जात विचारलेली माहिती पुढील प्रमाणे.

Particulars of information-

(i) Nature and subject matter of the information required:

१. Certified True Copies of Societys applications with their enclosures, if any,for permission for premature encashment and/or for taking loan/overdraft against its Fixed Deposits from Reserve Fund,Sinking Fund and/or General Fund for repairs to Socierys building "Sadhana" or for any other purpose.

२. Certified True copies of Societys applications for permission to hold its AGM for Co-op Year २००६-२००७ after १५th August,२००७ and for Co-op Year २००७-२००८ after १५th August,२००८.

३. I may be informed if no such applications were received from the Society in respect of any of the above matters.

वरील माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी केलेल्या प्रथम अपिलावर अपिलीय अधिका-यांनी अपील मान्य करुन अर्जदारास तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्देश १८.१२.२००८ रोजी पारित केला. अतिमतः अर्जदारास याबाबतचे कुठचेही कागदपत्र रेकॉर्डला नाही अशा आशयाचे पत्र दि.३.०३.२००९ रोजी पाठविण्यात आलेले दिसते. अर्जदाराने त्याच्या अपिलामध्ये त्याच्या याच विषयावरील आधीच्या अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना असे कळविले की, सोसायटीस १५ ऑगष्ट २००७ नंतर सर्वसाधारण सभा घेण्यास मंजूरी देण्यात आली होती. नंतरच्या अर्जावर मात्र परवानगी दिल्याचे रेकॉर्डवरुन आढळून येत नाही असे कळविले अशी विसंगती कशी असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

सोसायटीच्या संदर्भातील कोणतीही माहिती ही सोसायटी पातळीवरच विनासायास उपलब्ध होणे आवश्यक आहे. जेणेकरुन अपिलार्थी तसेच संबंधीत ऑफिस यांचाही मौल्यवान वेळ वाचू शक्तो. मात्र असे होत नसेलतर सहकार विाभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांचेकडे असलेली माहिती देणे व त्यांना प्राप्त झालेला सहाकार कायद्यातील अधिकारा व्दारा संबंधीत सोसायटीकडून त्या सभासदास ती माहिती मिळवून्न देणे हे करावे लागेल. अपिलीय अधिकाऱ्यांनी आदेश देवूनही रेक्ॉर्ड शोधून काढण्यास व संस्थेचे कुठचेही अर्ज आलेले दिसून येत नाही हेही कळविण्यास बराच कालावधी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला आहे. म्हणून मुंबईतील सोसायटयांची संख्या लक्षात घेता प्रत्येक सोसायटी विषयीची अशी माहिती तपासून देणे हे जिकरीचे काम आहे. हे लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांच्यावर फक्त १० दिवसांच्या विलंबासाठी २५००/- रुपयांची शास्ती लावण्याचे आयोगाने ठरविलेले आहे. तसेच विसंगतीच्या बाबतीत ॲज अ प्रॅक्टीस तारीख उलटून गेल्यानंतरही सर्वसाधारण सभा घेण्यास परवानगी देण्यात येतच असते त्यामुळे अशी परवानगी देण्यात आली होती असे सांगितले. माहितीच्या अधिकारात कुठचीही माहिती देतअसतांना ती रेकॉर्डवरुन द्यावयाची असते हे

लक्षात घेता अशा पध्दतीची कागदपत्रांची तपासणी न करता उत्तरे देणे योग्य होत नाही याची नोंद जन माहिती अधिकारी यानी घ्यावी. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

जन माहिती अधिकारी यांचेवर लादलेली शास्ती ही जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांस जन माहिती अधिकाऱ्यांच्या १ ऑगष्ट २००९ रोजी होणाऱ्या पगारातून वसुल करुन ती शासनाने विहित केलेल्या बजेट हेडखाली जमा करावी.

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ८.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र .३९३७

श्री. संजय विष्णू टिकम, ------ **अपीलकर्ता**
बी/६०२,संस्कार,गणेश पेठ गल्ली,
दादर (प.), मुंबई ४०० ०२८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृह निर्माण भवन, ५ वा मजला,
बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी तथा
उप जिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृह निर्माण भवन, ५ वा मजला,
बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: १३.०५.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: १०.०६.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि.	:१५.०७.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	: १८.०८.२००८

व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २८.११.२००८

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

श्री. गणसिध्दी विनायक सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो.) माहिम येथील परिशिष्ट - २ ची प्रत, पूरवणी परिशिष्ट-२ ची प्रत, पुनर्विकास करावयाच्या इमारतीचा व विक्री इमारती मंजूर आराखडयाची प्रत, पुनर्विकास योजनेबाबत LOC व CC, अर्हताप्राप्त व्यक्तींची यादी, अर्हताप्राप्त होण्यासाठी अर्ज केलेल्या व्यक्तींची यादी वगैरे तसेच अभिलेख तपासणीची मागणी अपिलार्थीने केली होती.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

न.भू.क्र. ९६ अ, ९७ येथील झोपडी धारकांच्या परिशिष्ट-२ बाबत माहिती सहाय्यक महानगरपालिका आयुक्त, जी/नॉर्थ विभाग, दादर (प.), मुंबई-२८ यांजकडून प्राप्त करुन घ्यावी. उर्वरित माहितीसाठी २० पृष्ठांकरिता एकूण रुपये ४०/- एवढे माहिती शुल्क बँक ऑफ महाराष्ट्र येथे भरुन चलनाची प्रत सादर करावी व त्यानंतर माहिती व्यक्तीशः घेऊन जावी.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

अर्जदारास संचिकेची पाहणी करुन द्यावी व कागदपत्र मोफत पुरवावेत.

सुनावणीचा दिनांक : ६.०३.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
उत्तरवादी (१) : अनुपस्थित
उत्तरवादी (२) : उपस्थित/श्री.एस्.जी.फुलसुंदे,विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

अपिलार्थीने संचिकेची पाहणी करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना विनामूल्य देण्याबाबत प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी घेतेलेल्या निर्णयाशी सहमती दर्शविण्यात येते. अपिलार्थी हे संबंधित संचिकेची पाहणी करण्यासाठी उपस्थित न राहिल्यामुळे त्यांना आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली नाही, असे अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी निदर्शनास आणले.

आदेश

अपिलार्थी यांनी हे आदेश मिळाल्यानंतर संबंधित संचिकेच्या तपासणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांना सदर आदेशासह समक्ष कार्यालयीन वेळेत भेटून त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य प्राप्त करुन घ्याव्यात. प्रथम

अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी होते किंवा नाही याचा पाठपुरावा करण्याची दक्षता घ्यावी.

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ८.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र .४४२९

श्री. उदय एस. दळवी ------ अपीलकर्ता
ए ११, सार दिपक को.ऑ.हौ.सोसायटी,
२ रा मजला, दिपक नगर, जय वार्र विदया,
मंदिर रोड, कल्याण (पूर्व) ठाण

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
अधिक्षक, भूमापन व भूमि अभिलेख,मुंबई शहर फोर्ट मुंबई ०१

जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क्र.२ जिल्हाधिकारी कार्यालय,
ओल्ड कस्टम हाऊस फोर्ट मुंबई ०१

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : २४.०७.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : १६.०८.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा :२८.०८.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : २७.०९.२००८
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २२.१२.२००८
अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : १९.०६.२००९

अपिलार्थी : अनुपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास प्रॉपर्टी सी.एस. नंबर ६६९, मलबार कंबाला हील, मुंबई या प्रॉपर्टी कार्डच्या दोन प्रमाणीत प्रती पाहिजे होत्या. त्या देण्यासाठी त्यांचा माहितीच्या अधिकाराखालील अर्ज होता. अर्जदारास मात्र मिळकत पत्रिकेसाठी माहितीचा अधिकार कायदा लागू होण्यापूर्वी असलेल्या पूर्वापार पध्दतीप्रमाणे वेगळयाने अर्ज सादर करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कळविले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित न राहिल्यामुळे अपील अर्ज निकाली काढण्यात आला. त्या त्यामुळे सदरचे अपील केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे अपिलार्थी यांनी मिळकत पत्रिका उताऱ्याकरीता सेतू सुविधा केंद्रात स्वतंत्र अर्ज सादर केल्यास त्यांना मिळकतपत्रिका वितरीत करण्याची तजवीज केलेली आहे. ही पध्दती माहितीचा अधिकार अधिनियम अस्तित्वात येण्यापुर्वीची आहे. हा कायदा अस्तित्वात आल्या नंतर अर्जदार हवेतर जुन्या पध्दतीचा वापर करु शकता किंवा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सुध्दा अर्ज करु शकता. सर्टीफाईड प्रतिची विभागाने ठरवून दिलेली जी फी असेल ती अर्जदारास द्यावी लागेल. तेव्हा अर्जदारास सर्टीफाईड प्रतिची फी कळवावी व फी भरल्यावर त्यांना मिळकत पत्रिका देण्यात यावी. अर्जदाराने पुन्हा अर्ज जुन्या पध्दती प्रमाणे करणे आवश्यक नाही.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिका-यांनी वर निर्देशील्याप्रमाणे कार्यवाही करावी

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक:१९.६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र .४४३०

श्री. संजय आवारे ------ अपीलकर्ता
ए-९३,खैरणा एम.आय.डी.सी.
श्रीनाथ पॅकेजिंग समोर, रिलायन्स सिलीकॉनच्या पाठीमागे,
नवी मुंबई ४०० ७०९

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सह आयुक्त,(विधी) अन्न व औषध प्रशासन, बांद्रा-कुर्ला संकुल,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी तथा
मुख्य प्रशासकीय अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, बांद्रा-कुर्ला संकुल,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : ७.०७.२००८

माहिती अर्ज कार्यालयास प्राप्त झाल्याचा दिनांक :९.०७.२००८

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : ११.०८.२००८

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि.:२९.०८.२००८

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : २९.०९.२००८

व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : १७.१२.२००८

व्दितीय अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : १९.०६.२००९

अपिलार्थी : उपस्थित

अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपिलार्थीच्या मुद्यांच्या बाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

१.	माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून मुदतीत माहिती देण्याबाबत अर्जदाराशी केलेल्या पत्रव्यवहाराचा तपशील.	१) केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत दि. ७.०७.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त(अन्न) यांचेकडे दि. १०.०७.२००८ रोजी अर्ज प्राप्त झाला. सदरच्या अर्जातील मुद्या क्र. १,२,३ व ९,१०,११ प्रशासकीय बाबीशी निगडीत असल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे नियम ६(३) (दोन) नुसार अर्जदारास थेट माहिती देण्यासाठी दि. १०.०७.२००८ रोजी च्या पत्रानुसार हस्तांतरीत केला. अर्जदाराला सदरील नमूद मुद्याबाबतची माहिती कागदपत्रासह दि. ११.०८.२००८ रोजी हस्तवितरणाने विहित मुदतीत देण्यात आलेली आहे. त्याबाबतचे पत्र व त्याची पोंच सोबत जोडली आहे.
		२) मुद्या क्र. ४,५,६,७ व ८ हे अन्न विभागाशी निगडीत असून सदरील विभागातील शासकीय माहिती अधिकारी सहायक आयुक्त (अन्न) आहेत. सदर मुद्यांच्या बाबत त्यांनी त्यांचे पत्र क्र. अभेप्र/माअ/६२०-०८/७, दि. २३.०७.२००८ अन्वये विहित शुल्क भरण्यास अर्जदारास कळविलेले आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे.परंतू अर्जदाराने विहित शुल्क न भरल्यामुळे सदरची माहिती शासकीय माहिती अधिकारी तथा सहायक

		आयुक्त (अन्न) यांनी उपलब्ध करुन दिलेली नसल्याचे दिसून येते.
२.	माहिती अर्जाची मूळ/छायाप्रत	माहिती अर्जाची छायाप्रत सोबत जोडलेली आहे. तसेच शासकीय माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (अन्न) यांनी सदरचा अर्ज हस्तांतरीत केलेल्या दि.१० जुलै,२००८ च्या पत्राची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.
३.	अपीलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी	अर्जदारानी दि. २९.०८.२००८ च्या अर्जाव्दारे अपीलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त (विधी) यांचेकडे प्रथम अपील केलेले होते. दि. २६.०९.२००८ रोजी सह आयुक्त (विधी) यांचे दालनांत अपील बाबत सुनावणी झाली. सदरच्या सुनावणीअंती अपीलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार आस्थापना विभागाशी संबंधीत कागदपत्रे/माहिती पुनश्चः अर्जदारास दिली. तसेच अन्न विभगाशी संबंधित माहिती शासकीय माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (अन्न) यांचेकडे घेवून दि.२९.०९.२००८ रोजी हस्तेबटवडयाने अर्जदारास दिले. सोबत पत्राची प्रत जोडली आहे.

अर्जदाराचा अर्ज मुद्दे निहाय सुनावणीच्या वेळेला तपासला असता फक्त नेमणूका, बदल्यांचे आदेश राजपत्रात प्रसिध्द झालेले आहेत किंवा नाहीत याची माहिती देण्यात आलेली नाही असे दिसते. आदेश पाठविल्यापासून तीन महिन्यातील राजपत्र तपासून अर्जदारास हव्या असलेल्या राजपत्राची प्रत विनामुल्य देण्यात यावी व जर राजपत्रात प्रसिध्द झाले नसेल तर तशी माहिती अर्जदारास कळवावी. पण राजपत्रात प्रसिध्द व्हायाच्या नोटिफीकेशनचे टेक्स्ट हे अर्जदारास मिळाले असल्यामुळे त्याची तशी माहितीची गरज ही भागलेली आहे.

मुदतीत माहिती न देण्याच्या (किंचीत विलंब झालेला आहे)बाबतीत केलेला खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यामुळे शास्तीचा आदेश नाही.

आदेश

अपील निकाली काढयात येत आहे.

जन माहिती अधिका-यांनी वर निर्देशील्याप्रमाणे कार्यवाही करावी

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक:१९.६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील क्र .४४२८

श्री. निलेश प्रभाकर चोडणकर ------ अपीलकर्ता
स्थानबध्द बंदी क्रं. १४०, मुख्य सर्कल विभाग बराक क्र.५,
ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे ४०० ६०१

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका,
पी/उत्तर विभाग मालाड (प.) मुंबई ६४

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) बृहन्मुंबई महानगरपालिका,
पी/उत्तर विभाग मालाड (प.) मुंबई ६४

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : ०३.१०.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : २६.११.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा :१०.११.२००८

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : ३.१२.२००८
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २२.१२.२००८
अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : १९.०६.२००९

अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

सदर अपिलार्थी तुरंगात आहे. त्यांनी दि.३.१०.२००८ रोजीच्या अर्जानुसार सी. टी. एस. क्रमांक नंबर ३९१ या क्रिडांगणावरील अतिक्रमणाच्या बाबतीत काही माहिती विचारली होती. अर्जदारास ही माहिती कार्यालयात आल्यास पुरविण्यात येईल असे कळविण्यात आले व प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला उपस्थित न राहिल्यामुळे अर्जदारास या माहितीबाबत स्वारस्य नसल्याचे कारण दाखवून माहिती नाकारण्यात आली. त्यामुळे अर्जदाराने आयोगाकडे अपील सादर केलेले आहे. अर्जदार हे तुरुंगात असल्यामुळे ते उपस्थित राहू शकत नाही ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी लक्षात घ्यायला पाहिजे होती. मात्र व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या माहितीचा परामर्श घेणारा पुढील अहवाल आयोगास सादर केला आहे.

वरील उपरोक्त विषयानुसार श्री निलेश प्रभाकर चोडणकर यांनी केलेल्या तक्रारीनुसार या विभागाकडून त्यांच्या प्रत्येक मुद्यांचे उत्तर खालीलप्रमाणे आहे.

१) आरक्षित भुखंडावर न्यूदुर्गा मित्रमंडळ यांनी बांधलेल्या ताडपत्रीच्या शेडचे या विभागाकडून दि. २२.०९.२००८ रोजी निष्कासीन करण्यात आले.
२) आरक्षित भुखंडावरील ताडपत्री व बांबुच्या सहाय्याने बांधलेल्या १५ झोपडयांचे या कार्यालयाकडुन दि. ६.११.२००८ रोजी निष्कासन करण्यात आले. तसेच लहान मुलांच्या शाळेच्या मागच्या व पुढच्या बाजूस नवीन झालेले अनधिकृत वाढीव बांधकामही दि. ६.११.२००८ रोजी या विभागाने निष्कासीत केले.
३) सिध्दकला भजनी मंडळाने केलेल्या ३८X१८ च्या अनधिकृत शेडच्या बांधकामास हया कार्यालयाने महापालिका अधिनियम ३५४ अ अन्वये नोटीस बजावली होती व सदर बांधकामाचा निष्कासनाचा कार्यक्रम १८.११.२००८ रोजी ठेवण्यात आला. परंतु स्थानिक बंदोबस्त न मिळाल्याने निष्कासनाची कारवाई पुढे ढकलण्यात आली. हया शेडचा उपयोग धार्मिक कामासाठी होत असल्याने स्थानिक पोलीस बंदोबस्त पुरेसा मिळताच इतर प्रकरणांबरोबर कारवाई करण्यात येईल.
४) सध्या आरक्षित भुखंडावरील मोकळी असलेली जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया उप-प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांच्यामार्फत सुरु करण्यात आलेली आहे.

अर्जदाराला हव्या असणाऱ्या माहितीच्या बाबतीत सद्य स्थिती यावरुन कळू शकते.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १९.६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/३६६६४/अपील क्र .३८६९/०२

श्री. सिंग अजयकुमार सोमनाथ ------ अपीलकर्ता
किशनपालसिंग चाळ, रुम नं. ४/५,
शिवाजी नगर,कुरार व्हीलेज,
मालाड (पूर्व), मुंबई-४०० ०९७

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
शिक्षण उपनिरीक्षक, बृहन्मुंबई (पश्चिम विभाग),
के/पी (पूर्व), जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०० ०६०

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, सेंट रॉक्स हायस्कूल, ताकपाडा, मरोळ, अंधेरी (पूर्व),
मुंबई-४०० ०५९

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : ७.०६.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : ------

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि. :२२.०७.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : ४.०८.२००८
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २४.११.२००८
अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : २६.०२.२००९

अपिलार्थी : उपस्थित

अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी : उपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

सेंट रॉक्स एज्युकेशन ट्रस्ट संचलित सेंट रॉक्स हायस्कुल बाबत ए ते आय पर्यंत अशा एकूण १२ सेकविषयक मुद्यांची माहिती मागितली.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

शिक्षण निरीक्षक कार्यालय, बृहन्मुंबई (पश्चिम विभाग) यांच्या दिनांक २०.०२.२००९ च्या अहवालानुसार जन माहिती अधिकारी यांनी श्री. सिंग यांच्याबाबतीत शाळा न्यायाधिकरणात याचिका असल्याने माहिती पुरविता येत नाही असे कळविले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

दिनांक ०२.०८.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी श्री. सिंग यांना माहिती पूरविण्याबाबत कळविण्यात आले होते. असे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०.०२.२००९ च्या अहवालात नमूद केले आहे.

सुनावणीचा दिनांक : २६.०२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
उत्तरवादी (१) : उपस्थित/प्रतिनिधी म्हणून सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक,के/पी(पूर्व)
उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

सेंट रॉक्स हायस्कूल ही इंग्रजी माध्यमाची कायमविना अनुदानित शाळा आहे. त्यामुळे श्री. सिंग यांचे अपिलाबाबत शिक्षण निरीक्षक कार्यालयात कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याने ती पूरविता येत नाही, असे त्यांच्या दिनांक २०.०२.२००९ च्या अहवालात म्हटले आहे. माहिती न देण्याचे कारण संयुक्तिक नाही

<u>आदेश</u>

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीस अनुसरुन जी माहिती देणे आवश्यक आहे ती विनामूल्य एक महिन्यात द्यावी. माहिती नाकारावयाची झाल्यास कोणत्या तरतुदी अन्वये नाकारली आहे तीचा स्पष्ट उल्लेख करावा.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २३ जून, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/३५८२९/अपील क्र .३७०५/०२

श्री. प्रद्योत गोविंद नवाथे ------ अपीलीर्थी
राजबाग,ब्लॉक नं. २०५, दालूचंद
को.ऑप.हौ.सोसायटी, भालचंद्र रोड,
माटुंगा,मुंबई-४०० ०१९

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर
मलहोत्रा हाऊस,६ वा मजला, जी.पी.ओ.समोर, मुंबई-४०० ००१

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एफ.एन. विभाग
मलहोत्रा हाऊस,६ वा मजला, जी.पी.ओ.समोर, मुंबई-४०० ००१

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक	: १६.०६.२००८
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक	: ८.०७.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि.	:२९.०७.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि.	: २७.०८.२००८
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक	: २४.१०.२००८ चे अपील दि. २७.१०.२००८ रोजी प्राप्त दाखल.
अपीलाच्या सुनावणीचा दिनांक	: १०.०२.२००९

अपिलार्थी : उपस्थित

अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी : उपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

दलूचंद को.ऑप.हौ.सोसायटी च्या गैरकारभाराबाबत दिनांक ५.०७.२००७ रोजी जो तक्रार अर्ज केला होता, त्यासंदर्भात संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७८,७९,८१,८३ व एम २० नमून्यात बंधपत्र दाखल केले आहेत का? नसल्यास समिती सदस्यांना काढून टाकण्याबाबत काय कार्यवाही केली? अध्यक्षांनी ब्लॉक नं. २०१/२००२ च्या अनधिकृत बांधकामासाठी परवानगी दिल्याबद्दल त्यांच्याकडून रु.२०/- लाखाचा तोटा वसूल करण्याबाबत काय कार्यवाही केली? संस्थेच्या बिल्डर/अध्यक्ष यांनी फॉर्म झेड मधील विशेषत: क्र.१२,१३,१६ व १८ ची पूर्तता केली आहे का?

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

संस्थेस कलम ८९ अन्वये दप्तर तपासणी आदेश देण्यात आला असून फिरती अधिकाऱ्यांकडून अहवाल प्राप्त पुढील कार्यवाही करण्यात येईल. झेड फॉर्ममध्ये दिलेले प्रमाणपत्र तत्कालीन निबंधक यांनी ग्राहय मानून नोंदणी केलेली आहे. याबाबत वाद असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांकडे दाद मागू शकता.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

जन माहिती अधिकाऱ्यांनी तपासणी त्वरीत घेऊन १५ दिवसात तपासणीचा अहवाल अर्जदारांना द्यावा. अपील अंशत: मंजूर.

सुनावणीचा दिनांक : १०.०२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
उत्तरवादी (१) : उपस्थित
उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था) एफ.एन. विभाग यांच्या लेखी खूलाशानुसार अपीलार्थी यांच्या तक्रार अर्जाची दखल घेऊन प्रथम संस्थेच्या दप्तर तपासणीसाठी आदेश पारित करण्यात आले. तपासणी अहवालाच्या आधारे संस्थेस मा. सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अन्वये नोटीस निर्गमित केली. त्यामध्ये संस्था पदाधिकारी यांनी सहकार कायद्यामधील तरतुदीनुसार बंधपत्रे स्विकारुन ती दाखल न केल्याबाबतही मुद्या नमूद केला असून दिनांक ३१.०१.२००९ रोजी संस्थेवर प्रशासक नियुक्तीचे आदेश जारी केले आहेत. अपिलातील मुद्या क्र. ३ हा बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधित आहे. त्यामुळे त्याबाबत अपिलार्थीने त्यांच्याकडे संपर्क करणे अपेक्षित आहे. विकासकाने सादर केलेल्या फॉर्म झेड मधील क्लॉज १२,१३,१६ व १८ ची पूर्तता केली आहे किंवा नाही याबाबत मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,मुंबई विभाग(अपील) यांच्याकडे दाद मागणे उचित ठरेल.

आदेश

अपील अंशत:मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी वर उल्लेख केल्याप्रमाणे संस्थेस कलम ७८ अन्वये जी नोटीस काढली आहे त्याची प्रत न प्रशासक नियुक्तीच्या आदेशाची प्रत विनामुल्य अपिलार्थीस द्यावी. माहिती अर्जातील मुद्या क्र.३ बाबत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडे पाठवून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कळवावे तसेच मुद्या क्र.४ बाबत मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग यांजकडे अपिलार्थी यांनी सहकार कायद्यनुसार दाद मागावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०५.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७१७/२००९

सौ. इंदुबाई बाळीबा पानसरे, ------ **अपीलकर्ता**
मु.पो. बारागांव, पिंपरी ता. सिन्नर, जि. नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
गटविकास अधिकारी पंचायत समिती सिन्नर, जि. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक बारांगाव, पिंप्री ग्रामपंचायत, जि. नाशिक

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ३०.६.२००८
सुनावणीचा दिनांक: २४.०६.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

सौ. इंदुबाई बाळीबा पानसरे मु.पो. बारागांव यांनी दि. २४.०३.२००८ च्या अर्जान्वये त्यांच्या पत्रातील नमूद बांधकामा विषयी ग्रामपंचायतीकडील ठराव व अनुषांगिक माहिती मागितली. माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.

६.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तरीही माहिती न मिळाल्याने अपीलार्थीनी दि. ३०.६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी जनह माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की अपीलार्थींनी मागितलेली माहिती तयार केली आहे. यावर असे निर्देश देण्यात आले की, सोमवार दि. २९.६.२००८ रोजी ही माहिती अपीलार्थींना पुरविण्यात यावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २५.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७३९/२००९

सौ. अब्दुल मलिक मो. युनुस, ------ **अपीलकर्ता**
७९४/१९, रविवार वॉर्ड इस्लामाबाद, मालेगांव, जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी महानगर पालिका शिक्षण मंडळ मालेगांव जि. नाशिक ------- **उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
मुख्य लिपिक महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगांव जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १.१.२००८
सुनावणीचा दिनांक: २४.०६.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपिलार्थींनी दि. १४.९.२००७ च्या अर्जान्वये सन २००७ मध्ये शिक्षण सेवकांच्या केलेल्या नियुक्त्या, नियुक्तीसाठी तयार केलेली प्रतिक्षा यादी, खुल्या संवर्गातील नियुक्ती आदेश इत्यादिबाबतच्या कागदपत्रांच्या

छायांकित प्रतींची मागणी केली त्यांच्या मागणीला प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी दि. २६.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलावर निर्णय न झाल्याने दि. १.१.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्यात आले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी १५ दिवसात माहिती देण्यात येईल असे उत्तरवादींतर्फे सांगण्यात आले. तेव्हा उत्तरवादींना सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २५.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ५२५/२००९

श्री.भटेसिंग दगा पानपाटील, ------ **अपीलकर्ता**
जिल्हा वाचनालय पानट स्मृती मागे,
क्युमाईन कल्बजवळ, धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
महसुल विभाग धुळे ता.जि. धुळे

जन माहिती अधिकारी तथा
महसुल विभाग धुळे ता.जि. धुळे

- वि वे च न -

अपीलकार श्री.भटेसिंग दगा पानपाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.११.२००८ रोजी व्दितीय अपील सादर

केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत दि.२५.५.२००९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे येथे सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २५.०३.२००८ रोजी अर्ज करुन, दि. ६.८.२००७ रोजीच्या लोकशाही दिनी टोकन क्र. १६ ची चौकशी किंवा कारवाई केलेली प्रत मिळावी अशी मागणी केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि. ३०.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन दि. ६.८.२००७ रोजीच्या लोकशाही दिनी टोकन क्र.१६ बाबत झालेल्या कार्यवाहीची माहितीची प्रत मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही अपीलकाराने मागणी केलेली माहिती तयार असल्याने जन माहिती अधिकाऱ्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. अर्जदाराने या आधीही माहितीच्या अधिकारामध्ये काही अर्ज दिले होते व त्यांना उत्तरही दिले होते. अर्जदार यांना संस्थेने ग्रंथपालपदावरुन कमी केले होते म्हणून अर्जदार अनेक अर्ज करीत असतात. तरीही चौकशी करीत असल्याचे अर्जदारास या आधीच कळविले होते. धर्मदाय सह आयुक्त नाशिक यांचेकडे कलम ८३ प्रस्ताव दाखल झाला आहे. त्यांची मंजुरी येताच पुढील न्यायिक प्रक्रिया करण्यात येईल. असे जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वळी सांगितले जी माहिती तयार आहे ती अर्जदारास विनामुल्य पोष्टाने पाठविण्यात यावी. अर्जदारास सद्यस्थितीची कल्पना असल्याने माहितीच्या विलंबाबद्दल हेतुपुरस्सरता दिसत नाही म्हणून शास्तीचे आदेश नाहीत.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ५५१/२००९

श्री. प्रफुल्ल यादवराव बोरसे ------ **अपीलकर्ता**
मु.पो. पिंप्राड, ता. शिंदखेडा,

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
उपअभियंता जि.प. बांधकाम उपविभागीय शिंदखेडा, जि.धुळे

जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता जि.प. बांधकाम शिंदखेडा, जि.धुळे

- वि वे च न -

अपीलकार श्री. प्रफुल्ल यादवराव बोरसे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर

विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथे दि. २५.५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलाकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन, श्री साई इंजिनिअर्स को.ऑप. हौ. सो.लि. धुळे यांना दि. १२.३.२००७ रोजी सामाजिक सभागृह पिप्राड (ता. शिंदखेडा) गावी बांधण्याची Workorder दिलेली होती. रु ६,२३,६१८/- रक्कमेचे सामाजिक सभागृहाचे बांधकाम पूर्ण झाले आहे काय ? व इतर अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. २७.५.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज करुन सामाजिक सभागृह पिप्राड (ता.शिंदखेडा) बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी पुरविलेली माहिती खोटी असल्याचा मुद्या अपीलकाराने व्दितीय अपीलात उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास सामाजिक सभागृह बांधकामाची सर्वसंबंधीत कागदपत्र/फाईल निरीक्षणाकरीता अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर अपीलकाराने निवड केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती अपीलाकारास पुरवाव्यात.

<u>आदेश</u>

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ५२०/२००९

श्री. नरेंद्र बारकू चौधरी **------ अपीलकर्ता**
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला,
महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग, निफाड

जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता सा.बा. उपविभाग, निफाड

- वि वे च न -

अपीलकार श्री. नरेंद्र बारकू चौधरी, .यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले.

सदर अपीलावर जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे येथे दि. २५.५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९.७.२००८ रोजी अर्ज करुन विकास कामाची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि. ५.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.६.१२.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी उर्वरित २ मुद्यांची माहिती दिली असल्याचे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित वेळेत पूर्ण माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकाऱ्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन विकास कामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपूर्ण माहिती दिली. विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केल्यानंतर ४ महिन्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांना उशिरा माहिती दिली असल्याने जन माहिती अधिकाऱ्यांनी दंडीत करण्याबाबत अपीलकाराने सुनावणीच्यावेळी प्रतीपादन केले. सदर प्रकरणी अपीलकारास पूर्ण माहिती प्राप्त झाली. अपूर्ण व विलंबाने माहिती देण्याचे कारण कार्यालयातील उपलब्ध माहिती देण्यात आली व इतर माहिती इतर ठिकाणाहून संकलित करुन नंरत देण्यात आली असे स्पष्टीकरण देण्यात आले. माहिती उशीरा न देण्यात हेतुपुरस्सरता नाही त्यामुळे पूर्ण विलंबाबद्दल शास्ती न लावता केवळ १० दिवसाच्या विलंबाची रु. २५००/- शास्ती जन माहिती अधिकारी यांचेवर लादण्यात येत आहे. ती अपीलीय अधिकारी यांच्या ऑगष्टच्या पगारातून वसुल करुन शासनाने विहीत केलेल्या बजेट हेड मध्ये जमा करावी व आयोगास अनुपालन अहवाल पाठवावा.

आदेश

सबब अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,

दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ५५७/२००९

श्री. मुकुंद शंकर भामरे ------ **अपीलकर्ता**
रा. ५२, मुकुंद फॉरेष्ट कॉलनी,
नगांवबारी ,देवपूर, धुळे ४२४ ००५

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक, धुळे

जन माहिती अधिकारी तथा
मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक, धुळे

- वि वे च न -

अपीलकार श्री. मुकुंद शंकर भामरे, .यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.७.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे येथे दि. २५.५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ४.३.२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

"उत्तर धुळे विभागातील धडगाव तालुक्यात, मार्ग प्रकल्प विभाग, शहादा या विभागाने दि. २९.३.२००९ ते दि.२६.३.२००३ या कालावधीत केलेल्या कामाची चौकशी, वनक्षेत्रपालाच्या चमुने केली त्याबद्दल विभागीय वन अधिकारी दक्षता, धुळे यांनी चमुच्या वनक्षेत्रपालांकडून माहिती संकलीत केली. त्या माहितीची व त्यांनी सादर केलेल्या अहवालाची छायांकित सत्यप्रत, तसेच विभागीय वन अधिकारी, दक्षता यांनी सादर केलेल्या अहवालाची छायांकित सत्य प्रतीची मागणी केली होती.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम सी (१)(ज) (झ) मोडत असल्याने अपीलकारास, जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती नाकारली. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि. १७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती संबंधी दि. २.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सोबत मदतनिस घेऊन येण्याची विनंती अमान्य केली. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने माहिती मागितलेल्या प्रकरणात चौकशीची कार्यवाही सुरु असल्याने चौकशीच्या कामात बाधा येऊ नये या कारणास्तव जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती नाकारली. प्रकरणातील चौकशीची व्याप्ती मोठया प्रमाणावर असून चौकशी अंती अन्य प्राधिकरण, वरीष्ठ कार्यालय, शासन यांचेशी विचार विमर्श करणे आवश्यक असल्यानेही माहिती नाकारण्यात आली. अपीलकारास माहिती पुरविल्यास चौकशीवर परिणाम होईल म्हणून माहिती नाकारण्यात आली इतपर्यंत ठीक आहे. परंतू चौकशीपूर्ण झाल्यानंतर अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविणे उक्त अधिनियमानुसार आवश्यक आहे. याप्रकरणी पूर्ण झाली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून २१ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ५४५/२००९

श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे ------ **अपीलकर्ता**
प्लॉट नं.५२, ज्ञानदीप सोसायटी,
साईसेवा हॉस्पीटल समोर, नंदुरबार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,धुळे

जन माहिती अधिकारी तथा
लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण परिक्षणे शहादा,
सामाजिक वनीकरण,धुळे

- वि वे च न -

अपीलकार श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे, .यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे येथे दि. २५.५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ४.४.२००८ रोजी अपील करुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात झालेल्या कामाची यादी, झालेला खर्च, एम.आर.इ.जि.एस.आणि इ.जी.एस. च्या कामावर आपत्कालीन आणि सोयीसुविधा खर्चाच्या पावत्या आणि कॅशबुक इत्यादिच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.२९.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. ५.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी २९.४.२००८ रोजी माहिती दिली. ती पुरेशी न वाटल्याने केलेल्या प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी २.६.२००८ रोजी उर्वरीत माहिती देण्याचे आदेश दिलेत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिकाऱ्याची कृती निश्चीतच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अपीलकाराने मागणी केलेली माहिती ७ दिवसात अपीलकारास पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी कबुल केले आहे.या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, कबुल केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलकारास ७ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ५५४/२००९

श्री. नानकचंद हिरालाल अग्रवाल ------ **अपीलकर्ता**
बजरंग चौक नवापूर, ता.नवापूर जि. नंदुरबार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
विभागीय सहनिबंधक सहकारी पतसंस्था नाशिक,
जुना मुंबई आग्रारोड,नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
अग्रसेन पतसंस्था मर्यादित धुळे

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २४.३.२००८
धुळे येथील सुनावणीची तारीख : २५.५.२००९

अपीलार्थीला जन माहिती अधिकारी अग्रसेन पतसंस्था मर्यादित यांच्याकडून काही माहिती पाहिजे होती. ती त्यांना न मिळाल्यामुळे तसेच विभागीय सहनिबंधक सहकारी पतसंस्था यांनी अपीलार्थीला हवी ती माहिती न दिल्यामुळे अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केलेले आहे. नुकतेच कर्नाटक उच्च न्यायालय तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या नागरी सहकारी बॅंका पतसंस्थांसारख्या तत्सम संस्था ज्यांना शासकीय अनुदान दिले गेलेले नाही. अशा संस्था माहितीचा अधिकार अधिनियमानुसार जन प्राधिकरण

या संज्ञेत येत नाही. साहाजिकच त्यांच्यावर जन माहिती अधिकारी नेमणे व माहिती देणे बंधनकारक नाही. त्यामुळे माहितीच्या अधिकाराखाली केलेले अपील जरी मान्य करण्यात येत असले तरी अर्जदाराच्या सहकारी संस्था अधिनियमाखाली माहिती मिळविण्याचा मार्ग खुला आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ६५१/२००९

सौ. भगवान सतन पाटील, ------ **अपीलकर्ता**
नारायण दादा नगर, प्लॉट नं. ५८-ब,
मु.पो. खापर ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार ४२५ ४१९

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
संत जगनाडे शिक्षण संस्था देशमुख नगर, दोंडाईचा, जि.धुळे ------- **उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
संत जगनाडे महाराज शिक्षण संस्था प्लॉट नं. ३८/३९, देशमुख नगर दोंडाईचा ता. शिंदखेड, जि. धुळे

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ६.२.२००९
सुनावणीचा दिनांक: २६.०५.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींना दि. १०.१०.२००८ च्या अर्जान्वये जून १९९९ ते जून २००० या कालावधीत प्रत्येक महिन्यात बॅकेव्दारे केलेल्या वेतनाचा तपशील, डिसेंबर २००६ ते जुलै २००७ कालावधीत वेतनातून केलेल्या कपाती संबंधी माहिती मागितली होती. त्यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि.२५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर सुनावणी न झाल्याकारणाने अपीलार्थीनी दि.६.२.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी असे दिसून आले की, अपीलार्थींचा मुळ अर्ज संस्थेने प्राचार्यांकडे पाठविला होता. संस्थेने प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन प्राचार्यांना माहिती देण्याबद्दल कळविले होते. तथापी प्राचार्यांनी माहिती दिली नाही. सबब असे निर्देश देण्यात येतात की, प्राचार्य कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खापर ता. अक्कलकुवा यांनी अर्जदारास १० दिवसाचे आत माहिती पुरवावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेशाची प्रत, प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, खापर, ता.अक्कलकुवा यांनाही देण्यात यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २५.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ६४३/२००९

श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे, ------ **अपीलकर्ता**
श्री.अशोक नामदेव पाटील
१३९, गांधी नगर, धुळे रोड, नंदुरबार,
ता.जि.नंदुरबार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, नंदुरबार

जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (सा.बां.) उपविभाग क्र. १, नंदुरबार

- वि वे च न -

अपीलकार श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे, .यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.७.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे येथे दि. २६.५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि. ३.३.२००७ रोजी अर्ज करुन, राज्य मार्ग क्र. ७ च्या बाजूस साखळी क्र.२२/०० ते ४३/०० या अंतरात सुजलॉन एनर्जी प्रा.लि.पुणे या कंपनीने अतिक्रमण करुन इलेक्ट्रीक पोल आणि पवन चक्या उभ्या केलेल्या आहेत. याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्याने विहित अपीलकारास रु. ३१/- एवढे शुल्क भरण्याबाबत दि. ५.३.२००७ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दि.३०.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने शुल्क भरल्यानंतर विना विलंब माहिती द्यावी, असे दि. २२.०५.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन सुजलॉन एनर्जी प्रा.लि.पुणे या कंपनीने अतिक्रमण करुन इलेक्ट्रीक पोल आणि पवन चक्क्या उभ्या केल्या आहेत. याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती पोटी एकूण रु.३१/- एवढी रक्कम भरण्याबाबत अपीलकारास दि.५.३.२००७ च्या पत्रान्वये कळविले होते. शुल्क भरुन अपीलकाराने माहिती प्राप्त करुन घेतलेली दिसत नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल केले. शुल्क भरल्यांनतर अपीलकारास विनाविलंब माहिती द्यावी असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केले. त्यानंतरही अपीलकाराने शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतली नाही असे जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. शुल्क ३१/- भरल्याबाबतचे दि. ५.३.२००७ चे पत्र मिळाले नसल्याने शुल्क भरता आले नसल्याचे अपीलकाराने सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, आता उशीरामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झ ाल्यापासून १५ दिवसाचे आत विनाशुल्क माहिती द्यावी.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ६१०/२००९

सौ. देवेंद्र रामू जपसरे, ------ **अपीलकर्ता**
माध्यमिक हायस्कूल जवळ,
विष्णूनगर, देवपूर, धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सर्वोपचार रग्णालय, धुळे ------- **उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
सर्वोपचार रग्णालय, धुळे

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १५.९.२००८
सुनावणीचा दिनांक: २६.०५.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि. ५.४.२००८ च्या अर्जान्वये माहिती मागितली असता ती त्यांना दिनांक १९.४.२००८ च्या पत्रान्वये पुरविण्यात आली. प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे दर्शवून अपीलार्थींनी दि.२०.५.२००८ रोजी प्रथम

अपील दाखल केले. यावर सूनावणी होऊन अपीलावरील निर्णय दि.४.८.२००८ रोजी च्या आदेशान्वये अपीलार्थींना कळविण्यात आला. यात डॉ. तिवारींबाबतचा अहवाल शासनाकडे प्रलंबित असल्याचे नमूद करण्यात आले.

यावर व्यथित होऊन अपीलार्थींनी दि.१५.९.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केले की, डॉ.तिवारींच्या विरुध्द असलेल्या तक्रारीचा चौकशी अहवाल शासनाकडे प्रलंबित असल्याने त्याच्या छायांकित प्रती देणे उचित होणार नाही.

आयोगाचे याबाबत असे निर्देश आहेत की, शासन स्तरावर अहवाल अंतिम झाला असल्यास त्याच्या छायांकित प्रती अपीलार्थींना पुरविण्यात याव्या.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ५६८/२००९

सौ. छोटू भबुता देसले, ------ **अपीलकर्ता**
मु.दलवाडे, पो.विरदेल, ता.शिंदखेडा जि.धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
ग्राम विस्तार अधिकारी पं.स. शिंदखेडा, जि. धुळे ------- **उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक ग्रा.पं.दलवाडे,ता.शिंदखेडा जि.धुळे

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १२.६.२००८
सुनावणीचा दिनांक: २५.०५.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि. ९.१.२००८ च्या अर्जान्वये माहिती मागितली होती. यात सन २००५ ते २००७ मधील खालील माहितीचा समावेश होतो.

i) अधिनियमाच्या कलम ४ अन्वये प्रसिध्द करावयाची माहिती.

ii) शेत जमीन लिलाव व इतर लिलाव.

iii) ग्राम विकास व जल संधारण विभागाने विहित केलेल्या प्रपत्र-१ नुसार २ वर्षाचा तपशील. इत्यादी

या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीना दि. २०.२.२००८ रोजी असे कळविले की, माहितीसाठी रु. १००/-(रु.शंभर फक्त) आपण भरावे. रक्कम भरल्यानंतर आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. परंतु त्यांनी रक्कम भरली नाही व दि.२५.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलावरील दि.२२.४.२००८ च्या आदेशात असे स्पष्ट करण्यात आले की, अपीलार्थींनी माहिती मिळविण्यासाठी आवश्यक रक्कम भरलेली नसल्याने अपील अमान्य करण्यात येत आहे. यावर व्यथित होऊन अपीलार्थींनी दि. १२.६.२००८ रोजी व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले. व्दितीय अपीलावरील सुनावच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून आले की, अपीलार्थींना माहितीसाठी आवश्यक शुल्क भरण्याची सूचना दि. २०.२.२००८ रोजी देण्यात आली. वास्तविक पाहता दि. ९.१.२००८ रोजीचा मूळ अर्ज असल्याने पैसे भरण्याची सूचना दि. ९.२.२००८ पूर्वी द्यायला हवी होती. म्हणजेच शुल्काची मागणी विलंबाने केली आहे. त्यामुळे अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती विनामुल्य पुरविणे क्रमप्राप्त आहे. तेव्हा ती त्यांना १ आठवडयाच्या आत विनामुल्य पुरविण्यात यावी. फी भरण्याची सूचना शक्य तितक्या लौकर द्यावी. एक महिन्याच्या शेवटी किंवा त्यानंतर असे पत्र देण्याचे टाळावे अशी समज संबंधीत जन माहिती अधिकारीस देण्यात येत आहे. त्याची नोंद गोपनीय अहवालाच्या नस्तीत घेण्यात यावी.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ५९८/२००९

सौ. अशोक रामदास चौगुले **------ अपीलकर्ता**
रा. चौगुले किराणा, ग.नं.४, राज कमल टॉकीज मागे,
सन्मान व्हिडीओ समोर धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार तहसील कार्यालय , धुळे **------- उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार पुरवठा शाखा, धुळे

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १.११.२००८
सुनावणीचा दिनांक: २६.०५.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि. २९.३.२००८ च्या अर्जान्वये दि.१.१.१९९३ ते ३१.१२.१९९८ या कालावधीत किरकोळ विक्रेत्यांना दरमहा मिळणाऱ्या केरोसिनच्या आदेशांची माहिती मागितली यावर त्यांना माहितीसाठी रु.४२/-शुल्क

भरण्यास दि.१७.४.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले, तथापि फक्त सन १९९५ ची माहिती दिली हे कारण दर्शवून दि. ९.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले यावर सुनावणी होऊन दि. ६.८.२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले. यानुसार जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे आदेश देण्यात आलेत परुतु अपीलार्थींना प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी दि. १.११.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे कथन केले की, अपीलार्थींना वेळेवर माहिती पुरविण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या कागपत्रांवरुन असे दिसून आले की, अपीलार्थींना माहिती दिल्याची पोच रजिस्टर मध्ये आहे. तेव्हा पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/नाशिक/अपील क्र .५६९/२७८१

श्री.निलेश कल्याण देसले ------ अपीलीर्थी
मु.दलवाडे,पो.विरदेल,ता.शिंदखेडा,जि.धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
विस्तार अधिकारी (ग्रा.प.) पंचायत समिती शिंदखेडा

जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक, ग्रामपंचायत,दलवाडे,ता.शिंदखेडा,जि.धुळे

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक :०८.०१.२००८(प्राप्त दि.१४.१.२००८)
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक: १८.०१.२००८,८.४.२००८ व १९.४.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि. :२५.०३.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : -

व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : १२.६.२०००८(प्राप्त दि.२३.६.२००८)

अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

ग्रामपंचायत नमूना नं. ३ व ४ वार्षिक जमा खर्च, नमूना नं.६ वर्गिकरण रजिस्टर, नमूना नं.१९ डेडस्टॉक/जंगम मालमत्ता नोंदणी रजिस्टर, ग्रामसेवक नोकरीच्या ठिकाणी राहत असलेल्या घर नं.सह गावातील पोलीस पाटीलच्या रहिवासी दाखला कार्यकालासह, ग्रामसेवकाच्या सेवापुस्तकाची माहिती, सन २००६-०७ चे वार्षिक अंदाज पत्रक व दिलेला अर्ज माघारी घेत असल्याच्या पोच पत्राची प्रत.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

माहिती पुरविण्यासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम रुपये ५००/- विहित केलेल्या लेखाशिर्षामध्य चलनाने भरावी किंवा ग्रामपंचायतला भरणा करणे.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

अपीलाची सुनावणी दि. ७.४.२००८ घेण्यात आली. अर्जदाराने दिनांक १५.४.२००८ पर्यंत शुल्क फी भरावी म्हणून सूचीत केले. पुन:दि. १६.४.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली व शुल्काची रक्कम भरल्यानंतर दिनांक १९.४.२००८ रोजी माहिती दिली.

सुनावणीची स्थळ : (विशेष अपील निर्गत कार्यक्रम) नवीन प्रशासकीय इमारत, जि.अ.कार्यालय सभागृह, धुळे

सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९

अपिलार्थी : उपस्थित

उत्तरवादी (१) : उपस्थित

उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

अपीलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी असे सांगितले की, शुल्काची रक्कम जास्त घेण्यात आली असून माहिती अपूर्ण व उशिराने दिली आहे. अपिलार्थी यांना एकूण ११६ पूष्ठांची माहिती मिळाली असून प्रतिपृष्ठ रुपये २/- या दराने त्यांच्याकडून एकूण रुपये २३२/- एवढी रक्कम माहिती शुल्क म्हणून आकारणे अपेक्षीत होते. त्याऐवजी त्यांच्याकडून

रुपये५००/- आकारले असल्याने एकूण २६८/- एवढे जे जास्त शुल्क अपिलार्थीकडून वसूल केलेले आहेत ते जन माहिती अधिकारी यांनी दोन दिवसात परत करणे व डेडस्टॉक रजिस्टर सरपंचाने प्रमाणित केल्यानंतर त्याची प्रत देण्यात येईल याबाबत दोन्ही पक्षांचे एकमत झाले.

आदेश

अपील अंशत:मान्य जन माहिती अधिकारी यांनी वरील प्रमाणे कार्यवाही करावी.
अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/नाशिक/सी आर ५७०

श्री.हेमंत सुपडू चौधरी ------ अपीलीर्थी
मु.पो. थाळनेर,जि.धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती शिरपूर

जन माहिती अधिकारी तथा
वरिष्ठ विस्तार अधिकारी(शिक्षण विभाग) पंचायत समिती शिरपूर,
ता.शिरपूर जि.धुळे

श्री.रमेश कृपाशंकर साळुंके (बडगुजर) मुख्याध्यापक,
जि.प.शाळा,नवाडीपाडा, ता.शिरपूर (त्रयस्थ पक्ष)

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक :२८.८.२००८

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक: १.९.२००८ व २३.९.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि. :३.१०.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : -
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २८.११.२००८
अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

२००१ पासून ते ऑगस्ट २००८ पर्यंतची श्री.रमेश कृपाराम बडगुजर (साळुंके) शिक्षक जि.प.शाळा,नवाडीपाडा, थाळनेर यांच्या विषयी एकूण ५ मुद्यांची माहिती मागितीली ते शिक्षकाच्या नोकरी व्यतिरिक्त खाजगी व्यवसाय करतात का? असल्यास शासनाची परवानगी घेतली आहे का? खाजगी व्यवसाय कुठला व कोणत्या स्वरुपाचा?इन्कमटॅक्स भरताना सदर व्यवसायाचा उल्लेख केला आहे का? असल्यास त्याचा टॅक्स किती भरला? पॅन कार्ड नंबर इत्यादी?

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

ज्यांची माहिती मागितली ते मुख्याध्यापक जि.प.शाळा, नवाडीपाडा,ता. शिरपूर, जि.धुळे असल्याने त्यांना माहिती द्यायला सांगण्यात आले व तसा अहवाल केंद्र प्रमूख यांच्या मार्फत सादर करण्याबाबत दि.१.९.२००८ च्या पत्रान्वये माहिती मुख्याध्यापकांना लिहिलेल्या पत्राची प्रत जोडून त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश : उपलब्ध नाहीत.

सुनावणीची स्थळ : (विशेष अपील निर्गत कार्यक्रम) जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे
सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९
अपिलार्थी : उपस्थित
उत्तरवादी (१) : उपस्थित
उत्तरवादी (२) : अनुपस्थित
उत्तरवादी (३) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

श्री.रमेश कृपाशंकर साळुंके (बडगुजर) (उत्तरवादी क्र.३) यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या खूलाशानुसार त्यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती गट शिक्षणाधिकारी यांना दि.२६.९.२००८ रोजी पाठविली होती. तथापि सदर माहिती परस्पर अपिलार्थीला द्यावी असे आदेशीत केल्याने त्यांनी अपिलार्थीस दि.३.१०.२००८ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या

कलम ११ अन्वये कार्यवाही करुन स्वत: अर्जदारास (अपिलार्थीस) माहिती कळविणे आवश्यक होते. तसे न करता त्रयस्थ पक्षालाच परस्पर माहिती द्यायला सांगणे म्हणजे कलम ११ चा भंग केल्याचे दिसते. प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी देखील प्रथम अपिलावर विहित कालावधीत सुनावणी घेऊन आदेश पारित करणे आवश्यक होते.

आदेश

जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांना अनुक्रमे उक्त अधिनियमाच्या कलम ११ व १९ (१) मधील तरतुदींनुसार यापुढे कार्यवाही करण्याची सक्त ताकीद देण्यात येत आहे. अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाने परस्पर माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/नाशिक/अपील /सीआर५३५/२६९२

श्री.भिवसन चंदा भामरे ------ अपीलीर्थी
२१,राजगृह, बालाजी हौ.सोसायटी,
नकाणे रोड,देवपूर,जि.धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षण विभाग,जि.प. धुळे

जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधिक्षक, शिक्षण विभाग, (प्राथमिक) जि.प. धुळे

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : २९.८.२००८
माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक: -
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि. :४.१०.२००८

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : -
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : १४.१२.२००८
अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

धुळे जिल्हा परिषदेतील सर्व प्रवर्गाच्या प्राथमिक शिक्षकांची मंजूर पदे, कार्यरत पदे व रिक्त पदे यांचा गोषवारा मिळणेबाबत.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर: उपलब्ध झाले नाही.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश : उपलब्ध झाले नाही.

सुनावणीची स्थळ : (विशेष अपील निर्गत कार्यक्रम) नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे

सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९
अपिलार्थी : उपस्थित
उत्तरवादी (१) : अनुपस्थित
उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

विशेष अपील निर्गत कार्याक्रमाच्यावेळी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली. त्याबाबत अपिलार्थींनी समाधान व्यक्त केले आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/नाशिक/अपील /सीआर ५८३/२७५९

श्री. धनराज छोटुगीर गोसावी ----- अपीलीर्थी
ह.मु.दोंडाईचा रोड
सदाशिव नगर,शहादा,जि.नंदुरबार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे(स्था.स्तर) विभाग, धुळे

जन माहिती अधिकारी तथा
उप विभागीय अधिकारी, लघु पाटबंधारे(स्था.स्तर), धुळे

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : १०.७.२००८
माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक:१) १५.७.२००८,
२)१८.८.२००८,३) २६.९.२००८

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि. :१८.८.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : १८.९.२००८रोजी
सुनावणी घेतली तथापि आदेश दिला नाही
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २०.१०.२००८
अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

२००७ व २००८ या वर्षात उप विभाग धुळे परिसरात कामाचा सविस्तर तपशील उदाहरणार्थ साठवण बंधारे, गाव तलाव,पाझर तलाव, इत्यादी त्याचप्रमाणे योजनांतर्गत इ ाालेल्या योजनांचे नाव मंजूर सोसायटयावर असल्यास त्याबाबत गावाचं नांव,सर्व्हे नं. व नकाशा उपलब्ध करणे मागणी केलेल्या जास्तीच्या माहितीसाठी एकूण रुपये १४,५३२/- एवढे माहिती शुल्क विभागीय कार्यालयात भरणा केल्यानंतर छायांकित प्रती देण्यात येतील असे दि.२६.९.२००८ च्या पत्राने कळविले.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर: दि.१५.७.२००८ रोजी माहिती अधिकारी यांनी माहितीच्या संकलनास वेळ लागण्याची शक्यता असल्याबाबत अर्जदारास पत्राने कळविले नंतर दिनांक १८.८.२००८ रोजी माहिती विनामुल्य दिलेली आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश : दि.१८.९.२००८ रोजी सुनावणी घेऊन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसात माहिती द्यावी असे तोंडी आदेश दिल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

सुनावणीची स्थळ : (विशेष अपील निर्गत कार्यक्रम) नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे
सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
उत्तरवादी (१) : उपस्थित
उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

अर्जदारास माहिती अधिकाऱ्यांनी माहिती आठ दिवस विलंबाने तथापि विनामुल्य दिलेली आहे. प्रथम अपिलावरील सुनावणीच्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये अपिलार्थी यांनी जास्तीची माहिती मागितली जी मुळ माहिती अर्जात समाविष्ट नव्हती. प्रथम अपिलात

माहितीची व्याप्ती वाढविल्यामुळे रुपये १४,५३२/-शुल्काची मागणी केलेली दिसते. मुळ माहिती अर्जात केलेल्या माहितीच्या व्याप्तीमध्ये बदल करुन प्रथम अपिल करणे योग्य नसल्याने या प्रकरणी वाढीव माहिती विनामुल्य देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

आदेश

अपील खारीज करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००८/३६७३१/ अपील क्र. ३८७८

श्री.चेतन कोठारी, ------ **अपीलीर्थी**
ओसानिक अपार्टमेंट,
डॉ.राजाबली पटेल गल्ली,
ऑफ बी.देसाई रोड, मुंबई ४०० ०२६

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९, हिल रोड,बांद्रा (पश्चिम),
मुंबई ४०० ०५०

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीय आयुक्त, पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,
बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०० ०५०

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : १९.८.२००८(उक्त जन माहिती अधिकारी यांना दिनांक २.९.२००८ रोजी प्राप्त)

माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक :१.१०.२००८ व ४.१०.२००८

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि. :१६.१०.२००८

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : २१.११.२००८

व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २७.११.२००८

अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व पोलीस ठाण्यांच्या बाबतीत मागील ३ वर्षांपासून वेगवेगळया न्यायालयांकडून प्राप्त जामीनप्राप्त/अजामीनपात्र वॉरंट/समन्स बाबत एकूण तीन मुद्याची माहिती मागितली.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १.१०.२००८ च्या पत्रान्वये खेरवाडी, बी.के.सी. वाकोला,बांद्रा,खार,सांताक्रझ,डी.एन.नगर वर्सोवा, ओशिवरा, साकीनाका या पोलीस ठाण्यांची माहिती कळविली व त्यानंतर दि. ४.१०.२००८ च्या पत्रान्वये उर्वरीत ९ पोलीस ठाण्यांची माहिती पुरविण्यात आली.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

जन माहिती अधिकारी यांनी दिलेली सांखिकीत माहिती समाधान कारक असून उर्वरित माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नियम ८ (१) (ज) प्रमाणे देता येत नाही. यास्तव अपिलार्थी यांचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

सुनावणीचा दिनांक : ०२.३.२००९

अपिलार्थी : उपस्थित

उत्तरवादी (१) : अनुपस्थित

उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

ज्या काही पोलीस ठाण्यांकडे अशी काही माहिती आहे ती अपिलार्थींना दिल्याने आरोपीस अटक करण्याच्या कार्यवाहीवेळी अडथळा निर्माण होऊ शकेल. एवढीच माहिती सोडून इतर सर्व माहिती दिली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी प्रतिपादन केले. हा मुद्या

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मान्य मान्य केला आहे मात्र बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातील इतर झोननी संपूर्ण माहिती दिली आहे. तेव्हा या झोननी सुध्दा माहिती देण्यास हकरत नसावी.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.
अर्जदारास उर्वरीत माहिती देण्यात यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ४.७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/नाशिक/अपील /सीआर ५७६/०२

श्री.बी.जे.पाटील ------ अपीलीर्थी
५,प्रमोद नगर ,सेक्टर-२,
देवपूर, जिल्हा. धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी लि,
दोंडाईचे,ता. शिंदखेडा

जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी लि,
मंडल कार्यालय, जिल्हा. धुळे

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : ८.९.२००८,१८.९.२००८ व १८.११.२००८

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक :१४.१०.२००८,२३.९.२००८+२९.११.२००८,२२.१२.२००८

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि. :२१.११.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : २५.३.२००९ रोजी अपील सुनावणीच्या वेळी माहिती समजाऊन सांगण्यात आली.
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : ९.१.२००९
अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

दिनांक १८.३.२००९ रोजीच्या अर्जानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळावी, दिनांक १२.५.२००८ रोजी वीज जोडणीबाबत केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळावी, दिनांक १७.९.२००८ रोजी विहिरीच्या खांब्यावरील तारा ज्या वायरमननी काढल्या त्यांची नावे व पत्ते व तारा काढणेबद्दल आदेशाच्या प्रती, तारा काढण्याचे प्रयोजन, तारा काढण्यावर गुन्हा दाखल करता येईल का? इत्यादी माहिती मागितली.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर: जास्तीत जास्त माहिती वेळोवेळी देण्यात आली आहे.
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश : उपलब्ध नाही
सुनावणीची स्थळ : (विशेष अपील निर्गत कार्यक्रम) नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे
सुनावणीचा दिनांक : २५.५.२००९
अपिलार्थी : उपस्थित
उत्तरवादी (१) : उपस्थित
उत्तरवादी (२) : उपस्थित (विद्यमान)

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

दिनांक १८.३.२००८ च्या साध्या अर्जामधील मजकुराचा खुलासा दिनांक १५.११.२००८ रोजी विद्युत जोडणीचा अर्ज दिला होता त्या संदर्भात अर्जदारास दिनांक २३.९.२००८ च्या पत्रान्वये तसेच त्यानंतर वेळोवेळी कळविण्यात आले आहे. अर्जदार हे पी.डी.ग्राहक असून त्यांचे साहित्य विना आदेश काढुन स्टोअरला जमा केलेले असल्याचे अर्जदारास दिनांक १४.१०.२००८ तसेच दिनांक ४.१२.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. श्री. मडकु बोरसे यांच्या तारा का काढण्यात आल्या नाहीत याबाबत दिनांक १४.१०.२००८ व दिनांक ४.१२.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.थकबाकीदार पी.डी. ग्राहकाचे साहित्य काढण्याची कारवाई ही गुन्हे स्वरुपात येत नसल्याचेही अर्जदारास कळविण्यात आलेले आहे.

अपीलार्थी माहितीच्या अधिकारात अपेक्षित असलेली माहिती दिली आहे. कृषीपंपाचे तोडलेले विज कनेक्शन त्यांना परत पाहिजे आहे सदर बाब माहितीच्या अधिकारात येत नाही. त्यासाठी अपिलार्थींना ग्राहक संरक्षण कायद्याखाली रितसर तक्रार करावी लागेल.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४४४९/०२

श्री. रमाकांत विश्वास शिर्सेकर ------ **अपीलकर्ता**
उवरी नगर गेट नं.२ गणेश चाळ, अलीयावर जंग मार्ग,
सांताक्रुझ (पूर्व) मुंबई ४०० ०५५

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ **उत्तरवादी**
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका एच/पुर्व विभाग कार्यालय,
सांताक्रुझ (पूर्व) मुंबई ५५

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (जलकाम) बृहन्मुंबई महानगरपालिका एच/पूर्व विभाग कार्यालय,
सांताक्रुझ, (पूर्व) मुंबई ५५

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ६.४.२००९

सुनावणीचा दिनांक: ८.७.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

श्री. रमाकांत विश्वास शिर्सेकर यांनी आयोगाकडे दिनांक ६.४.२००९ रोजी केलेल्या व्दितीय अपीलाची सुनावणी दिनांक ८.७.२००९ रोजी घेण्यात आली. त्या वेळेला अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराने त्यांना नळाचे पाणी वापरु देण्याच्या बाबतीत २०.११.२००६, २८.५.२००७, २०.८.२००७,२६.६.२००८ रोजी महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. पण त्यांना पाणी न मिळाल्यामुळे त्यांनी माहितीच्या अधिकारान्वये अर्ज केलेला आहे. याच विषया संदर्भातील त्यांची काही अपीले या अगोदर आयोगाकडे एकलेली आहेत. अपिलीय अधिकारी यांच्या निर्देशानुसार अपिलीय अधिकाऱ्यांनी अर्जदाराचा जी तक्रार आहे त्यावर त्यांनी लवकरात लवकर उत्तर देण्यात यावे असे निर्देश दिले होते व त्यानुसार ७.३.२००९ रोजी सहाय्यक अभियंता यांनी सेक्रेटरी श्री. विनायक शंकर राणे व इतर यांना पत्र लिहून जल जोडणी फाईल नंबर एच. पुर्व १४८४४ ही जल जोडणी श्री. विनायक शंकर राणे यांना देण्यात आली आहे. त्यांच्या कमिटीमधील एका सभासदाची एक खोली श्री. रमाकांत वि. शिर्सेकर यांनी विकत घेतली असून त्यांना पाणी भरण्यास मनाई करु नये अन्यथा महानगरपालिका कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.

महापालिकेकडे आलेल्या साध्या अर्जाला किती दिवसात उत्तर द्यावयाचे यासंबंधी काही आदेश असल्यास त्याची हि प्रत अर्जदारास देण्यात यावी.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २५.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/नाशिक/अपील /सीआर ५७१/०२

श्री. जगन्नाथ काशीनाथ वाणी **----- अपीलीर्थी**
४०१०,नेहरुचौक, देवपूर, धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
शिक्षणाधिकारी (माध्य) जेलरोड, जि.प.धुळे

जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य) यांचे कार्यालय, जि.प.धुळे

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : २०.८.२००८
माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक: -
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि. :१७.११.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : -
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २७.१२.२००८

अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :-

दिनांक ११.४.२००८ रोजी सादर केलेल्या टिपणीत अधिकाऱ्यांनी नमूद केलेल्या नोंदणीनुसार दिनांक २७.३.२००६ रोजी श्री. जे.के.वाणी (अपीलार्थी) यांनी अर्जदारास (माहिती अर्ज केलेली अन्य व्यक्ती) उत्तर देऊन अर्ज निकाली काढलेला आहे. त्या पत्राची साक्षांकित प्रत मिळणेबाबत.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:-

कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे प्रथम अपिलावरुन दिसते तथापि सुनावणीचेवेळी श्री.वाणी यांना त्यांच्याच सहीच्या पत्राची प्रत नसल्याने देता येत नाही असे यापूर्वीच कळविले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

दिनांक २.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती तथापि त्यावर आदेश पारित केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसत नाही.

सुनावणीची स्थळ : (विशेष अपील निर्गत कार्यक्रम) नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे

सुनावणीचा दिनांक : २५.०५.२००९
अपिलार्थी : उपस्थित
उत्तरवादी (१) : उपस्थित
उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

माहिती अधिकारान्वये श्री.निसार तांबोळी यांनी दिनांक २७.२.२००६ रोजी शिक्षणाधिकारी(माध्य), जि.प.धुळे यांच्या कार्यालयात माहिती अर्ज सादर केला होता. त्यावर वेळीच माहिती दिली नसल्याने मा.राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद खंडपीठ यांनी त्यांच्या दि.४.४.२००८ च्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी व सहाय्यक कर्मचारी यांना एकत्र मिळून रु २५०००/- ची शास्ती लादली होती. तया अनुषंगाने जी कार्यालयीन टिपणी अधिक्षकांनी सादर केली होती त्यामध्ये श्री. जी. के.वाणी (अपिलार्थी) यांच्या नावाचा उल्लेख करुन चूकीची माहिती दिली असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. याबाबत अपिलार्थी यांना

योग्य प्राधिकाऱ्यांकडे म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. धुळे यांचेकडे सर्वसाधारण तक्रार करुन दाद मागणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी दिनांक २७.३.२००६ रोजी कोणतेही पत्र पाठविले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना यापूर्वीच कळविले असल्याने माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

आदेश

अपील खारीज करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.२००९/नाशिक/अपील क्र . ७४६ /०२

श्री. माणिकराव विठोबा नेहे ------ **अपीलकर्ता**
माणिक मार्केट, शिवाजी नगर, सातपूर,जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ **उत्तरवादी**
आयुक्त महानगरपालिका, सातपूर, नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
विभागीय अधिकारी महानगरपालिका,सातपूर,नाशिक

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १८.७.२००७
नाशिक येथे सुनावणीचा दिनांकः २४.६.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दिनांक १६.५.२००७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

i) महानगरपालिका बृक्षारोपण करतांना प्रत्येक झाडावर किती खर्च करते.

ii) निवासी भागात लावलेले झाडे जगल्यास १ वर्षानंतर ती घरमालकाकडे सूपूर्द केली जातात. तेव्हा अशा प्रकरणी घरमालकाला घरपट्टीत सवलत देण्याची सरतूद महानगरपालिका करु शकते काय ?

iii) मळे विभाग, निवासी विभाग व मावठाणातील घरे जी महानगरपालिका हद्दीत आलीत त्याबाबतचे दस्त/नियम/ठराव इत्यादी माहिती.

iv) रस्ते बनवितानाची नियमावली.

v) दि.२३.३.२००७ च्या अर्जावर केलेली कार्यवाही.

अपिलार्थींना दि.२.६.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले. या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.१९.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. यानंतर त्यांनी व्दितीय अपील दि.१८.७.२००७ रोजी आयोगाकडे दाखल केले.

अपिलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की अपिलार्थींना सर्व माहिती मुदतीत पुरविण्यात आली असून अर्जदारास खत्रीच करुन घ्यावयाची असेलतर अभिलेखे पाहणीसाठी समक्ष बोलविण्यात आले होते. अपिलार्थी सुनावणीचे वेळी अनुपस्थित असल्याने त्यांचे म्हणणे ऐकूण घेता आले नाही.

<u>आदेश</u>

अपील खारीज करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७३४ /२००९

श्री. बाबुलाल रामभाऊ अहिरे ------ **अपीलकर्ता**
शांता निवास,एकता नगर,सहाणा नाका,मालेगांव जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
प्रशासन अधिकारी, महानगरपालिका मालेगांव शिक्षण मंडळ
जि. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी, महानगरपालिका मालेगांव शिक्षण मंडळ
जि. नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. बाबुलाल रामभाऊ अहिरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.२.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी

आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन अपीलकाराच्या सेवापुस्तकातील १९७३ पासून झालेल्या संपूर्ण नोंदीची सांक्षांकित प्रत अपीलकारास जुलै २००६ च्या वेतनात १ दिवसाचे वेतन कमी अदा करण्याचे कारण काय ? शासन निर्णय क्र.पीटीपी १०७९/१०६३८१/३२७५ प्राशी, दि. २६.१०.१९८२ ची सत्यप्रत इत्यादी अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीम माहिती दिली नाही यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दि.२४.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही.यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिकाऱ्याची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. दि.२६.१०.१९८२ च्या शासन निर्णयाची प्रत कार्यालयात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी सुनावणीचे वेळी सांगितले. या परिस्थितीत मी असे आदश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपीलकाराने मागणी केलेली माहिती तसेच दि.२६.१०.१९८२ च्या शासन निर्णयाची प्रत १५ दिवसाचे आत अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १०.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७२२/२००९

श्री. अन्सारी मो. गुफरान ------ **अपीलकर्ता**
मो.युसुफ ता. मालेगाव जि. नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
शिक्षणाधिकारी (मा) जि.प. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक मातेश्री शांताभाई माध्यमिक विद्यालय श्रीपुरखेड ता.सहाणा
जि. नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. अन्सारी मो. गुफरान, मो.युसुफ. यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१५.४.२००८ रोजी अर्ज करुन मातेश्री शांताभाई माध्यमिक विद्यालय श्रीपुरखेड व कर्मचाऱ्यांबाबत अनुषंगीक माहिी मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दि.१४.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागितलेली माहिती ४ दिवसात उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी, जन माहिती अधिकाऱ्यांना आदेश दिले .त्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१०.७.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपूर्ण माहिती पुरविल्याच्या कारणावरुन अपीलाकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलाकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन मातेश्री शांताभाई माध्यमिक विद्यालय श्रीपुरखेड बाबत व शाळेच्या कर्मचाऱ्यांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास मुद्या क्र.२ व ३ ची पूर्ण माहिती दिली नाही. असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांनी सुध्दा १४ वर्षांची माहिती मागितली आहे मात्र याबाबत विवेक बाळगणे आवश्यक. जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७४०/२००९

श्री. संतोष मांगु चौधरी **------ अपीलकर्ता**
एन-३२/एन-७,२१/६,उमाग्रज निवास
स्वामी विवेकानंदनगर,सिडको, सिडको नं.३,जि. नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ मालेगांव जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मुख्य लिपीक महानगरपालिका शिक्षण मंडळ मालेगांव जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. संतोष मांगु चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.६.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकाराकडे दि.२९.२.२००८ रोजी अर्ज करुन. खालील माहिती मागितली होती.

'अपीलकाराने पेन्शन विक्री बाबतचा अर्ज दिला होता. तो अर्ज रद्रद करणे बाबत अपीलकाराने दि.११.९.२००६ रोजी अर्ज महानगरपालिका शिक्षण मंडळ मालेगाव कार्यालयाकडे पाठविला. प्रशासनाधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव यांनी दि.११.९.२००६ रोजीच्या अपीलकाराच्या अर्जावर दिलेल्या शेऱ्याची सत्यप्रत, प्रशासनाधिकारी यांनी दिलेल्या शेऱ्याप्रमाणे कार्यवाही झाली का नाही. झालेल्या कार्यालयाची सविस्तर माहिती मागितली होती.'

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२१.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेतली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलाकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन पेन्शन विक्रीबाबतचा अर्ज रद्द करण्याबाबत अनुषंगीम माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहीत कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही सदर दोन्ही अधिकाऱ्यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

<u>आदेश</u>

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७२०/२००९

श्री. अब्दुल मालीक अब्दुल खालीक ------ **अपीलकर्ता**
घर नं.९१२,गली नं.०८, गुलशेर नगर,मालेगांव
ता.मालेगांव,जि. नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
शिक्षणाधिकारी (मा) जि.प. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (मा) जि.प. नाशिक,जि. नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. अब्दुल मालीक अब्दुल खालीक यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक नियोजन हॉल येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.१०.२००७ रोजी अर्ज करुन. मालेगांव, नाशिक येथील टि.एम.हायस्कूलची आणि सदर शाळेतील कर्मचारी तसेच विशेषत: मुख्याध्यापक श्री. गुफरान अन्सारी यांचेबाबत एकूण ४१ मुद्यांबाबत अनुषंगीम माहिती मागितली होती.

अपीलकाराच्या अर्जातील मुद्या क्र. २६ व २८ बाबत दि.३०.१०.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. मुद्या क्र.५ व ६ हे दोन्ही प्रस्ताव बऱ्याच आधिच्या कालावधीचे आहेत. शिक्षणाधिकारी (माध्यामिक) कार्यालयाचे दोन वेळा स्थलांतर झालेले असल्याने सदर शाळेच्या प्रस्तावासह अन्य तत्कालीन

प्रस्ताव आढळून येत नाहीत. यामुळे अपीलकाराने मागणी केलेली शिक्षक व मुख्याध्यापक यांचे बाबतच्या प्रस्तावाची प्रत अपीलकारास पुरविता येत नाही. आढळून आल्यास पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकारास दि.३०.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविले. तसेच अर्जातील मुद्या क्र.१ ते ४१ मुद्यांची माहिती शाळा व संस्था यांच्या स्तरावरील असल्याने संस्थेचे अध्यक्ष/सचिव व टि.एम. हायस्कूलचे (मालेगाव) मुख्याध्यापक यांच्या कार्यालयाकडून उपलब्ध करुन घ्यावे असेही जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कळविले. अपीलाकारास विहित मुदतीत माहिती द्यावी असे मुख्याध्यापक,टी.एम. हायस्कूल मालेगांव जि. नाशिक यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. ३०.१०.२००७ च्य पत्रान्वये कळविले. माहिती पोटी रुपये १३०/- एवढे शुल्क भरणा करावा जेणेकरुन माहिती पुरविणे सुलभ होईल. असे शाळेच्या मुख्याध्यापकांनी अपीलकारास दि. २३.११.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसलयाने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि. १५.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने दारिद्रय रेषेखालील नागरीक असल्याचा दावा करुन निशुल्क माहिती मागितली. याकरिता पुरावा म्हणून रेशन कार्डाची छायाप्रत जोडली अपीलकाराच्या उत्पन्नाबाबत व पिवळया रेशन कार्डाबाबत माहिती मिळविली असता अपीलकाराने सदर रेशन कार्ड खोटी माहिती देऊन प्राप्त केल्याचे समजते. सदर कार्डबाबत व त्याच्या वैध्यतेबाबत माहिती प्राप्त करण्यासाठी संबंधीत कार्यालयाकडून पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तेथून समाधान झाल्यास विनाशुल्क माहिती पुरविण्यात येईल. जलद माहिती हवी असल्यास रुपये १३०/- शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. रेशनकार्डाबाबत समाधान झाल्यावर अपीलकाराने भरलेले शुल्क परत करण्यात येईल. असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि. २३.११.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यावरून अर्जावर जन माहिती अधिकऱ्यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७३२/२००९

श्री. दत्ता संपत निकम ------ **अपीलकर्ता**
२५,मेघदूत शॉपींग, नाशिक-२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
जिल्हा अधिक्षक नाशिक जि. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय नाशिक जि. नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. दत्ता संपत निकम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.१.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२४.९२००७ रोजी अर्ज करुन.पोलीस स्टेशन इगतपूरी येथील मो.अ.गु. ११५/२००६(९१/६) स.के.नं. दि.४.१२.२००६ रोजी ६०६/२००७ चे गुन्हयातील अनुषंगीक बाबीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही.

यामुळे अपिलकाराने दि.१८.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकड अर्ज करुन इगतपूरी पोलीस स्टेशन ६०६/२००७ चे गुन्हयातील माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास एकूण ४ मुद्यांबाबत दि. १५.११.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे सहाय्यक जन माहिती अधिकारी यांना लेखी अहवाल सादर करुन व्दितीय अपीलाच्या सुनावणीचे वेळी सांगितले यावरुन अपीलकारास माहिती पुरविण्यात आल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र .७३३/२००९

सौ. सुमती अशोक निकम ------ **अपीलकर्ता**
दत्त नगर, कारखाना रोड,दाभाडी,ता.मालेगांव
जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
शिक्षणधिकारी जि.प.नाशिक, जि. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.नाशिक, जि. नाशिक

- वि वे च न -

अपीलकार सौ. सुमती अशोक निकम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१२.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर नियोजन हॉल जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१.६.२००७ रोजी अर्ज करुन श्री.भगवान पुंडलीक बागूल उपशिक्षक टी.आर. हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज दाभाडी यांच्या पर्यवेक्षक पदाच्या मान्यतेबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यास ६.०७.२००७ रोजी माहिती दिली. यामुळे समाधान न झाल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.९.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन पर्यवेक्षक पदाच्या मान्यतेबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती.जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. अपीलीय अधिकाऱ्यांची कृती निश्चितच योग्य नाही. या सुनावणीच्या वेळे हे दिसून आले की, इतर माहिती जरी देण्यात आली तरी शिक्षण उपसंचालकाच्या अंतिम निर्णयाची प्रत सापडत नसल्याने ती दिली नाही ती शोधून १० दिवसाच्या आत अर्जदारास देण्यात यावी.

आदेश

सबब अपील मान्य काढण्यात येत आहे.

संबंधीतानी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.

अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर मुदतीत निर्णय द्यावा अशी समज देण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १०.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र .७०७/२००९

श्री. संतोष मांगु चौधरी **---- अपीलकर्ता**
एन३२/एन-७/२१/६ उमाग्रज निवास,
स्वामी विवेकानंदनगर,सिडको. सिडको नं.३,नाशिक-४२२ ००९
जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ मालेगांव जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मुख्य लिपीक महानगरपालिका शिक्षण मंडळ मालेगांव जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. संतोष मांगु चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.९.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१४.५.२००७ रोजी अर्ज करुन शासनाकडून व महानगरपालिका, मालेगांव यांचेकडून माहानगरपालिका शिक्षण मंडळ,मालेगांव कार्यालयास दि.१३.३.२००७ ते १२.५.२००७ या कालावधीत उपलब्ध झालेल्या निधीबाबत सविस्तर तपशिल, मुख्याध्यापक, उपशिक्षक,शिपाई व वॉचमन यांना उपदान रक्कम व पेन्शन विक्री रक्कम दिलेल्या आहेत. अशा सर्व कर्मचाऱ्यांची सविस्तर माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत सुनावणी

आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.२.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिकाऱ्यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन

<u>आदेश</u>

सबब अपील मान्य काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १५.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र .७१०/२००९

श्री. आसिफ एकबाल निहाल अहमद **------ अपीलकर्ता**
किला,गली नं. ३, घर नं५३,
मालेगांव जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ मालेगांव जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मुख्य लिपीक महानगरपालिका शिक्षण मंडळ मालेगांव जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. आसिफ एकबाल निहाल अहमद यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.९.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थिपत होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२५.४.२००७ रोजी अर्ज करुन खालील विषयासंबंधी माहिती मागितली होती.

"आपले कडील पत्र जा.क्र.५६९७ दिनांक २०.३.२००७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री.यशवंत कौतीक पाटील यांचे अर्जानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम १९८७८ शासन अधिसुचना वित्त विभाग क्रं. वेपुर:१२९८:प्र.कं.-१३:९८ सेवा १० दि.१०.१२.१९९८ मधील नियम क्र.७ मधील टिप क्रं. ७ नुसार समान केडरचा लाभ देण्यात येत आहे. या संबंधी संबंधीत कागदपत्रांच्या प्रमाणीत छायांकित नकला मिळणे बाबत."

अपीलकाराने वर नमुद केल्याप्रमाणे मागीतलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.२०.६.२००९ रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली माहिती विहिती कालावधीत दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिकाऱ्यांची कृती निश्चितच योग्य नाही. सदर प्रकरणी अपीलकारास १५ दिवसाचे आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी व्दितीय अपीलाच्या सुनावणीचे वेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. आयुक्त मालेगांव नगरपालिका तसेच उपसंचालक (शिक्षण) नाशिक डिव्हीजन यांना असे निर्देश देण्यात येतात की अपीलीय अधिकारी यांनी दिड महिन्याचे आत अपीलावर निर्णय न दिल्याबद्दल त्यांना 'समज' देण्यात येत आहे त्याची नोंद गोपनीय अहवालामध्ये घेण्यात यावी.

<u>आदेश</u>

सबब अपील मान्य काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७४१ /०२

श्री.एम.एस.शेख **------ अपीलकर्ता**
सर्व्हे नं. २०१/१,घर नं.५४

अमनपुटा,मालेगांव जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------ उत्तरवादी**
प्रशासन अधिकारी, महानगरपालिका मालेगांव, जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मालेगांव महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय, मालेगांव, जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १५.१०.२००८
सुनावणीचा दिनांक: २४.६.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.९.६.२००८ च्या अर्जान्वये महानगरपालिका, मालेगांव यांच्या शिक्षण मंडळातील माजी शिक्षक श्री अफरोज अहमद अन्सारी यांच्या विषयाची माहिती मागितली. माहितीचा थोडक्यात तपशील खालील प्रमाणे

i) नियुक्ती आदेशाची प्रत.

ii) सेवा पुस्तकाची प्रमाणित प्रत.

iii) ऑक्टो १९८७ डिसें ८८ यातील वेतनाची माहिती.

iv) सेवा कालावधीत त्यांनी इतरत्र नियुक्ती मिळण्यासाठी अर्ज केला असल्यास त्याचा तपशील.

v) अर्ज केला असल्यास शिक्षण मंडळाने दिलेल्या मंजूरीचा तपशील.

vi) वरील (iii) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत त्यांना दिलेली नोटीस ची प्रत व त्यावर दिलेल्या जबाबाची प्रत.

या अर्जाला दि.२१.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले तथापि समाधान न झाल्याने त्यांनी दि.१८.७.२००८ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर सुनावणी न झाल्याने त्यांनी दि. १५.१०.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थींना मुदतीत माहिती दिली असल्याचे स्पष्ट झाले अपीलार्थी उपस्थित नसल्याने जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या कथनावर अपीलार्थीचे काय म्हणणे आहे हे जाणून घेता आले नाही.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.२००९/नाशिक/ अपील क्र . ७२६

श्री. अन्सारी मो. गुफरान, मो.युसुफ ----- अपीलकर्ता

मो.युसुफ ता. मालेगाव जि. नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
शिक्षणाधिकारी (मा) जि.प. नाशिक जि. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी शिक्षणाधिकारी (मा) कार्यालय जि.प.नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. अन्सारी मो. गुफरान, मो.युसुफ. यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४११.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९.४.२००८ रोजी अर्ज करुन दिलासगाव नॅशनल एज्युकेशन सोसायटी व नॅशनल उर्द हायस्कूल लासलगावच्या शिक्षक व शिक्षकेतराच्या वेतनाबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी मागितलेली माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.२३.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलाकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन शिक्षक व शिक्षकेतराच्या वेतनाबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी विहित कालावधीत माहिती दिली नाही. सुनावणीच्या वेळी हे स्पष्ट झाले आहे की, काही जोडपत्रे अर्जदारास मिळालेली नाही. या परिस्थितीत मी असे आदश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत ही जोडपत्रे पाठवावीत.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १०.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७२३/२००९

श्री. अन्सारी मो. गुफरान, मो.युसुफ ----- अपीलकर्ता
ता. मालेगाव जि. नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (मा) जि.प. नाशिक जि. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका, नॅशनल उर्द हायस्कूल लासलगांव जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. अन्सारी मो. गुफरान, मो.युसुफ. यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २४.३.२००८ रोजी अर्ज करुन नॅशनल उर्द हायस्कूल लासलगांव ता. निफाडे , जि.नाशिक येथील शिक्षक व शिक्षकेतर तसेच मुख्याध्यापकाच्या वेतनाबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.१२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि. १०.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकाऱ्यानी सुनावणीचे वेळी कोणतीही माहिती दिली नाही. म्हणून अपीलकाराने मागणी केलेली माहिती आठ दिवसाचे आत अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी असे जन माहिती अधिकाऱ्यांना आदेश दिले. त्यानंतरही जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलाकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. अपीलकारास आठ दिवसाच्या आत माहिती द्यावी. असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना आदेश दिले होते तरीही जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकाऱ्याची सदर कृती उक्त अधिनियमातील कलम ७ चा भंग करणारी आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत अपीलकारास आवश्यक ती माहिती द्यावी. अपीलकारास माहिती देण्यास झालेल्या विलंबाबत जन माहिती अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार रु.२५,०००/- इतकी शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत १५ दिवसाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७३८/२००९

श्री. अत्तहर हुसैन हसीबुल्ला ----- अपीलकर्ता
सर्व्हे नं.८७, घर नं.८ जाफर नगर,
मालेगांव जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
प्रशासनाधिकारी शिक्षण मंडळ महानगरपालिका मालेगांव, जि. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
महानगरपालिका शिक्षण मंडळ मालेगांव, जि. नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. अत्तहर हुसैन हसीबुल्ला यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१२.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १०.१०.२००७ रोजी अर्ज सर्व शिक्षा अभियानाचे अंतर्गत खरेदी केलेल्या कॉम्प्युटर व इतर अनुषंगीक माहिती मागितली होती. **जन माहिती अधिकाऱ्यानी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.२७.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.**

अपीलाकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन खरेदी केलेल्या कॉप्युटर व इतर बाबी संबंधी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहिती कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिकाऱ्यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती देण्यास झालेल्या विलंबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी जबाबदार आहेत. पण त्यांचा मृत्यु झालेला असल्याने दंडाचे आदेश नाहीत. अपिलीय अधिकाऱ्यांनी यापुढे मुदतीत अपीलाची सुनावणी घ्यावी असे निर्देश त्यांना देण्यात येत आहे.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कारवाई करावी

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७२५/२००९

श्री. महेमुद शाह हाजी गफुर शाह ----- अपीलकर्ता
४५,निहाल नगर ग.नं.१, मालेगांव जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
प्रशासनाधिकारी शिक्षण मंडळ महानगरपालिका मालेगांव, जि. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
वरिष्ठ लिपीक शिक्षण मंडळ मालेगांव, महानगरपालिका मालेगांव, जि. नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. महेमुद शाह हाजी गफुर शाह.यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन महानगरपालिका नवीन प्राथमीक शाळा क्र. १८,१९ व २० मधील शालेय पोषण आहार व इतर माहिती बाबत व गुलाबराव पाटील यांच्या सेवे बाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. अर्जातील मुद्या क्र. १ ते ७ ची माहिती संबंधीत शाळेकडून प्राप्त झाल्यानंतर पुरविण्यात येईल. मुद्या क्र.८ ते १४ हे त्रयस्थ व्यक्तीशी संबंधीत असल्याने व सदर त्रयस्थ पक्षाची माहिती देण्यास संम्मती नसल्याने सदर माहिती पूरवू शकत नाही असे जन माहिती अधिकाऱ्यानी दि.४.१०.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.२२.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलाकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन महानगरपालिका नवीन प्राथमीक शाळा क्र. १८,१९ व २० बाबत व गुलाबराव पाटील यांच्या सेवे बाबत अनुषंगीक एकूण १४ मुद्यांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहिती कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिकाऱ्यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत जी माहिती शाळेकडून मागवून देण्यात येईल असे कळविले होते ती माहिती अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबत जन माहिती अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांचेवर रु.५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. तरी ही शास्ती सप्टेंबर महिन्याच्या पगारातून प्रशासन अधिकारी महानगरपालिका शिक्षण मंडळ यांनी वसुल करुती ती

शासनाने विहीत केलेल्या बजेट हेड मध्ये भरावी व तसा अनुपालन अहवाल मंत्रालयीन शिक्षण विभाग व आयोगास पाठवावा.

<u>आदेश</u>

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७११/२००९

श्री. अन्सारी मो. गुफरान, मो.युसुफ ----- **अपीलकर्ता**
७३६, अन्सार रोड, ता. मालेगाव जि. नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
सचिव/अध्यक्ष, मदरसा अरेबिया इस्लामिया ट्रस्ट,
आझाद नगर,मालेगांव ता. मालेगाव जि. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका, अलफलाह उर्दू प्रायमरी स्कूल,

आझाद नगर,मालेगांव ता. मालेगाव जि. नाशिक

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २४.७.२००७
सुनावणीचा दिनांक: २४.६.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपिलार्थींनी दि.२७.३.२००७ च्या अर्जान्वये अलफलाह उर्दू प्रायमरी स्कूल संबंधी खालील माहिती मागितली होती.

i) शाळा कधीपासून सुरु करण्यात आली.

ii) शाळेला शासनाची परवानगी केव्हा मिळाली.

iii) शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या.

iv) कर्मचाऱ्यांच्या वैयक्तीक मान्यतेची प्रत.

v) आजमितीस सुरु असलेल्या वर्गांची संख्या

vi) नियमानुसार शाळा समिती आहे का?

vii) शाळा अनुदानास केव्हा पासून पात्र ठरली.

viii) कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक आहे का ?

वरील माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. ४.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि अपिलार्थीस माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी दि.२४.७.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या निदर्शनास आणले की, जन माहिती अधिकारी यांनी रु.७५/- शुल्काची मागणी मुदतीत केली आहे .अपीलार्थी यांचे म्हणणे त्यांनी रु.७५/- मनी ऑर्डरने पाठविले आहे व त्याची पावती त्यांचेकडे आहे. शाळेकडे ही रक्कम मनी ऑर्डरने मिळाल्याची पावती अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना दाखवावी व मनी ऑर्डरने पाठविलेले कार्यालयात जर अपीलार्थीचे पैसे स्विकृत करण्यात आले होते तर हे सिध्द झाले तर मुख्याध्यापिका/संस्थेने संबंधीत कर्मचाऱ्याने ही बाब जन माहिती अधिकाऱ्यांच्या निदर्शनास न आणल्याबद्दल कारवाई करावी. अपीलार्थींनी मागितलेली माहिती त्यांना त्वरीत पुरविण्यात यावी

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कारवाई करावी

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १०.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/तक्रार क्र .२५४/२००९

श्री.सुनील म. वाखारकर ------ **तक्रारकर्ता**
ई-०५/बी-००७,हायवे पार्क,
ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व)
मुंबई ४०० १०१

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
मिठीबाई महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई ५६

- वि वे च न -

श्री. सुनील मधुकर वाखारकर यांनी दिनांक १७.११.२००८ रोजी आयोगाकडे तक्रार केली आहे. मिठीबाई महाविद्यालय मुंबई येथील प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता दि.१०.११.२००८ त्यांच्या निलंबन कालावधीमधील माहिती दिली. मात्र असे करीत असताना सुनावणी घेण्याची संधी द्यायला पाहिजे होती. असे अर्जदाराचे म्हणणे होते याबाबत या तक्रारीची सुनावणी दि. १४.७.२००९ रोजी घेण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

दि.१०.११.२००८ रोजीच्या अर्जदारास लिहीलेल्या पत्रात सस्पेंशन पिरेड मधील अलाउन्स बद्दल माहिती दिली आहे. आजच्या सुनावणीच्या वेळेला अर्जदार उपस्थित असते तर त्यांचे म्हणणे चांगल्या रितीने समजून घेता आले असते. मात्र रेकॉर्ड प्रमाणे माहिती दिलेली आहे असेच दिसून येते. अपिलीय अधिकाऱ्यांनी मात्र सुनावणी घेतांना प्रथम अपिलाचा निर्णय लावतांना सुनावणी जरुर घ्यावी असे निर्देश त्यांना देण्यात येत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १४.७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

मुमाआ/तक्रार क्र .२५५/२००९

श्री.सुनील म. वाखारकर **------ तक्रारकर्ता**
ई-०५/बी-००७,हायवे पार्क,
ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व)
मुंबई ४०० १०१

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
मिठीबाई महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई ५६

- वि वे च न -

श्री. सुनील मधुकर वाखारकर यांनी दिनांक १०.११.२००८ रोजी लिहीलेल्या पत्रानुसार त्यांनी दि.२७.८.०८ रोजी दिलेल्या अर्जाच्या सदर्भात जे दि. १३.१०.०८ रोजी अपील सादर करण्यात आले होते त्यात कॉलेजची माहिती देण्यासाठी स्थापण करण्यात आलेल्या समिती बद्दल माहिती मागितलेली होती. याबाबतीत अपिलार्थीस सुनावणीची संधी देण्यात आली नाही. अशी

तक्रार अर्जदारने आयोगाकडे दि.१७.११.०८ रोजीच्या पत्राने केली होती. त्याची सुनावणी दि.१४.७.२००९ रोजी घेण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

३०.९.२००८ रोजी च्या आदेशाने प्राचार्यांनी जी श्री.वाखारकर व मिसेस. पी.ए. रंगारी एकमेकाविरुध्द ज्या तक्रारी केल्या होत्या त्याची करुन घेण्यासाठी जी कमिटी नेमली होती त्या कमिटीचा रीपोट व तदनुषंगीक कागदपत्रे यांची मागणी अर्जदाराने केली होती. ही कागदपत्र पाहिली असता यात सदरील माहिती अर्जदारास देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले. अपिलार्थी मात्र उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. अपिलीय अधिकाऱ्यांनी प्रथम अपीलाचा निर्णय घेतांना सुनावणी मात्र जरुर घ्यावी असे निर्देश त्यांना देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १४.७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/तक्रार क्र .५१३/२००९

श्री.रियाझ अहमद शेख **------ तक्रारकर्ता**
रुम नं.३, अशोक नगर चाळ क्र.४४,
मरोळ पाईप लाईन, मरोळ,
अंधेरी (पू) मुंबई ५९

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
महानगरपालिका, बृहन्मुंबई मुंबई ०१

- वि वे च न -

श्री.रियाझ अहमद शेख यांनी आयोगाकडे २६.०६.२००७ रोजी अशी तक्रार केली होती की, त्यांनी त्यांच्या भावाच्या विरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिके कडे प्रत्यक्ष पाठविलेले अपील स्विकारण्यात आले नव्हते. ते नंतर त्यांनी रजिष्टर पोष्टानी पाठविले. अर्जदारास त्यांनी पाठविलेल्या अपील अर्जासोबत कागदत्रे पाठविले नसल्यामुळे ही कागदपत्रे पाठविण्यास सांगितले होते, व त्यांनी ते नंतर पाठविले. अर्जदाराच्या कागदपत्रांची पडताळणी केल्या नंतर असे दिसून आले की, अर्जदाराचे अपील हे मुंबई हेडकॉर्टर्स महापालिकेच्या मुंबई मुख्यालयाला उद्देशून

करण्यात आले होते व हा अर्ज व अपील दि.१०.५.२००७ व दि.५.७.२००७ रोजीच्या पत्राने संबंधीत कार्यालयाकडे पाठविण्यात आला होता. तसेच अर्जाच्या बाबतीत दि.१३.०७.२००७ रोजीच्या पत्राने त्याच्या नंतरचा अर्ज सुध्दा जन माहिती अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला यासंबंधी कळविण्यात आले असे दिसून येते. तसेच अर्जदारास संबंधीत माहिती सुध्दा दि.३.८.२००७ रोजीच्या पत्राने अर्जदारास दिलेली आहे असे दिसून येते. तसेच अपील आदेश सुध्दा दि.२.८.२००७ रोजी दिलेला दिसून येतो. माहापालिकेत वास्तविक पाहता जे अपील व अर्ज ऑफीस मध्ये येतात ती स्विकारुन जन माहिती अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आली आहेत. तसेच अर्जदाराने सर्व कागदत्रांचे विवेचन केले असे दिसून येत.त्यामुळे पुढील आदेश देण्यात यत आहेत.

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १४.७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ६८५/२००९

श्री.गोविंद पर्वतराव मोरे ----- **अपीलकर्ता**
रेष-पर्व, आनंदनगर, सोयगांव,
ता.मालेगाव जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
शिक्षणाधिकारी जि.प. नाशिक (माध्य), नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी जि.प. नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री.गोविंद पर्वतराव मोरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विषेश अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत, नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि. १३.०६.२००८ रोजी अर्ज करुन, दि. २१.०५.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (माध्य) यांचे दालनात नाशिक जिल्हा माध्यमिक शिक्षण संघटना यांचेसमोर सहविचार सभा झाली याबाबत अनुषंगीक एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.१७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने वरील परि.२ मध्ये नमूद केलेली माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहिती कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिकाऱ्यांची कृती निश्चीतच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त करुन घेऊन अपीलकारास माहिती १५ दिवसात द्यावी.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १५.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/४०३५८ /अपील क्र.४४७४/०२

श्री. शेख सय्यद अली मोहंमद रझा ----- अपीलीर्थी
रझा को.हौ.सो.लि. ए- विंग, ८ वा माळा,
रु.नं.८०७, रफि अहमद किडवर्ड मार्ग,
बिलाल मस्जिद समोर, शिवडी (प.)
मुंबई-४०० ०१५

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,एफ/साऊथ वॉर्ड,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,परळ,
मुंबई ४०० ०१२

जन माहिती अधिकारी तथा
वसाहत अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका,एफ/साऊथ वॉर्ड,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,परळ,
मुंबई ४०० ०१२

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : २७.०१.२००९
माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक: -
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि. :२६.०३.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : १८.०४.२००९
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २३.०४.२००९
अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : १७.०७.२००९
सुनावणीचा दिनांक : १७.०७.२००९
अपिलार्थी : उपस्थित
उत्तरवादी (१) : उपस्थित
उत्तरवादी (२) : अनुपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :-

श्री.झाकिर हाजी मोहंमद विराणी व इतर अशा एकूण ०८ व्यक्तींनी रझा को.हौ.सोसायटीमध्ये व्यापारी तत्वावर गाळे मिळण्यासाठी दाखल केलेली कागदपत्रे, पत्रव्यवहार इत्यादींची माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:-

फक्त अनेततश्चर II उपलब्ध आहे.बाकी माहिती उपलब्ध नाही.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

अपीलार्थी यांनी त्यांना हवी असणारी माहिती ए.ओ (इस्टेट) यांचे कार्यालयात पैसे भरुन प्राप्त करुन घ्यावी.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

अर्जदारास त्यांनी नमूद केलेल्या ८ पात्र व्यक्तींनी त्यांची पात्रता सिध्द करण्यासाठी केलेला अर्ज व अनुषंगीक कागदपत्र जे त्यावेळेस सादर केले होते त्याची प्रत पाहिजे होती, पण जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी या दोन्हीच्या म्हणण्यानुसार अंतिमत: पात्र यादी व इतर कागदपत्र प्राप्त करुनही सापडून येत नाही. आणि कागदपत्राची ही पाहणी करण्यात येते ती कागदपत्रे काही कालावधीसाठी निश्चीतपणे दुसऱ्या पध्दतीने ठेवणे हे आवश्यक असते. वार्ड ऑफीसर ते अपिलीय अधिकारी यांना असे निर्देश देण्यात आले की, त्यांनी सदरील प्रकरणाच्या कागदपत्रांचा पुन्हा धोध घ्यावा व अर्जदारास हवी असलेली कागदपत्रे देण्याचे शर्थीचे प्रयत्न करावे. जरी शर्थीचे प्रयत्न करुनही कागदपत्र उपलब्ध नसतील तर ही बाब संबंधीत अतिरिक्त महापालिका आयुक्त यांच्या निदर्शनास आणावी व कागदपत्रांची उपलब्धता ही त्यांनी पमाणित करावी.

<u>आदेश</u>

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

संबंधीत मध्यंतरीच्या कामात हायटाईट व्यवस्थेमध्ये महापालिकेचे अतिरिक्त असण्याची आवश्यकता असल्यामुळे १० सप्टेंबर पर्यंत वरील आदेशाची अंमलबजावणी करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ४४८०/२००९

श्री. विवेक र. म्हात्रे **----- अपीलकर्ता**
ओम विजय लक्ष्मी सोसायटी, रुम नं. ८,१ ला माळा,
पाण्याच्या टाकीजवळ, आयरे रोड,
डोंबीवली (पू) जि.ठाणे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
सहाय्यक आयुक्त महानगरपालिका, डी वॉर्ड,
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, जोबन पुत्र
कंपाऊंड, मुंबई ०७

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त महानगरपालिका, डी वॉर्ड,
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, जोबन पुत्र
कंपाऊंड, मुंबई ०७

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २.०३.२००९
सुनावणीचा दिनांक: १८.०७.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास बी.आय.टी. चाळी मध्ये रुम ३/७३ ही खोली त्यांच्या वडीलांच्या मृत्यु नंरत त्यांच्या मोठया भावाच्या नावावर हस्तांतरीत करण्याच्या बाबतीत माहिती पाहिजे होती. यासंदर्भात नस्ती दाखवून ज्या कागदपत्रांच्या प्रती पाहिजे होत्या त्या देण्याचा आदेश देण्यात आला होता. मिळालेल्या आदेशानुसार अर्जदारास हस्तांतरणाच्या आदेशाची प्रत देण्यात आलेली आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी हे अपील केलेले आहे. सुनावणीच्या वेळेला जी कागदपत्र दिलेली आहे त्यावरुन हस्तांतरण नावामध्ये अर्जदाराचेही नाव दाखविलेले आहे. तसेच मालमत्ता कागद नोंद वहीचा उतारा पाहिला असता असे दिसून

आले की, त्यात अर्जदाराचे वडील मृत्यु पावल्यानंतर त्याच्या मध्ये मुलांची नावे जरी हस्तांतरीत करण्यात आली असली तरी ॲक्युपमेंट चार ची नावे दाखविण्यात आलेली आहे व त्यात अर्जदाराचे नाव आहे. वरील कार्यवाही आणि सेक्शन ट्रान्सफर ज्या सेक्शन ट्रान्सफरचा उल्लेख सुध्दा वरील कागद नोंद मध्ये आहे. फक्त त्या सेक्शन ऑर्डरची प्रत मात्र नाही. मात्र इतर सर्व कागदपत्र उपलब्ध आहेत. अर्जदाराने मालमत्ता मागणी खाते नोंद ज्या उताऱ्याची मागणी केली ती ते कागदत्र अर्जदारास त्वरीत देण्यात यावे असे निर्देश देण्यात आले.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १८.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ६८६/२००९

श्री.गोविंद पर्वतराव मोरे ----- **अपीलकर्ता**
रेष-पर्व, आनंदनगर, सोयगांव,
ता.मालेगाव जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
शिक्षणाधिकारी जि.प. नाशिक (माध्य), नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
गो.य.पाटी विद्यालय जळगांव(नि) ता.मालेगांव जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री.गोविंद पर्वतराव मोरे. यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विषेश अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत, नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि. ०८.०७.२००८ रोजी अर्ज करुन,गट विमा योजनेची रक्कम धनादेशाने मिळण्याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. त्यांच्याकडून मार्गदर्शन आदेश प्राप्त झाल्याबरोबर आपणास तसे कळविण्यात येईल व पैसे पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलकारास दि.२.०८.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळै समाधान झाले झाले नसल्यामुळे अपूर्ण चुकीची माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.१.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२९.०९.२००८ रोजी सुनावणी आयोजीत केली. अपीलकाराने मागितलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत मोडत नाही असे नमूद करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन गट विमा योजनेची रक्कम धनादेशाने मिळण्याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहिती कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिकाऱ्यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. गट विमा योजनेची रक्कम संबंधीत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची वैयक्तिक बाब आहे. तरी जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागितलेली माहिती पुरवावी.

आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १५.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ६८७/२००९

श्री.गोविंद पर्वतराव मोरे ----- **अपीलकर्ता**
रेष-पर्व, आनंदनगर, सोयगांव,
ता.मालेगाव जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- **उत्तरवादी**
शिक्षणाधिकारी जि.प. नाशिक (माध्य), नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी जि.प. नाशिक (माध्य),

- वि वे च न -

अपीलकार श्री.गोविंद पर्वतराव मोरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विषेश अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत, नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन, संस्थेचे अधिकृत व्यवस्थापन व इतर बाबी संबंधी अनुषंगीक माहिती मागितली होती. कोणते व्यवस्थापन अधिकृत किंवा सक्षम असे सांगणारे ठरविणारे सक्षम अधिकारी कोण आहेत. संस्थेचे पत्र क्र.६६/०६.०७ दि.३१.०१.२००७ अन्वये अर्जदार श्री. गो.प. मोरे यांना दि. १.०२.२००७ पासून सेवेतून कमी केले. असे असतांना संस्थेचे कार्यालयाने अपीलकारास बडतर्फ असा शब्द प्रयोग का करत आहे. आर्थीक गैरव्यवहाराबाबत जे पुरावे सादर केलेले असतील त्या पुराव्याच्या छायांकित प्रती. माध्यमिक शाळातील कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती वेतन मंजूर करणारे कार्यालयीन प्रमुख कोण आहेत याबाबतची अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहिती कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.११.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलाकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज संस्थेच्या व्यवस्थ्ञ ाापनाबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहिती कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ३० दिवसात सुनावणी घेऊन अपीलाचा निर्णय द्यावयास पाहिजे असे निर्देश त्यांना देण्यात येत आहे. या परिस्थितीत मी असे आदश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी. माहिती उपलब्ध करुन देण्यास झालेल्या विलंबाबाबत सर्व प्रकरणे लेखी खुलासा आयोगाकडे दाखल करावा.

आदेश

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १५.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ६७५/२००९

श्री.राजेंद्र काळु नानकर ------ अपीलकर्ता

एन-५३,अे.जे.१/२६/५,
महात्मा फुले नगर, पवननगर,
सिडको, नविन नाशिक-८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
पोलीस आयुक्त कार्यालय (प्रशासन) नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस उपआयुक्त क्र.२ ना.रोड कार्यालय, नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री.राजेंद्र काळु नानकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०७.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, तसेच अपीलकार उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१.०४.२००८ रोजी अर्ज करुन, अंबंड पोलीस स्टेशनमध्ये सन १९९० ते २००८ या कालावधीत कार्यरत असेले शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या कालावधी, त्यांची नावे अशी सविस्तर माहिती मागितली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती पोलीस आयुक्त कार्यालयातील आस्थापना शाखेत उपलब्ध होऊ शकेल. अपीलकाराचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी पोलीस आयुक्त कार्यालयाकडे पाठविला असून आवश्यक माहिती त्यांचेकडून प्राप्त होईल असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.११.०४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान न झाल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.२२.०५ २००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलाकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन अंबंड पोलीस स्टेशनमध्ये सन १९९० ते २००८ या कालावधीत कार्यरत असेले शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे,

कालावधीची माहिती मागितली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती पोलीस आयुक्त कार्यालयातील आस्थापना शाखेत उपलब्ध होऊ शकेल असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कळवून अपीलकाराचा अर्ज पोलीस आयुक्त कार्यालयाकडे पाठविला. सदरबाब अपीलकारास अवगत केली. यावरुन पोलीस आयुक्त कार्यालयातील आस्थापना शाखेतील जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदश देतो की, पोलीस आयुक्त कार्यालयातील आस्थापना शाखेतील जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती अपीलकारास माहिती द्यावी

आदेश

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.
मात्र अर्जदाराने किती वर्षाची माहिती मागावी याबाबत विवेक बाळगणे आवश्यक आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २०.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ६८३/२००९

श्री.राजेंद्र काळु नानकर ------ **अपीलकर्ता**
एन-५३,अे.जे.१/२६/५,
महात्मा फुले नगर, पवननगर,
सिडको, नविन नाशिक-८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. नाशिक

- वि वे च न -

अपीलार्थींनी दि.३१.१२.२००७ च्या अर्जान्वये सन २००३ ते २००७ या कालावधीची खालील माहिती मागितली.

अपीलाचा दिनांक : २५.७.२००८
सुनावणीचा दिनांक: २४.०६.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थींनी दि. ३१.१२.२००७ च्या अर्जान्वये सन २००३ ते २००७ या कालावधीची खालील माहिती मागितली.

i) त्र्यंबक तालुक्यातील प्रा.आ. केन्द्रांना दिलेले अनुदान.
ii) दिलेल्या अनुदानातून झालेला खर्च व त्याच्या बिलांच्या सत्यप्रती.
iii) प्रत्येक राष्ट्रीय कार्यक्रमाच्या अंतर्गत झालेला व त्यासंबंधीचे हाऊर्सच्या सत्यप्रती.

उपरोक्त माहिती तालुकास्तरावर उपलब्ध असल्याचे अपीलार्थींना दि. १६.०१.२००८ रोजी कळविण्यात आले. त्यानुसार पं.स. स्तरावरुन दि. २५.०२.२००८ रोजीच्या पत्रान्वये त्यांना खर्चाचा तपशील कळविण्यात आला. हाऊचर्सच्या प्रतीसाठी रुपये २०,०००/- शुल्क भरण्यास सांगण्यात आले.

यावर समाधान न झाल्याने अपीलार्थींनी माहिती अप्राप्त असल्याचे कारण नमूद करुन दि. १५.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणी झाली नाही व माहिती अप्राप्त आहे या कारणास्तव त्यांनी दि. २५.७.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सुनावणीच्या वेळी अपीलार्थींनी असे सांगितले की विशेष अपील निर्गत कार्यक्रमामध्ये त्यांचे अपील चालविण्यात येऊ नये. यावर त्यांना असे सांगण्यात आले की, प्रशासकीय दृष्टिकोन नजरे समोर ठेवून विशेष निर्गत कार्यक्रम आयोजित केला जातो. अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी स्थानिक रहिवाशी असल्यामुळे सुनावणी नाशिक येथे घेणे सर्वांच्या

सोयीचे असते. सुनावणीच्या वेळी अर्जदारास हवा तेवढा वेळ त्यांचे मुद्दे मांडण्यासाठी दिला जाईल. त्यामुळे अर्जदाराची विनंती मान्य करण्यात आली नाही.

सुनावणी दरम्यान कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून आले की अपीलार्थींचा दि. ३१.१२.२००७ रोजीचा मुळ अर्ज ५.०१.२००८ पर्वी १६.०१.२००८ रोजी म्हणजेच विलंबाने पाठविला आहे. तरी यापुढे असा विलंब होणार नाही याची जन माहिती अधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय यांनी अपीलार्थीना माहिती पुरविली आहे. माहिती अधिकारी पंचायत समिती त्र्यंबकेश्वर यांना अर्ज २१.०१.२००९ रोजी प्राप्त झाली व त्यांची माहिती २५.०२.२००९ रोजी दिली. चार दिवसाच्या विलंबाबद्दल त्यांचेवर १०००/- रुपयांची शास्ती लावण्यात येत आहे. व व्हाऊचर्सच्या प्रतीसाठी शुल्क भरावयास सांगितले आहे. अर्जदाराने नमून केलेल्या व्हाऊचर्सच्या प्रती एकूण १०,०००/- होतील असे दिसते. एवढया प्रती काढत बसणे हे त्या कार्यालयाच्या क्षमतेवर अवास्तव ताण टाकणारे ठरेल. त्यामुळे अर्जदाराने आपली मागणी केल्यास विवक्षित कार्यक्रमाची बिले मागितल्यास रु.२५०/- प्रतीपर्यंत विनामुल्य देण्यात याव्यात यावर सख्या होणार असेल तर उर्वरीत व्हाउचर्सच्या प्रती या शुल्क आकारण्यात याव्यात.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेशाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक, जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.नाशिक व गटविकास अधिकारी यांना हि आयोगाने लादलेली शास्ती त्यांनी वसुल करावी व शासनाने विहीत केलेल्या बजेट हेड मध्ये जमा करुन तसा अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २०.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/नाशिक/अपील/सीआर ६६३/०२

श्री. प्रकाश भुता पाटील, ----- अपीलीर्थी
रा.मु.पो. पढावद,ता.शिंदखेडा,

ता.शिंदखेडा, जि.धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
तहसिलदार, शिंदखेडा, जि.धुळे

जन माहिती अधिकारी तथा
पुरवठा निरीक्षक, तहसिल कार्यालय, शिंदखेडा, जि.धुळे

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : १५.०७.२००८
माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक: ०४.०८.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाचा दि. :१२.११.२००८
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : -
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : ०३.०२.२००९
अपीलाच्या सुनावणीचा दिनांक : २६.०५.२००९
सुनावणीचा दिनांक : २६.०५.२००९

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :-

मौजे पढावद येथील रहिवाशी श्री. प्रकाश भुता पाटील व सौ. मिराबाई प्रकाश पाटील यांना शिधापत्रिका देताना पुरवठा विभामार्फत झालेल्या होम इन्कवायरीचे सर्व कागदपत्र, कार्डधारकाचे जबाब, चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल व त्यावर तहिसिलदार शिंदखेंडा यांनी केलेला आदेश, १९९४ साली अस्तित्वात असलेल्या कन्झुमर रजिस्टर मधील वरील व्यक्तींच्या नावे कन्झुमर रजिस्टरची झेरॉक्स/शिधाप्रत्रिकेची झेरॉक्स इत्यादी मागणी केलेली माहिती ही साधारणत: बरीच जुनी असून, सदर माहितीचा शोध घेण्याचे काम सुरू असून ती प्राप्त होताच देण्याची कार्यवाही करण्यात येईल. सोबत एकूण सात पृष्ठांची उपलब्ध असलेली माहिती पाठविण्यात आली.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:-

माहिती उपलब्ध नाही.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१६.१२.२००८,दि.१५.०१.२००९ व दि. १६.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. तथापि आदेश पारित केलेले नाहीत.

सुनावणीचा दिनांक : २६.०५.२००९
अपिलार्थी : उपस्थित
उत्तरवादी (१) : उपस्थित
उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

पूरवठा विभाग कार्यालयात उपलब्ध असलेली शिधापत्रिका क्रमांक ११२४ व ११२३३१ बाबतची माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे. सदर शिधापत्रिकांच्या बाबतीत होम इन्कावयरीची कागदपत्रे देता येऊ शकलेली नाहीत कारण सदरची चौकशी कागदपत्रे ही 'ड' या एक वर्षाच्या कालावधीत मोडतात. त्यामुळे ती नष्ट करण्यात आली असल्याचे तहसिलदार, शिंदखेडा यांनी त्यांच्या खूलाशामध्ये नमूद केले आहे. खुलासा याग्य आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २०.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ तक्रार क्र . ६२ /२००९

श्री.केशव मानसिंग देवरीया, **------ तक्रारकर्ता**
प्लॉट नं. २, आचार्य वाडी, वडवली व्हिलेज,

चेंबुर, मुंबई ४०० ०७४

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**
उपमुख्य कार्यकारी अधिक्षक ग्रा.पं. विभाग जि.प.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नाशिक

- वि वे च न -

श्री. केशव मानसिंग देवरीया यांनी जन माहिती अधिकारी, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे दि. ८.०८.२००६ रोजी तक्रार करुन एल.एल.बी. तृतीय वर्षाच्या चौथ्या, सहाव्या सेमिस्टर व पाचव्या वर्षाच्या एल.एल.बी. च्या आठव्या व दहाव्या सेमिस्टरच्या एप्रिल, मे २००६ च्या संदर्भात घेतलेल्या परिक्षेच्या बाबतीत काही माहिती विचारलेली होती. काही माहिती त्यांच्या दि. २६.०६.२००६ च्या पत्राने मागितलेली आहे व याच विषयाधीन प्रकरण विचाराधीन आहे असे दि. २१.०७.२००६ रोजीच्या पत्राने कळविले. युनिव्हर्सीटी मुंबई त्याच्या संदर्भात अर्जदाराने सहा मुद्यांवर माहिती विचारलेली होती. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी अर्ज देण्यात यावा असे निर्देश दिले व त्यानुसार पुढे हे अर्जदारास देण्यात आले पण त्यामुळे दिलेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे कारण दर्शवून आयोगाकडे तक्रार केलेली आहे. अर्जदाराने विचारलेली माहिती व अर्जदारास दिलेली माहिती याचा ताळमेळ लागत नाही हे खरेच काही माहिती संबंधीत असेल पण अर्जदाराला हवी असणारी माहिती व दिलेली माहिती यात संदीग्धता आढळून येत नाही त्यामुळे अर्जदाराचा अर्ज पुन्हा काळजी पूर्वक वाचून अर्जदाराच्या अर्जाचे संबंधात त्याचे निराकरण होईल अशा रितीने माहिती १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी द्यावी.

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २१.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ तक्रार क्र . ६१ /२००९

श्री.केशव मानसिंग देवरीया, ------ तक्रारकर्ता
प्लॉट नं. २, आचार्य वाडी, वडवली व्हिलेज,
चेंबुर, मुंबई ४०० ०७४

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा **-------- उत्तरवादी**
वकाअ/परिक्षा नियंत्रक (वाणिज्य शाखा), परिक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ,
फुले भवन, विद्यानगरी सांताक्रुझ (पूर्व) मुंबई ४०० ०९८

- वि वे च न -

अर्जदाराने २६.१२.२००७ रोजीची जी तक्रार दिलेली आहे त्याची सुनावणी दि. २१.०७.२००९ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ते अनुपस्थित होते तर जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास तीन वर्षाच्या एल.एल.बी कोर्सच्या पाचव्या सेमिस्टरची व पाच वर्षाच्या एल.एल.बी. कोर्सच्या नवव्या सेमिस्टरची नोहेंबर ०५ मध्ये घेतलेल्या परिक्षेच्या संदर्भात आणि तीन वर्षाच्या एल.एल.बी. कोर्सच्या सहाव्या सेमिस्टरची पाच वर्षाच्या एल.एल.बी. कोर्सच्या दहाव्या सेमिस्टरची एप्रिल ०६ मध्ये घेतलेल्या परिक्षेच्या संदर्भात माहिती माहिती पाहिजे होती.

a) How many students have cleared in each subjects of ३ year ll.B ५th semester and ५ year LL.B ९th semester Examination held in the year November २००५ and in the ३ year LL.B ६th semester and ५ year LL.B १०th semester examination held in the year April २००६.
b) Give the list of students who have cleared in each of the subjects of ३ year LL.B ५th semester LL.B ९th semester Examination held in the year November २००५ and in the ३ year LL.B ६th semester and ५ year LL.B १०th semester examination held in the year April २००६, together with the marks obtained by each of them in asending order for each subject along with the name of the college to which the strdent belong.

अर्जदारास ए ची माहिती देण्यात आली आहे व बी ची माहिती ही तृतीय पक्षाची असल्यामुळे देण्यात आली नाही. त्यामुळे अर्जदाराची तक्रार आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला बी मधील माहिती ज्या पध्दतीने पाहिजे आहे तशा पध्दतीने ती ठेवल्या जात नाही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशा पध्दतीने माहिती उपलब्ध असेलतर तशा पध्दतीने माही सर्वसाधारण पणे फोटो कॉपीच्या

संदर्भात दिली जाते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य वाटते या परिस्थितीत पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २१.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७५६/२००९

श्री.राजेंद्र काळु नानकर ------ अपीलकर्ता
एन-५३,अे.जे.१/२६/५,
महात्मा फुले नगर, पवननगर,
सिडको, नविन नाशिक-८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
उपमुख्य कार्यकारी अधिक्षक ग्रा.पं. विभाग जि.प.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री.राजेंद्र काळु नानकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०३.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक नियोजन हॉल येथे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने एकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

मात्र अपीलार्थीचे म्हणणे असे की त्यांनी अपील हे औरंगाबाद माहिती आयोगाच्या कार्यालयात केले आहे तेव्हा हे अपील त्याच आयुक्तांनी चालवावे. सध्या नाशिक विभागाचा कार्यभार औरंगाबाद राज्य माहिती आयुक्तांकडे आहे. औरंगाबाद विभागाचा कार्यभार फार अवजड असल्याने नाशिक विभागाच्या कांही अपीलांची सुनावणी स्वतः मुख्य माहिती आयुक्त सर्वांची सोय व्हावी, अपीलार्थी व सरकारी अधिकारी यांचा प्रवास खर्च व वेळ वाचावा म्हणून नाशिकला येऊन सुनावणी घेत असतात. या विशेष सुनावणीत अपीलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पूर्ण संधी देण्यात येते. निकाल आपल्याच बाजूने लागावा अशी मात्र अपेक्षा ठेवणे रास्त नाही. त्यामुळे अपीलार्थीची विनंती मान्य करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि.२५.१०.२००७ रोजी अर्ज करुन. नाशिक जिल्हा परिषदेअंतर्गत सन १९९० ते २००७ या कालावधीत करण्यात आलेल्या अंतरजिल्हा बदली कर्मचाऱ्यांची नावे, किती कर्मचारी बदली करण्यात आली त्यांची नावे इत्यादी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यानी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.१८.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलाकाराने मागणी केलेली माहिती विलंबाने, जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १५.१२.२००७ रोजी अपीलकारास पुरविली. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. या परिस्थितीत मी असे आदश देतो की, जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहत कालावधीत आवश्यकती कारवाई करण्याची दक्षता घ्यावी अशी अभयतांना समज देण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १६.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७५५/२००९

श्री.राजेंद्र काळु नानकर ------ अपीलकर्ता
एन-५३,अे.जे.१/२६/५,
महात्मा फुले नगर, पवननगर,
सिडको, नविन नाशिक-८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
सामान्य प्रशासन, जिल्हा परिषद, नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री.राजेंद्र काळु नानकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०३.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक नियोजन हॉल येथे दि.२५.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने एकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

मात्र अपीलार्थीचे म्हणणे असे की त्यांनी अपील हे औरंगाबाद माहिती आयोगाच्या कार्यालयात केले आहे तेव्हा हे अपील त्याच आयुक्तांनी चालवावे. सध्या नाशिक विभागाचा कार्यभार औरंगाबाद राज्य माहिती आयुक्तांकडे आहे. औरंगाबाद विभागाचा कार्यभार फार अवजड असल्याने नाशिक विभागाच्या कांही अपीलांची सुनावणी स्वत: मुख्य माहिती आयुक्त सर्वांची सोय व्हावी, अपीलार्थी व सरकारी अधिकारी यांचा प्रवास खर्च व वेळ वाचावा म्हणून नाशिकला येऊन सुनावणी घेत असतात. या विशेष सुनावणीत अपीलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पूर्ण संधी देण्यात येते. निकाल आपल्याच बाजूने लागावा अशी मात्र अपेक्षा ठेवणे रास्त नाही. त्यामुळे अपीलार्थीची विनंती मान्य करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि.११.१२.२००७ रोजी अर्ज करुन. सन २००० ते २००७ या कालावधीत किती अधिकारी/कर्मचाऱ्यांना ॲन्टीकरप्शन ब्युरोने ट्रॅप केले. किती अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबीत केले तो कालावधी, अंतर्गत जिल्हा बदलबाबत शासन निर्णयाची प्रत मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.१८.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन ॲन्टीकरप्शन ब्युरोने ट्रॅप केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची व इतर अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विलंबाने दि.११.०२.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिकाऱ्यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदश देतो की, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी

भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहत कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी अभयतांना समज देण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ अपील क्र . ७५४/२००९

श्री.राजेंद्र काळु नानकर ------ अपीलकर्ता
एन-५३,अे.जे.१/२६/५,
महात्मा फुले नगर, पवननगर,
सिडको, नविन नाशिक-८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
सामान्य प्रशासन, जिल्हा परिषद, नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री.राजेंद्र काळु नानकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०३.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक नियोजन हॉल येथे दि.२५.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने एकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

मात्र अपीलार्थीचे म्हणणे असे की त्यांनी अपील हे औरंगाबाद माहिती आयोगाच्या कार्यालयात केले आहे तेव्हा हे अपील त्याच आयुक्तांनी चालवावे. सध्या नाशिक विभागाचा कार्यभार औरंगाबाद राज्य माहिती आयुक्तांकडे आहे. ौरंगाबाद विभागाचा कार्यभार फार अवजड असल्याने नाशिक विभागाच्या कांही अपीलांची सुनावणी स्वत: मुख्य माहिती आयुक्त सर्वांची सोय व्हावी, अपीलार्थी व सरकारी अधिकारी यांचा प्रवास खर्च व वेळ वाचावा म्हणून नाशिकला येऊन सुनावणी घेत असतात. या विशेष सुनावणीत अपीलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पूर्ण संधी देण्यात येते. निकाल आपल्याच बाजूने लागावा अशी मात्र अपेक्षा ठेवणे रास्त नाही. त्यामुळे अपीलार्थीची विनंती मान्य करण्यात आली.

अपीलकाराने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि.११.१२.२००७ रोजी अर्ज करुन. सन २००० ते २००७ या कालावधीत किती अधिकारी/कर्मचाऱ्यांना ॲन्टीकरप्शन ब्युरोने ट्रॅप केले. किती अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबीत केल.त्यांची नावे व कालावधीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन ॲन्टीकरप्शन ब्युरोने ट्रॅप केलेल्या व निलंबीत केलेल्या कर्मचारी / अधिकाऱ्यांबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. २५.०६.२००९ च्या पत्रासोबत अपीलकारास दिली. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती उशिरा दिली. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. असा मुद्या अपीलकाराने व्दितीय अपीलात उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदश देतो की जन माहिती अधिकारी, प्रथम

अपीलीय अधिकारी यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहत कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १८.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/अपील क्र . ८२६/०२

श्री.विजय तुकाराम पवार ------ अपीलकर्ता
१४, सुशिल अपार्टमेंट, निर्मला कॉन्व्हेंट शाळेजवळ,
गंगापूर रोड, नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
अधिक्षक, उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,

जन माहिती अधिकारी तथा
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, सिंचन स्तर,साक्री रोड, धुळे

- वि वे च न -

अपीलकार श्री.विजय तुकाराम पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२५.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दि.२४.०८.२००७ रोजी अर्ज करुन.विभागांतर्गत उपविभागामध्ये वेगवेगळया शिर्षाखाली करण्यात आलेल्या व सुरु असलेल्या कामाच्या एकूण १३ मुद्यांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे दि.१५.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि.३०.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली व मुदतीपुर्वी माहिती घेऊन जाणेबाबत अर्जदारास दि.४.१०.२००७ रोजी कळविण्यात आले होते. सदर माहिती दि.१८.१०.२००७ रोजी टपालाने पुरवठा केली आहे असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि. २०.११.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकाऱ्यांनी लेखी अहवाल सादर करुन असे प्रतिपादन केले की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती दि. ४.१०.२००७ रोजी पोष्टाने अपिलकारास पाठविण्यात आली आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. परंतु सदर माहितीमुळे अपिलकाराचे समाधान झालेले नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्धवट माहिती पुरविली व अर्जदारास निष्फळ केले असल्याचा मुद्याही व्दितीय अपिलात व्दितीय अपिलात अपिलकाराने उपस्थित केला. सदर बाब लक्षात घेता या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रथम अपिलकारास कार्यालयातील संबंधित नस्ती/कागदपत्र निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन द्यावीत व त्यानंतर अपिलकाराने निवडलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी उपलब्ध करुन द्याव्यात.

आदेश

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २०.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/अपील क्र . ७९५/०२

श्री.यशवंत आनंदा सोनवणे, ------ अपीलकर्ता
घ.नं. १२८, शनिवार वार्ड, आझाद चौक,
मालेगांव, ता.मालेगांव, जि. नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
मालेगांव महानगरपालिका, ता.मालेगांव, जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मालेगांव महानगरपालिका, ता.मालेगांव, जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री.यशवंत आनंदा सोनवणे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दि.२५.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. सुनावणीच्यावेळी अपीलकाराचे म्हणणे एकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. ८.१२.२००६ रोजी अर्ज करुन घर क्रमांक १२८ शनिवार वॉर्ड येथे बांधकामाच्या परवानगीसाठी आलेल्या अर्जाचा व देण्यात आलेल्या परवानगीबाबतच्या अनुषंगिक ५ मुद्यांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली. त्यावर त्यांचे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे दि.१६.०१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि.५.२.२००७ रोजी ८ दिवसाचे आत माहिती देण्याचे आदेश पारित केले पण अर्जदारास माहिती न मिळाल्यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलकाराने जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज करुन घर क्रमांक १२८ शनिवार वॉर्ड येथे बांधकामाच्या परवानगीसाठी आलेल्या अर्जाचा व देण्यात आलेल्या परवानगीबाबतच्या अनुषंगिक माहिती मागितली होती. माहितीपोटी रु.८०/- एवढे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकारास दि.२१.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले होते असे अपिलातील कागदपत्रांवरुन दिसून येते. अर्जदाराचे दिलेल्या माहितीची समाधान झालेले दिसत नाही. त्यामुळे त्यांना संपुर्ण नस्ती दाखवावी व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात. तसेच साक्षांकित न केलेल्या १ प्रतिसाठी (सर्वसाधारण आकाराचा कागद) रुपये २/- या प्रमाणे शुल्क आकारायचे असते. जर या नियमास डावलून जास्त रक्कम घेतली असेल तर ती अर्जदारास प्ररत करावी.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १८.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००८/नाशिक/सीआर-६७७ व सीआर- ६७८/०२

श्री.राजेंद्र काळु नानकर ------ अपीलकर्ता
एन-५३,अे.जे.१/२६/५,
महात्मा फुले नगर, पवननगर,
सिडको, नविन नाशिक-८
विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
पोलीस उप आयुक्त (परिमंडळ), नाशिक शहर, नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-२,नाशिक शहर,नाशिक

सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-२,नाशिक शहर,नाशिक
व्दितीय अपील (सीआर ६७७) यांच्या विरुध्द आहे. मात्र सुनावणी सूचना त्यांना पाठविलेली नव्हती.

- वि वे च न -

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : १५.०४.२००८

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक:
२५.०४.२००८,८.५.२००८,१६.५.२००८,२९.११.२००८,
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. :२७.०५.२००९
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : निरंक माहिती देण्याबाबत तोंडी आदेश दिले होते. अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.२३.०६.२००९ च्या अहवालात नमूद केले आहे.
व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २५.०७.२००८ (औरंगाबाद खंडपीठाकडे व्दितीय अपील दाखल केले)

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :

अंबड पोलीस स्टेशन मधील कार्यरत असलेले पोलीस कॉन्स्टेबल, रमेश सोनवणे यांनी कार्यकालात कोणकोणत्या पोलीस स्टेशनला काम केले, प्रत्येक बदलीबाबत माहिती, त्यांचे विषयी नागरिक, राजकीय पक्ष याजकडून प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत, त्यांच्या बदलीसाठी सामाजिक राजकीय पक्षाकडून शिफारस केली असल्यास त्याबाबतची माहिती, शासकीय सेवेतील कार्यकालासंबंधी माहिती मागितली.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:

मागितलेली माहिती तयार असून अतिरिक्त शुल्क रुपये ७/- प्रदान करुन माहिती घेऊन जावी.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

अपील अर्ज दि.२७.०५.२००८ हा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

सुनावणीचा दिनांक : २४.०६.२००९ (नियोजन हॉल,जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत)
अपिलार्थी : उपस्थित

उत्तरवादी (१) : उपस्थित
उत्तरवादी (२) : उपस्थित
उत्तरवादी (३) : अनुपस्थित

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

मात्र अपीलार्थीचे म्हणणे असे की त्यांनी अपील हे औरंगाबाद माहिती आयोगाच्या कार्यालयात केले आहे तेव्हा हे अपील त्याच आयुक्तांनी चालवावे. सध्या नाशिक विभागाचा कार्यभार औरंगाबाद राज्य माहिती आयुक्तांकडे आहे. औरंगाबाद विभागाचा कार्यभार फार अवजड असल्याने नाशिक विभागाच्या कांही अपीलांची सुनावणी स्वत: मुख्य माहिती आयुक्त सर्वांची सोय व्हावी, अपीलार्थी व सरकारी अधिकारी यांचा प्रवास खर्च व वेळ वाचावा म्हणून नाशिकला येऊन सुनावणी घेत असतात. या विशेष सुनावणीत अपीलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पूर्ण संधी देण्यात येते. निकाल आपल्याच बाजूने लागावा अशी मात्र अपेक्षा ठेवणे रास्त नाही. त्यामुळे अपीलार्थीची विनंती अमान्य करण्यात आली.

अपिलार्थी यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडून अनवधानाने माहिती विहित वेळेत दिलेली नाही, असे लक्षात येताच दि. २९.११.२००८ रोजीच्या जैत्राने जन माहिती अधिकारी क्र.. कडून विनामूल्य माहिती पुरविण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी उक्त अधिनियमाच्या कलम १९ (६) मधील तरतूदींचा भंग केला आहे. मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने सर्वसाधारणत: कलम ११ मधील तरतूदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतु जनहिताचा मुद्दा लक्षात घेता माहिती देण्याचा निर्णय योग्यच म्हणावा लागेल.

आदेश

अपिलार्थीस विनामुल्य माहिती देण्यात आलेली आहे त्यामुळे दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांना भविष्यात प्रथम अपिलावर विहित कालावधीत अपिलार्थीस सुनावणीची संधी देऊन आदेश पारित करण्याबाबत कटाक्षाने काळजी घेण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे तसेच सर्व पोलीस स्टेशनला कळवून माहिती घेण्यास वेळ लागला त्यामुळे अर्जदारास माहिती देण्यास वेळ लागला त्यामुळे शास्तीचे आदेश नाही.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,दिनांक: १५.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील-४४९४/०२

श्री.शाम गो. सामंत **------ अपीलकर्ता**
बी-१, स्वप्नभूमी, एस.डे.बोले रोड,
पोर्तुगीज चर्च, दादर मुंबई-२५

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **------- उत्तरवादी**

जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था मुंबई- (१), शहर,

जन माहिती अधिकारी तथा
उप निबंधक,सहकारी संस्था जी/एन वार्ड, मलहोत्रा हाऊस,
६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई ०१

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २०.०३.२००९
सुनावणीचा दिनांक: २२.०७.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

श्री. शाम गो.सामंत यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये प्रितीकान्ता कौ.ऑ.हौ.सोसायटी लि.दादर, मुंबई २८ या संस्थेचे कागदपत्रे/माहिती मिळणेसाठी दि.१.५.२००८ व २.६.२००८ अन्वये अर्ज केलेला होता.

अर्जदार यांनी त्यांनी त्यांच्या माहिती अधिकारांतर्गत केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही संस्था पातळीवरील असल्यामुळे व सदरची माहिती या कार्यालयाकडे दप्तरी उपलब्ध नसल्यामुळे या कार्यालयाने दि. १५.०५.२००८ अन्वये अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती त्यांना देता येत नाही तथापि अर्जदार यांनी संस्थेकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ३२ अन्वये सदरची माहिती प्राप्त करुन घ्यावी. त्यासंबंधी संस्थेसही सुचना देण्यात आलेल्या होत्या.

अर्जदार यांनी या संबंधी प्रथम जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (१) मुंबई शहर, यांचेकडे अपील केले होते. सदर प्रकरणी प्रथम जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांचे कडील दिनांक १४.०८.२००८ चे प्राप्त झालेल्या आदेशामध्ये नमूद केल्या प्रमाणे या कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(२) दि.५.०८.२००८ अन्वये संस्थेस निर्देश देण्यात आलेले आहेत. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अजूनहि यांचेकडून माहिती मिळाली नाही असे सांगितले.

सदर निर्देशाचे संस्थेने पालन केलेले नाही असे या कार्यालयाचे निदर्शनास आलेले असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(३) अन्वये प्राधिकृत अधिकारी नेमून सदरची अपेक्षित माहिती संस्थेकडून प्राप्त होताच अर्जदार यांना देण्यात येतील. असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहकारी संस्था, जीएन विभाग, मुंबई यांनी दिले.

नुकतेच मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद बेंचने असे रिपीटेशन १३०४/०८ मध्ये असे अंतरीम आदेश दिलेले आहेत की, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ या अंतर्गत सोसायटीचा नफा तोटा लेखे व बॅलन्स शीट एवढे सोडून इतर कोणतीही माहिती देण्यात येऊ नये. मात्र सहकारी कायद्याखाली माहिती मिळवून देण्याच्या बाबतीत कार्यवाही ही सहकार विभागाला निश्चीतपणे करता येते व त्यांनी ती करावी. अर्जदारास माहिती मिळवून देण्यास अर्जदाराचा मुळ माहितीचा अर्ज हा बराच जुना आहे हे लक्षात घेता विभागाने अर्जदारास एक महिन्याच्या आत सहकारी कायद्या अंतर्गत माहिती देणे अपेक्षित राहील.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २३.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील-४५०३/०२

श्री.रमेश नागनाथ कदम ----- अपीलकर्ता
ए/१,नागनाथ कंपाऊंड,गणेश चौक,काजुपाडा,
बोरिवला (पूर्व), मुंबई -६६

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
विशेष कार्यकारी अधिकारी, (पंरा-२) ग्रामविकास व जलसंधारण
विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी (पंरा-२) ग्रामविकास व जलसंधारण
विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २५.०३.२००९
सुनावणीचा दिनांक: २३.०७.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या जिल्हापरिषद पंचायत समिती मधील पदाधिकाऱ्यांच्या संदर्भात नावे, तारखा, पदे व मतदारसंघ अशी माहिती स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आल्या पासून ते आज पर्यंत प्रत्येक निवडणूकीच्या कालावधीची माहिती पाहिजे होती. अर्जदाराने मागणी केलेला मुद्या हा मंत्रालयाच्या ग्रामविकास विभागा मध्ये नसल्यामुळे व ते संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये असल्यामुळे अर्जदारास जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेण्यास कळविण्यात आले व माहिती देण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले. प्रथम अपीलाच्या वेळेला अर्जदाराने सर्व जिल्हापरिषद प्रचायत समिती निवणूकीतील निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या जिल्हा निहाय, तालुका निहाय विस्तृत माहिती पाहिजे अशी व्याप्ती वाढविली अपिलीय स्टेजला अशी व्याप्ती वाढविता येणार नाही. अपील हे मुळ अर्जाशी संबंधीतच असले पाहिजे जास्तीची माहिती पाहिजे असेलतर अर्जदारास वेगळा अर्ज करावा लागेल. ग्रामविकास विभागात अशी संपूर्ण जिल्हयाची माहिती संकलित करुन ठेवल्या जात नसल्याने ज्या जिल्हयाची माहिती पाहिजे असेल त्या जिल्हयाकडून माहिती घेणे हे जास्त श्रेयस्कर ठरेल. अर्जदार स्वत: उपस्थित नसल्यामुळे त्याचे म्हणणे समजून घेता आले नाही.

आदेश
अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २३.०७.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ. २००९/अपील-४५०४/०२

श्री.अर्जुनलाल एम.छाबरिया ----- अपीलकर्ता
बेला विस्ता, फ्लॅट नं.१५, ३ रा मजला,
अपो. लेक आणि एज.आय.सी. ऑफीस,
एस.व्ही.रोड, बांद्रा (प.)
मुंबई ५०

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
उप विभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ९ वा मजला,
वांद्रे (पूर्व),मुंबई- ५१

जन माहिती अधिकारी तथा
तहलिदार,तहसिलदार अंधेरी यांचे कार्यालय, दादाभाई नौरोजी रोड,
अंधेरी (पू),मुंबई ५८

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २५.०४.२००९
सुनावणीचा दिनांक: २३.०७.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

